अकोला । गुरुवार
दि. २४ जुलै २०२५
वर्ष : १९ अंक : १४४
पाने : ८ + ४

दैनिक **अजिंक्य भारत** बातम्यांचा गतिमान पाठलाग

www.ajinkyabharat.com

स्वागत मूल्य ३ रुपये





मँचेस्टर कसोटीत केएल राहुलचा नवा पराक्रम!
(पान ७ वर)

## महत्त्वाचे

### त्यांचे चेहरे लवकरच समोर येतील- वडेट्टीवार



**मुंबई :** राज्यात हनी ट्रॅपची सध्या जोरदार चर्चा सुरु असताना, रोज होणाऱ्या नवीन खुलाशांमुळे राज्य शासनाच्या अडचणी वाढत असल्याचे चित्र आहे. यातच काँग्रेसचे नेते विजय वडेट्टीवार यांनी या प्रकरणाचा लवकरच खुलासा होणार असून झाकलेले चेहरे समोर येतील, असा दावा केला आहे. विजय वडेट्टीवार दावा करताना म्हणाले की, हनी ट्रॅपचे खूप मोठे रॅकेट आहे. त्यात अनेक मोठे मासे अडकले आहेत. साधारण ५० मंत्री आणि अधिकारी यात अडकले आहेत. तसेच मोठे अधिकारी, मंत्री, राजकारणातले अनेक आजी-माजी मंत्री हनी ट्रॅपमध्ये आहेत. ज्याचे नाव पुढे आले, त्या प्रफुल लोढाने व्हिडीओ दाखवून अनेकांकडून पैसे घेतले आहेत. त्याने किमान २०० कोटींची वसुली केली आहे. लोढा हा कुणाचा कार्यकर्ता आहे, हे मी बोलणार नाही. पण या सगळ्या प्रकरणाचा खुलासा लवकर होईल. जे झाकलेले चेहरे आहेत ते समोर येतील, असा दावाही विजय वडेट्टीवार यांनी केला आहे.

### खर्गे म्हणतात, काहीतरी गडबड आहे



**नवी दिल्ली :** उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांच्या राजीनामा प्रकरणात काहीतरी गडबड असल्याचा दावा राज्यसभेतील काँग्रेस नेते मल्लिकार्जुन खर्गे यांनी केला असून, त्यांनी या विषयावर सरकारकडून स्पष्टीकरण मागितले आहे. धनखड भारतीय जनता पार्टी आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या लोकांपेक्षाही जास्त भाजप-आरएसएसचा बचाव करत असत, तरीही त्यांना राजीनामा द्यावा लागला असे खर्गे यांनी म्हटले आहे. ते म्हणाले, सरकारने धनखड यांना राजीनामा का दिला, त्याची कारणे काय आहेत, त्यामागील रहस्य काय आहे याचे उत्तर द्यावे. आम्हाला वाटते की काहीतरी गूढ आहे. ते आजारी असल्याचे दिसत नाही आणि त्यांच्याकडून नेहमीच चांगले शब्द ऐकायला मिळतात. पण अचानक काय झाले? ते भाजप-आरएसएसच्या लोकांपेक्षाही जास्त भाजप आणि आरएसएसचा बचाव करत असत. इतकी निष्ठा असूनही, त्यांचा राजीनामा आश्चर्यकारक आहे.

### संसदेत ऑपरेशन सिंदूरवर पुढच्या आठवड्यात चर्चा

**नवी दिल्ली :** ऑपरेशन सिंदूरवर पुढील आठवड्यात लोकसभेत १६ तास तर राज्यसभेत ९ तास चर्चा होईल. सोमवारी लोकसभेत तर मंगळवारी राज्यसभेत चर्चा केली जाणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी २९ तारखेला म्हणजे मंगळवारी राज्यसभेत या विषयावर माहिती देतील. संसदेत दर आठवड्याला एक चर्चा सत्र आयोजित करण्याची मागणी विरोधी पक्षांकडून लावून धरण्यात आली होती. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अनुपस्थितीमुळे पहलगाम दहशतवादी हल्ल्यावरची चर्चा काल म्हणजेच मंगळवारी होऊ शकली नाही. कालच्या तहकूबीबाबत विरोधी पक्षांनी म्हटले आहे की, व्यवहार सल्लागार समितीची बैठक वारंवार रद्द करणे योग्य नाही. आता सभागृहाची बैठक गुरुवारी होणार आहे, ज्यामध्ये निवृत्त खासदारांना निरोप दिला जाईल. काही विरोधी खासदारांनी उपराष्ट्रपती आणि राज्यसभेचे अध्यक्ष जगदीप धनखड यांना निरोप देण्यासाठी सभागृहात चर्चेची मागणीही केली, जी सत्ताधारी पक्षाने मान्य केली नाही.

# ईडी सुपरकॉप नाही; मद्रास उच्च न्यायालयाचा दणका

## ९०१ कोटींची जप्ती कारवाई रद्द




**चेन्नई, दि. २३** वृत्तसंस्था

सक्तवसुली संचालनालय (ईडी) ही काही "सुपरकॉप" नाही, जी समोर येणाऱ्या प्रत्येक प्रकरणाची चौकशी करू शकेल, अशा कडक शब्दांत मद्रास उच्च न्यायालयाने ईडीला फटकारले आहे. आरकेएम पॉवरजेन प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीच्या ९०१ कोटी रुपयांच्या मुदत ठेवी गोठवण्याचा ईडीचा निर्णय न्यायालयाने रद्दबातल ठरवला असून, तपास यंत्रणेच्या अमर्याद अधिकारांवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारा हा एक महत्त्वाचा निकाल मानला जात आहे.

न्यायमूर्ती एम. एस. रमेश आणि न्यायमूर्ती व्ही. लक्ष्मीनारायण यांच्या खंडपीठाने स्पष्ट केले की, जोपर्यंत मनी लाँड्रिंग प्रतिबंधक कायद्यांतर्गत एखादा मूळ गुन्हा नोंदवला जात नाही, तोपर्यंत ईडीला या कायद्यांतर्गत कारवाई करण्याचे अधिकार नाहीत. आधी अनुसूचित गुन्हेगारी कृत्य घडले पाहिजे आणि त्यातून गुन्हेगारी उत्पन्न निर्माण झाले पाहिजे, त्यानंतरच ईडीची पीएमएलए अंतर्गत भूमिका सुरू होते, असे न्यायालयाने अधोरेखित केले. हे प्रकरण २००८ मध्ये फतेहपूर पूर्व कोळसा खाणीच्या वादग्रस्त वाटपाशी संबंधित आहे. ही खाण संरक्षित वनक्षेत्रात असल्याचे उघड झाल्यानंतर २०१४ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने हे वाटप रद्द केले होते. सीबीआयने २०१४ मध्ये याप्रकरणी गुन्हा दाखल केला, परंतु पुराव्याअभावी क्लोजर रिपोर्ट सादर केला. तथापि, २०१७ मध्ये एका विशेष न्यायालयाने पुढील तपासाचे आदेश दिले. या आधारावर ईडीने २०१५ मध्ये आरकेएम पॉवरजेनची खाती गोठवली होती, परंतु उच्च न्यायालयाने त्याच वर्षी ही कारवाई रद्द केली होती. मूळ गुन्हाच नसल्याने २०२२ मध्ये उच्च न्यायालयाने ईडीला पीएमएलए अंतर्गत पुढील तपास करण्यापासून रोखले होते. असे असतानाही, २०२३ मध्ये सीबीआयने पुरवणी आरोपपत्र दाखल केल्यानंतर ईडीने पुन्हा तपास सुरू केला आणि २०२५ च्या सुरुवातीला कंपनीच्या मुदत ठेवी गोठवल्या. ईडीची ही

### सीबीआय आरोपपत्र म्हणजे स्वयंचलित अधिकार नाही

सीबीआयने आरोपपत्र दाखल केले म्हणजे ईडीला आपोआप तपासाचे अधिकार मिळत नाहीत. जोपर्यंत आरोपपत्रातून गुन्हेगारी उत्पन्नाचा संबंध स्पष्ट होत नाही, तोपर्यंत ईडीची कारवाई समर्थनीय ठरू शकत नाही. परकीय चलन व्यवस्थापन कायद्याच्या उल्लंघनाचा वापर पीएमएलए अंतर्गत कारवाई सुरू करण्यासाठी मागील दार म्हणून केला जाऊ शकत नाही. फेमाचे उल्लंघन म्हणजे आपोआप मनी लाँड्रिंग होत नाही. ईडीने ज्या विदेशी गुंतवणुकीवर राउंड-ट्रिपिंगचा संशय व्यक्त केला होता, ती गुंतवणूक पूर्णपणे पारदर्शक आणि रिझर्व्ह बँकेला संपूर्ण माहिती देऊन करण्यात आल्याचेही न्यायालयाने नमूद केले.

नवीन कारवाई फेटाळून लावताना उच्च न्यायालयाने म्हटले की, (पान २ वर)

# माणिकराव कोकाटे यांचे कृषी मंत्रीपद जाणार?

## मकरंद पाटील यांच्याकडे कृषी खाते सोपविले जाण्याची शक्यता





**मुंबई, दि. २३** वृत्तसंस्था

राज्याचे कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांचे विधानसभेतील रमी प्रकरण राजकारणात चांगलेच तापले असून, त्यांच्या राजीनाम्याची मागणी दिवसागणिक जोर धरू लागली आहे. मात्र, मी काही चुकीचे केलेच नाही असे म्हणत कोकाटे यांनी कृषिमंत्री पदाचा राजीनामा देणार नसल्याचे जाहीर केले. मात्र, आता कोकाटे यांच्याकडून कृषी खातं काढून घेतलं जाणार असल्याची माहिती सूत्रांकडून मिळाली आहे. त्याऐवजी मकरंद पाटील यांना कृषी खातं सोपवण्यात येऊ शकतं असा अंदाज आहे.

रमी प्रकरणाविषयी कोकाटे यांनी आपली बाजू स्पष्ट जरी केली असली तरी, त्यांच्या काही वक्तव्यामुळे पक्षाने त्यांच्याविषयी नाराजी देखील व्यक्त केली आहे. त्यामुळे त्यांचे मंत्रीपद तातडीने रद्द होणार नाही, मात्र त्यांना कृषीखात्याच्या जबाबदारीतून हटवले जाणार असल्याचे म्हटले जात आहे. त्याऐवजी त्यांना सध्या मकरंद पाटील यांच्याकडे असलेले मदत आणि पुनर्वसन खातं सोपवले जाईल, असा अंदाज आहे. विधानपरिषदेत रमी खेळणे, शेतकऱ्यांसंदर्भात वारंवार वादग्रस्त वक्तव्य करणे यामुळे माणिकराव कोकाटेंविषयी नाराजी वाढत चालली आहे. तसेच त्यांची वक्तव्य सरकारला अडचणीत टाकणारी ठरत आहेत. पण म्हणून त्यांना मंत्रीपदावरून तात्काळ काढणे योग्य ठरणार नसल्यामुळे, फक्त त्यांच्या खात्यात बदल केले जाणार असल्याचे पक्षातील वरिष्ठ नेत्यांचे मत आहे. गेल्या काही दिवसांपासून वादग्रस्त वक्तव्य तसेच सभागृहात रमी खेळत असतानाचा व्हिडिओ व्हायरल झाल्याने महायुतीतील मंत्री असलेले माणिकराव कोकाटे हे राज्यभरात चर्चेचा विषय ठरले आहेत. विरोधकांकडून त्यांच्या राजीनाम्याची मागणी देखील (पान २ वर)

# महायुतीचा महामंडळ वाटपाचा फॉर्म्युला ठरला!

## भाजप- ४४, शिवसेना (शिंदे गट)- ३३, राष्ट्रवादी (अजित पवार)- २३ महामंडळे



**मुंबई, दि. २३** वृत्तसंस्था

मागच्या काही महिन्यांपासून राज्यातील विविध महामंडळांवर नियुक्त्या करण्याबाबत महायुतीमध्ये असणारा तिढा अखेर सुटला आहे. महायुतीच्या समन्वय समितीच्या नुकत्याच पार पडलेल्या बैठकीत महामंडळ वाटपाचे सूत्र निश्चित करण्यात आले आहे. या सूत्रावर महायुतीमधील तिन्ही पक्षांचे एकमत झाले आहे.

**काय आहे फॉर्मुला? :** मागील काही महिन्यांपासून महामंडळाच्या वाटपावरून महायुतीमध्ये चर्चा सुरू होती. आज महायुतीच्या समन्वय समितीची बैठकदेखील पार पडली. या बैठकीमध्ये महामंडळाच्या वाटपावर चर्चा होऊन फॉर्मुला निश्चित करण्यात आला आहे. भाजपच्या वाट्याला सर्वाधिक ४४ महामंडळे, शिंदे यांच्या शिवसेनेला ३३, तर अजित पवार यांच्या राष्ट्रवादीला २३ महामंडळं मिळणार आहेत. यामुळे महायुतीतील 'मोठा भाऊ' कोण ? हेदेखील आता स्पष्ट झाले आहे.

**महत्त्वाच्या महामंडळांवरून रस्सीखेच सुरु :** एकीकडे कोणत्या पक्षाच्या वाट्याला किती महामंडळ हे निश्चित (पान २ वर)

### पूजा खेडकरचे नॉन क्रिमिलेअर रद्द!



**नाशिक :** भारतीय प्रशासकीय सेवेतील (आयएएस) बडतर्फ प्रशिक्षणार्थी पूजा खेडकरच्या नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र प्रकरणाची सुनावणी पूर्ण होऊन हे प्रमाणपत्र रद्द करण्याचा निर्णय नाशिक विभागीय आयुक्त कार्यालयाने घेतला आहे. कोट्यवधींची संपत्ती व महागडी वाहने असताना नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र तिने मिळवल्याचा आक्षेप होता. यात तथ्य आढळल्याने विभागीय आयुक्त कार्यालयाने हे प्रमाणपत्र रद्द करण्यात आले असल्याचा अहवाल राज्य शासनाला (पान २ वर)

# ईडीने सुरू केली मिंत्राची चौकशी

## आर्थिक अफरातफरीचा संशय




**बंगळुरू, दि. २३** वृत्तसंस्था

भारतातील प्रसिद्ध फॅशन ई-कॉमर्स प्लॅटफॉर्म मिंत्राची सक्तवसुली संचालनालय अर्थात ईडीने चौकशी सुरू केली आहे. मिंत्राची परकीय चलन व्यवस्थापन कायदा (फेमा) अंतर्गत चौकशी सुरू आहे. सरकारच्या थेट परकीय गुंतवणुकीच्या नियमांचे उल्लंघन केल्याचा आरोप मिंत्रावर आहे.

मल्टी ब्रँड रिटेल ट्रेडिंग करणाऱ्या मिंत्राने स्वतःला "घाऊक रोख आणि करी" व्यवसाय म्हणून दाखवले. बंगळुरू येथील ईडीच्या कार्यालयाने मेसर्स मिंत्रा डिझाइन्स प्रायव्हेट लिमिटेड (मिंत्रा) आणि त्यांच्या संबंधित कंपन्या आणि त्यांच्या संचालकांविरुद्ध परकीय चलन व्यवस्थापन कायदा, १९९९ (फेमा) च्या कलम १६(३) अंतर्गत १६५४,३५,०८,९८१ रुपयांच्या उल्लंघनाचा गुन्हा दाखल केला आहे. मिंत्राने कागदोपत्री त्यांचे बहुतेक सामान मेसर्स वेक्टर ई-कॉमर्स प्रायव्हेट लिमिटेडला विकले आहे. हे व्यवहार कागदोपत्री दाखवून मिंत्रा आर्थिक गैरव्यवहार करत आहे. कायद्याचे उल्लंघन करत, कर देण्याऐवजी मिंत्रा पैसे फिरवत आहे, असाही आरोप ईडीने केला आहे. मिंत्रा २००७ - ०८ दरम्यान भेटवस्तूंच्या विक्रीसाठी सुरू केलेली कंपनी. पुढे २०११ मध्ये त्यांनी फॅशन आणि (पान २ वर)

# नवीन उपराष्ट्रपतींची निवडणूक १९ सप्टेंबरपूर्वी होणार!




**नवी दिल्ली, दि. २३** वृत्तसंस्था

२१ जुलै रोजी उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी अचानक आरोग्याच्या कारणास्तव राजीनामा दिल्यानंतर भारतातील राजकीय यंत्रणा गोंधळात पडली होती. दरम्यान, राज्यसभेचे उपाध्यक्ष हरिवंश नारायण सिंह यांनी वरिष्ठ सभागृहाचे कार्यवाहक अध्यक्ष म्हणून पदभार स्वीकारला आहे, जे घटनात्मकदृष्ट्या उपराष्ट्रपतींचे पद आहे.

आता सर्व लक्ष देशाच्या पुढील उपराष्ट्रपतींच्या निवडीवर आहे आणि निवडणूक आयोगाला १९ सप्टेंबरपूर्वी ६० दिवसांच्या आत निवडणूक घ्यावी लागेल. मात्र, ही निवडणूक जनतेद्वारे थेट होत नाही. उपराष्ट्रपतींची निवड संसदेच्या दोन्ही सभागृहांच्या सर्व विद्यमान खासदारांकडून प्रमाणशीर प्रतिनिधित्व आणि एकल हस्तांतरणीय मतदान प्रणालीद्वारे केली जाते. उपराष्ट्रपती हे केवळ एक औपचारिक व्यक्तिमत्व नाही. ते राज्यसभेचे अध्यक्षपद भूषवतात आणि अनेकदा महत्त्वाच्या कायदेविषयक चर्चा आणि निर्णयांचे मार्गदर्शन करतात. नवीन उपराष्ट्रपतींच्या निवडीपूर्वी संसदेत महत्त्वाची विधेयके कशी हाताळली जातात यावर ही भूमिका अवलंबून आहे. (पान २ वर)

# देशभरात मान्सूनचा कहर!

## अनेक राज्यांना अलर्ट : विजेच्या झटक्याने सात महिलांचा मृत्यू



**नवी दिल्ली, दि. २३** वृत्तसंस्था

देशात मान्सून सक्रिय झाल्याने अनेक राज्यांत मुसळधार पावसाचा कहर सुरु आहे. झारखंडमध्ये चार तर बिहारमध्ये तीन महिलांचा विजेच्या झटक्याने मृत्यू झाला असून दोन महिला भाजल्या आहेत. मात्र, पाटणा हवामान केंद्रानुसार सध्या बिहारमध्ये मान्सून कमजोर झाला असून पुढील ४८ तासांत पावसाची शक्यता नाही.

जम्मू आणि काश्मीरच्या उधमपूर जिल्ह्यात मुसळधार पावसामुळे भूस्खलन झाले असून पुढील ७२ तासांत मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा इशारा भारतीय हवामान विभागाने (आयएमडी) दिला आहे. काल राजौरी जिल्ह्यात सैन्य कॅम्पची भिंत कोसळून तीन कारचे नुकसान झाले. वाराणसीत गंगेची पातळी घटत असून बुधवारी दरताश २ सेंटीमीटरने घट झाली आहे. सध्या गंगेची पातळी ६९.२४ मीटर आहे, पण अजूनही ८४ घाट पाण्याखाली आहेत. वरुणा भागात ३०,००० लोकसंख्या प्रभावित असून ४०० कुटुंबांना मदत छावण्यांमध्ये हलवण्यात आले आहे. राष्ट्रीय आपत्ती निवारण दलाच्या (एनडीआरएफ) टीम्सना वाराणसीतील पूरग्रस्त भागांमध्ये तैनात करण्यात आले आहे. कुणीही अडकलेला नसावा यासाठी सातत्याने गस्त घालण्यात येत आहे. मात्र, (पान २ वर)

# अल- कायदाच्या चार संशयितांना अटक; गुजरात एटीएसची कारवाई



**अहमदाबाद, दि. २३** वृत्तसंस्था

गुजरातच्या दहशतवाद विरोधी पथकाने अर्थात एटीएसने अल-कायदा या कुख्यात दहशतवादी संघटनेशी संबंधित चार संशयित दहशतवाद्यांना अटक केली आहे. एटीएसचे डीआयजी सुनील जोश यांनी याबाबत माहिती दिली. त्यापैकी दोघांना गुजरातमधून, एकाला दिल्लीतून आणि एका दहशतवाद्याला नोएडामधून अटक करण्यात आली आहे. हे चौघेही अल-कायदाच्या विचारसरणीचा प्रचार करत होते. हे दहशतवादी बऱ्याच काळापासून सक्रिय होते. गुजरात एटीएसला एक गुप्त माहिती मिळाली. त्यानंतर एटीएसने तपास सुरू केला. योग्य कारवाई करण्यात आली आणि त्यानंतर त्यांना अटक करण्यात आली. एटीएसच्या मते, ते सोशल मीडियाद्वारे त्यांच्या गटात लोकांना जोडत होते आणि त्यात अल-कायदाचा प्रचार करत होते. ही माहिती मिळाल्यानंतर गुजरात एटीएसने झिशान, फरदीन, सैफुल्ला आणि फारिक यांना अटक केली आहे. अटक करण्यात आलेल्या आरोपींचे वय २० ते २५ वर्षे असल्याचे सांगितले जात आहे. हे दहशतवादी मोठ्या दहशतवादी हल्ल्याचा कट रचत होते असा दावा केला जात आहे.

# संसदेत गोंधळ; जनतेच्या पैशांचा अपव्यय!

## विरोधकांच्या गोंधळामुळे संसदेचे कामकाज पूर्णपणे ठप्प



**नवी दिल्ली, दि. २३** वृत्तसंस्था

संसदेचे पावसाळी अधिवेशन २१ जुलैपासून सुरू झालंय. मात्र पहिल्याच दिवशी विरोधकांच्या गोंधळामुळे संसदेचं कामकाज पूर्णपणे ठप्प झालं. प्रत्येक मिनिटाला सुमारे अडीच लाख रुपये खर्च होणाऱ्या या संसदेच्या २१ दिवसांच्या अधिवेशनासाठी तब्बल १८९ कोटी रुपये खर्च होणार आहेत. हा पैसा जनतेच्या करातून येतो आणि गोंधळामुळे तो वाया जातोय? यावर सरकारसह विरोधक गंभीर नाहीत का, जनतेच्या पैशांचा कशासाठी चुराडा केला जातोय.

पावसाळी अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी प्रश्नोत्तराच्या तासातच लोकसभेचे कामकाज स्थगित करावं लागलं. दुपारी १२ वाजेपर्यंत आणि नंतर २ वाजेपर्यंत संसदेचं कामकाज पुढे ढकलण्यात आलं. विरोधकांनी बिहारमधील निवडणूक आयोग प्रक्रिया आणि ऑपरेशन सिंदूरवर चर्चेची मागणी केली. सरकारने सर्व विषयांवर चर्चेसाठी तयारी दाखवली, मात्र विरोधकांनी गोंधळ घातलाच. संसदेचा प्रत्येक मिनिटाचा खर्च हा जनतेच्या खिशातून जातो. जर विरोधक आणि सत्ताधाऱ्यांनी एखाद्या विषयावर योग्य चर्चा केली तरच हा पैसा देशाच्या विकासासाठी खर्च होईल. मात्र गोंधळामुळे जनतेच्या पैशांचा अपव्यय होतोय. हा गोंधळ नवीन नाही. मागील काही वर्षांत पेगासस प्रकरण, राफेल करार, हिंडनबर्ग अहवाल यांसारख्या मुद्द्यांवर विरोधकांनी संसदेचं कामकाज ठप्प केलं आहे. २०२३ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात हिंडनबर्ग अहवालावरून आणि बीबीसीच्या प्रचारात्मक माहिती पटावरूनही गोंधळ घातला. त्यामुळे संसदेचा वेळ आणि जनतेचा बराच पैसा वाया गेला.

संसदेचा प्रतिमिनिट खर्च अडीच लाख रुपये आहे. यंदा २१ दिवसांत १२६ तास म्हणजेच ७५६० मिनिटांच्या कामकाजाचे नियोजन आहे. या हिशोबाने संसदेच्या पावसाळी अधिवेशनाचा खर्च १८९ कोटींच्या घरात जातो. यात खासदारांना प्रतिदिन भत्त्याच्या अडीच हजार रुपयांसह इतर अनेक खर्चांचा समावेश आहे.

# देशात सायबर गुन्हेगारीत प्रचंड वाढ!

## ५ वर्षांत दुपटीहून अधिक प्रकरणे



**नवी दिल्ली, दि. २३** वृत्तसंस्था

भारतात सायबर गुन्हेगारीचा आलेख चिंताजनकरित्या वाढत असल्याचे समोर आले आहे. नॅशनल क्राइम रेकॉर्ड ब्युरोच्या क्राईम इन इंडिया अहवालानुसार, गेल्या पाच वर्षांत सायबर गुन्हेगारीच्या प्रकरणांमध्ये दुपटीहून अधिक वाढ झाली आहे. केंद्रीय गृह राज्यमंत्री बंडी संजय कुमार यांनी लोकसभेत एका प्रश्नाच्या लेखी उत्तरात ही धक्कादायक आकडेवारी सादर केली.

आकडेवारीवरून सायबर गुन्हेगारीचा चढता आलेख स्पष्ट दिसतो. विशेष म्हणजे, देशातील वृद्ध व्यक्तींनी (ज्येष्ठ नागरिकांनी) दाखल केलेल्या सायबर गुन्ह्यांच्या तक्रारींची विशिष्ट आकडेवारी नॅशनल क्राइम रेकॉर्ड ब्युरोद्वारे स्वतंत्रपणे नोंदवली जात नाही, त्यामुळे ज्येष्ठ नागरिकांवरील सायबर हल्ल्यांची खरी व्याप्ती अजूनही अस्पष्ट आहे. भारतीय राज्यघटनेनुसार पोलिस आणि सार्वजनिक सुव्यवस्था या सेवा राज्यांच्या अखत्यारीत येतात. त्यामुळे राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांची कायदा अंमलबजावणी करणारी संस्था सायबर गुन्हे आणि वृद्धांवरील सायबर गुन्हे रोखण्यासाठी, शोधण्यासाठी, तपासण्यासाठी (पान २ वर)

**२०१८ ते २०२२ या कालावधीत सायबर गुन्हेगारी**

- २०१८ मध्ये २७,२४८
- २०१९ मध्ये ४४,७३५
- २०२० मध्ये ५०,०३५
- २०२१ मध्ये ५२,९७४
- २०२२ मध्ये ६५,८९३

## पान 1 वरून...

### ईडी सुपरकॉप नाही; मद्रास ...

तपास यंत्रणेने कोणताही नवीन पुरावा किंवा ठोस कारण सादर केलेले नाही. ईडीच्या जप्ती मेमोमध्ये केवळ कायद्यातील तरतुदींची पोपटपंची केली असून, कोणताही सारासार विचार केलेला दिसत नाही, असे ताशेरेही न्यायालयाने ओढले. मूळ गुन्हा अनिवार्य: पीएमएलए अंतर्गत कारवाईसाठी कायद्याच्या अनुसूचीमध्ये नमूद केलेला गुन्हा घडणे अनिवार्य आहे. त्याशिवाय ईडीला हस्तक्षेप करण्याचा अधिकार नाही.

### माणिकराव कोकाटे यांचे ...

जोर धरू लागली आहे. तसेच राज्यभरात विविध ठिकाणी कोकाटे यांच्याविरोधात रस्त्यावरती अनेक आंदोलनंही झाली. त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट हा एकंदरच खूप अडचणीत सापडल्याचे दिसत आहे. कोकाटे यांच्या राजीनाम्याची मागणी जोर धरू लागलेली असतानाच आता कोकाटे यांचं मंत्रीपदाचं खात बदलणार असल्याची माहिती समोर येत आहे. राष्ट्रवादी काँग्रेसमधीलच दुसरे मंत्री असलेले मकरंद आबा पाटील यांच्याकडे असलेलं मदत व पुनर्वसन खातं हे कोकाटे यांना मिळू शकतं. तर कृषीमंत्रीपदाची धुरा ही मकरंद पाटील यांच्या खांद्यावर सोपवली जाण्याची शक्यता आहे. तसेच हा प्रयोग राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाकडून केला जाण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

### महायुतीचा महामंडळ ...

झाले असले तरी महत्त्वाच्या महामंडळाबाबत अद्याप तिन्ही पक्षांमध्ये रस्सीखेच सुरु आहे. मुंबई म्हाडा, सिडको , एमएमआरडीए, एमटीडीसी अशा प्रभावी महामंडळांच्या अध्यक्षपदावर तिन्ही पक्षांकडून दावा करण्यात आला आहे. विशेषतः सिडको आणि म्हाडा या दोन्ही महामंडळांवर शिवसेना (शिंदे गट) आणि भाजपमध्ये रस्सीखेच सुरू आहे.

### पूजा खेडकरचे नॉन क्रिमिलेअर ...

सादर करण्यात आला आहे. भारतीय प्रशासकीय सेवेतील बडतर्फ आयएएस प्रशिक्षणार्थी पूजा खेडकरने दिशाभूल करून नॉन क्रिमिलेयर प्रमाणपत्र मिळविल्याचा गोपनीय अहवाल स्थानिक प्रशासनाने सादर केला होता. या संदर्भात नाशिक विभागीय आयुक्त कार्यालयाने पूजा खेडकरला नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र रद्द का करू नये, अशा आशयाची कारणे दाखवा नोटीस बजावली होती.

### ईडीने सुरू केली मिंत्राची चौकशी

जीवनशैली उत्पादने विकण्यास सुरुवात केली आणि २०१४ मध्ये फ्लिपकार्टने मिंत्रा खरेदी केले. आता मिंत्रा १००० हून अधिक ब्रँडची १.५ लाखांहून अधिक उत्पादने विकते आणि देशातील ९००० पिन कोडवर डिलिव्हरी करते. पण बाजारातील स्थानाचा गैरवापर करुन कर देण्याऐवजी मिंत्रा सातत्याने कायद्यांचे आणि नियमांचे उल्लंघन करत आहे. यामुळे ईडीने चौकशी सुरू केली आहे.

### नवीन उपराष्ट्रपतींची निवडणूक ...

विजयासाठी उमेदवाराला एकूण वैध मतांपैकी बहुमत (५०% पेक्षा जास्त) मिळणे आवश्यक आहे. जर पहिल्या फेरीत कोणाला बहुमत मिळाले नाही, तर कमी मते मिळालेल्या उमेदवाराला बाहेर काढून त्याची मते इतर उमेदवारांना त्यांच्या क्रमाप्रमाणे हस्तांतरित केली जातात, जोपर्यंत एक उमेदवार बहुमत मिळवत नाही. संसदेच्या सध्याच्या संख्येनुसार, सहा रिक्त जागा वगळता ७८२ खासदार मतदान करण्यास पात्र आहेत. उपराष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीत विजयी होण्यासाठी बहुमताचा आकडा ३९२ आहे. पहिल्या पसंतीनुसार किंवा त्यानंतरच्या मतमोजणीत ३९२ किंवा त्याहून अधिक मते मिळवणाऱ्या कोणत्याही उमेदवाराला विजयी घोषित केले जाईल.मात्र, जर विरोधी आघाडी, इंडिया ब्लॉक, अपक्ष आणि लहान पक्षांच्या पाठिंब्याने संयुक्त उमेदवार उभा करण्यात अपयशी ठरली, तर भाजपच्या नेतृत्वाखालील एनडीए युती स्वतःचा उमेदवार नामांकित करण्यासाठी मजबूत स्थितीत असेल.

### देशभरात मान्सूनचा कहर!

पावसाचा जोर कमी झाल्यामुळे गंगा आणि वरुणा या दोन्ही नद्यांच्या पाण्याची पातळी हळूहळू घटत आहे. बंगालच्या उपसागराच्या उत्तरेकडील भागात २४ जुलैपासून कमी दाबाचा नवीन पट्टा तयार होणार असून त्यामुळे देशभरात पुन्हा एकदा जोरदार पावसाची शक्यता आहे. मध्य प्रदेशात मान्सून प्रणाली सक्रीय झाल्यामुळे मंगळवारी भोपाळ, इंदूर, तिकमगडसह २० जिल्ह्यांत मुसळधार पावसाची नोंद झाली. आजही जबलपूर, शेवपूर, मुरैना, नरसिंहपूर, छिंदवाडा, बालाघाट, डिंडोरी, अनूपपूर यासह १५ जिल्ह्यांत अतिवृष्टीचा इशारा देण्यात आला आहे.

### देशात सायबर गुन्हेगारीत प्रचंड वाढ!

आणि खटला चालवण्यासाठी प्रामुख्याने जबाबदार आहेत. मात्र, केंद्र सरकार राज्यांना या क्षमता विकासासाठी विविध योजनांअंतर्गत सल्लामसलत आणि आर्थिक सहाय्य पुरवते. भारतीय सायबर गुन्हे समन्वय केंद्र: देशातील सर्व प्रकारच्या सायबर गुन्ह्यांचा समन्वयाने निपटारा करण्यासाठी केंद्रीय गृह मंत्रालयाने भारतीय सायबर गुन्हे समन्वय केंद्र ची स्थापना केली आहे.

# पालखी उत्सवात भाविकांची गैरसोय टाळा!

## पालकमंत्र्यांच्या अध्यक्षतेत कावड उत्सव नियोजनाबाबत बैठक

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी




### पालकमंत्री ॲड. आकाश फुंडकर यांचे निर्देश

**अकोला, दि. २३ :** जिल्ह्याला पालखी उत्सवाची वैभवशाली परंपरा असून उत्सव काळात कायदा व सुव्यवस्था राखतानाच भाविकांसाठी सर्व आवश्यक सुविधा निर्माण कराव्यात, कुठेही गैरसोय होता कामा नये, मंडळांना आवश्यक परवानग्यांसाठी एक खिडकी योजना राबवावी, असे निर्देश राज्याचे कामगार मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ॲड. आकाश फुंडकर यांनी आज येथे दिले.

जिल्ह्यातील कावड व पालखी उत्सव श्री गणेशोत्सव काळात कायदा व सुव्यवस्थेसह आवश्यक सुविधांचा आढावा पालकमंत्री ॲड. फुंडकर यांच्या अध्यक्षतेखालील बैठकीत नियोजनभवनात घेण्यात आला, त्यावेळी ते बोलत होते. आमदार रणधीर सावरकर, आमदार वसंत खंडेलवाल, जिल्हाधिकारी अजित कुंभार, पोलीस अधीक्षक अर्जित चांडक,जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी अनिता मेश्राम, महापालिका आयुक्त सुनील लहाने, अपर पोलीस अधीक्षक सी.के. रेड्डी, निवासी उपजिल्हाधिकारी विजय पाटील आदी उपस्थित होते.

पालकमंत्री ॲड. फुंडकर म्हणाले की, कावड पालखीसाठी सुरळीत मार्ग, सुरक्षिततेसाठी आवश्यक बॅरिकेटिंग, पेयजल, स्वच्छतागृहे याबरोबरच आवश्यक ठिकाणी आरोग्य पथकांची पुरेशी व्यवस्था असावी. पालखीची मोठी परंपरा व पावित्र्याची जपणूक व्हावी. हा उत्सव शांतता व सुव्यवस्थेसह पार पडावा. कायदे व सुव्यवस्था अबाधित राखून भाविकांना सर्व आवश्यक सुविधा चोखपणे पुरवाव्यात. ही वैभवशाली परंपरा वृध्दिंगत करण्यासाठी मंडळांनीही डॉल्बी डीजेचा वापर टाळून झांजा, ताशे पथक, दिंडी आदी पारंपरिक वाद्यांचा वापर व्हावा, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले. कावड यात्रा, गणेशोत्सव मिरवणूक मार्गावर अतिक्रमणे असल्याच्या तक्रारी मोठ्या प्रमाणावर प्राप्त होत आहेत. अतिक्रमणे असतील तिथे ती तत्काळ काढावीत व मार्ग मोकळा करावा. पर्यायी तसेच ॲप्रोच मार्ग मोकळे असावेत. सुरक्षिततेच्या दृष्टीने रेलिंग, वॉचटॉवर, सीसीटीव्ही, संवेदनशील परिसरात बॅरिकेटिंग, मोठ्या पुलाची दुरूस्ती, रस्त्याावर लोंबकळणाऱ्या तारा दूर करणे आदी सर्व आवश्यक उपाय काटेकोर अंमलात आणावेत, असे निर्देश पालकमंत्र्यांनी दिले. सर्व भाविकांची सुरक्षितता जपली जावी, तथापि दुर्देवाने काही अपघात घडल्यास संबंधीतांना सीएम रिलीफ फंडातून मदत मिळावी यासाठी शासनाकडे पाठपुरावा करण्यात येईल. मात्र अशी घटना घडू नये यासाठी सर्वतोपरी प्रयत्न व्हावे, असे निर्देश त्यांनी दिले.

पारंपरिक वाद्यांचा उपयोग करून डीजेमुक्त उत्सव साजरा करण्याचे आवाहन आमदार श्री. सावरकर यांनी केले. शिवभक्त मंडळ, गणेशोत्सव मंडळाचे प्रतिनिधी तसेच विजय अग्रवाल, सिध्दार्थ शर्मा, अनिल गरड, सतीश ढगे, चंदु सावजी, अमोल गोगे, जयंत मसने, बंटी चौरसिया यांच्यासह अनेक मान्यवरांनी विविध सुचना केल्या. त्यानुसार भाविकांसाठी सर्व आवश्यक सुविधा निर्माण करण्याचे निर्देश पालकमंत्र्यांनी प्रशासनाला दिले.

## मुंडगाव येथे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या वाढदिवसानिमित्त आरोग्य शिबिरांचा ३०० रुग्णांनी घेतला लाभ



दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

### काशिराम साबळे यांचा पुढाकार

**अकोला, दि. २३ :** राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या वाढदिवसानिमित्त मुंडगाव येथे श्रीकृष्ण अवलिया महाराज संस्थान येथे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश सचिव काशीरामजी साबळे यांच्या माध्यमातून मुंडगाव सर्कल मधील नागरिकांसाठी आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात सुमारे ३०० रुग्णांनी लाभ घेतला.

मुंडगाव येथे आयोजित करण्यात आलेल्या आरोग्य शिबिराचे उद्घाटन राष्ट्रवादीचे महाराष्ट्र प्रदेश सचिव काशीरामजी साबळे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष मोहंमद बद्रुजमा, राष्ट्रवादीच्या नेत्या तथा जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा संध्या वाघोळे, छायाताई कात्रे, शारदाताई थोटे, कैलास थोटे, हरिभाऊ वाघोडे, अजाबराव कात्रे, हरिभाऊ वाघोडे. रमेश खोलोकार. डॉ. प्रवीण भीरडे, सौरभ साबळे, दीपक कुयटे, ज्ञानेश्वर वसतकार, रोशन गाडगे, राहुल बुलबुले प्रकाश गाडगे, पांडुरंग गाडगे, गजानन वारकरी, ऋषीं वाघ उपस्थित होते. यावेळी राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष मोहंमद बद्रुजमा म्हणाले की, महाराष्ट्रातील सर्वसामान्य जनता, शेतकरी, कामगार, मजुरांच्या सर्वांगीण विकासासाठी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी अहोरात्र कार्य केले असून जनतेला न्याय दिला आहे. त्यांना उदंड निरोगी, सुदृढ आरोग्यासाठी प्रार्थना केल्याचे मोहंमद बद्रुजमा यावेळी म्हणाले. यावेळी प्रदेश सचिव काशिराम साबळे म्हणाले की, महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासासाठी उपमुख्यमंत्री अजित पवार अहोरात्र झटत आहेत.

## निळा, पिवळा, हिरवा रंग एकत्र आणणार -डॉ. हुलगेश चलवादी

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

### साहित्यरत्न अण्णाभाऊ साठेंच्या जयंतीनिमित्त बसपची पुण्यात बैठक

**पुणे, दि. २३ :** क्रांतीचे कवि, लोकशाहीर, साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त बहुजन समाज पक्षाने (बसपा) पुण्यात एक महत्त्वपूर्ण बैठक घेतली. १ ऑगस्ट रोजी सांगली जिल्ह्यातील त्यांच्या मूळगावी वाटेगाव येथे भव्य जयंती सोहळ्याचे आयोजन करण्यात येणार असून, त्या पार्श्वभूमीवर तसेच आगामी निवडणुकांचा विचार करून या बैठकीत रणनीती आखण्यात आली.

या बैठकीस बसपचे प्रदेशाध्यक्ष ॲड. सुनील डोंगरे, प्रदेश महासचिव व पश्चिम महाराष्ट्र झोनचे मुख्य प्रभारी डॉ. हुलगेश चलवादी, झोन प्रभारी ॲड. संजीव सदाफुले, पुणे जिल्हाध्यक्ष अशोक गायकवाड, अप्पासाहेब लोकरे, दादाराव उईके, तसेच जिल्हा प्रभारी, जिल्हा कमिटी सदस्य, विधानसभा अध्यक्ष आणि इतर पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

बैठकीत ॲड. सुनील डोंगरे यांनी सांगितले की, पक्षाचे विचार घरोघरी पोहोचले पाहिजेत. बूथ आणि सेक्टर पातळीवर संघटन बळकट करणे ही आजची गरज आहे. वंचित, शोषित आणि पीडितांना निळ्या झेंड्याखाली न्याय मिळवून देण्याचे काम प्रत्येक कार्यकर्त्याने करावे.

डॉ. हुलगेश चलवादी म्हणाले, निळा, पिवळा आणि हिरवा या तीन रंगांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या विविध बहुजन घटकांनी एकत्र येणे आवश्यक आहे. असे झाले तर पुणे मनपा, जिल्हा परिषद, पंचायत समित्या आणि ग्रामपंचायतींमध्ये बसपचे यश १००% निश्चित आहे.बैठकीत लखनऊ येथे १३ जुलै रोजी पार पडलेल्या राष्ट्रीय बैठकीत रामचंद्र जाधव यांची महाराष्ट्र राज्य प्रभारीपदी झालेली नियुक्ती जाहीर करून त्यांचा पुणे जिल्हा वतीने सन्मान करण्यात आला. तसेच, २६ जुलै रोजी कोल्हापूर येथे शाहू महाराज जयंती सोहळा पार पडल्याची माहिती देण्यात आली. येत्या २४ सप्टेंबर रोजी पुणे करार धिक्कार दिवस पाळण्याचा निर्णयदेखील बैठकीत घेण्यात आला.

## गोसेवा हरित सेवा उपक्रम २०२५ वृक्षारोपण करून साजरा

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी




**अकोला, दि. २३ :** महा एनजिओ फेंडरेशन पुणे व सेवा धर्म शिक्षण व बहुउद्देशीय संस्था अकोला यांच्या संयुक्त विद्यमाने आदर्श गो सेवा व अनुसंधान प्रकल्प, म्हैसपूर, अकोला मध्ये वृक्षलागवड करून गोसेवा हरित सेवा उपक्रम साजरा करण्यात आला.

गोसेवा हरित सेवा मा. श्री देवेद्रजी फडणवीस यांच्या वाढदिवसाचा आणि शुद्ध देशी गोवंश जतन व संवर्धन दिवसाचा विशेष उपक्रम गोसेवा हरित सेवा उपक्रम२०२५ आदर्श गो सेवा व अनुसंधान प्रकल्प म्हैसपूर अकोला येथे वृक्षारोपन करून साजरा करण्यात आला . या वृक्षलागवड कार्यक्रम ला रमाकांत जी भोपळे, मुकुंद गिरी, रमेश वाजपेयी, श्याम भेंडे, गोपाल दांदले व सेवा धर्म शिक्षण व बहुउद्देशीय संस्था अकोला चे संस्थापक सचिव तथा महा एन जी ओ फ`डरेशन चे अकोला जिल्हा समन्वयक तुषार हांडे सह संस्थेचे पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

मणप्पुरम
HGघर फायनान्स लि.
मनप्पुरम होम फायनान्स लिमिटेड पूर्वी मनप्पुरम होम फायनान्स प्रायव्हेट लिमिटेड
CIN : U65923KL2010PLC039179
नोंदणीकृत कार्यालय: IV/470A (जुने) W/638A (नवीन) मणप्पुरम हाऊस वलपद त्रिशूर, केरळ 680567
कॉर्पोरेशन ऑफिस: मणप्पुरम होम फायनान्स लिमिटेड, तिसरा मजला, युनिट क्रमांक ३०१ ते ३१५, ए विंग, 'कनकिया वॉल स्ट्रीट', अंधेरी-कुर्ला रोड, अंधेरी पूर्व, मुंबई-४०००९३, महाराष्ट्र. फोन क्रमांक: ०२२-६६२११०००, वेबसाइट: www.manappuramhomefin.com
ताबा सुचना (स्थावर मालमत्तेसाठी)
तारीख: २४ जुलै २०२५ | ठिकाण: महाराष्ट्र
अधिकृत अधिकारी मणप्पुरम होम फायनान्स लिमिटेड

## परिचारिकांची ठाम भूमिका : मागण्या लेखी मान्य झाल्याशिवाय आंदोलन थांबणार नाही!




दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. २३ :** जिल्हा स्त्री रुग्णालयातील महिला परिचारिकांनी आपल्या विविध मागण्यांसाठी पुकारलेल्या कामबंद आंदोलनाचा सातवा दिवस आज पूर्ण झाला असून अजूनही शासनाकडून लेखी आश्वासन न मिळाल्याने संतप्त भावना अधिकच उफाळून आली आहे. महाराष्ट्र परिचारिका संघटनेच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन सुरू असून 'आता तोंडी नव्हे, लेखी हवे' अशा स्पष्ट शब्दांत परिचारिकांनी सरकारला इशारा दिला आहे.

संघटनेच्या शारदा खांबालकर व पद्मिनी जोत यांनी सायंकाळी ६ वाजता माध्यमांशी बोलताना सांगितले की, गेल्या काही दिवसांपासून आम्ही शांततेत आंदोलन करत आहोत. मात्र, शासनाकडून केवळ तोंडी आश्वासने दिली जात आहेत. आम्ही वारंवार फसवले गेलो आहोत. आता लेखी निर्णयाशिवाय आंदोलन मागे घेणार नाही.

परिचारिकांच्या प्रमुख मागण्या म्हणजे सेवा सुरक्षा कायदा लागू करणे, मानधन वाढ, सन्मानाने वागणूक आणि कंत्राटी सेवा रद्द करणे. काही मागण्या तोंडी मान्य झाल्याचे सांगितले जात असले तरी लेखी आदेशाशिवाय कुठलाही तोडगा मान्य केला जाणार नाही.

दरम्यान, एक वर्षाखालील सेवा असलेल्या काही परिचारिकांना रुग्णालय प्रशासनाकडून आंदोलनात सहभागी न होण्याच्या सूचना देण्यात आल्या असून त्यांनी माघार घेतली आहे. मात्र एक वर्षांहून अधिक काळ सेवा बजावत असलेल्या परिचारिका अजूनही आंदोलनावर ठाम आहेत. शासनाने वेळकाढूपणा थांबवावा, अन्यथा परिणाम सरकारला भोगावे लागतील, असा इशाराच परिचारिकांनी दिला आहे.

## जिल्हा बाल शोषणमुक्त व्हावा यासाठी जनजागृती

**वाडेगाव :** जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, महिला व बालविकास कार्यालय आणि ॲसेस टू जस्टीस प्रकल्प आय.एस.डब्ल्यू.एस अकोला यांच्या संयुक्त विद्यमाने वाडेगाव येथील जागेश्वर विद्यालय व महाविद्यालयात बाल शोषणमुक्त जिल्हा व्हावा यासाठी जनजागृती व कायदेविषयक मार्गदर्शन कार्यक्रम घेण्यात आला.

सचिव श्रीमती आर. एन. बंसल यांनी बाल अत्याचार, बाल विवाह, तस्करी, बालकामगार यांसारख्या गुन्ह्यांबाबत माहिती दिली. उपमुख्य लोक अभियुक्त प्रवीण होनाळे यांनी 'पॉक्सो कायदा २०१२' व पीडित बालकांसाठीच्या सेवा यावर मार्गदर्शन केले. चाईल्ड लाईन १०९८ विषयी माहिती हर्षाली गजभिये यांनी दिली.

महाराष्ट्र शासन
जलसंपदा विभाग
निविदा सुचना क्रमांक ११ सन २०२५-२०२६

कार्यकारी अभियंता, यांत्रिकी विभाग अकोला ४४४००४४ (दुरध्वनी क्रं०७२४- २४८८५४) हे मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे वतीने खालील नमूद केलेल्या कामाकरीता मोहोरबंद निविदा अनुभवी यांत्रिकी संघटने अंतर्गत नोंदणिकृत रकाना क्रं १० मध्ये नमूद केलेल्या वर्गवारीनुसार ब-१ नमुन्यात सिलबंद निविदा मागविण्यात येत आहे. को-या निविदा कार्यकारी अभियंता,यांत्रिकी विभाग, अकोला याच्या कार्यालयात रकाना क्रं ८ मध्ये दर्शविल्याप्रमाणे कार्यालयीन वेळेत देण्यात येईल व रकाना क्रं ९ मध्ये दर्शविल्याप्रमाणे कार्यकारी अभियंता,यांत्रिकी विभाग, अकोला यांचे कार्यालयात स्विकारले जातील अणि शक्य झाल्यास त्याच दिवशी उघडण्यात येतील. को-या निविदासंचांची किंमत रोखीने अथवा मनिऑडरने स्विकारण्यात येईल.पोष्टल ऑडर,डीमांड ड्राफट, धनादेश स्विकारले जाणार नाही याची नोंद घ्यावी.

| अ. क्रं. | निविदा सुचना क्रं व वर्ष | कामाचे नाव | अंदाजे कामाचे मुल्य (रुपये) | अनामत रक्कम (रुपये) | कामाची मुदत | निविदा शुल्क(रुपये) | निविदा विक्रीचा कालावधी | निविदा स्विकृतीची दिनांक व वेळ | गुणव-ता प्राप्त निविदाकार | कामाचे ठिकाण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
| १. | बी-१/ २०२५-२०२६ | उपअभियंता, व्दार निर्मिती व उभारणी उपविभाग क्र.१ अकोला अंतर्गत तपासणी वाहन क्र.एम एच २७ एए १७५ करिता वाहनचालक पुरवठा करणेबाबत.. | ३२४७२८ | ३३००/ | ३१७ मनुष्य दिवस man days | ११८०/- | दिनांक २३.०७. २०२५ ते ३०. ०७. २०२५ | ३१. ०७. २०२५ वेळ १६.०० वाजेपर्यंत | मजूर कामगार/ बेरोजगार सेवा सहकारी संस्था अन्वये पात्र कंत्राटदार | प्रकल्प स्थळ |
| २. | बी-१/ २०२५-२०२६ | काटेपूर्णा प्रकल्प ता. बार्शी टाकळी जि. अकोला येथे वक्रव्दार १२ x ५ मी-१० नग च्या वार्षिक देखभाल व दुरुस्ती कामांतर्गत वायर रोप ला Cardium Compound लावण्याचे कामे | १०५८७८ | ११००/ | ६० दिवस | ११८०/- | दिनांक २३.०७. २०२५ ते ३०. ०७. २०२५ | ३१. ०७. २०२५ वेळ १६.०० वाजेपर्यंत | शा.नि.क्रं. संकीर्ण १११७/ प्र.क्रं १०४/ १७/यांत्रिकी दि. १४.०३.२०१८ अन्वये पात्र कंत्राटदार | प्रकल्प स्थळ |
| ३. | बी-१/ २०२५-२०२६ | वान प्रकल्प ता. तेल्हारा जि. अकोला येथे जनित्र संच-२नग ची वार्षिक देखभाल व दुरुस्ती कामे | ६९५६० | १०००/ | ६० दिवस | ११८०/- | दिनांक २३.०७. २०२५ ते ३०. ०७. २०२५ | ३१. ०७. २०२५ वेळ १६.०० वाजेपर्यंत | शा.नि.क्रं. संकीर्ण १११७/ प्र.क्रं १०४/ १७/यांत्रिकी दि. १४.०३.२०१८ अन्वये पात्र कंत्राटदार | प्रकल्प स्थळ |

तपशिलवार निविदा सूचना कार्यकारी अभियंता, यांत्रिकी विभाग, अकोला यांचे कार्यालयातील सुचना फलकावर पाहता येईल.विनंती केल्यास विनामुल्य पाठविण्यांत येईल. २) कोरी निविदा प्रपत्रे पोष्टाने मागविल्यास आणि उशिर झाल्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही व त्याची सर्वस्वी जबाबदारी निविदाकाराची राहील.३) अटींसह सादर केलेली निविदा प्रपत्रे मंजूर केल्या जाणार नाहीत. ४) कोणतीही अथवा सर्व निविदा प्राप्त प्रपत्रे कोणतेही कारण न देता नाकारण्याचा/रद्द करण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, यांत्रिकी विभाग, अकोला यांचेकडे राखून ठेवण्यात येत आहे. ५) व्दार निर्मीती/ सयंत्र दुरुस्ती / विद्युत क्षेत्रातील कामाचा अनुभव असलेल्या निविदाकारास निविदा देण्यात येतील. यासाठी शॉप ॲक्ट, सेलटॅक्स, जीएसटी नोंदणी प्रमाणपत्र,पूर्वी केलेल्या आदेशाच्या प्रमाणीत प्रती सादर करणे आवश्याक आहे.६) निधी अभावी देयकाची भुगतान करण्यास विलंब लागु शकतो, यासाठी स्वतंत्र व्याजाची किंवा इतर कोणतीही मागणी मान्य करण्यात येणार नाही.७) निविदेतील कामाचे मुल्य शासकीय नियमाप्रमाणे आहेत. शासकीय नियमाप्रमाणे सर्व कर भरण्याची जबाबदारी निविदाकराची असून त्यामध्ये काही त्रुटी आढळल्यास देयकातून कपात करण्यांत येईल व नियमाप्रमाणे भुगतान करण्यात येईल. ८) कोरी निविदा खरेदी करतेवेळी निविदाकारास मागील मार्च २०२४ अखेरपर्यंतचा विक्रीकर व आयकर भरल्याचा दाखला सादर करणे आवश्यक आहे. ९) निविदा उघडल्यापासून ६० दिवसावर्यंत वैध राहतील. १०) सदर निविदा wrd.mahayantriki.gov.in वर पाहायला मिळेल.११) स्विकृत निविदाकारास निविदेच्या २ टक्के, सहकारी संस्था यांना २ टक्के सुरक्षा ठेव लागू आहे. सुरुवातीस निविदा रकमेच्या रकमेच्या २ टक्के व मजुर सहकारी संस्था/सुशिक्षीत बेरोजगार यांना १ टक्का सुरक्षा रक्कम व देयकातून अनुक्रमे १ व १ टक्के भरावी लागेल.

जा.क्र./१९०८/यांअको/लेशा/२०२५
दिनांक: १७-०७-२०२५

(वि.ल. वराडे)
कार्यकारी अभियंता
यांत्रिकी विभाग, अकोला

## थोडक्यात

### ३ किलो सोने चोरणारे सापडले जाळ्यात

**कलबुर्गी :** कर्नाटकातील कलबुर्गी शहरातील पोलिसांनी दागिने आणि रोकड असे एकूण ३ कोटी रूपयांच्या मालमत्तेच्या चोरीचा छडा लावल्याची माहिती दिली आहे. विशेष बाब म्हणजे या चोरीच्या घटनेतील प्रमुख आरोपीसह तीन संशयित हे एका ३० रूपयांच्या पाव भाजीमुळे पोलिसांच्या जाळ्यात सापडले आहे.
पोलिसांनी या अटक करण्यात आलेल्या संशयितांकडून २.१५ कोटी रुपयांचे दागिने देखील जप्त केले आहेत. अयोध्या प्रसाद चौहान(४८), फारुक अहमद मलिक (४०) , सोहेल शेख उर्फ बादशाह (३०) अशी अटक केलेल्या संशयितांची नावे आहेत. फारूक हा मूळचा पश्चिम बंगालचा आहे आणि तो कलबुर्गी येथे सोन्याचा व्यवसाय करतो. तर सोहेल हा मुंबईचा असून ते टेलर आहे.११ जुलै रोजी मास्क घातलेले चोर मार्थुला मलिक यांच्या सोन्याच्या दुकानात घुसले होते. त्यांनी दुकान मालकाचे हात आणि पाय दोरीने बांधले आणि त्यानंतर लॉकर उघडून तीन किलो वजनाचे सोन्याचे दागिने आणि रोकड घेऊन फरार झाले.मात्र पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दुकानाच्या मालकाने त्याच्या दुकानातील जाहीर न केलेले सोने लपवण्यासाठी फक्त ८०५ ग्रॅम सोने चोरीला गेल्याचा दावा केला आहे. पोलिस आयुक्त एस. डी. शरणप्पा म्हणाले की, आरोपींकडून पोलिसांनी २.८६५ किलो सोने आणि ४.८० लाख रुपये रोख जप्त केले आहेत. तसेच फारुक हा या दरोड्याच्या मागील सूत्रधार होता. त्याचे मोठे नुकसान झाले होते आणि त्याचे कर्ज ४० लाख रुपयांपर्यंत वाढले होते, अशी माहिती एका पोलिस अधिकाऱ्याने दिली.११ जुलै रोजी आरोपींनी हत्यारं आणि बंदुका घेऊन शहराच्या मध्यभागी असलेल्या दुकानावर हल्ला केला आणि सोने आणि रोख रक्कम चोरली. पोलिसांनी त्यांच्या तपासासाठी ५ पथके तयार केली होती.

### जंगले एका रात्रीत बुलडोझरने नष्ट करायची नाहीत: सरन्यायाधीश

**नवी दिल्ली :**सरकारी प्रकल्पांसाठी जंगलतोड केली जाण्याच्या घटना बऱ्याचदा घडल्याचे समोर आले आहे. पर्यावरण प्रेमींकडून विरोध होत असेल तर सरकारी यंत्रणा रात्रीच्या अंधारात मोहिम राबवून झाडे तोडून टाकतात. दरम्यान सर्वोच्च न्यायालयाने अशा प्रकरणात एक महत्त्वाचे निरीक्षण नोंदवले आहे. तेलंगणातील कांचा गचिबोवली जंगलातील वृक्षतोडीबाबत न्यायालयाने स्वतःहून दाखल केलेल्या खटल्यात सुनावणी करताना भारताचे सरन्यायाधीश बी. आर. गवई म्हणाले की, एका रात्रीतून जंगल साफ करण्यासाठी बुलडोझरचा वापर हा शाश्वत विकास म्हणून न्याय्य ठरवला जाऊ शकत नाही. सरन्यायाधीश गवई म्हणाले की त्यांचा शाश्वत विकासाला पाठिंबा असला तरी, कांचा गचीबोवली परिसरात रात्रीतून बुलडोझर चालवण्याची घटना माफ केला जाऊ शकत नाही. ते म्हणाले की, ''मी स्वतः शाश्वत विकासाचा पुरस्कार करतो पण याचा अर्थ असा होत नाही की तुम्ही रात्रीतून ३० बुलडोझर आणून सर्व जंगल साफ करावे. या खटल्यात कोर्टाकडून बाजू मांडणारे वरिष्ठ वकील के परमेश्वर यांनी माहिती दिली की खाजगी गुंतवणूकदारांना सरकारच्या प्रतिज्ञापत्रावर उत्तर दाखल करायचे होते. त्यानंतर न्यायालयाने १३ ऑगस्ट रोजी प्रकरणावर सुनावणी घेण्याचे मान्य केले. यापूर्वी न्यायालयाने लाँग विकेंडचा गैरवापर या भागात बुलडोझर चालवण्यासाठी केल्याचे नमूद करत राज्याच्या प्रशासकीय अधिकाऱ्यांना अवमानाची कारवाई आणि तात्पुरत्या तुरुंगवासाची ताकीद दिली होती. याबरोबरच या भागतील स्थिती जैसे थे ठेवणे ही न्यायालयाची पहिली प्राथमिकता असेल असेही नमूद केली.

### अहमदाबादमध्ये इंडिगोचे विमान टेक-ऑफ करतानाच तांत्रिक बिघाडामुळे थांबले




**अहमदाबादः** अहमदाबादमध्ये इंडिगोचं विमान तांत्रिक बिघाडामुळे टेक ऑफ करतानाच थांबवण्यात आलं. या विमानातील सर्व ७० प्रवासी सुखरुप आहेत. आज हे विमान उड्डाणासाठी निघालं. हे विमान अहमदाबादहून दिऊला चाललं होतं. त्यावेळी वैमानिकाला इंजिनाला आग लागल्याचा तातडीचा संदेश मिळाला आणि त्याने प्रसंगावधान दाखवून हे विमान टेक ऑफच्या वेळीच थांबवलं. आज सकाळी ११ च्या दरम्यान ही घटना घडली. अहमदाबादहून हे विमान दिऊला चाललं होतं. विमान थांबवण्यात आल्यानंतर या विमानातील सर्व ७० प्रवाशांना बाहेर काढण्यात आलं. तसंच तातडीच्या सेवाही सक्रिय झाल्या आणि इंजिनाला लागलेली आग नियंत्रणात आणण्यात आली.इंडिगोच्या प्रवक्त्याने या घटनेबाबत माहिती देताना हे सांगितलं की विमानाचं उड्डाण ग होत असतानाच वैमानिकाला तांत्रिक बिघाडाचा संदेश मिळाला. त्यानंतर हे विमान सगळ्या औपचारिकता पाळून टेक ऑफच्या वेळीच रोखण्यात आलं. वैमानिकाने रनवे जवळच हे विमान थांबवलं त्यानंतर या विमानातून ७० प्रवाशांना बाहेर काढण्यात आलं.

# 'ऑपरेशन सिंदूर'वर संसदेत २८ जुलैपासून चर्चा

## विरोधकांना उत्तर देण्यासाठी सरकारची विशेष तयारी

नवी दिल्ली दि.२३ वृत्तसंस्था

संसदेचे पावसाळी अधिवेशन सध्या सुरू असून यामध्ये ऑपरेशन सिंदूरच्या मुद्द्यावर विरोधक आणि सत्ताधारी लवकरत एकमेकांसमोर येणार आहेत. संसंदेत चालू पावसाळी अधिवेशनादरम्यान २८ जुलै रोजी ऑपरेशन सिंदूरवर चर्चा केली जाणार आहे. या विशेष चर्चेसाठी सरकारने लोकसभा आणि राज्यसभा या दोन्हींसाठी प्रत्येकी १६ तासांचा वेळ दिली आहे. इंडिया टुडेने यासंबंधीचे वृत्त दिले आहे. तसेच विरोधकांकडून उपस्थित केल्या जाणाऱ्या प्रश्नांना उत्तर देण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृह मंत्री अमित शाह आणि संरक्षण मंत्री राजनाथ सिंह हे या चर्चेत सहभागी होतील अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.



पुढील आठवड्यात सोमवारी म्हणजेच २८ जुलै रोजी लोकसभेत या चर्चेला सुरूवात होईल, त्यानंतर राज्यसभेत मंगळवारी (२९ जुले) रोजी चर्चा होईल. सरकारने दोन्ही सभागृहांमध्ये या चर्चेसाठी भरपूर वेळ दिला आहे, मात्र विरोधकांकडून या मुद्द्यावर उद्यापासूनच चर्चा घेतली जावी अशी मागणी केली जात होती. पण पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या परदेश दौऱ्याचे कारण देत सरकारने ही मागणी फेटाळली.
अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प वारंवार दावा करत आहेत की त्यांनी भारत आणि पाकिस्तान यांच्यातील शस्त्रविराम घडवून आणला. सरकारने याचे खंडन केले आहे. मात्र ट्रम्प यांच्या विधानाचा वापर विरोधकांकडून सत्ताधारी पक्ष आणि पंतप्रधान मोदी यांच्यावर दबाव टाकण्यासाठी केला जात आहे. विरोधक पंतप्रधान मोदी यांनी स्पष्टीकरण द्यावे अशी मागणी करत आहेत. या पार्श्वभूमीवर या संबंधित चर्चेकडे संपूर्ण देशाचे लक्ष असणार आहे.गेल्या आठवड्यापासून

सुत्रांच्या हवाल्याने दिलेल्या वृत्तानुसार, सरकार त्यांची बाजू पूर्ण आक्रमकतेने मांडण्यासाठी तयारी करत आहे. संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी चीफ डिफेन्स स्टाफ जनरल अनिल चौहान, संरक्षण सचिव राजेश कुमार सिंह आणि तिन्ही दलांच्या प्रमुखांबरोबर सरकारच्या प्रतिसादाचे अंतिम स्वरूप निश्चित करण्यासाठी अनेक उच्चस्तरीय बैठका घेतल्या आहेत. कारगिल विजय दिवस म्हणजेच २६ जुलै रोजीच्या उत्सवानंतर ही चर्चा आयोजित करण्यात आली आहे. ७ मे रोजी पहलगाम दहशतवादी हल्ल्याचा बदला घेण्यासाठी ऑपरेशन सिंदूर राबवण्यात आले होते, ज्यामध्ये पाकिस्तान आणि पाकव्याप्त काश्मीरमधील दहशतवादी तळांना लक्ष्य करत हल्ले करण्यात आले होते.

ऑपरेशन सिंदूरवर चर्चेची मागणी वाढताना पाहायला मिळत होती, ज्यामध्ये विरोधी पक्षाच्या खासदार पहलगाम दहशतवादी हल्ला आणि बिहारमधील स्पेशल इटेन्शिव्ह रिव्हिजन ऑफ इलेक्टोरल रोल्सवर उत्तरे देण्याची मागणी केली होती. तसेच विरोधकांनी वेगवेगळ्या नियमांच्या अंतर्गत विविध प्रशांवर कमी कालावधीच्या चर्चा घेण्याचीही मागणी केली आहे. तसेच नियमित चर्चेसाठी बिझनेस ॲडव्हाजरी कमिटी (बीएस)ची दर आठवड्याला बैठक घेण्याची मागणीही केली आहे.

## अखिलेश यादवांची मशिदीमध्ये राजकीय बैठक; भाजपा अल्पसंख्याक मोर्चाने केला निषेध

नवी दिल्ली , दि.२३ वृत्तसंस्था

दिल्लीतील संसद भवनाजवळ असलेल्या मशिदीत समाजवादी पक्षाचे प्रमुख अखिलेश यादव यांनी कथित बैठक घेतल्याचा वाद आता आणखी चिघळला आहे. भाजपाचा अल्पसंख्याक मोर्चा आणि उत्तराखंड वक्फ बोर्डाने या प्रकरणावर तिखट प्रतिक्रिया देत आक्षेप नोंदवला आहे. मशिदीला तुम्ही राजकारणाचा मंच बनवला आहे. फक्त आमच्या धार्मिक भावना दुखावलेल्या नाहीत तर राजकीय मर्यादाही ओलांडल्या गेल्या आहेत असंही भापाने म्हटलं आहे.
''संसदेजवळच्या मशिदीत बैठक घेऊन अखिलेश यादव आणि डिंपल यादव यांनी धार्मिक मर्यादांचं उल्लंघन केलं आहे. त्यांच्या या कृतीमुळे मुस्लिम समाजाच्या भावना दुखावल्या आहेत. या मशिदीचे इमाम मोहिबुल्लाह नदवी



यांनी या दोघांना मशिदीत बैठक घेण्याची संमती कशी दिली? डिंपल यादव या मशिदीत चुकीच्या पद्धतीने बसल्या होत्या'' असंही सिद्दिकी यांनी म्हटलं आहे. तसंच या दोन्ही नेत्यांच्या विरोधात गुन्हा दाखल केला जावा अशीही मागणी केली आहे. जमाल सिद्दिकी म्हणाले, जर दुसरा एखादा नेता असं काही वागला असता तर त्यावरुन राजकीय वादळ सुरु झालं असतं. जे स्वतःला मुस्लिमांना नेता मानतात ते असदुद्दीन ओवैसी झालेल्या प्रकाराबाबत गप्प का असाही सवाल सिद्दिकी यांनी विचारला आहे.

## न्यायमूर्ती वर्मांच्या याचिकेवरील सुनावणीसाठी सर्वोच्च न्यायालयाचा मोठा निर्णय: विशेष खंडपीठ स्थापन करण्यात येणार

नवी दिल्ली , दि.२३ वृत्तसंस्था

न्यायमूर्ती यशवंत वर्मा हे मागील काही महिन्यांपासून चर्चेत आहेत. त्यांच्या दिल्लीतील निवासस्थानी आग लागल्याच्या घटनेनंतर मोठ्या प्रमाणात बेहिशेबी रोख रक्कम आढळून आली होती. त्यामुळे संपूर्ण देशभरात एकच खळबळ उडाली होती. मात्र, या प्रकरणात त्यांच्यावर झालेले आरोप न्यायमूर्ती यशवंत वर्मा यांनी फेटाळून लावले होते. त्या प्रकरणाची अंतर्गत चौकशीसाठी तीन सदस्यांची समिती स्थापन करण्यात आली होती. त्यानंतर या समितीने सर्वोच्च न्यायालयाला अहवालही सादर



केला.
न्यायमूर्ती यशवंत वर्मा यांची या आरोपानंतर दिल्ली उच्च न्यायालयामधून अलाहाबाद उच्च न्यायालयात बदली करण्यात आली होती. त्यानंतर न्यायमूर्ती वर्मा यांच्या विरोधात महाभियोग मंजूर होऊन त्यांना पदावरून हटविण्यात येऊ शकतं अशी चर्चा मागील काही महिन्यांपासून आहे.
यातच न्यायमूर्ती वर्मा यांच्याविरुद्ध महाभियोगाची प्रक्रिया औपचारिकपणे सुरू करण्यात आल्याचं सांगितलं जात आहे. १५२ संसद सदस्यांनी लोकसभेच्या अध्यक्षांकडे स्वाक्षरी केलेलं एक निवेदन सादर करत गैरवर्तनाच्या आरोपांवरून त्यांना पदावरून काढून टाकण्याची मागणी केल्याचंही बोललं जात आहे.
दरम्यान, असं असतानाच आता न्यायमूर्ती यशवंत वर्मा यांच्यावरील आरोपाच्या प्रकरणासंदर्भात आणखी एक मोठी माहिती समोर आली आहे. न्यायमूर्ती वर्मा यांची ज्या समितीने चौकशी करून अहवाल सर्वोच्च न्यायालयात सादर केला त्या अहवाला आव्हान देणारी याचिका न्यायमूर्ती यशवंत वर्मा यांनी दाखल केलेली आहे.
आता याच याचिकेच्या सुनावणीसाठी विशेष खंडपीठ स्थापन करण्यात येणार आहे. सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश भूषण गवईंनी यांनी या संदर्भातील निर्णय घेतल्याची माहिती समोर आली आहे.
सरन्यायाधीश भूषण गवई यांनी बुधवारी सांगितलं की, न्यायमूर्ती वर्मा यांनी दाखल केलेल्या याचिकेवर सुनावणी करण्यासाठी एक विशेष खंडपीठ स्थापन करण्यात येईल.

## जामिनावर सुटलेला भाजपा खासदार पुत्र बनला 'लॉ ऑफिसर' आयएएस अधिकाऱ्याच्या मुलीचा लैंगिक छळ केल्याप्रकरणी झाली होती अटक

नवी दिल्ली , दि.२३ वृत्तसंस्था

भाजपाचे राज्यसभा खासदार सुभाष बराला यांचा मुलाक विकास बराला याची हरियाणा येथे असिस्टंट ॲडव्होकेट जनरल (एएजी) म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. १८ जुलै रोजी काढण्यात आलेल्या अधिकृत अधिसूचनेत याबद्दल माहिती देण्यात आली आहे. विशेष बाब म्हणजे या विकास बारला याच्यावर आठ वर्षांपूर्वी एका आयएएस अधिकाऱ्याच्या मुलीचा पाठलाग करण्याचा आणि अपहरण कारण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी लैंगिक छळाचा गुन्हा दाखल आहे.
या अधिसूचनेत असिस्टंट ॲडव्होकेट जनरल, डेप्युटी ॲडव्होकेट जनरल, सिनियर डेप्युटी ॲडव्होकेट जनरल आणि ॲडिशनल ॲडव्होकेट जनरल यांची नावे देण्यात आली आहे. या नवीन नियुक्ती मिळालेल्या ९७ जणांच्या यादीत २०१७ सालच्या एका प्रकरणात आरोपी असलेल्या विकास याचे नाव



देखील आहे. या लैंगिक छळ प्रकरणाची सुनावणी चंदीगड उच्च न्यायालयात अजूनही सुरू आहे आणि या प्रकरणात विकास हा सध्या जामीनावर सुटला आहे.
५ ऑगस्ट २०१७ रोजी विकास आणि त्याचा मित्र आशिष कुमार यांच्यावर आयपीसीच्या कलम ३५४ डी (पाठलाग), ३४१, ३६५ (अपहरणाचा प्रयत्न) आणि ५११ अंतर्गत मद्य प्राशन करून वाहन चालवणे आ आरोपांखाली गुन्हा दाखल झाला होता. या प्रकरणी हरियाणा केडरचे आयएएस अधिकारी व्ही. एस, कुंडू यांच्या मुलगी वर्णिका कुंडू यांनी तक्रार दाखल केली होती. ज्यामध्ये या दोघांनी चंदीगड येथे रात्री उशीरा पाठलाग केला आणि बळजबरीने तिच्या वाहनात प्रवेश करण्याचा प्रयत्न केला, असा आरोप केला होता. तेव्हा हरियाणामध्ये भाजपाची सत्ता होती आणि सुभाष बाराला हे हरियाणा भाजपाचे अध्यक्ष होते. वर्णिकाने दिलेल्या तक्रारीनंतर सेक्टर २६ पोलीस ठाण्यात एफआयआर दाखल करण्यात आला आणि हे प्रकरण चर्चेत आल्यानंतर अखेर ९ ऑगस्ट २०१७ रोजी विकास आणि आशिष या दोघांना अटक करण्यात आली. त्याच वर्षी ऑक्टोबरमध्ये आरोपींविरुद्ध आरोप निश्चित करण्यात आले. यादरम्यान जानेवारी २०१८ मध्ये पंजाब आणि हरियाणा उच्च न्यायालयाने विकासला चंदीगडच्या बुरैल येथील मॉडेल तुरुंगात पाठवले. त्यानंतर त्याला जामीन मिळाला. आता या खटल्याची पुढील सुनावणी २ ऑगस्ट २०२५ रोजी ठेवण्यात आली आहे.

## अहमदाबाद विमान अपघातानंतर ब्रिटनच्या कुटुंबांना पाठविले दुसऱ्यांचे मृतदेह ?

नवी दिल्ली , दि.२३ वृत्तसंस्था

अहमदाबादमध्ये एअर इंडियाच्या विमानाला भीषण अपघात झाल्याची घटना १२ जून रोजी घडली होती. या घटनेला आता एक महिना होऊन गेला आहे. या अपघातानंतर 'एअर इंडिया'च्या विमान अपघात प्रकरणाच्या चौकशी समितीचा प्राथमिक अहवालही समोर आला आहे. मात्र, या अहवालावरून बरेच वादळ उठवताना दिसत आहेत. जवळपास पावणेतीनशे जणांचा जीव या घटनेत गेला होता. या संपूर्ण प्रकरणाची चौकशी विविध स्तरांवर सुरू असून बोइंग कंपनी, नागरी हवाई वाहतूक मंत्रालयासह आदी स्तरातून या अपघातामागील कारणांचा शोध घेतला जात आहे. या दुर्घटनेत विमानातील प्रवाशांचा होरपळून मृत्यू झाला, ज्यामध्ये १० केबिन क्रू सदस्यांचा समावेश होता. दरम्यान, या घटनेतील मृतांमध्ये विदेशातील नागरिकांचाही समावेश होता. या घटनेबाबत आता धक्कादायक माहिती समोर आली आहे.

### भारताने काय खुलासा केला?

अहमदाबाद विमान अपघातानंतर ब्रिटनमधील कुटुंबांना दुसऱ्यांचेच मृतदेह पाठवण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. या संदर्भातील यूकेच्या मीडियातील वृत्त समोर आल्यानंतर भारताने याबाबत खुलासा केला आहे. भारताने म्हटलं की, या घटनेबाबत ज्या समस्या आहेत त्या दूर करण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत. दरम्यान, अहमदाबाद विमान अपघातातील एकूण मृतांपैकी ५२ ब्रिटिश नागरिक होते. पण यातील दोन मृतांचे चुकीचे मृतदेह ब्रिटनमधील कुटुंबांना पोहोचल्याचा आरोप करण्यात आला आहे. यावर भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी सांगितलं की, ''भारतीय अधिकारी या मुद्द्यावर त्यांच्या ब्रिटनच्या समकक्षांसोबत काम करत आहेत. आम्ही हा अहवाल पाहिला आहे आणि याबाबतच्या मुद्यावर आम्ही ब्रिटनशी संपर्क साधत आहोत. या दुःखद अपघाताच्या पार्श्वभूमीवर, संबंधित अधिकाऱ्यांनी प्रस्थापित प्रोटोकॉल आणि तांत्रिक आवश्यकतांनुसार मृतांची ओळख पटवली होती. सर्व मृतांच्या प्रतिष्ठेचा आदर करून हाताळण्यात आले. या समस्येशी संबंधित कोणत्याही चिंता दूर करण्यासाठी आम्ही यूके अधिकाऱ्यांसोबत काम करत आहोत.

## पोटगीसाठी १२ कोटी रुपये, मुंबईत फ्लॅट, बीएमडब्लू कार मागणाऱ्या पत्नीला सरन्यायाधीश भूषण गवईंनी सुनावले

नवी दिल्ली , दि.२३ वृत्तसंस्था

सर्वोच्च न्यायालयात एका घटस्फोट प्रकरणाच्या सुनावणीदरम्यान महिलेने पोटगीसाठी मागितलेली रक्कम आणि इतर मागण्या ऐकून सरन्यायाधीश भूषण गवई यांनी नाराजी व्यक्त केली. संबंधित जोडप्याच्या लग्नाला केवळ १८ महिने झाले असताना या महिलेने पतीकडून १२ कोटी रुपये, मुंबईत फ्लॅट आणि बीएमडब्लू कार मागितली होती. यानंतर सरन्यायाधीश गवई यांनी नाराजी व्यक्त करत उच्चशिक्षित असलेल्या महिलेला पतीच्या देखभाल खर्चावर अवलंबून न राहता स्वतः कमविण्याचा सल्ला दिला. सध्या या प्रकरणाची देशभर चर्चा होत आहे.
पोटगी प्रकरणाची सुनावणी सरन्यायाधीश भूषण गवई यांच्या खंडपीठासमोर झाली. यावेळी महिलेने पतीकडे मुंबईत एक फ्लॅट, १२ कोटी रुपयांची पोटगी मागितली. विशेष म्हणजे या जोडप्याच्या लग्नाला केवळ १८ महिने झालेले आहेत. सुनावणीदरम्यान सरन्यायाधीश गवई




म्हणाले, ''तुम्ही इतक्या शिकलेल्या आहात, तुम्हाला अशाप्रकारे पैसे मागणे शोभत नाही. तुम्हाला स्वतःहून पैसे कमवायला हवेत.''
दरम्यान महिलेने पतीकडून देखभाल खर्च आणि पोटगीसाठी मागितलेल्या अवाजवी मागण्यांबद्दलही सरन्यायाधीशांनी प्रश्न उपस्थित केले. ''तुमच्या लग्नाला केवळ १८ महिने झाले आहेत. अशावेळी तुम्हाला बीएमडब्लू कार हवी आहे? तसेच महिन्याला एक कोटीही हवे आहेत?'', असे प्रश्न सरन्यायाधीशांनी विचारले.

**'पतीकडे भीक मागू नका, स्वतः कमवा'**

सदर महिलेने एमबीएचे शिक्षण घेतले असून ती माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील तज्ज्ञ आहे. महिलेचे शिक्षण पाहून सरन्यायाधीशांनी तिला पतीच्या पैशांवर अवलंबून न राहण्याचा सल्ला दिला. ''तुम्ही जर उच्चशिक्षित आहात, तर तुम्ही अशाप्रकारे भिक मागू नये. तुम्ही स्वतः कमवायला हवे'', असे म्हणत सरन्यायाधीशांनी सदर महिलेची कानउघाडणी केली.
सरन्यायाधीशांच्या टिप्पणीनंतर महिलेने प्रतिवाद करताना म्हटले की, तिचा नवरा खूप श्रीमंत आहे. तिला स्किझोफ्रेनिया असल्याचा आरोप करत त्याने लग्न रद्द करण्याची मागणी केली आहे. ''मी स्किझोफ्रेनियाग्रस्त दिसते का?'', असा प्रश्न महिलेने खंडपीठाला विचारला.
पतीच्या बाजूने ज्येष्ठ विधिज्ञ माधवी दिवाण यांनी बाजू मांडली. त्या म्हणाल्या, अशा अतिरेकी पद्धतीने पोटगीचा दावा करता येत नाही. तसेच सदर महिलेकडे मुंबईत आधीच एक फ्लॅट आहे, ज्यातून ती चांगले पैसे मिळवत आहे. तसेच ती कामही करू शकते. प्रत्येक गोष्टीची अशी मागणी करता येत नाही.

सरन्यायाधीश गवई यांनी पतीच्या उत्पन्नाचीही माहिती घेतली. पतीने पतीने नोकरीतून २.५ कोटी रुपये वेतन आणि १ कोटी रुपयांचा बोनस मिळाला असल्याचे सांगितले. यानंतर सरन्यायाधीश यांनी दोन्ही पक्षकारांना त्यांच्या उत्पन्नाची माहिती सादर करण्याचे आदेश दिले. तसेच महिला पतीच्या वडिलांच्या संपत्तीवर दावा करू शकत नाही, असेही सांगितले.

## नव्या सीईओने किस स्कॅंडलसंदर्भात स्पष्ट केली भूमिका

नवी दिल्ली , दि.२३ वृत्तसंस्था

गेल्या काही दिवसांपासून बॉस्टनमधील कोल्डप्लेच्या कॉन्सर्टची सोशल मीडियावर मोठी चर्चा सुरू आहे. ही चर्चा आहे एका 'किस कॅम' व्हिडीओची. या कॉन्सर्टमधील व्हायरल झालेला व्हिडीओ सॉफ्टवेअर कंपनी ॲस्ट्रोनॉमरचे माजी सीईओ ॲंडी बायर्न आणि एचआर हेड क्रिस्टिन कॅबोट यांचा आहे. या कोल्डप्ले कॉन्सर्टमुळे ॲंडी बायरन आणि क्रिस्टिन कॅबोट यांचं अफेअर उघडकीस आलं.
या व्हिडीओमध्ये हे दोघं एकमेकांना मिठी मारून रोमान्स करताना दिसून आले होते. मात्र, या १० सेकंदाच्या व्हायरल व्हिडीओनंतर एका अब्जाधीश कंपनीच्या सीईओंना आपल्या पदाचा राजीनामा द्यावा लागला आहे. ॲंडी बायरन यांच्या राजीनाम्यानंतर त्यांच्या जागी ॲस्ट्रॉनॉमरचे अंतरिम सीईओ पीट डेजॉय यांनी पदभार स्वीकारला आहे. ॲस्ट्रॉनॉमरच्या सीईओ पदाची जबाबदारी स्वीकारल्यानंतर पीट डेजॉय यांनी पहिल्यांदाच किस स्कॅंडलसंदर्भात भूमिका स्पष्ट केली आहे.डेजॉय यांनी या संदर्भात सोमवारी लिंक्डइनलवर एक पोस्ट केली आहे. या पोस्टच्या माध्यमातून त्यांनी आपलं मत व्यक्त केलं आहे. पीट डेजॉय यांनी म्हटलं की, ''गेल्या काही दिवसांतील घटनांनी माध्यमांचं इतकं लक्ष वेधलं आहे की डेटा आणि एआय जगतातील छोट्या कोपऱ्यातील स्टार्टअप्स सोडाच फार कमी कंपन्यांना याचा सामना करावा लागतो.
''आमच्या टीमसाठी स्पॉटलाइट असामान्य आणि अवास्तव राहिला आहे. मी कधीही असं घडावं अशी इच्छा केली नसली तरी, ॲस्ट्रॉनॉमर आता घराघरात पोहोचलेले नाव आहे'', असं पीट डेजॉय यांनी म्हटलं. दरम्यान, २०१७ मध्ये डेटा ऑपरेशन्स कंपनीची सह-स्थापना करणारे डेजॉय यांना शनिवारी ॲस्ट्रॉनॉमर कंपनीचं अंतरिम सीईओ म्हणून नियुक्त करण्यात आलं. सीईओ म्हणून नियुक्त करण्यात आल्यानंतर पीट डेजॉय यांनी म्हटलं की, ''मी ॲस्ट्रोनॉमरमध्ये अंतरिम सीईओच्या भूमिकेत पाऊल ठेवलं आहे.

हे पत्र मालक,मुद्रक,प्रकाशक आणि **मुख्य संपादक तिक्ष्णगत सुगत वाघमारे** यांनी भास्कर प्रिंटिंग प्रेस एन.एच.६ बोरगाव मंजू येथे मुद्रित करून दै.अजिंक्य भारत, सुगत भवन,बारा ज्योतिर्लिंग मंदिराजवळ, रणपिसेनगर, अकोला येथे प्रकाशित केले.* **कार्यकारी संपादक-रूबेन डी.वाळके (*पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची)** आरएनआय-MAHMAR/2009/35271

आपले पत्र या मेलवर पाठवावे, आम्ही त्याला प्रसिद्धी देऊ
ajinkyabharat23@gmail.com

# संपादकीय...

## तिसरी आर्थिक शक्ती बनण्याकडे भारताची वाटचाल

भारत आगामी दोन वर्षात जगातील तिसरी आर्थिक शक्ती बनण्याची अपेक्षा आहे. जर हे शक्य झाले तर ते एक मोठे यश मानले जाईल. आर्थिक धोरणाच्या अंमलबजावणीतून विकास धोरण तयार होते. वेळोवेळी रिझर्व्ह बँकेकडून आर्थिक दर जाहीर केले जातात. त्याला चलनविषयक धोरण म्हणतात. पूर्वी रिझर्व्ह बँक धोरण जाहीर करीत असे. आता सहकार्य आणि सल्लामसलत करण्यासाठी एक चलनविषयक समितीदेखील स्थापन करण्यात आली आहे. प्रत्येक चलनविषयक धोरणाचा आदर्श असा आहे, की एकीकडे ते महागाई नियंत्रित करते आणि दुसरीकडे देशाच्या विकासात कोणताही अडथळा येऊ नये, यावर कटाक्ष ठेवते. सरकारचा दावा आहे, की महागाई नियंत्रित करण्यात आली आहे. रिझर्व्ह बँकेनुसार, सुरक्षित चलनवाढीचा दर चार टक्के आहे आणि या वर्षी निर्देशांकाच्या आकडेवारीनुसार तो ४.६ टक्के होता. आता तो चार टक्क्यांपेक्षा कमी होण्याची शक्यता आहे. भारताचा विकास दर जगातील सर्व देशांच्या विकास दरापेक्षा जास्त आहे असे वारंवार जाहीर केले जाते; पण सामान्य माणसाची स्थिती वेगळीच असते. त्याला महागाई कमी झाल्याचे जाणवत नाही. नारळ, भाजीपाल्यासह सर्वच वस्तूंचे दर वाढले आहेत. त्यामुळे नेमका कोणाचा विकास झाला, असा प्रश्न उपस्थित होत आहे. देशाच्या लोकसंख्येच्या तीन-चतुर्थांश लोकांची उपासमार होत आहे. प्रगतीसोबतच करुणा आणि सवलती संस्कृतीची कालमर्यादा देखील वाढत आहे. आपल्याला २०४७ मध्ये भारताला जगाचा नेता बनवायचे आहे. आपल्याला विश्वगुरू व्हायचे आहे; परंतु नैतिक मूल्यांच्या घसरणीची स्थिती अशी आहे, की आपल्या समाजात ज्या प्रकारच्या घटना घडत आहेत, त्या एका निरुपयोगी आणि अधोगती समाजाच्या सूचक आहेत. आनंद निर्देशांकात भारत खूप मागे आहे. आपल्या शेजारील देशांमधील सामान्य लोकांचा आनंद आपल्यापेक्षा खूप जास्त आहे. मग हा कोणत्या प्रकारचा विकास आहे, ही कोणत्या प्रकारची प्रगती आहे, ज्यावर आपण इतके आनंदी आहोत, या प्रश्नांची उत्तरे आपली आपल्यालाच शोधावी लागतील. कोणत्याही विकसनशील देशाचा महागाई निर्देशांक केवळ अन्नपदार्थांच्या किमतींवर अवलंबून राहू नये. यामध्ये भांडवली गुंतवणूक आणि वस्तूंनाही समान महत्त्व मिळायला हवे. जसे आपल्या निर्देशांकात नाही. त्याचप्रमाणे, विकास दर मोजताना, हेदेखील पाहिले पाहिजे, की देशातील कोणत्या वर्गाला हा विकास मिळत आहे. सर्व विकास फक्त निवडक खासगी भांडवलदार वर्गाकडे जात आहे का? जे महानगरांमध्ये बहुमजली इमारती आणि महागड्या गाड्यांच्या स्वरूपात दिसून येते. सामान्य माणूस अजूनही सवलतीच्या दुकानांबाहेर रांगेत का उभा आहे? 'समाजवाद' हा शब्द संविधानात आहे, की नाही यावर वाद घालण्यापेक्षा श्रीमंत आणि गरिबांच्या राहणीमानातील फरक कमी करणे अधिक महत्त्वाचे आहे. तरुणांना त्यांच्या पात्रतेनुसार रोजगाराची हमी मिळाली पाहिजे. सध्या देशात अशी हमी आहे, की लोक उपाशी मरणार नाहीत; परंतु त्यांच्या योग्य पोषणाची हमी का नाही? देशात अजूनही कुपोषित समाज का अस्तित्वात आहे? नवीन पिढी कमकुवत जन्माला येत आहे आणि सरासरी वय वाढत नाही हे दुर्दैवी आहे. अशा परिस्थितीत, चलनविषयक धोरणाच्या मूल्यांकनावर चर्चा व्हायला हवी, जी आजकाल ऐकायला मिळते. साधारणपणे असे समजले जात होते, की जेव्हा महागाई नियंत्रित केली जाते आणि चलनवाढीचा दर चार टक्क्यांपर्यंत खाली येतो, तेव्हा रेपो दर आणखी कमी केला पाहिजे. व्याजदर आणखी कमी केला पाहिजे, कर्ज स्वस्त केले पाहिजे आणि मासिक हप्तेदेखील कमी केले पाहिजेत, जेणेकरून लोक नवीन गुंतवणूक करू शकतील आणि देशाला वेगाने विकासाच्या मार्गावर घेऊन जाऊ शकतील; परंतु याचा काय फायदा? गेल्या दोन वेळा रेपो दरात एक टक्का कपात करण्यात आली आहे. त्यामुळे या वर्षाच्या सुरुवातीपासून बँकांमध्ये पुरेशी रोकड आहे. असा अंदाज आहे की बँकांना ५.६ लाख कोटी रुपयांचा शाश्वत वित्तपुरवठा मिळाला आहे. हा वित्तपुरवठा भांडवली गुंतवणुकीकडे गेला आहे का? तर त्याचे उत्तर नाही असे आहे. दिल्या जाणाऱ्या कर्जाचा मोठा भाग दिखाऊ वापरावर खर्च केला जात आहे. एकविसाव्या शतकातील भारतात पूल १५ वर्षे टिकत नाहीत; पण निष्काळजीपणा ७० वर्षे टिकतो. जेव्हा आपण भांडवल विकासाच्या दरांकडे पाहतो तेव्हा आपल्याला ती प्रगती आढळत नाही, जी व्हायला हवी होती. ६.५० टक्के विकास दर आपल्याला २०४७ पर्यंत जगात अग्रणी बनवू शकत नाही. यासाठी किमान दहा टक्के विकास दर आवश्यक आहे आणि भांडवली क्षेत्रात गुंतवणूक पुनरुज्जीवित केली पाहिजे. यासोबतच लघु, मध्यम आणि सहकारी उद्योगांचाही विकास झाला पाहिजे, जेणेकरून लोक दरवर्षी बेरोजगार होणार नाहीत. तरुणांच्या हाताला तात्काळ रोजगार मिळाला पाहिजे; पण हे घडत नाही. म्हणूनच, आपल्याला ज्या योग्य विकास धोरणाचा शोध घ्यायचा आहे. त्यात हे लक्षात ठेवावे लागेल, की गोष्टी दावे किंवा घोषणांपुरत्या मर्यादित नसाव्यात, तर सामान्य माणसाच्या आयुष्यापर्यंत पोहोचल्या पाहिजेत. हे देखील विचारात घ्यावे लागेल, की देशात विकासाच्या नावाखाली असे त्रिकूट अस्तित्वात आलेले नाही, ज्यामध्ये भांडवलदार, नोकरशहा आणि राजकारणातील निवडक लोकांची युती तयार झाली आहे. ही युती तीच नाही का, जी जनकल्याणाच्या मार्गात भिंत बनत आहे? ब्रिटनचे माजी पंतप्रधान टोनी ब्लेअर यांनी एक धाडसी दावा केला, की भारत २०५० पर्यंत जागतिक महासत्ता बनेल. या शतकाच्या मध्यापर्यंत तीन महासत्ता असतील, अमेरिका, चीन आणि भारत. इतर सर्व देश तुलनेत लहान असतील, असे ते म्हणाले होते. भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही अशाच आकांक्षा व्यक्त केल्या आहेत आणि २०४७ पर्यंत भारत 'विकसित' देशाचा दर्जा प्राप्त करेल असे म्हटले आहे. त्यांनी त्यांच्या तिसऱ्या कार्यकाळाच्या अखेरीस देशाला तिसरी सर्वात मोठी आर्थिक महासत्ता बनविण्याचे वचन दिले आहे. ते कितपत खरे होते हे येणारा काळच सांगेल.



## लक्ष्यभेद

जयदीप सोनखासकर
9890508017

### कृषी समृद्धी



शेतकऱ्यांसाठी आता
योजना नवी आणली
सरकार म्हणते दाता
म्हणून गुंतवणूक केली

शेतकरी सक्षमीकरणासाठी
आम्ही पुढे पाऊल टाकले
भांडवली गुंतवणुकीसाठी
पाच हजार कोटी घातले

कृषी समृद्धी योजना
काय दिवे लावणार
खरंच हे शेतकऱ्यांना
आता सक्षम करणार

## ।। अभंगवाणी ।।

- प्रवीण हटकर
८०५५२१३२८१

सगुण निर्गुण
ब्रम्हांड वाटतो ।
प्रेयसी वाटतो
मोबाईल ।।

मोबाईल जाळ
असा अडकवी ।
चकवा फिरवी
जसा तुम्हा ।।

मोबाइल झाला
इतका जवळ ।
जितका जवळ
श्वास नाही ।।

मोबाईल कार्य
संदेशवहन ।
उगाच वाहनं
नको त्यात ।।



### विचारायण

साधना काळबांडे
9767993827

# घडतंय बिघडतंय...



मानवी जीवन म्हटले की जीवनात सुख आणि दु:ख असणारच. हातात हात घेवून ते मानवी जीवनात येतात. प्रत्येकाला शिकवण देवून जातात. जसे आपल्या जीवनात आपण सुखासाठी प्रयत्न करतो. पण दु:ख आपल्याला सांगून येत नाही. काही नैसर्गिक आपत्ती असते तर काही आपत्या ह्या आपण स्वत: हुन ओढवून घेतो. आजकाल कुठेही गेले तरी फोटो काढण्याची प्रत्येकाची चढाओढ सुरु असते. त्या चढाओढीत काही लोक जीवाचीही पर्वा करीत नाहीत. काहीतरी घडून जाते आणि संपूर्ण जीवन बिघडून जाते. बर प्रश्न असा पडतो की त्या फोटोचे आपण करतो काय? जर आठवणी साठी काढत असाल तर जिवंत राहणार नसाल तर त्या फ़ोटोला कोण पाहिलं?आज या फोटो काढण्याच्या फॅशन पायी कुटुंबंचे कुटुंबं आज उद्धस्त होत आहेत. पण समजते पण उमजत नाही अशी परिस्थिती आहे. अनेक धोक्याच्या ठिकाणी लोक मौजमजेसाठी जातात. तिथे जावून मस्ती करतात आणि जीवाला मुकतात. जर तिथे धोक्याची सूचना दिलेली असतांना आपण जातो तेव्हा ती जबाबदारी कोणी घ्यावी. मग आपण प्रशासनाला दोष देवून मोकळे होतो. आपण स्वत: आपल्या जीवाची का करू नये. हे दु:ख आपण स्वत:ओढवून घेत नाही का?आपण आणि आपले कुटुंबं जर संकटात येणार असेल तर काही ठिकाणी वागतांना विचार करायला हवा. निसर्ग आपला खरा सोबती आणि मित्र आहे. त्याच्या सारखा खरा सखा कोणी नाही. पण त्याची आपण साधी कदर केली नाही तर मात्र निसर्गासारखा शत्रूही नाही. त्याचे स्वास्थ बिघडण्याचा प्रयत्न आपण करतो. त्याला नेहमी नेहमी डिवचतो तेव्हा मात्र तो रौद्र रूप धारण करतो. तो पक्के शत्रूत्व निभावतो. मग आपण सारा दोष निसर्गाला देतो. या मानवी कृतिमुळे निसर्ग धोक्यात आला आहे. स्वत:च्या स्वार्था साठी आपण निसर्गाचा उपयोग करून घेतो. त्याच निसर्गाचे आपणच हालही करतं आहोत.ज्या गड किल्ल्यांना आपण पाहायला जातो. तिथे कसे वागावे हेही आपल्याला कळत नाही. तिथे केरकचरा करतो. दारू पिऊन धिंगाणा घालतो. जिथेतीथे स्वत:ची नावे कोरतो. हे कृत्य घडतांना आपल्याला काहीच कसे वाटत नाही. गड किल्ले हे पवित्र ठिकाण असते. त्या पवित्र भूमीवर राजे महाराजांनी शौर्य गाजवलेले असते. तेव्हा अशा ठिकाणी आपण कसे वागावे हेही आपल्याला कळत नाही. असे म्हणावे लागेल. कळते पण वळत नाही हेही सत्य आहे.तिथे आपले नाव कोरून ठेवावे इतके आपण महान नाही. आपण काहीच शौर्य गाजवलेले नाही. मग कोणत्या हक्काने आपण पावन ठिकाणी घाण करून येतो. कुठे कसे वागावे हे न कळणारे सुशिक्षित लोक आहोत. अशी चांगली ठिकाणे आपल्या देशाची आपली खरी संपत्ती असते.तिचे रक्षण करणे आपली जबाबदारी असते. आज हजारो जीव रस्ते अपघातात जातात. काही अपघात अनपेक्षित असले तरी काही स्वत:च्या चुकीने होतात. रस्त्यावर स्टंट करणारी तरुणाई स्वत: आपला जीव धोक्यात घालते. आपल्या जीवा बरोबर दुसऱ्याचा जीव जातो हे त्यांना कसे कळत नाही. आपले आईवडील त्यांचे कष्ट डोळया समोर येत नाहीत. ते जीवाने जातात आणि मागे दु:ख देवून जातात. वेळेला किंमत असते हे मान्य पण जिवापेक्षा नाही. पुरा तुन वाहन टाकतांना कोणता आला शुरवीर पणा. आता या पावसाळ्यात स्वत: आपत्ती ओढवून घेणारे लोक आहेत. नदी, ओढे, धबधबे, पूर या नैसर्गिक प्रक्रियेत हस्तक्षेप केला की संकट येणारच. अशी किती तरी संकटे आपण स्वत: निर्माण करतो. पुढच्याचे पाहून मागच्याच ठेचं ही फक्त म्हण आहे. इतरांच्या संकटातून आपण आजही काहीच शिकत नाही. शिकलो असतो तर त्यातून काही धडा घेतला असता... नाही का? आपल्या हातून घडतं म्हणून बिघडतंय... नक्कीच. सुधारणार स्वत: केल्याशिवाय दु:ख येणार नाही. आपल्या वागणुकीतून येणारी दु:खे ही स्वत: विकत घेतलेली असतात. ते तुम्ही स्वीकारायला हवी.... थोडा विचार व्हायला हवा.



### शैक्षणिक

प्रा. प्रशांत बुंदे
९४२३१३४१७४

# मुलांचे तंत्रज्ञानाकडे वाढते आकर्षण शालेय शिक्षणासाठी संधी की संकट?

**आजचा काळ 'डिजिटल युग' म्हणून ओळखला जातो. इंटरनेट, मोबाईल, संगणक, स्मार्ट टीव्ही यांचा उपयोग शिक्षण, मनोरंजन आणि संवादासाठी होतो. परंतु याच तंत्रज्ञानाकडे मुले दिवसेंदिवस अधिकाधिक आकर्षित होत चालली आहेत. हातात मोबाईल आला की जणू त्यात संपूर्ण जग सामावले गेले आहे. हे आकर्षण शिक्षणासाठी एक सुवर्णसंधी आहे का संकटाची चाहूल?**

**संधीचे दार उघडणारे तंत्रज्ञान मुलांना शिक्षण व्हिडीओ, डिजिटल ॲप्स, ऑडिओ-व्हिज्युअल साधनांमधून अधिक सुस्पष्ट समजते.**

विज्ञानाचे प्रयोग, गणिती सूत्र, इंग्रजी उच्चार हे सर्व घरबसल्या शिकणे शक्य झाले आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थी सुद्धा इंटरनेटमुळे जगाच्या पातळीवर स्पर्धा करू लागले आहेत.

पण संकटांची सावली... दुर्दैवाने, अनेक मुले शिक्षणापेक्षा गेम्स, सोशल मीडिया, रील्स, चॅटिंग यामध्ये गुंतून पडलेली दिसतात. तासन्तास मोबाईलवर खेळणे, संवाद टाळणे, एकाग्रतेचा अभाव, चिडचिड, रात्री उशिरापर्यंत जागणे, झोपेच्या वेळा बदलणे ही संकटे हळूहळू पालकांच्या नजरेस येतात, पण वेळ गेलेली असते.

प्रिय पालकांनो, मोबाईलवर पाऊसगीत लावून जेव्हा तुम्ही बाळ जेवायला घालत होता, तेव्हा हेच आकर्षण तुम्ही नकळत रूजवत होतात. आता त्याचा उगम वाढतोय, त्याची दिशा आपण ठरवायला हवी. तुमच्या मुलांना मोबाईल देताना उद्देश स्पष्ट ठेवा तो शिक्षणासाठी आहे की फक्त करमणुकीसाठी? तंत्रज्ञानाला दोष देण्याऐवजी, त्याचा सकारात्मक उपयोग शिकवणे हे आपले कर्तव्य आहे.

एकत्र बसून मोबाईल वापरा, काय पाहतात, काय शिकतात ते जाणून घ्या. 'डिजिटल उपवास' ठरवा आठवड्यातून एक दिवस मोबाईलमुक्त! विद्यार्थ्यांनो, लक्षात ठेवा मोबाईल, इंटरनेट, गेम्स हे तुमचे सेवक आहेत, मालक नाहीत. तुमचा वेळ, अभ्यास, आरोग्य, मैत्री, झोप आणि शांतता यावर तंत्रज्ञानाने कब्जा करू नये. तुमच्याकडे तंत्रज्ञान असले पाहिजे, पण तंत्रज्ञानाने तुम्हाला गिळू नये. प्रत्येक मिनिटाची किंमत समजून वापरा.




ज्ञान, शिस्त, मैत्री आणि सर्जनशीलतेसाठीच तंत्रज्ञान वापरा. ताण, भीती, चिडचिड वाटलीच तर पालकांशी, शिक्षकांशी बोला. शाळा, पालक आणि विद्यार्थी तिघांची भागीदारी आवश्यक शाळांनी डिजिटल शिस्तीचे मार्गदर्शन करावे, अभ्यासात तंत्रज्ञानाचा उपयोग शिकवावा. पालकांनी संवाद वाढवावा, केवळ निर्बंध न लावता समजून घ्यावे. विद्यार्थ्यांनी तंत्रज्ञानाचा उपयोग स्वत:च्या विकासासाठी करावा, विनाशासाठी नव्हे. निष्कर्ष संधी की संकट? तंत्रज्ञान हे ना चांगले, ना वाईट ते फक्त एक साधन आहे. त्याच्या योग्य वापरामुळे शिक्षण समृद्ध होऊ शकते, तर गैरवापरामुळे आयुष्य अंध:कारमयही होऊ शकते. संकट नको असेल, तर दिशा द्या. संधी हवी असेल, तर नियमन ठेवा. ''ज्ञानासाठी तंत्रज्ञान हवे पण विवेकासाठी मार्गदर्शन हवेच!''



### प्रासंगिक

सौ. माधुरी धनोकार
८४८२९६०११९

# 'स्वकर्मात व्हावे रत, मोक्ष मिळे हातो हात।' 'सावत्याने केला मळा। विट्ठल देखियला डोळा।'

सावता माळी हे एक मराठी संतकवी होते. सोलापूर जिल्ह्यातील माढा तालुक्या मध्ये अरण हे सावतोबांचे गाव होय. दैवू माळी हे सावता महाराजांचे आजोबा होते, ते पंढरीचे वारकरी होते त्यांना दोन मुले होती पुरसोबा आणि डोंगरोबा पुरसोबा हे धार्मिक वळणाचे होते शेतीचा व्यवसाय सांभाळून ते भजन-पूजन करीत असत, पंढरीची वारी करीत असत. त्यांचा विवाहही त्याच पंचक्रोशीतील सदू माळी यांच्या मुलीशी झाला. या दांपत्याच्या पोटी सावतोबांचा जन्म झाला. या घराण्याचे मूळ गाव मिरज संस्थानातले औसे होय. दैवू माळी (आजोबा) अरण या गावी स्थायिक झाले. भेंड हे गाव जवळच दोन मैलांवर आहे. सावता माळी यांनी भेंड गावचे 'भानवसे रूपमाळी' हे घराणे असलेल्या जनाई नावाच्या मुलीशी लग्न केले. तिने उत्तम संसार केला. त्यांना विठ्ठल व नागाताई अशी दोन अपत्ये झाली. सावता माळी यांनी सेना न्हावी नरहरी सोनार यांच्याप्रमाणेच त्यांनीही आपल्या व्यवसायातील वाक्प्रचार, शब्द अभंगात वापरले आहेत. तत्कालीन मराठी अभंगाच्या भाषेत नव्या शब्दांची, नव्या उपमानांची त्यामुळे भर पडली. सावता माळ्याचे अभंग काशीबा गुरव हा लिहून ठेवत असे.



संत सावता माळी यांच्या बद्दल संत नामदेव म्हणतात:-
धन्य ते अरण, रत्नांचीच खाण। जन्मला निधान सावता तो।।
सावता सागर, प्रेमाचा आगर। घेतला अवतार माळ्या घरी।।

सावता माळी हे कर्तव्य आणि कर्म करीत राहणे हीच खरी ईश्वारसेवा अशी प्रवृत्तिमार्गी शिकवण देणारे संत आहेत. वारकरी संप्रदायातील एक श्रेष्ठ आणि ज्येष्ठ संत म्हणून त्यांचा लौकिक आहे. श्री विठ्ठल हेच त्यांचे परमदैवत होते. ते कधीही पंढरपूरला गेले नाहीत. प्रत्यक्ष पांडुरंगच त्यांना भेटावयास आले. ते कर्ममार्गी संत होते. 'कर्मे ईशु भजावा' हीच त्यांची वृत्ती होती.पंढरपूरच्या विठ्ठलाची पालखी वर्षातून एकदा खास त्यांना भेटावयास येत असते.

अध्यात्म आणि भक्ती, आत्मबोध आणि लोकसंग्रह, कर्तव्य आणि सदाचार याची बेमालूम सांगड त्यांनी घातली. धर्माचरणातील अंध:श्रद्धा, कर्मठपणा, दांभिकता व बाह्य अवडंबर याबाबत त्यांनी कोणाचीच भीडभाड ठेवली नाही. त्यावर सतत कोरडे ओढले. अन्त:शुद्धी, तत्त्वचिंतन, सदाचार, निर्भयता, नीतिमत्ता, सहिष्णुता इत्यादी गुणांची त्यांनी भलावण केली. ईश्वराला प्रसन्न करून घ्यावयाचे असेल तर योग-याग-जप-तप, तीर्थव्रत, व्रतवैकल्ये या साधनांची बिलकूल आवश्यकता नाही. केवळ ईश्वराचे अंत:करणपूर्वक चिंतन हवे आहे.'आमची माळियाची जात, शेत लावू बागाईत' असे ते एका अभंगात म्हणतात.

ऐहिक जीवनात कर्तव्यकर्मे करीत असतानाच काया-वाचे-मने ईश्वरभक्ती करता येते, हा अधिकार सर्वांना आहे.

'न लगे सायास, न पडे संकट, नामे सोपी वाट वैकुंठाची' असा त्यांचा रोकडा अनुभव होता. त्यांनी जनसामान्यांना आत्मोन्नतीचा मार्ग दाखविला. यांना केवळ ४५ वर्षांचे आयुष्य लाभले. धार्मिक प्रबोधनाचे व भक्तिप्रसाराचे कार्य त्यांनी निष्ठेने व्रत म्हणून आचरिले. समरसता आणि अलिप्तता यातील विलक्षण समतोल त्यांच्या व्यक्तिमत्त्वात प्रकर्षाने जाणवतो. त्यांचे केवळ ३७ अभंग उपलब्ध आहेत. अरण येथे आषाढ वद्य चतुर्दशी, शके १२१७ (दि. २३ जुलै, १२९५) रोजी संत सावता महाराज अनंतात विलीन झाले. आजही पंढरपूरच्या श्री विठ्ठलाची पालखी वर्षातून एकदा खास त्यांना भेटावयास येत असते.होती. पंढरपूरच्यासंत सावतामाळी गाजलेले अभंग पुढीलप्रमाणे 'आमची माळियाची जात, शेत लावू बागाईत'

'कांदा मुळा भाजी अवघी ।विठाबाई माझी'' ''लसण मिरची कोथंबिरी । अवघा झाला माझा हरि ।।'

अनासक्त वृत्तीने ईश्वरार्पण बुद्धीने केलेला प्रपंचच परमार्थ होतो, हीच त्यांची जीवननिष्ठा होती. त्यांना मोक्ष-मुक्ती नको होती.

'वैकुंठीचा देव आणू या कीर्तनी' ही त्यांची प्रतिज्ञा होती

'स्वकर्मात व्हावे रत, मोक्ष मिळे हातो हात।'

'सावत्याने केला मळा। विठ्ठल देखियला डोळा।'

या ओळींतून त्यांची जीवननिष्ठाच स्पष्ट होते. त्यांच्या अभंगांत नवरसांपैकी वत्सल, करुण, शांत, दास्य-भक्ती हे रस आढळतात. सावतोबांची अभंगरचना रससिद्ध आहे.

'योग-याग तप धर्म । सोपे वर्म नाम घेता।।

तीर्थव्रत दान अष्टांग। याचा पांग आम्हा नको।। हाच विचार त्यांनी आग्रहाने मांडला. नामसंकीर्तनावर त्यांनी जास्त भर दिला. सर्वसंगपरित्याग करण्याची जरुरी नाही. प्रपंच करता करता ईश्वर भेटतो.

'प्रपंची असूनि परमार्थ साधावा। वाचे आळवावा पांडुरंग मोट, नाडा, विहीर, दोरी। अवघी व्यापिली पंढरीसावता माळी हे आपल्या दैनंदिन कामकाजात विठ्ठलाचेच रूप पाहात असत. त्यांच्या सासुरवाडीचे लोक एकदा त्यांच्याकडे आले. सावता माळी भजनात रंगून गेले होते. त्यांनी सासुरवाडीच्या लोकांकडे लक्ष दिले नाही. पत्नी संतापली, त्यावेळी त्यांनी आपल्या पत्नीला जो उपदेश केला तो पुढीलप्रमाणे

प्रपंचीं असूनि परमार्थ साधावा । वाचे आठवावा पांडुरंग ।।
उंच नीच कांही न पाहे सर्वथा । पुराणींच्या कथा पुराणींच ।।
घटका आणि पळ साधीं उतावीळ । वाउगा तो काळ जाऊं नेदी ।।
सावता म्हणे कांते जपें नामावळी । हृदयकमळी पांडुरंग ।।

आपल्या कामात परमेश्वर पाहणारे, काम हाच परमेश्वर अशी दृढ श्रद्धा बाळगणारे आणि स्वत:च्या पत्नीसही अधिकारवाणीने परमार्थाचा उपदेश करणारे सावता माळी त्यांच्या काळात महाराष्ट्राच्या भक्तीच्या मळयाची मनोभावे जपणूक करीत होते, हे आपले भाग्यच नाही का ...

# दाक्षिणात्य सुपरस्टार सूर्याने ५० व्या वाढदिवसानिमित्त चाहत्यांना दिले खास गिफ्ट



दाक्षिणात्य सुपरस्टार सूर्या आज त्याचा ५० वा वाढदिवस साजरा करत आहे. त्याच्या वाढदिवसानिमित्त आगामी चित्रपट 'करुप्पू'चा टीझर नुकताच प्रदर्शित करण्यात आला आहे. या टीझरमधून सूर्याचा ॲक्शनने भरलेला हटके आणि रावडी अंदाज पाहायला मिळत आहे. त्याचा हा अंदाज चाहत्यांच्याही चांगलाच पसंतीस पडला आहे. 'करुप्पू' हा एक ॲक्शन-थ्रिलर चित्रपट असून चित्रपटाचं दिग्दर्शन आरजे बालाजी यांनी केले आहे. ''सूर्या सरांच्या खास दिवशी 'करुप्पू'चा टीझर सादर करताना आम्हाला खूप आनंद होत आहे'' असं म्हणत सर्व सोशल मीडिया अकाऊंटद्वारे हा टीझर शेअर करण्यात आला आहे. गावात जत्रा सुरू आहे आणि वातावरणात एक वेगळीच ऊर्जा असल्याचं या टीझरमधून दिसत आहे. तर टीझरच्या सुरुवातीलाच सूर्याच्या व्यक्तिरेखेची झलक दिसत आहे. त्याचबरोबर टीझरमधून स्थानिक देवतेची पूजा, परंपरा आणि लोकसंस्कृतीचं चित्रणदेखील दिसत आहे. टीझरमध्ये सूर्या दोन वेगवेगळ्या भूमिकांमध्ये दिसत आहे. एका अवतारात तो वकील असून स्वतःचं नाव सरवनन सांगतो. तर दुसऱ्या रूपात तो ग्रामीण पोशाखात दिसत असून त्याच्या हातात एक शस्त्र असल्याचं पाहायला मिळत आहे.या टीझरमधून अनेक ॲक्शन सीन्स, उत्तम संवाद आणि सूर्याचा डॅशिंग अंदाज पाहायला मिळत आहे. ज्यामुळे त्याच्या चाहत्यांची चित्रपटाविषयीची उत्सुकता आणखीनच वाढली आहे. 'करुप्पू'विषयी सांगायचं झालं तर याचं दिग्दर्शन आरजे बालाजी यांनी केलं आहे. कथा अश्विन रविचंद्रन, राहुल राज, टी.एस. गोपी कृष्णन आणि करण अरविंद कुमार यांची आहे. तर चित्रपटाला संगीत साई अभयंकर यांनी दिलं आहे.

# तनुश्री दत्ताने विवेक अग्निहोत्री यांच्यावर केले गंभीर आरोप!



बॉलीवूड अभिनेत्री तनुश्री दत्ताने नुकताच इन्स्टाग्रामवर एक भावनिक व्हिडिओ शेअर केला आहे. या व्हिडिओमध्ये ती सांगत आहे की, चार-पाच वर्षांपासून तिचा स्वतःच्या घरात छळ होत आहे. या व्हिडीओमध्ये ती रडताना दिसत आहे. तिला घरात मानसिक त्रासाला, तसेच शारीरिक छळाला सामोरे जावे लागत आहे. तसेच तिला मदतीची गरज आहे, असेदेखील तिने म्हटले आहे.'आशिक बनाया आपने' या चित्रपटातून प्रसिद्धीच्या झोतात आलेल्या तनुश्री दत्ताने 'द काश्मीर फाइल्स'चे दिग्दर्शक विवेक अग्निहोत्री यांच्याबरोबर काम करण्याचा तिचा वाईट अनुभव शेअर केला होता. एका जुन्या मुलाखतीत तिने सांगितले होते की, जेव्हा ती शूटिंगला पाच मिनिटे उशिरा पोहोचली तेव्हा ते तिच्यावर ओरडले होते. २००५ मध्ये आलेल्या 'चॉकलेट' चित्रपटात विवेक अग्निहोत्री यांच्याबरोबर अभिनेत्री तनुश्री दत्ताने काम केले होते. तिने फरीदून शहरयारशी झालेल्या संभाषणात तिचा अनुभव शेअर केला होता. ती म्हणाली होती, ''एके दिवशी मी सेटवर पाच मिनिटे उशिरा पोहोचले तेव्हा ते माझ्यावर ओरडले आणि मला अनप्रोफेशनल म्हटले. कधी कधी लाईटही चालू केलेली नसायची तेव्हा मी सेटवर येत असे. काही सेट्स तयार नसायचे. म्हणजे जो काही सेटअप आहे, काहीही तयार नसायचे. पण एके दिवशी मी थोडी उशिरा आली. पाच मिनिटे, अगदी पाच मिनिटे आणि ते फक्त मी आले आहे की नाही हे पाहण्यासाठी सेटवर आले होते.

## आपणचं तयार करा हे महाशब्दकोडे 110



### हे कोडे कसे सोडवाल

संकेतामध्ये काही शब्द दिलेले आहेत. हे शब्दच योग्यप्रकारे या चौकटीत लिहून हे महाशब्दकोडे आपणचं तयार करा. मदतीकरिता काही शब्द चौकटीत दिलेले आहे.

**संकेत शब्दः—**

**दोन अक्षरी**
- आम
- कम
- कस
- कर्मा
- काग
- काया
- काळ
- कंद
- कंपा
- खोच
- तन
- तंबी
- थारा
- दादा
- न्यारा
- पर्व
- पंक
- पंत
- पंथ
- बोध
- भद्र
- मन
- मात
- शाप
- योद्धा
- रघु
- रमा
- रवि
- रंग
- रीस
- लोट
- वसा
- वपु
- सुगी
- सुभा

**तीन अक्षरी**
- आश्रीत
- आसाम
- कायदा
- खनन
- गर्दभ
- चंदन
- तरल
- धमाका
- पंकज
- दलित
- नासका
- नेपाळ
- लिपिक
- वामन
- सामान
- सुसाट

**चार अक्षरी**
- अनवाणी
- अरसिक
- आमदार
- कथानक
- काळे पाणी
- तळघर
- निमपट
- पांचजन्य
- लवकर
- लोकमान्य
- समारंभ

**पाच अक्षरी**
- कन्याकुमारी
- कबीरपंथ
- थर्मामीटर
- मानापमान
- श्रीमान योगी

**सहा अक्षरी**
- नगर पालिका
- नियत कालिक
- राजीव लोचन

**अन्य अक्षरी**
- आमिष दाखविणे
- नेताजी सुभाषचंद्र बोस

(उत्तर पुढील अंकी)

### मागील महाशब्दकोडेचे उत्तर



Uday Munde - 8446302691

## महाशब्दकोडे 491



**—: आडवी विधाने :—**

1) अतिशय क्षुल्लक गोष्ट जास्त फुगवून सांगणे या अर्थाचा एक वाक्प्रचार
5) हिंदू वर्षाचा बारावा महिना
7) गुरु, शिक्षक, शास्त्र प्रवर्तक
8) शंकराचे आवडते त्रिदळी पान
9) लढवय्या
10) नफा, लाभ
12) दिवाळीत अंगणात विविध रंगांनी सजविलेल्या कलाकृती
14) सिर .............. तो पगडी पचास (गाळलेला शब्द)
16) अर्धांगवायू
18) स्वतःच्या मनाप्रमाणे वागणारा
20) वर्तुळ, वलय, कडे
21) नारी
22) श्री विष्णूचा एक अवतार
24) उजेड
26) एखाद्याबद्दल हमी देणे
29) पोलीसदलातील शिपायांवरचा एक अंमलदार
31) ज्यावर कुणी हक्क सांगत नाही असे, अनाथ,
32) आखणी, कल्पना
33) अग्नित आहुती टाकणे
34) संकट
35) पोलीस चौकीतील एक मुख्य अधिकारी
37) पृथ्वी
38) आई, जननी
39) उन्हाची अतिशय तीव्रता
42) मेघ, स्त्रीचा स्तन
46) सुख—दुःख जाणणारे इंद्रिय
48) आपला स्वार्थ साध्य झाल्यानंतर मदत करणाऱ्यास आपण काडीचीही किंमत देत नाही या अर्थाची एक म्हण
51) बारा राशीपैकी एक
52) आठ कोण असलेली आकृती
53) फुटलेल्या मडक्याचा तुकडा
54) विवाह प्रसंगी उच्चारण्यात येणारी आठ मंगलपदे
56) गळ्यापर्यंत
57) श्रीकृष्णाचा गरीब मित्र
59) चाकात टाकावयाचे ओंगण
60) अनिष्ट चिंतन
61) हिरा
63) सैन्य
64) ब्रम्हदेव, राजा
66) नजराणा, मिलाफ
67) ताप येण्यापूर्वीची लक्षणे
69) बुद्धी,, ज्ञान
70) दिवा
72) मोकळे सोडलेले, स्वच्छंदी
73) साधू पुरुष
75) स्पष्ट बोलणारा
76) एक पौष्टिक कंदमुळ
78) आयुध, हत्यार
79) सजविलेली कमान
80) पडणे, पर्ण

**—: उभी विधाने :—**

1) जाळून पोळून केलेला सत्यानाश
2) सुक्या मेव्यातील एक पदार्थ
3) घोड्यांचे निवासस्थान
4) एकेक कलम घेऊन
5) सोडचिठ्ठी,
6) लाभ, प्राप्ती
7) देवाणघेवाण, विनिमय
9) तीक्ष्ण अग्राचा लोहस्तंभ
11) मृत्यूदेवत
13) वाटोळा
15) अंधःकार काळोख
19) अंगिकार, घेणे, संमती
23) वाहणारे पाणी
25) अधीन असलेला, बंदी
26) एकापेक्षा दुसरा श्रेष्ठ असणे, वरचढ
27) पाश
28) लतामंडप
30) मीठ, क्षार
32) अचानक घडलेले
34) आदेश हुकूम
36) बिजातून नुकतेच उमललेले लहान झाड
38) आदर, सन्मान
40) विक्री, मेहनत
41) जबर शत्रुत्व, वैर
43) भूकंप
44) पुष्पकण, धूळ
45) दुसऱ्यावर केलेले उपकार
46) मदिरा
47) विवाह, लग्न
49) मित्र, सोबती
50) शत्रुत्व, वैमनस्य
52) आठ हात असलेली देवी
55) सेवक किंवा भक्त यांचा समूह, समुदाय, वर्ग
56) निराश न होणारा, उत्साही
58) मानवी मनाचा अभ्यास व स्वरुप या संबंधीचे एक शास्त्र
59) आदर देण्यायोग्य, महनीय
60) खूप, जास्त
61) जर्मनीचा एक भूतपूर्व हुकूमशहा
62) सरकारने कर माफ केलेली एखादी गोष्ट
64) स्पर्धक
65) दैना, दुर्दशा
68) कठोर, जुलमी
71) महिन्याकाठी मिळणारे वेतन
74) एक संख्या
77) देवाचे एकसारखे वारंवार नाव घेणे
78) शंभर

(उत्तर पुढील अंकी)

### मागील महाशब्दकोड्याचे उत्तर



Uday Munde - 8446302691

## राशी-भविष्य

**मेष :** आजचा काळ मिश्रित परिणाम देणारा आहे. प्रगती आणि आदर मिळविण्यासाठी आजचा दिवस चांगला आहे.

**वृषभः** कुटुंबातील सदस्यांमध्ये मतभेद होऊ शकतात. अशा परिस्थितीत अशांतता तुमच्यासाठी चिंतेचा विषय बनू शकते.

**मिथून :** तुमच्या कामात महत्त्वाचे निर्णय घेण्यासाठी आजचा दिवस चांगला आहे. आज तुम्हाला सर्वत्र यश मिळेल.एखाद्या जुन्या ओळखीच्या व्यक्तीला भेटू शकता.

**कर्क :** तुम्ही तुमच्या कुटुंबातील सदस्याला तुमचे मन सांगू शकता. यावेळी तुम्ही तुमच्या शहाणपणाने यश मिळवू शकाल. विनाकारण गोष्टींमध्ये जास्त छेडछाड करू नका.

**सिंह :** तुम्ही तुमच्या कामात पुढे जात राहाल. तुम्हाला यापासून कोणीही रोखू शकत नाही. तुमच्या कष्टाचे फळ मिळेल.

**कन्या:** नोकरी करणाऱ्या लोकांना आज कामाचा जास्त ताण जाणवू शकतो. तुमचे काम पुढे नेत राहा. कौटुंबिक वादात स्वतःला दोष देऊ नका.

**तुळ :** तुम्ही जे काम करत आहात ते उघडपणे तुमचे काम पुढे नेण्यासाठी काम करेल. तुम्हाला काही महागड्या गोष्टी मिळू शकतात.

**वृश्चिक :** आज तुम्ही भावनिकदृष्ट्या अस्वस्थ आहात. कुटुंबात भांडणे वाढू शकतात. कुटुंबात वाद होऊ शकतात. तुम्ही या बाबतीत चांगले पाऊल उचलले पाहिजे.

**धनु :** आज तुमच्या आयुष्यात काहीतरी घडू शकते. जर तुम्ही कठोर परिश्रमाच्या जोरावर नोकरी शोधत असाल तर तुम्हाला जास्त वाट पाहण्याची गरज नाही.

**मकर :** आज तुम्ही तुमच्या खर्चामुळे त्रस्त असाल. तुमची चुकीची माहिती तुमचे नाते बिघडू शकते. कामावर शिस्त लावण्याची खूप गरज आहे. ुम्हाला काही चांगली बातमी मिळेल.

**कुंभ :** चालू असलेल्या समस्या संपतील. तुम्हाला सामाजिक कार्यात किंवा राजकीय कार्यातही यश मिळू शकते. तुम्हाला काही अनावश्यक खर्चही करावे लागू शकतात.

**मीन :** तुमचे दीर्घकाळापासून प्रलंबित असलेले काम पूर्ण होईल. यामुळे तुम्हाला भविष्यातही यश मिळू शकते. कुटुंबातील वातावरण आनंददायी राहील.

आचार्य पं. श्रीकांत पटैरिया: मो. ७८७९३७२९१३

# २४ जुलैचा चक्काजाम: शेतकरी चवताळले!

## आता बळीराजा कर्जमाफीशिवाय गप्प बसणार नाही

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**अमरावती, दि. २३ :** कर्जमुक्तीचं वारंवार थातूरमातूर आश्वासन देऊन सरकारनं शेतकऱ्यांची केवळ थट्टाच केली आहे. आता मात्र महाराष्ट्रातील शेतकरी, कामगार, मेंढपाळ, मच्छीमार, दिव्यांग, महिला आणि संपूर्ण कष्टकरी समाज एकवटलेला आहे. बच्चू कडू यांच्या नेतृत्वाखाली २४ जुलै रोजी सकाळी ८ ते १० दरम्यान राज्यभर ''चक्काजाम आंदोलन'' होणार आहे आणि यावेळी हे आंदोलन केवळ इशारा नसून निर्णायक लढा ठरणार आहे.

'अभी नही तो कभी नही!' कर्जमुक्तीची चळवळ निर्णायक टप्प्यावर पोचले आहे. ''जातीपाती, धर्म, पक्ष विसरून एकत्र या! कर्जमुक्तीसाठी रस्त्यावर या!'' हा सुसंवाद आता घोषणा न राहता जनआंदोलनाचं रूप घेत आहे. महाराष्ट्रात वेगवेगळ्या ठिकाणी स्वयंस्फूर्तीने बैठकांचं उधाण आहे. या कर्जमुक्तीच्या आंदोलनाचं वळण आता निर्णायक टप्प्याकडे वळलं आहे. कर्जमुक्तीच्या आंदोलना मागे संघर्षाची साखळी आहेच हे विशेष. कर्जमुक्ती हा लढा नव्हे केवळ एक दिवसाचा, तर संघर्षाने आणि त्यागाने सजलेली अखंड श्रमयात्रा आहे.

मेंढपाळांसाठी डेरा आंदोलन, रायगडाच्या पायथ्याशी तीन दिवसांचा अन्नत्याग, मोझरी येथे सात दिवसांचं तुकडोजी महाराजांच्या प्रेरणास्थळी अन्नत्याग आंदोलन, .पापड ते चिलगव्हाण अशी १५० किमीची सातबारा कोरा कोरा पायदळ यात्रा हे सगळं हृदय हेलावणाऱ्या त्यागाने आणि निर्धाराने भरलेलं आहे. शासन गप्प, पण यंत्रणा सक्रिय दडपशाहीची तयारी करीत असल्याचा आरोप होत आहे. आंदोलन संविधानिक आणि शांततेच्या मार्गाने होत आहे. तरीही शासकीय यंत्रणा आंदोलन दडपण्यासाठी सक्रिय झाल्या आहेत. यावर शेतकऱ्यांचा तीव्र इशारा आहे की ''तुम्ही आंदोलन दडपाल, आम्ही आणखी जोमाने उभे राहू! हे फक्त आमचा हक्क नाही कर्जमुक्ती, शेतमालाला हमीभाव आमचा आत्मसन्मान आहे!'' शेतकऱ्यांच्या संपूर्ण कर्जमाफीसाठी महाराष्ट्रातील जनतेचा पाठिंबा वाढतोय सरकारच्या कानांवर अजूनही झोपेचं सोंग.राज्यातील अनेक शेतकरी संघटना, राजकीय पक्ष, सामाजिक संस्था, आमदार, खासदार, माजी लोकप्रतिनिधी यांनी या चळवळीला जाहीर पाठिंबा दिला आहे. आंदोलन यशस्वी करण्यासाठी सर्व स्तरांवरून आश्वासनं देण्यात आली आहेत.

### उग्र आंदोलनाला शासन जबाबदार!

सरकारने जर या आंदोलनाची दखल घेतली नाही, तर पुढील पाऊल अधिक तीव्र आणि उग्र असणार. शासन आमच्या भावनांचा अंत पाहू नये. आम्हाला उग्र आंदोलन करण्यास प्रवृत्त करू नये. ही चेतावणी आहे, विनंती नाही!

### २४ जुलै महाराष्ट्राच्या रस्त्यांवर निर्णयाची ठिणगी पडणार!

ही चळवळ आता केवळ एक मागणी उरलेली नाही, हा लढा झाला आहे शेतकऱ्यांच्या अस्तित्वाचा! सरकारने जर वेळेवर निर्णय घेतला नाही, तर २४ जुलै महाराष्ट्राच्या राजकीय आणि सामाजिक इतिहासात शेतकऱ्यांच्या रोषाचा स्फोटक दिवस ठरेल.

## थोडक्यात

### डाक विभागात २.० प्रणालीची अंमलबजावणी

**चंद्रपूर :** डाक विभागाद्वारे पुरविण्यात येणाऱ्या सुविधांमध्ये मोठे बदल घडवून आणण्याचे सरकारने ठरविले आहे. त्याकरीता डाक विभागात २.० या संगणकीय प्रणालीची अंमलबजावणी होणार आहे. या प्रणालीमुळे डाक विभागाद्वारे पुरविण्यात येणारी सेवा ही अचुक, जलद व ग्राहकाभिमुख होईल. सदर २.० प्रणालीची अंमलबजावणी ५ ऑगस्ट २०२५ रोजी चंद्रपूर व गडचिरोली जिल्ह्यातील सर्व डाकघरात होणार आहे. याकरीता ही अत्यंत महत्वाची प्रक्रीया असते, जी ४ ऑगस्ट रोजी केल्या जाईल. या कारणामुळे चंद्रपूर व गडचिरोली जिल्ह्यातील डाक विभागाशी संबंधीत सर्व कामे ही दिनांक ४ ऑगस्ट रोजी बंद राहतील. सर्व ग्राहकांना विनंती आहे की, त्यांचे डाक विभागाशी संबंधीत जी काही तातडीची कामे आहेत, ते कृपया २ ऑगस्ट पर्यंत पूर्ण करुन घ्यावे. ग्राहकांच्याच हितासाठी व त्यांना अचूक, जलद व ग्राहकाभिमुख सेवा मिळावी, याच उद्देशाने हे सर्व प्रयत्न केल्या जात आहेत. तरी सर्व ग्राहकांनी यांची कृपया नोंद घ्यावी, असे आवाहन वरिष्ठ डाक अधिक्षक एस. रामाक्रिष्णा यांनी केले आहे.

### वैयक्तिक व सामूहिक लाभांच्या योजनांचे अर्ज भरण्याकरिता ३१ जुलैपर्यंत मुदतवाढ

**चंद्रपूर :** आदिवासी विकास विभागाकडील केंद्रवर्ती अर्थसंकल्प योजने अंतर्गत वैयक्तीक व सामुहिक लाभाच्या विविध योजनांकरीता सन २०२५-२६ पासून. nbtribal.in ही ऑनलाईन अर्ज प्रणाली कार्यान्वीत करण्यात आली आहे. सन २०२५-२६ या वर्षात केंद्रवर्ती अर्थसंकल्प योजनेअंतर्गत प्रकल्प कार्यालय, चंद्रपुर यांच्या कार्यक्षेत्रातील चंद्रपुर, बल्लारपुर, राजुरा, कोरपना, जिवती, गोंडपिपरी, पोंभुर्णा, मुल, सावली व सिंदेवाही या तालुक्यातील अनुसुचित जमातीच्या तसेच आदिम जमातीच्या शेतकरी/बेरोजगार लाभार्थी तसेच बचत गटांकरीता उत्पन्न वाढीच्या अनुषंगाने व स्वयंरोजगाराभिमुख विविध योजना राबविण्या करिता इच्छुक गरजु पात्र लाभार्थ्यांकडून ऑनलाईन अर्ज मागविण्यात आले होते. सदर योजनेकरीता अर्ज करण्याची अंतिम मुदत ही १५ जुलै २०२५ पर्यंत होती. परंतु ऑनलाईन अर्ज करतांना दुर्गम भागात काही ठिकाणी तांत्रिक अडचणी येत असल्याने आयुक्त, आदिवासी विकास विभाग यांनी ३१ जुलै २०२५ पर्यंत अर्ज करण्यास मुदतवाढ दिली आहे. कोणत्याही कारणाने ऑनलाईन अर्ज करावयाचा राहून गेलेल्या इच्छुक आदिवासी नागरिकांनी/लाभार्थ्यांनी विविध योजनेकरीता. nbtribal.in या पोर्टलवर ऑनलाईन अर्ज भरुन लाभ घ्यावा, असे आवाहन प्रकल्प अधिकारी विकास राचेलवार यांनी केले आहे.

### रोजगार मेळाव्याचा समारोप; १०७ उमेदवारांची प्राथमिक निवड

अकोला, दि. २३ : पंडित दीनदयाल रोजगार मेळाव्यात एकूण ४५६ उपस्थित उमेदवार होते. त्यापैकी १०७ उमेदवारांची प्राथमिक निवड झाली. आमदार वसंत खंडेलवाल यांच्या हस्ते रोजगार मेळाव्यातून नोकरी मिळालेल्या काही उमेदवारांना नियुक्तीपत्रे वाटप करण्यात आले. आमदार साजिद खान पठाण यांनीही मेळाव्याला उपस्थित राहून विविध स्टॉलला भेट दिली. रोजगार मेळाव्यामध्ये विविध रोजगार व स्वयंरोजगार योजना राबवणाऱ्या जिल्हा उद्योग केंद्र, खादी व ग्रामोद्योग महामंडळ, मौलाना आझाद अल्पसंख्याक महामंडळ, वसंतराव नाईक महामंडळ, महाराष्ट्र राज्य दिव्यांग वित्त व विकास महामंडळ, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे महामंडळ, महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ, महाराष्ट्र संशोधन उन्नती व प्रशिक्षण प्रबोधन (अमृत) महामंडळ, महाराष्ट्र राज्य इतर मागास महामंडळ (ओबीसीमहामंडळ),अण्णासाहेब पाटील महामंडळ यांचे स्टॉल देखील लावण्यात आले होते. मेळाव्याच्या यशस्वी आयोजना करिता जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्रातील कर्मचारी व श्रीमती राधादेवी गोयनका महिला महाविद्यालय,अकोला यांचे कर्मचार्यांनी अथक परिश्रम घेतले.

### रेल्वे यात्री एकता मजदूर संघाच्यावतीने ४१ गुणवंतांचा सन्मान

**अकोला :** रेल्वे यात्री एकता मजदूर संघाच्या वतीने आयोजित गुणगौरव सोहळा भास्कर हॉल, शेगाव येथे मोठ्या उत्साहात पार पडला. यावेळी १०वी, १२वी आणि सीईटी परीक्षेत यशस्वी ठरलेल्या ४१ विद्यार्थ्यांचा सन्मान प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व महापुरुषांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून मोहन देशपांडे (स्टेशन मॅनेजर), शकुंतला बूच (नगराध्यक्ष), श्रीकांत मुळे (एलआयसी), अजय मगरदे (लोको पायलट), ज्योती बावस्कर यांची उपस्थिती लाभली. पाहुण्यांचा पुष्पगुच्छ व स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र व स्मृतिचिन्ह देऊन गौरवण्यात आले.संस्थापक अध्यक्ष नंदगोपाल पांडे यांनी राष्ट्रीय रेल्वे यात्री संघ सोशल वेल्फअर फाउंडेशनच्या संचालिका दीपमाला कांबळे यांचा विशेष सत्कार करत झाशीची राणीचा पुतळा भेट दिला. कार्यक्रमात संघाच्या पदाधिकाऱ्यांना नियुक्ती पत्र व आयकार्डचे वाटप करण्यात आले. या सोहळ्याचे आयोजन निरज खंडेलवाल, डॉ. मोहम्मद नदीम, उमेश अग्रवाल, रामेश्वर कापडे, ललित पांडे, दीपमाला कांबळे, रत्ना डिक्कर यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांनी केले.

## शिवसेना आ. खरात यांच्या मध्यस्थीने टॉवरवर चढलेल्या शेतकऱ्याचे उपोषण मागे

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**मेहकर, दि. २३ :** ''मागेल त्याला सोलर'' या सरकारच्या योजनेवर मेहकर तालुक्यातील शेतकऱ्यांचा विश्वास बसावा की न बसावा, असा प्रश्न निर्माण झाला आहे. भोसा येथील अल्पभूधारक शेतकरी विष्णू जयराम चंदनशे यांनी तब्बल आठ महिने झाले तरी सोलर पंपासाठी वीज कनेक्शन न मिळाल्याने पुन्हा एकदा टॉवरवर चढून आंदोलन छेडले असता रात्री उशिरा शिवसेना आमदार सिद्धार्थ खरात यांनी वीज वितरण कंपनी व सोलर कंपनीकडून ठोस आश्वासन घेतल्यानंतर शेतकऱ्याने आंदोलन मागे घेतले



तालुक्यातील भोसा येथील शेतकरी विष्णू चंदनशे यांना शासनामार्फत तीन हॉर्सपॉवरचे दोन सोलर पंप मंजूर झाले होते. त्यासाठी त्यांनी पत्नीच्या गळ्यातील मंगळसूत्र विकून कोटेशनचे पैसे भरले. मात्र आठ महिने उलटूनही संबंधित सोलर एजन्सी (सावित्री सोलरप्रा.लि.)आणि महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीकडून कनेक्शन मिळालेले नाही.

या गैरप्रकाराविरोधात त्यांनी ११ जुलै २०२५ रोजी महावितरणच्या मेहकर येथील उपकार्यकारी अभियंता कार्यालयाच्या टॉवरवर चढून आंदोलन केले होते. यावेळी उपकार्यकारी अभियंता विरेंद्र कळस्कर यांनी २० जुलै २०२५ पर्यंत कनेक्शन देण्याचे लेखी आश्वासन दिले. मात्र दिलेल्या मुदतीनंतरही कनेक्शन मिळाले नाही.

शेवटी, अन्याय व दुर्लक्षामुळे संतप्त झालेल्या विष्णू चंदनशे यांनी २२ जुलै रोजी मेहकर येथील जुन्या तहसील कार्यालयाच्या टॉवरवर चढून दुपारी एक वाजेपासून पुन्हा आंदोलन सुरू केले होते . रात्री साडेनऊ वाजता शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) आमदार सिद्धार्थ खरात हे घटनास्थळी गेले.त्यांनी वीज वितरण कंपनी व सोलर कंपनी अधिकारी यांच्या शी बोलून चार ते पाच दिवसात सोलर कनेक्शन लावण्याचे आश्वासन घेतले.तसे लेखी उप कार्यकारी अभियंता विरेंद्र कळसकर यांनी दिले आहे.यासोबतच यामिनी विष्णू चंदनसे व सहदेव भिकाजी बहादुरे यांना सुद्धा सोलर कनेक्शन मिळणार आहे.तसेच भोसा येथे कायमस्वरूपी लाईनमन देणे व जी.के. सोलर एनर्जी कंपनीचे नाव काळ्या यादीत टाकण्याबाबत वरिष्ठ अधिकारी यांच्या कडे प्रस्ताव पाठविण्यात येईल असे लेखी कळसकर यांनी दिले आहे.यावेळी शिवसेना शहर प्रमुख किशोर गारोळे, युवा सेना तालुका अधिकारी आकाश घोडे, संदीप गवई,भोसाचे माजी सरपंच तथा पत्रकार दत्ता उमाळे सह गावकरी उपस्थित होते.

या प्रकारामुळे ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना सौर उर्जेचा लाभ मिळवून देण्याची जबाबदारी घेतलेल्या शासन यंत्रणेची कार्यक्षमता व पारदर्शकता यावर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहेत.या प्रकरणाची तात्काळ चौकशी करून संबंधित शेतकऱ्याला न्याय द्यावा, अशी मागणी आता ग्रामस्थांसह विविध शेतकरी संघटनांनी केली आहे.

## माजी प्रदेश कार्याध्यक्षाला महिलेकडून चप्पलने चोप

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**अकोला, दि. २३ :** अकोला जिल्ह्यातील मुर्तीजापूर तालुक्यात संभाजी ब्रिगेड पक्षाच्या माजी प्रदेश कार्याध्यक्ष डॉ. गजानन पारधी यांना एका महिलेकडून चप्पलांनी बेदम चोप दिला असल्याची खळबळजनक घटना उघडकीस आली आहे. संबंधित महिलेनं त्यांच्यावर छेडछाड, ब्लॅकमेलिंग, पैशांची मागणी आणि व्हिडिओ-फोटो व्हायरल करण्याच्या धमकीसारखे गंभीर आरोप केल्याने हा सगळा प्रकार घडल्याची माहिती प्राप्त झाली आहे.

दरम्यान, या प्रकरणाचा व्हिडिओ सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल झाला असून, समाज माध्यमात मोठी चर्चा रंगली आहे. विशेष म्हणजे या प्रकाराची पोलिस ठाण्यात कोणतीही अधिकृत नोंद झालेली नाही. मुर्तीजापूर पोलीस ठाण्यात डॉ. पारधी विरोधात कोणताही गुन्हा दाखल नसल्याचे सूत्रांकडून सांगण्यात येत आहे.

पक्षाची प्रतिमा मलीन केल्याप्रकरणी संभाजी ब्रिगेडने तातडीने कारवाई करत डॉ. गजानन पारधी यांना पक्षातून कायमस्वरूपी हकालपट्टी केल्याची अधिकृत घोषणा केली आहे. याबाबतचे पत्रही प्रसारमाध्यमांमध्ये व्हायरल झाले आहे. पक्षाने ही कारवाई महिलेकडून करण्यात आलेल्या गंभीर आरोपांची दखल घेत केल्याचं पत्रात नमूद आहे. या संदर्भात संपर्क केला असता संबंधित महिलेनं मीडियासमोर येण्यास नकार दिला असून, तिच्या तक्रारीमुळेच ही कारवाई झाल्याचं स्थानिक पातळीवर सांगण्यात येतंय. मात्र, मारहाण नेमकी केव्हा झाली, त्याचा नेमका कालावधी काय, याविषयी अधिकृत माहिती अद्याप अस्पष्टच आहे. या प्रकारामुळे पक्षाच्या वरिष्ठ नेतृत्वावर आणि डॉ. पारधी यांच्या पूर्वीच्या कामकाजावरही प्रश्नचिन्ह उपस्थित झाले असून, पुढील काळात या प्रकरणाला काय वळण मिळते, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

## राज्यातील कोचिंग क्लासेस संघटनेचा एल्गार

### राज्यस्तरीय क्लासेस बचाव कृती समितीची स्थापना

। सुधीर केने ।

**अमरावती, दि. २३ :** महाराष्ट्र शासनाच्या प्रस्तावित कोचिंग क्लासेस अधिनियमाचा अभ्यास करुन त्यातील केवळ ज्याचक अटीला विरोध करण्यासाठी दादर पूर्व येथील हॉटेल सिटी पॉईंट सभागृहात महाराष्ट्रातील कोचिंग क्लासेसच्या नऊ संघटना एकत्र आल्या व क्लासेस बचाव कृती समिती स्थापना करण्यात आली आहे. मुंबईच्या महाराष्ट्र क्लास ओनर्स असोसिएशनचे प्रजेश ट्रॉस्की यांची अध्यक्षपदी निवड झाली. कोचिंग क्लासेस टीचर्स फेडरेशन अँड सोशल फोरम महाराष्ट्र, अमरावती येथील बंडोपंत भुयार यांची उपाध्यक्षपदी तसेच प्रोफेशनल टीचर असोसिएशनचे सांगली येथील रवींद्र फडके व नागपूर येथील कोचिंग क्लासेस असोसिएशनचे बोंद्रे सर यांचीही उपाध्यक्षपदी निवड झाली. कोचिंग क्लासेस वेल्फेअर असोसिएशन नाशिकचे यशवंत बोरसे यांची कार्याध्यक्षपदी निवड झाली. असोसिएशन ऑफ कोचिंग क्लास ओनर्स अंड मेंटॉर्स मुंबईचे श्री दिलीप मेहंदळे सर यांची सचिवपदी व कोचिंग क्लास असोसिएशन संभाजीनगर



(औरंगाबाद )चे पांडुरंग वाघ यांची सहसचिव पदी निवड झाली. कोचिंग क्लासेस असोसिएशन ठाणेचे प्रकाश पाटील यांची खजिनदारपदी व खाजगी शिक्षक संघ नागपूरचे सचिन गजभिये यांची सहसचिव पदी निवड झाली. कोचिंग क्लासेस प्रोप्रायटर्स असोसिएशन ठाणे चे सतीश देशमुख यांची समन्वयक पदी व महाराष्ट्र क्लास ओनर्स असोसिएशन मुंबई येथील संतोष वासकर यांची संघटक पदी निवड करण्यात आली. यानिमित्ताने महाराष्ट्रातील लाखोच्या संख्येने असलेले कोचिंग क्लासेस संचालक एका क्षेत्राखाली आलेले आहे तसेच राज्यातील या समितीच्या माध्यमातून सर्व विभागांना प्रतिनिधित्व मिळालेले आहे.

> राज्यातील कोचिंग क्लासेस साठी प्रस्तावित असलेल्या सरसकट सर्वच नियमावलीला क्लासेस संचालकाचा विरोध नाही उलट शासनाला सहकार्य करण्याच्या मानसिकतेत आहे परंतु त्यामध्ये सोळा वर्षा खालील विद्यार्थ्यांना कोचिंग बंदी, फायर ऑडिट सारखे नियम, लेखापरीक्षणाचा अहवाल अशा ज्याचक अटींना संचालकांच्या विरोध आहे. तसेच कोचिंग क्लासेस संचालकांना नियमावली करित असताना शासनाने पात्र असलेल्या उच्चशिक्षित कोचिंग क्लासच्या संचालकांना अभ्यास मंडळावर घ्यावे, शिक्षक मतदार संघामध्ये मतदार म्हणून त्यांचा समावेश करावा व शासनाच्या निकषात बसत असतील अशा राज्यातील पात्र शिक्षकांना आदर्श शिक्षक पुरस्कारा मध्ये सुद्धा समाविष्ट करावे अशा मागण्या करण्यात आलेल्या आहेत
>
> - **बंडोपंत भुयार**,राज्य उपाध्यक्ष,
> कोचिंग क्लासेस बचाव कृती समिती, महाराष्ट्र राज्य.

## स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीच्या अनुषंगाने काँग्रेसची जोरदार मोर्चेबांधणी

### पेंढरी, गट्टा परिसरातील शेकडो भाजप पदाधिकाऱ्यांचा काँग्रेसमध्ये प्रवेश

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**गडचिरोली, दि. २३ :** धानोरा तालुक्यात पेंढरी, गट्टा व आसपासच्या गावांतील भाजपचे असंख्य पदाधिकारी, सरपंच, कार्यकर्ते आणि महिला कार्यकर्त्यांनी काँग्रेसमध्ये जाहीर प्रवेश केला. गडचिरोली येथे झालेल्या भव्य पक्षप्रवेश कार्यक्रमात काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष महेंद्र ब्राह्मणवाडे आणि आरमोरीचे आमदार रामदास मसराम यांच्या प्रमुख उपस्थितीत या सर्व नवोदित कार्यकर्त्यांनी काँग्रेसचा झेंडा हाती घेतला आहे. यावेळी उपस्थित मान्यवरांनी काँग्रेस पक्षाचे दुपट्टे व पुष्पगुच्छ देऊन त्यांचे जोरदार स्वागत केले.



या कार्यक्रमात भाजपमधून काँग्रेसमध्ये प्रवेश करणाऱ्यांमध्ये अनेक निवडून आलेले सरपंच, ग्रामसभा अध्यक्ष, तरुण कार्यकर्ते आणि महिलांचा मोठा सहभाग होता. भाजपच्या कार्यशैलीवर नाराजी व्यक्त करीत या कार्यकर्त्यांनी काँग्रेसमध्ये विश्वास दाखविला. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे गडचिरोली जिल्ह्याचे पालकमंत्री असताना सुद्धा जिल्ह्यातील मूलभूत समस्या सुटत नाहीत. अनेक वेळा मागण्या करूनही त्यावर तोडगा निघत नाही. युवकांना रोजगार मिळत नाही, शेतकरी अडचणीत आहेत, महागाई दिवसेंदिवस वाढत आहे, भाजपमध्ये सामान्य कार्यकर्त्यांचे ऐकले जात नसल्याची भावना व्यक्त करत अनेक युवक कार्यकर्त्यांनी भाजपचा त्याग करून काँग्रेसमध्ये सामील होण्याचा निर्णय घेतला. या पक्षप्रवेश कार्यक्रमात विशेषत: परमेश्वर गावंडे (सरपंच, दुर्गापूर), देवसाय गावडे (सरपंच, कामतडा), कांडेराम उसेंडी (सरपंच, झाडापापडा), माणिक हिचामी (ग्रामसभा अध्यक्ष, सावंगा), लक्ष्मण आतला, उत्तम आतला, अरविंद मडावी, हिरामण गावडे, अरविंद टेकाम, गणेश पोटावी, दिलीप जोरी, हरिदास गावडे, रमेश मडावी, विशाल नरोटे, मधुकर जाडे, देवू नरोटे, विजय गावडे, मोतीराम दरो, अजय पदा, विलास नरोटे, लालू टेकाम, गणेश गावडे, कुमारी हेमलता धुर्वे, पल्लवी गावडे, गीता गावडे, सपना मडावी, योगिता मडावी या प्रमुख कार्यकर्त्यांसह शेकडो भारतीय जनता पार्टीच्या युवक व महिला कार्यकर्त्यांचा समावेश होता. हे कार्यकर्ते काँग्रेसच्या विचारसरणीवर विश्वास ठेवून पक्षात दाखल झाले आहेत. आगामी काळात हे सर्व कार्यकर्ते काँग्रेस संघटनेला बळकट करत सामान्य जनतेसाठी संघर्ष करतील,' असा विश्वास गडचिरोली जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष महेंद्र ब्राह्मणवाडे यांनी व्यक्त केला. यावेळी जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष मनोहर पाटील पोरटी, महिला काँग्रेस जिल्हाध्यक्ष ॲड. कविता मोहरकर, धानोरा तालुका काँग्रेस अध्यक्ष प्रशांत कोराम, माजी जिल्हा परिषद सदस्य विनोद लेनगुरे, कुरखेडा तालुकाध्यक्ष जीवन पा. नाट, आरमोरी तालुकाध्यक्ष मिलिंद खोब्रागडे, वडसा तालुकाध्यक्ष राजेंद्र बुल्ले, कोरची तालुकाध्यक्ष मनोज अग्रवाल, चामोर्शी तालुकाध्यक्ष प्रमोद भगत, गडचिरोली तालुकाध्यक्ष वसंत राऊत, पर्यावरण सेलचे अध्यक्ष राजेश ठाकूर, किसान सेलचे जिल्हाध्यक्ष वामनराव सावसागडे, शिक्षक सेलचे अध्यक्ष दत्तात्रेय खरवडे, सोशल मीडियाचे उपाध्यक्ष नंदुजी वाईलकर, अनुसूचित जाती सेलचे अध्यक्ष रजनीकांत मोटघरे, परिवहन सेलचे अध्यक्ष रूपेश टिकले, माजी नगरसेवक रमेश चौधरी, शंकरराव सालोटकर, अनिल कोठारे, घनश्याम वाढई, प्रभाकर वासेकर, हरबाजी मोरे, जितेंद्र मूनघाटे, लालाजी सातपुते, दिवाकर निसार, प्रतीक बारसिंगे, योगेंद्र झंझाड, श्रीनिवास ताटपल्लीवार, सुरेश भांडेकर, महिला काँग्रेस तालुकाध्यक्ष कल्पना नंदेश्वर, कविता उराडे, पौर्णिमा भडके, शालिनी पेंदाम, जे.एम. मुप्पीडवार, सुदर्शन उंदीरवाडे, ज्ञानेश्वर पोरटे, उत्तम ठाकरे, सुधाकर ठाकूर, रवींद्र पाल, सुशील शाह, बालू चापले, नागोराव उईके, प्रभाकर कुबडे, भूषण भैसारे, विनोद निकुरे, मेंगाजी कोडापे, निकेश कामिडवार, विजय लाड, सूरज भोयर, मनोज बोरकर, अनिल किरमे, संजूभाऊ मेश्राम, देवा लोणबले, स्वप्नील बेहरे, जावेद खान यांच्यासह विविध काँग्रेस नेते आणि पदाधिकारी उपस्थित होते. नवोदित कार्यकर्त्यांनी पक्षासाठी निष्ठेने काम करण्याचा निर्धार व्यक्त केला. या पक्षप्रवेशामुळे धानोरा तालुक्यात काँग्रेस अधिक मजबूत झाली आहे.

# यशस्वी जैस्वालची संयमी अर्धशतकी खेळी, भारताचे झळकले शतक

**मँचेस्टर, दि. २३** प्रतिनिधी

भारत आणि इंग्लंड यांच्यातील पाच कसोटी सामन्यांच्या मालिकेतील चौथा सामना आजपासून (दि.२३) ओल्ड ट्रॅफर्डच्या मैदानावर सुरू झाला आहे. टॉस जिंकून इंग्लंडचा कर्णधार बेन स्टोक्सने प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला आहे. मालिकेत १-२ ने पिछाडीवर असलेल्या भारतीय संघासाठी हा सामना अत्यंत महत्त्वाचा असून, मालिका बरोबरीत आणण्याचे मोठे आव्हान संघासमोर आहे. भारतीय संघातून करुण नायरला वगळण्यात आले असून, युवा वेगवान गोलंदाज अंशुल कंबोजला कसोटी पदार्पणाची संधी देण्यात आली आहे.

ब्रायडन कार्सच्या गोलंदाजीवर एक धाव घेत यशस्वी जैस्वालने आपले अर्धशतक पूर्ण केले आहे. लॉर्ड्स येथील मागील सामन्यात धावा करण्यासाठी संघर्ष करणाऱ्या जैस्वालने या सामन्यातून पुन्हा लय प्राप्त केली आहे. सुरुवातीला काहीसा वेळ घेतल्यानंतर आणि खेळपट्टीवर स्थिरावल्यानंतर त्याचा खेळ अधिकच बहरला. ऑफ-स्टंपच्या बाहेरील चेंडूंनी त्याला सातत्याने चकवले असले तरी, त्याने चिकाटीने फलंदाजी करत हे सुयोग्य अर्धशतक साकारले आहे. त्याने कार्सचा लेंथ चेंडू हलक्या हातांनी पॉइंटच्या दिशेने खेळून काढला आणि चपळाईने धाव पूर्ण केली. यावेळी यष्टीरक्षकाच्या टोकाकडे थेट फेकीचा प्रयत्न झाला, तथापि दुसऱ्या टोकावरील फलंदाज साई सुदर्शन तोपर्यंत सहजपणे क्रीझमध्ये सुरक्षित पोहोचला होता. ख्रिस वोक्सने केएल राहुलला झॅक क्रॉलीकरवी झेलबाद करत इंग्लंडला दुपारच्या भोजनोत्तर सत्रात महत्त्वपूर्ण यश मिळवून दिले आहे. राहुल ऑफ-स्टंपच्या बाहेर काहीसे निष्काळजी फटके खेळत होता आणि अखेर त्याला त्याची किंमत मोजावी लागली. वोक्सने टाकलेला आखूड टप्प्याचा चेंडू ऑफ-स्टंपच्या बाहेर टप्पा पडल्यानंतर वेगाने दूर गेला, ज्यावर राहुलने शरीरापासून दूर पंच करण्याचा प्रयत्न केला. या प्रयत्नात चेंडूने बॅटची बाहेरील जाड कड घेतली आणि थर्ड स्लिपमध्ये उभ्या असलेल्या क्रॉलीने एक सुरक्षित झेल घेतला. उत्तम लयीत दिसणारा सलामीवीर राहुल अर्धशतकापासून केवळ चार धावांनी दूर असताना, ख्रिस वोक्सने त्याचा महत्त्वपूर्ण डाव संपुष्टात आणला. या गड्याच्या पतनानंतरही भारताने डावाची स्थिर सुरुवात केली आहे.

**जैस्वालचा शानदार चौकार! :** यशस्वी जैस्वालने षटकाच्या अखेरच्या चेंडूवर एक सुरेख चौकार लगावत आपली वैयक्तिक धावसंख्या ४० वर पोहोचवली. इंग्लंडच्या वेगवान गोलंदाजांना ही भागीदारी लवकरात लवकर फोडण्याचा मार्ग शोधावा लागेल, अन्यथा सामन्यावर पकड मिळवण्यासाठी त्यांना खूप उशीर झालेला असेल.




**उपहारानंतर खेळाला पुन्हा सुरुवात! :** उपहाराच्या विश्रांतीनंतर सामन्याच्या पुढील सत्राला प्रारंभ झाला आहे. भारताचे सलामी फलंदाज केएल राहुल आणि यशस्वी जैस्वाल हे पुन्हा एकदा खेळपट्टीवर आले असून, इंग्लंडच्या मा-याला तोंड देण्यासाठी ते सज्ज आहेत. इंग्लंड संघाकडून गोलंदाजीची धुरा वेगवान गोलंदाज ब्रायडन कार्स याच्या हाती सोपवण्यात आली.

**आकडेवारीवर एक नजर! :** भारताने नोंदवलेल्या बिनबाद ७८ धावा हे या मालिकेतील दुसरे असे सकाळचे सत्र आहे, ज्यात एकही गडी बाद झाला नाही. यापूर्वी इंग्लंडने लीड्स येथील पहिल्या कसोटीच्या पाचव्या दिवशी सकाळच्या सत्रात बिनबाद ९६ धावांची नोंद केली होती. याआधी, कसोटी सामन्याच्या पहिल्या दिवशी सकाळच्या सत्रात एकही गडी न गमावण्याची कामगिरी भारताने २०२३ मध्ये पोर्ट ऑफ स्पेन येथे वेस्ट इंडिजविरुद्ध केली होती.

**केएल राहुलचा महत्त्वाचा टप्पा पार :** सकाळच्या सत्रात केएल राहुल पूर्ण नियंत्रणात दिसला. त्याने अत्यंत संयमाने फलंदाजी करत इंग्लंडच्या भूमीवर आपल्या १००० कसोटी धावा पूर्ण केल्या आणि हा महत्त्वपूर्ण टप्पा गाठणाऱ्या मोजक्या भारतीय फलंदाजांच्या गटात स्थान मिळवले. उत्कृष्ट तंत्रशुद्धता आणि संयमाचे प्रदर्शन करत, राहुल हा विक्रम करणारा केवळ पाचवा भारतीय फलंदाज ठरला आहे. या कामगिरीमुळे आव्हानात्मक परदेशी परिस्थितीत त्याचे सातत्य पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे.

उपाहार मध्यंतरापूर्वीचे अंतिम षटक जोफ्रा आर्चरने टाकले. केएल राहुलने अत्यंत सावधगिरीने आणि शांतपणे गोलंदाजीचा सामना करत पहिल्या सत्राअखेर नाबाद राहण्यात यश मिळवले. एकही गडी न गमावल्याने पहिले सत्र पूर्णपणे भारताच्या नावावर राहिले. दोन्ही सलामीच्या फलंदाजांनी इंग्लंडच्या वेगवान गोलंदाजांचा समर्थपणे सामना केला. प्रथम फलंदाजीची संधी मिळाल्यानंतर भारतासाठी हे एक उत्कृष्ट सत्र ठरले. सलामीवीरांनी नवीन चेंडूचा यशस्वीपणे सामना करत मध्यंतरापर्यंत एकही गडी गमावला नाही. या दरम्यान त्यांना नशिबाचीही काहीशी साथ मिळाली, कारण अनेकदा चेंडू बॅटला चकवून गेला; परंतु अशा परिस्थितीत नशिबाची साथ मिळणे आवश्यक असते. या मालिकेतील पूर्वीच्या खेळपट्ट्यांच्या तुलनेत, या खेळपट्टीवर चांगला वेग आणि उसळी आहे. तसेच चेंडूलाही बऱ्यापैकी हालचाल मिळत आहे. हा कसोटी पाहणारा आव्हानात्मक टप्पा पार करण्यासाठी राहुल आणि जैस्वाल यांनी अत्यंत सावधगिरीने फलंदाजी केली.

**स्टोक्सच्या गोलंदाजीवर जैस्वालचा अप्पर-कटने षटकार! :** स्टोक्सने ऑफ-स्टंपच्या बाहेर टाकलेल्या आखूड टप्प्याच्या चेंडूवर, जैस्वालने जागेवरूनच उंच होत जोरदार प्रहार केला आणि चेंडू थेट थर्ड मॅनच्या सीमारेषेबाहेर धाडला. यापूर्वी ऑफ-स्टंपच्या बाहेरील चेंडूंवर पुल फटका खेळण्याच्या प्रयत्नात तो अनेकदा अडचणीत सापडला आहे. मात्र, या वेळी त्याने कट फटक्याची निवड केली आणि तो अतिशय उत्कृष्टपणे खेळला.

**जैस्वालचा कट फटक्यावर चौकार :** जैस्वालने २३ व्या षटकाचा शेवट एका शानदार चौकाराने केला. स्टोक्सने टाकलेल्या आखूड टप्प्याच्या आणि बाहेरच्या चेंडूवर, त्याने बॅकवर्ड पॉइंटच्या दिशेने ताकदवान कट फटका लगावत चार धावा वसूल केल्या. या षटकातील उर्वरित चेंडूंवर जैस्वालने भक्कम बचाव केला.

**आर्चर पुन्हा आक्रमणावर! :** उपाहारपूर्वी सलामीची भागीदारी फोडण्याच्या उद्देशाने इंग्लंडने जोफ्रा आर्चरला पुन्हा गोलंदाजीसाठी पाचारण केले आहे. यशस्वी जैस्वालची खेळी काहीशी संथ वाटत असली तरी, त्याने आपली संघर्षी वृत्ती दाखवली आहे. दुसरीकडे, केएल राहुल अत्यंत शांत आणि संयमाने खेळपट्टीवर कायम आहे.

## ऋषभ पंत बनणार भारताचा नवा कसोटी 'सिक्सर किंग'!

**मँचेस्टर, दि. २३** प्रतिनिधी

भारतीय क्रिकेट संघाचा स्टार यष्टीरक्षक-फलंदाज ऋषभ पंत हा आणखी एका ऐतिहासिक मैलाचा दगड गाठण्याच्या अत्यंत जवळ पोहोचले आहेत. इंग्लंडविरुद्ध मँचेस्टर कसोटीत मैदानात उतरताच पंतला भारतासाठी कसोटी क्रिकेटमध्ये सर्वाधिक षटकार ठोकणारा फलंदाज होण्याची नामी संधी आहे. सध्या पंतच्या नावावर ४६ कसोटी सामन्यांतील ८१ डावांत ८८ षटकारांची नोंद आहे. या यादीत तो भारताचा वनडे कर्णधार रोहित शर्माच्या बरोबरीने आहे. हिटमॅनने देखील कसोटीत ८८ षटकार खेचले आहेत.

रोहितच्या बरोबरीनंतर पंतचे पुढील लक्ष्य भारताचा माजी आक्रमक सलामीवीर वीरेंद्र सेहवाग आहे. सेहवागच्या नावावर कसोटी क्रिकेटमध्ये एकूण ९१ षटकार आहेत. म्हणजेच, जर पंत मँचेस्टर कसोटीत किमान ४ षटकार मारण्यात यशस्वी झाला तर तो सेहवागला मागे टाकून भारतासाठी कसोटी क्रिकेटमध्ये सर्वाधिक षटकार मारणारा फलंदाज बनेल.

विशेष म्हणजे, पंतने ही कामगिरी अवघ्या ४६ कसोटी सामन्यांमध्येच साध्य केली आहे, तर रोहित आणि सेहवाग यांनी हे आकडे बरेच अधिक सामने खेळून गाठले होते. जर पंतने हा विक्रम आपल्या नावावर केला, तर तो असा कीर्तिमान प्रस्थापित करेल, जो येत्या अनेक वर्षांमध्ये इतर फलंदाजांना मोडणे सोपे नसेल. कसोटी क्रिकेटमध्ये इतक्या कमी सामन्यांमध्ये षटकारांचा हा टप्पा गाठणे ही मोठी उपलब्धी आहे.

**वीरेंद्र सेहवाग : ९१ (१०४ कसोटी)**
**ऋषभ पंत : ८८ (४६ कसोटी)**
**रोहित शर्मा : ८८ (६७ कसोटी)**
**महेंद्रसिंग धोनी : ७८ (९० कसोटी)**
**रवींद्र जडेजा : ७४ (८३ कसोटी)**

ऋषभ पंत याची आक्रमक शैली आणि दडपणाखाली खेळण्याची क्षमता यामुळे तो इतर खेळाडूंपेक्षा वेगळा ठरतो. विशेषतः परदेशी मैदानांवर त्याने आपल्या फलंदाजीने अनेकदा भारताला संकटातून बाहेर काढले आहे. तथापि, लॉर्ड्स कसोटी सामन्याच्या पहिल्या डावात ७४ धावा केल्यानंतर दुसऱ्या डावात त्याला फलंदाजीने विशेष काही करता आले नाही. परिणामी, धावांचा डोंगर उभारण्याची सर्व जबाबदारी रवींद्र जडेजावर पडली आणि त्याला दुसऱ्या टोकाकडील कोणत्याही फलंदाजाचा साथ मिळाला नाही.

## ओल्ड ट्रॅफर्डचा तो एकमेव 'त्रिशतकवीर', १९६४ मधील विक्रम आजही अबाधित

**मँचेस्टर, दि. २३** प्रतिनिधी



भारत आणि इंग्लंड यांच्यात मँचेस्टरच्या ऐतिहासिक ओल्ड ट्रॅफर्ड मैदानावर कसोटी मालिकेतील चौथा सामना खेळवला जात आहे. हे मैदान अनेक ऐतिहासिक क्षणांचे साक्षीदार राहिले आहे; पण या मैदानावर असा एक विक्रम आहे, जो गेल्या ६० वर्षांपासून अबाधित आहे. तो विक्रम म्हणजे कसोटी सामन्यात त्रिशतक झळकावण्याचा. ऑस्ट्रेलियाचे माजी कर्णधार बॉब सिम्पसन हे ओल्ड ट्रॅफर्डवर त्रिशतक झळकावणारे एकमेव फलंदाज आहेत.

ही ऐतिहासिक घटना घडली होती २३ ते २८ जुलै १९६४ दरम्यान ऑस्ट्रेलिया आणि इंग्लंड यांच्यात झालेल्या कसोटी सामन्यात. त्यावेळी ऑस्ट्रेलियन कर्णधार बॉब सिम्पसन यांनी नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता, जो पुढे जाऊन ऐतिहासिक ठरला.

सिम्पसन यांनी तब्बल ७४३ चेंडूंचा सामना करत ३११ धावांची मॅरेथॉन खेळी साकारली. त्यांनी ७६२ मिनिटे (१२ तास आणि ४२ मिनिटे) फलंदाजी केली. या खेळीत त्यांनी २३ चौकार आणि एक षटकार लगावला. सिम्पसन यांच्या या शानदार फलंदाजीच्या जोरावर ऑस्ट्रेलियाने ८ बाद ६५६ धावांवर आपला पहिला डाव घोषित केला.

हा सामना अनिर्णीत राहिला असला, तरी तो बॉब सिम्पसन यांच्या ऐतिहासिक त्रिशतकासाठी कायमचा स्मरणात राहिला. आज ६० वर्षांनंतरही ओल्ड ट्रॅफर्डच्या मैदानावर कोणत्याही फलंदाजाला त्रिशतक झळकावता आलेले नाही, ज्यामुळे सिम्पसन यांचा हा विक्रम क्रिकेटच्या इतिहासात सुवर्ण अक्षरांनी कोरला गेला आहे.

## मँचेस्टर कसोटीत केएल राहुलचा नवा पराक्रम!
### इंग्लंडमध्ये १००० कसोटी धावा पूर्ण

**मँचेस्टर, दि. २३** प्रतिनिधी

भारत आणि इंग्लंड यांच्यात मँचेस्टर येथे कसोटी मालिकेतील चौथा सामना खेळवला जात आहे. या सामन्यात टॉस गमावल्यानंतर भारतीय संघाला प्रथम फलंदाजीसाठी पाचारण करण्यात आले. भारताचा सलामीवीर फलंदाज केएल राहुलने या सामन्यात ११ धावा करताच एका विशेष विक्रमाला गवसणी घातली आहे.

त्याने इंग्लंडमध्ये १००० कसोटी धावांचा टप्पा पूर्ण केला असून, अशी कामगिरी करणारा तो पाचवा भारतीय खेळाडू ठरला आहे. या कामगिरीसह त्याने सचिन तेंडुलकर आणि विराट कोहली यांसारख्या दिग्गजांच्या पंक्तीत स्थान मिळवले आहे.



**विविध देशांमधील राहुलची आकडेवारी :** राहुलने इंग्लंडपूर्वी केवळ भारतातच १००० पेक्षा अधिक धावा केल्या आहेत. त्याने मायदेशात २० कसोटी सामन्यांतील ३२ डावांमध्ये ३९.६२ च्या सरासरीने १,१४९ धावा केल्या आहेत, ज्यामध्ये १ शतक आणि १० अर्धशतकांचा समावेश आहे.

ऑस्ट्रेलिया : ऑस्ट्रेलियामध्ये त्याने २५.७२ च्या सरासरीने ४६३ धावा केल्या आहेत.

दक्षिण आफ्रिका : दक्षिण आफ्रिकेत त्याने २८.३८ च्या सरासरीने ३६९ धावा आपल्या नावावर केल्या आहेत.

वेस्ट इंडिज : राहुलने वेस्ट इंडिजमध्ये ४८.१४ च्या सरासरीने ३३६ धावा केल्या आहेत.

इंग्लंडमध्ये सर्वाधिक कसोटी धावा कोणाच्या नावावर?

इंग्लंडमध्ये सर्वाधिक कसोटी धावा करणाऱ्या भारतीय फलंदाजांच्या यादीत सचिन तेंडुलकर अग्रस्थानी आहे. तेंडुलकरने आपल्या कारकिर्दीत इंग्लंडमध्ये १७ सामन्यांत ५४.३१ च्या सरासरीने १५७५ धावा केल्या होत्या. दुसऱ्या क्रमांकावर राहुल द्रविड असून, त्याने इंग्लंडमध्ये १३ सामन्यांत ६८.८० च्या प्रभावी सरासरीने १३७६ धावा केल्या आहेत. या यादीत तिसरे स्थान माजी दिग्गज फलंदाज सुनील गावसकर यांचे आहे, ज्यांनी इंग्लंडमध्ये १६ कसोटी सामन्यांमध्ये ११५२ धावा केल्या होत्या.

माजी भारतीय कर्णधार विराट कोहली या यादीत चौथ्या क्रमांकावर आहे. त्याने इंग्लंडमध्ये १७ सामन्यांत ३३.२१ च्या सरासरीने १०९६ धावा केल्या आहेत. मँचेस्टर येथे सुरू असलेल्या कसोटी सामन्यात ११ धावा पूर्ण करून केएल राहुलनेही आता इंग्लंडमध्ये १००० धावांचा टप्पा ओलांडला आहे. त्याने इंग्लंडमध्ये आतापर्यंत १३ सामन्यांत १००८ धावा केल्या असून, त्याच्या धावसंख्येत आणखी वाढ अपेक्षित आहे. या यादीत विराट कोहलीला मागे टाकण्याची संधी आता त्याच्याकडे असेल.

इंग्लंडमध्ये सर्वाधिक कसोटी धावा करणारे भारतीय

**सचिन तेंडुलकर : १५७५ धावा**
**राहुल द्रविड : १३७६ धावा**
**सुनील गावस्कर : ११५२ धावा**
**विराट कोहली : १०९६ धावा**
**केएल राहुल : १००० धावा पूर्ण (खेळत आहे)**

मँचेस्टर कसोटी सामन्यात इंग्लंडने टॉस जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. इंग्लंडने आपल्या अंतिम ११ जणांच्या संघात एक बदल केला असून, दुखापतग्रस्त शोएब बशीरच्या जागी लियाम डॉसनला संधी दिली आहे. दुसरीकडे, भारतीय संघात तीन बदल करण्यात आले आहेत. संघ व्यवस्थापनाने करुण नायरला वगळून साई सुदर्शनला संधी दिली आहे, तर दुखापतग्रस्त नितीश रेड्डी आणि आकाश दीप यांच्या जागी शार्दुल ठाकूर आणि अंशुल कंबोज यांचा संघात समावेश करण्यात आला आहे.

# एकाच दिवसात भारताला दोन मोठे धक्के!
## अर्थव्यवस्थेशी संबधित अहवालातून नेमके काय आले समोर?

**नवी दिल्ली, दि. २३** प्रतिनिधी



भारताला एकाच दिवसात दोन मोठे धक्के बसले आहेत. हे धक्के अर्थव्यवस्थेशी संबंधित आहेत. इंडिया रेटिंग्ज अँड रिसर्च आणि एशियन डेव्हलपमेंट बँकेने भारताच्या आर्थिक दृष्टिकोन अंतर्गत चालू आर्थिक वर्षासाठी जीडीपी वाढ कमी केली आहे. दोघांचाही अंदाज आहे की चालू आर्थिक वर्षात भारताचा विकास अनुक्रमे ६.३ टक्के आणि ६.५ टक्के असू शकतो. डोनाल्ड ट्रम्प यांच्या टॅरिफ आणि भू-राजकीय तणावामुळे हे दिसून येते. त्याच वेळी, दोघांनीही असेही म्हटले आहे की या कपातीनंतरही भारत जगातील सर्वात वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था राहील. हे दोन्ही अहवाल भारताच्या लक्ष्यासाठी एक मोठा धक्का मानला जाऊ शकतो, ज्या अंतर्गत भारताला २०४७ पर्यंत विकसित करन ३० ट्रिलियन डॉलर्सची अर्थव्यवस्था बनवायची आहे. दुसरीकडे, भारत आणि अमेरिका व्यापार करार करू शकलेले नाहीत. अशी अपेक्षा आहे की जर १ ऑगस्टपूर्वी भारत आणि अमेरिकेत व्यापाराबाबत कोणताही करार झाला नाही, तर अमेरिकन अध्यक्ष भारताविरुद्ध टॅरिफ पत्र देखील जारी करु शकतात. ज्यामुळं देशाच्या अर्थव्यवस्थेला आणखी नुकसान होऊ शकते. युरोपियन युनियनने आधीच भारतातून येणाऱ्या रशियन तेलावर बंदी घातली आहे. इंडिया रेटिंग्ज आणि एडीबीने कोणत्या प्रकारचा अहवाल सादर केला आहे ते आम्ही तुम्हाला सांगतो.

**इंडिया रेटिंग्जने दिला धक्का :** इंडिया रेटिंग्ज अँड रिसर्चने बुधवारी चालू आर्थिक वर्ष २०२५-२६ साठी भारताचा विकासदर ६.३ टक्के इतका कमी केला आहे. एजन्सीने अमेरिकेतील शुल्कांवरील अनिश्चितता आणि कमकुवत गुंतवणूक वातावरणाचा हवाला दिला आहे. इंडिया रेटिंग्ज अँड रिसर्चने त्यांच्या मध्य-वर्षाच्या आर्थिक परिस्थितीत २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी भारताचा सकल देशांतर्गत उत्पादन (जीडीपी) विकासदर ६.३ टक्के राहण्याचा अंदाज वर्तवला आहे, जो डिसेंबरमध्ये त्यांच्या ६.६ टक्क्यांच्या अंदाजापेक्षा कमी आहे.

मुख्य अर्थतज्ज्ञ आणि सार्वजनिक वित्त प्रमुख देवेंद्र कुमार पंत म्हणाले की, अमेरिकेतील सर्व देशांवर एकतर्फी शुल्कवाढीमुळं अनिश्चित जागतिक दृष्टिकोन आणि अपेक्षेपेक्षा कमकुवत गुंतवणूक वातावरण हे प्रमुख प्रतिकूल परिस्थिती आहेत. त्याचवेळी, अनुकूल परिस्थितीमध्ये आर्थिक सुलभता, महागाईत अपेक्षेपेक्षा जास्त घट आणि २०२५ मध्ये सामान्यपेक्षा जास्त पावसाचा अंदाज यांचा समावेश आहे. २०२४-२५ मध्ये (एप्रिल २०२४ ते मार्च २०२५) भारतीय अर्थव्यवस्थेचा विकासदर ६.५ टक्के दराने झाला.

**आशियाई विकास बँकेचा अंदाज काय? :** व्यापार अनिश्चितता आणि उच्च अमेरिकन करांबद्दलच्या चिंतेमुळं आशियाई विकास बँकेने () बुधवारी २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी भारताचा विकास दर ६.७ टक्क्यांवरून ६.५ टक्क्यांपर्यंत कमी केला आहे. एप्रिल २०२५ च्या तुलनेत जुलै आशियाई विकास अंदाज () मध्ये घट झाली असली तरी, भारत जगातील सर्वात वेगाने वाढणाऱ्या प्रमुख अर्थव्यवस्थांपैकी एक आहे. जुलै आशियाई विकास अंदाजानुसार, ही सुधारणा प्रामुख्याने अमेरिकन कर आणि संबंधित धोरण अनिश्चिततेचा परिणाम आहे. कमी जागतिक विकासाचा परिणाम आणि भारतीय निर्यातीवर अतिरिक्त अमेरिकन करांचा थेट परिणाम याशिवाय, वाढलेली धोरणात्मक अनिश्चितता गुंतवणूक प्रवाहावर परिणाम करू शकते. ग्रामीण मागणीत सुधारणा झाल्यामुळे देशांतर्गत वापरात जोरदार वाढ होण्याची अपेक्षा आहे. सेवा आणि कृषी क्षेत्रे वाढीचे मुख्य चालक असतील आणि सामान्यपेक्षा जास्त मान्सून पावसाचा अंदाज कृषी क्षेत्राला आधार देईल. अहवालात २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी विकास दर ६.७ टक्के राहण्याचा अंदाज आहे. कच्च्या तेलाच्या किमती कमी होण्याची सुरुवातीची अपेक्षा आर्थिक वर्ष २०२५-२६ आणि आर्थिक वर्ष २०२६-२७ मध्ये आर्थिक घडामोडींना आधार देऊ शकते. आर्थिक सर्वेक्षणात २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी सकल देशांतर्गत उत्पादन () वाढीचा दर ६.३ टक्के ते ६.८ टक्के दरम्यान राहण्याचा अंदाज आहे. तर रिझर्व्ह बँकेने () चालू आर्थिक वर्षासाठी वाढीचा अंदाज ६.७ टक्क्यांवरून ६.५ टक्के केला आहे.

## ऑस्ट्रेलियात सापडला जगातील सर्वात मोठा लोहखनिजाचा साठा

**कॅनबेरा :** भूवैज्ञानिकांना पश्चिम ऑस्ट्रेलियातील पिलबारा प्रदेशात लोहखनिजाचा आतापर्यंतचा सर्वात मोठा साठा सापडला आहे. या अभूतपूर्व शोधाने संपूर्ण जगाचे लक्ष वेधून घेतले आहे. या साठ्याचे अंदाजित मूल्य तब्बल ६ ट्रिलियन डॉलर असून, हा शोध केवळ जागतिक लोह बाजारात क्रांती घडवणार नाही, तर पृथ्वीच्या भूवैज्ञानिक इतिहासाविषयीची आपली समजही बदलणार आहे, असे तज्ज्ञांचे मत आहे. ऑस्ट्रेलियाचा पिलबारा प्रदेश हा त्याच्या शुष्क भूभागासाठी आणि समृद्ध खनिज संपत्तीसाठी ओळखला जातो. आता याच प्रदेशात जगातील सर्वात मोठा लोहखनिजाचा साठा सापडल्याने त्याचे महत्त्व आणखी वाढले आहे. या शोधाने लोहखनिजाच्या निर्मितीविषयीच्या वैज्ञानिक समजुतींनाही आव्हान दिले आहे. या खडकांचे वय पूर्वी २.२ अब्ज वर्षे मानले जात होते, ते आता १.४ अब्ज वर्षे असल्याचे निश्चित करण्यात आले आहे.



**तंत्रज्ञानाची निर्णायक भूमिका :** ऑस्ट्रेलियातील या मोठ्या यशामागे प्रगत तंत्रज्ञानाची महत्त्वाची भूमिका आहे. अचूक विश्लेषण : भूवैज्ञानिकांनी 'उन्नत आयसोटोपिक डेटिंग' आणि 'रासायनिक विश्लेषण' यांसारख्या तंत्रज्ञानाचा वापर करून केवळ या साठ्याच्या विशाल आकाराचाच नव्हे, तर त्याच्या उत्कृष्ट गुणवत्तेचाही शोध लावला आहे. उत्कृष्ट गुणवत्ता : सुरुवातीच्या अंदाजानुसार या खनिजातील लोहाचे प्रमाण ३० टक्के होते. परंतु, आता ते ६० टक्क्यांपेक्षा जास्त असल्याचे स्पष्ट झाले आहे. यामुळे हा साठा आतापर्यंतच्या सर्वात समृद्ध साठ्यांपैकी एक बनला आहे.

**जागतिक अर्थव्यवस्थेवर होणारा परिणाम :** जागतिक लोहखनिज बाजारपेठेत ऑस्ट्रेलियाचे स्थान आधीच महत्त्वाचे आहे; परंतु या शोधामुळे ते आणखी मजबूत होणार आहे. या साठ्याच्या आकारामुळे जगभरातील लोहखनिजाच्या किमतींवर थेट परिणाम होण्याची शक्यता आहे. यामुळे आयातीवर अवलंबून असलेल्या देशांमधील आर्थिक आणि सामरिक संबंध बदलू शकतात. हा बदल नवीन आघाड्या आणि व्यापारी करारांना जन्म देऊ शकतो, ज्यामुळे जागतिक खाणकाम क्षेत्राचे स्वरूपच बदलू शकते.

**आर्थिक लाभांपलीकडचा परिणाम :** या शोधाचे परिणाम केवळ तत्काळ आर्थिक लाभांपुरते मर्यादित नाहीत. या साठ्यामध्ये पृथ्वीच्या भूवैज्ञानिक इतिहासाची पाने पुन्हा लिहिण्याची आणि दीर्घकाळ चालत आलेल्या वैज्ञानिक मान्यतांना आव्हान देण्याची क्षमता आहे. हा शोध पृथ्वीच्या भूतकाळाबद्दल शास्त्रज्ञांची समज वाढवतो आणि भविष्यातील संशोधनालाही प्रेरणा देतो. यामुळे अन्वेषण आणि शोधाच्या नवीन संधी निर्माण होतील, अशी आशा तज्ज्ञांना आहे.

## चार गायी, अठरा माणसांच्या छोट्या प्रतिकृती ठेवलेले प्राचीन भांडे

**लंडन :** उत्तर सायप्रसमधील एका कांस्ययुगीन कबरीत एक अनोखे भांडे सापडले होते. त्यामध्ये चार गायी आणि अठरा मनुष्याकृती ठेवलेल्या दिसून आल्या. हे 'वौनस बाऊल' नावाचे भांडे सापडल्यापासून विद्वान अनेक दशकांपासून त्याच्या अर्थावर चर्चा करत आहेत. या चार हजार वर्षांपूर्वीच्या असामान्य भांड्याचा नेमका उद्देश अस्पष्ट असला, तरी बहुतेक तज्ज्ञांचा असा विश्वास आहे की यात कोणत्या तरी पवित्र दृश्याचे चित्रण आहे आणि त्याचा उपयोग धार्मिक समारंभात केला गेला असावा.

१९३० च्या दशकात वौनस-बेलापेस या ठिकाणी झालेल्या उत्खननात एका मोठ्या प्रागैतिहासिक दफनभूमीतील डझनभर कबरी उघडकीस आल्या. जरी अनेक कबरी आधीच लुटल्या गेल्या होत्या, तरीही पुरातत्त्वशास्त्रज्ञांनी मोठ्या प्रमाणात गुंतागुंतीची नक्षीकाम केलेली मातीची भांडी हस्तगत केली, ज्यात 'वौनस बाऊल'चा समावेश होता, जो काळाच्या ओघात अनेक तुकड्यांमध्ये मोडला होता. वेल्स ट्रिनिटी सेंट डेव्हिड विद्यापीठाच्या पुरातत्त्वशास्त्रज्ञ लुईस स्टील यांनी २०१३ च्या अभ्यासात लिहिले आहे की, 'वौनस बाऊल', जे आता सायप्रस संग्रहालयात आहे, ते उथळ असून, त्याचा तळ सपाट आहे आणि त्याचा व्यास १४.६ इंच (३७ सेंटिमीटर) आणि उंची ३.१ इंच (८ सेंटिमीटर) आहे. भांड्याच्या एका बाजूला एक खडबडीत, आयताकृती छिद्र आहे, जे संभाव्यतः दरवाजा दर्शवते. भांड्याच्या आत १८ मानवी आकृत्या, गोठ्यात असलेल्या चार गायी आणि काही फर्निचर यांनी बनलेले एक गुंतागुंतीचे दृश्य आहे.

दरवाजाच्या समोर तीन खांबांची एक रचना आहे, जी दोन नागमोडी रेषा असलेल्या आडव्या पट्ट्यांनी जोडलेली आहे - जे कदाचित एक देव्हारे असावे आणि त्याच्यासमोर एक मानवी आकृती गुडघे टेकून बसलेली आहे. काही आकृत्या बाकावर हात बांधून बसलेल्या आहेत आणि एक आकृती मुकुट घातलेली आणि एका प्रकारच्या सिंहासनावर बसलेली दिसते. १९९४ च्या अभ्यासात, एडिनबर्ग विद्यापीठाचे पुरातत्त्वशास्त्राचे प्राध्यापक एडगर पेल्टेनबर्ग यांनी सुचवले की, 'वौनस बाऊल'मध्ये तीन वेगवेगळी दृश्ये होती, ज्यात गायींसह एक गोपालक दृश्य; मुकुट घातलेल्या व्यक्तीसह पुरुष सत्तेचे संकेत; आणि गुडघे टेकलेल्या आकृत्यांसह आध्यात्मिक जगाचे प्रतिनिधित्व यांचा समावेश होता. एकत्रितपणे, ही दृश्ये त्या काळात विकसित होत असलेल्या नवीन, श्रेणीबद्ध सामाजिक व्यवस्थेचे प्रतिबिंब होती.

# लिंबूवर्गीय उत्पादकांना तंत्रज्ञानाचे धडे

## रोग-कीड व्यवस्थापनावर तज्ज्ञांचे मार्गदर्शन; सीसीआरआयच्या तीन दिवसीय प्रशिक्षणास प्रतिसाद

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**नागपूर, दि. २३ : लिंबूवर्गीय फळबागांमध्ये रोग आणि किडींचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी केवळ अनुभव पुरेसा नसून, त्याला शास्त्रीय ज्ञानाची जोड देणे आवश्यक आहे. नेमका हाच उद्देश डोळ्यासमोर ठेवून, मध्य प्रदेशातील शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी केंद्रीय लिंबूवर्गीय फळ संशोधन संस्थेने (सीसीआरआय) तीन दिवसांच्या विशेष प्रशिक्षण कार्यक्रमाचे नुकतेच आयोजन केले होते.**



नागपूर येथील अमरावती मार्गावरील संस्थेत पार पडलेल्या या उपक्रमात मध्य प्रदेशातील शाजापूर जिल्ह्यातील २७ लिंबूवर्गीय फळ उत्पादक सहभागी झाले होते. १५ ते १७ जुलै दरम्यान पार पडलेला हा कार्यक्रम 'अपेडा' (कृषी आणि प्रक्रिया केलेले खाद्य उत्पादने निर्यात विकास प्राधिकरण) प्रायोजित 'क्षमता विकास' कार्यक्रमांतर्गत आयोजित करण्यात आला. कृषी वैज्ञानिक निवड मंडळाचे माजी अध्यक्ष सी. डी. मायी, सीसीआरआयचे संचालक दिलीप घोष, कृषी विज्ञान केंद्र शाजापूरचे संशोधक मुकेश सिंग आणि सीसीआरआयच्या संगीता भट्टाचार्य यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती. आपल्या प्रास्ताविकात, दिलीप घोष यांनी शास्त्रोक्त पद्धतींचा अवलंब करण्यावर आणि फळबागांमध्ये आंतरपिके टाळण्यावर भर दिला. तांत्रिक सत्रांमध्ये संस्थेतील तज्ज्ञांनी सखोल मार्गदर्शन केले. यामध्ये दर्शन कदम यांनी फळबागांची स्थापना, ए. थिरुज्ञानावेल यांनी रोपवाटिका, सुरजित मोंडल यांनी पोषण व्यवस्थापन, ए. के. दास यांनी रोग, एन. एम. मेश्राम यांनी कीटक, तर के. के. कोम्मू यांनी सूत्रकृमी (नेमाटोड) व्यवस्थापनावर मार्गदर्शन केले. संगीता भट्टाचार्य यांनी बागांचा ऱ्हास आणि पुनरुज्जीवन तंत्रज्ञानाची माहिती दिली. जे. पी. तेजकुमार यांनी वृक्षजातींचे संरक्षण करण्याविषयी सल्ला दिला.

### शास्त्रशुद्ध प्रात्यक्षिकांमधून थेट मार्गदर्शन

**हे प्रशिक्षण केवळ व्याख्यानांपुरते मर्यादित नव्हते, तर यात प्रात्यक्षिकांवर विशेष भर देण्यात आला. वेंकटरामन बनसोडे यांनी लिंबूवर्गीय फळांच्या तोडणीनंतरचे व्यवस्थापन आणि आधुनिक पॅकिंग लाईनचे प्रात्यक्षिक दाखवले. तसेच, यू. आर. सांगळे आणि अशोक कुमार यांनी बोर्डो मिश्रणासारखी महत्त्वाची बुरशीनाशके प्रत्यक्ष तयार करून दाखवली. यामुळे शेतकऱ्यांना सिद्धांतासोबतच प्रत्यक्ष कृतीचेही ज्ञान मिळाले.**

## जिल्ह्यात 'येलो अलर्ट' जाहीर

**नागपूर, दि. २३ :** भारतीय हवामान खात्याने नागपूर जिल्ह्यामध्ये २३ ते २६ जुलै या कालावधीत जिल्ह्यात मुसळधार पाऊस, वादळीवारा, मेघगर्जनेसह विजांचा कडकडाट होण्याची शक्यता वर्तवलेली आहे. २६ जुलैपर्यंत 'येलो अलर्ट' तर २५ जुलै रोजी 'ऑरेंज अलर्ट' देण्यात आला असून, या कालावधीत काही ठिकाणी अत्यंत मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता वर्तवली आहे. नदीकाठी वास्तव्यास असलेल्या नागरिकांनी आवश्यक काळजी घेण्याचे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे. विजांचा कडकडाट होत असताना घरातच राहावे. अशावेळी मोबाईल फोन सोबत बाळगू नये. घरातील इलेक्ट्रिकल उपकरणे बंद ठेवावी. तसेच, पाऊस आणि विजांचा कडकडाट सुरू असताना झाडाखाली उभे राहू नये, शेतात काम करत असताना सुरक्षित ठिकाणी आसरा घ्यावा, असे जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनुप खांडे यांनी केले आहे. नागरिकांनी पर्यटन स्थळी जीव धोक्यात घालणारी कुठलीही कृती करू नये.

## थोडक्यात

### कुख्यात गुंड स्थानबद्ध

**नागपूर :** कळमना पोलिसांनी शहर पोलिस आयुक्तांनी जारी केलेल्या आदेशावरून शरीराविरुद्ध गंभीर गुन्हे करणारा कुख्यात गुंड परमेश्वर (भांज्या) याला विविध गुन्ह्याखाली स्थानबद्ध केले आहे. महाराष्ट्र झोपडपट्टी दादा, हातभट्टीवाले, औषधी द्रव्यविषयक गुन्हेगार, धोकादायक व्यक्ती, व्हिडिओ पायरेट्स, वाळू तस्कर, अत्यावश्यक वस्तूंचा काळाबाजार, बेकायदेशीर जुगार, बेकायदेशीर लॉटरी आणि मानवी अपव्यापार यांच्या घातक कृत्यांना आळा घालणे संबंधी अधिनियम १९८१ अंतर्गत स्थानबद्ध करण्याचा आदेश पारित करण्यात आला आहे. या आदेशाची अंमलबजावणी २२ जुलै रोजी करून परमेश्वर याला नागपूर मध्यवर्ती कारागृहात ठेवण्यात आले आहे. आरोपीने अलीकडच्या काळात कळमना ठाण्याच्या हद्दीत आपखुशीने दुखापत करणे, गैरनिरोध करणे, अश्लील भाषेत शिवीगाळ करणे, अपराधिक जीवे ठार मारण्याची धमकी देणे, प्राणघातक शस्त्र बाळगणे, मनाई आदेशाचे उल्लंघन आदी स्वरूपाचे गंभीर गुन्हे केले आहेत.

### अजनी परिसरात घरफोडी

**नागपूर:** अजनी ठाण्याच्या हद्दीत प्रवेश करून रोख रक्कम आणि सोन्याचे दागिने असा एकूण ३ लाख ६४ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल लंपास केला आहे. याप्रकरणी अज्ञात आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तक्रारदार, शुभम नामदेव ढेंगरे (तृप्ती नगर) यांचे आई-वडील शेतीच्या कामासाठी बुटीबोरी येथे गेले होते, तर शुभम स्वत: घराला कुलूप लावून मावशीच्या घरी सेमिनरी हिल्स येथे गेले होते. याच दरम्यान, अज्ञात चोरांनी घराच्या मुख्य दाराचे कुलूप आणि कडीकोयंडा तोडून घरात प्रवेश केला. बेडरूममधील कपाटातून रोख २ लाख ६५ हजार आणि सोन्याचे दागिने असा एकूण ३ लाख ६४ हजार रुपये किमतीचा ऐवज चोरून नेला. शुभम ढेंगरे यांनी दिलेल्या तक्रारीवरून अजनी ठाण्यात अज्ञात आरोपींविरुद्ध भारतीय न्याय संहिता (भा.न्या. सं.) च्या कलम ३०५(अ), ३३१(३), ३३१(४) अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

### कामठीत 'वॉंटेड'ला अटक

**कामठी :** जुनी कामठी पोलिसांनी कृषी उत्पन्न बाजार समिती परिसरात भंडारा जिल्ह्यातील वॉंटेड आरोपीला अटक केली. लखन ईश्वर दयाळ बोरे असे त्याचे नाव आहे. आरोपी लखन हा (लोभी, ता. तुमसर) मंगळवारी सायंकाळी सातच्या सुमारास आपले अस्तित्व लपवून कोणतातरी दखलपात्र गुन्हा करण्याच्या बेतात असल्याचे आढळून आला अधिक चौकशीत त्याच्यावर भंडारा, तुमसर, वरठी, गोबरवाही येथे चोरी, जबरी चोरी, घरफोडी, विनयभंग इत्यादी गुन्हे दाखल असल्याचे समजले. तसेच, नमूद आरोपी हा भंडारा जिल्ह्यातील वरठी ठाण्यातील विनयभंगाच्या गुन्ह्यात आणि गोबरवाही ठाण्यातील चोरीच्या गुन्ह्यात 'पाहिजे' असलेला आरोपी असल्याचे आढळून आले आरोपीला अटक करण्याची कामगिरी मा. श्री. निकेतन कदम, पोलीस उप-आयुक्त (परिमंडळ क्रमांक ५) आणि मा. श्री. विशाल क्षीरसागर, सहा. पोलीस आयुक्त (कामठी विभाग) यांच्या मार्गदर्शनाखाली व पोउपनि. प्रशांत जुमडे, पोउपनि. सागर भंडारी, पोहवा. गणेश पोराटे, नापोअं. श्रीकांत, रमेश बंजारा, पोअं. विवेक दोरसटवार व शारिक खान यांनी केली.

## CAPTION 'नागपुरी खर्रा' लालीलाल...




**नागपूर : नागपूर अर्थात राज्याच्या उपराजधानीतील गणेशपेठ मध्यवर्ती बसस्थानक़ 'नागपुरी खर्रा' हा देखील महाराष्ट्रातील काही भागात पसरविण्यात आला़ तो 'खर्रा' थुंकून जागा घाण करण्यातही हीच मंडळी पुढे आहेत़ थुंकू नका, असे स्पष्ट लिहिले असतानाही या बसस्थानकातील काही जागा अशा 'लालीलाल' करण्यात आल्या आहेत.**

## सुरेश डोंगरे यांचे बहुजन हितैषी नेतृत्व

### देशव्यापीस्तरावर संघटनात्मक बळकटीकरणाचे प्रयत्न

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी



**नागपूर, दि. २३ :** बहुजन मुक्ती आंदोलनाचे राष्ट्रीय अध्यक्ष सुरेश डोंगरे देशभरातील बहुजन, वंचित आणि मागासवर्गासाठीअथकपणे कार्यरत आहेत. त्यांच्या नेतृत्वाखाली सामाजिक न्याय, शैक्षणिक हक्क, आरोग्य जनजागृती मोहिमांद्वारे समाजात सकारात्मक बदल घडवण्याचे महत्त्वाचे कार्य होत आहे. सामाजिक समानतेच्या दिशेने संघटनेने राजकीय सत्ताकेंद्राच्या पलीकडे जात तळागाळात पोहोचण्याची त्यांची कार्यशैली समाजात एक नवी आशा निर्माण करत आहे.

बहुजन मुक्ती आंदोलन संघटनेच्या नेतृत्वापदी सर्वानुमते निवड झाल्यानंतर सुरेश डोंगरे यांनी ग्रामीण आणि मागास भागातील विद्यार्थ्यांना मुख्य शैक्षणिक प्रवाहात आणण्यासाठी विविध शैक्षणिक शिबिरे आणि मार्गदर्शन वर्गांचे आयोजन केले आहे. या कार्यक्रमांद्वारे शिष्यवृत्ती, प्रवेश प्रक्रिया आणि करिअरच्या संधींबाबत मार्गदर्शन मिळत आहे. तसेच, दलित आणि अल्पसंख्यक वस्त्यांमध्ये मोफत आरोग्य तपासणी शिबिरे, औषध वाटप आणि महिलांसाठी आरोग्य जागरूकता मोहीम राबवून सामाजिक आरोग्याशी संबंधित समस्यांवर लक्ष केंद्रित केले आहे. सुरेश डोंगरे यांच्या कार्यशैलीमुळे अनेक तरुण समाजकायार्साठी पुढे येत असून, संघटनेत नवीन कार्यकर्त्यांची संख्या सातत्याने वाढत आहे. त्यांच्या पारदर्शक नेतृत्वामुळे बहुजन समाजात एक नवा विश्वास निर्माण झाला आहे. हे आंदोलन केवळ संघर्षापुरते मर्यादित न राहता, समाजाच्या प्रत्येक स्तरावर परिवर्तनाच्या दिशेने अग्रेसर आहे. डोंगरे यांनी उभारलेली ही चळवळ 'न्याय, समानता आणि अधिकार' या तीन मूळ तत्त्वांवर आधारित असून, भविष्यात ती समाजासाठी एक भक्कम आधारस्तंभ बनेल, असा विश्वास संघटनेनेक व्यक्त केला आहे.

## दिव्यांग सर्वेक्षणासाठी ऑनलाईन नोंदणीची सुविधा

### २७ जुलैपर्यंत माहिती सादर करावी

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**नागपूर, दि. २३ :** महानगरपालिकेद्वारे दिव्यांगांची माहिती संकलित करण्यासाठी दिव्यांग सर्वेक्षण करण्यात येत आहे. आशा सेविकांद्वारे घरोघरी भेट देत सर्वेक्षण प्रक्रिया केली आहे. सर्वेक्षण कार्य अंतिम टप्प्यात असून, आशा सेविकांना माहिती देण्यापासून कुणी वंचित असल्यास गूगल फॉर्मद्वारे ऑनलाईन नोंदणीची सुविधा उपलब्ध करून दिली आहे.

केंद्र सरकार, राज्य सरकार आणि नागपूर महानगरपालिकेद्वारे राबविण्यात येत असलेल्या योजनांचा लाभ मिळविण्यासाठी दिव्यांग सर्वेक्षण अत्यंत आवश्यक आहे. या सर्वेक्षणापासून कुणीही वंचित राहू नये हा मनपाचा उद्देश आहे. आशा सेविकांच्या सर्वेक्षणामध्ये सहभागींना ऑनलाईन सर्वेक्षण करण्याची गरज नाही. सर्वेक्षणामध्ये सहभागी होऊ शकले नाहीत, अशानाच ऑनलाईन सर्वेक्षणाची सुविधा असून, मनपाच्या संकेतस्थळावर 'पब्लिक नोटीस' आरोग्य विभागामध्ये 'दिव्यांग सर्वेक्षण' मथळ्याखालील गूगल फॉर्ममध्ये आवश्यक १० प्रश्नांची माहिती भरून आपले सर्वेक्षण करून घ्यावे, असे आवाहन नागपूर महानगरपालिकेद्वारे करण्यात येत आहे.

## व्हीआयए एलईडब्ल्यू अध्यक्षपदी योगिता देशमुख, सचिवपदी पूनम गुप्ता

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**नागपूर, दि. २३:** विदर्भ इंडस्ट्रीज असोसिएशनच्या लेडी एंटरप्रेन्योर्स विंगच्या २०२५-२६ वर्षासाठी नवीन कार्यकारिणी स्थापना सोहळा पार पडला. योगिता देशमुख यांची अध्यक्षपदी, तर पूनम गुप्ता यांची सचिवपदी बिनविरोध निवड करण्यात आली.



नवीन कार्यकारिणी पुढीलप्रमाणे आहे संस्थापक अध्यक्ष : सरला कामदार, सल्लागार समिती: प्रफुल्लता रोडे, सरिता पवार, मधुबाला सिंग, माजी अध्यक्ष : रश्मी कुलकर्णी, चित्रा पराते, वाय. रमणी, नीलम बोवाडे, अंजली गुप्ता, डॉ. अनिता राव, वंदना शर्मा, शशी मल्लिक, रिटा लांजेवार, मनीषा बावनकर, पूनम लाला, उपाध्यक्ष : शिखा खरे, कोषाध्यक्षा: अमनदीप कौर सेहमी, कार्यकारिणी सदस्य : इंदू क्षीरसागर, तेजल रक्षमवार, मीनल दवंडे, दिशा डुंबरे, श्रीगौरी घाटे नवनिर्वाचित अध्यक्षा योगिता देशमुख यांनी मिळालेल्या संधीबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. व्हीआयए एलईडब्ल्यू ही शाखा महिला उद्योजकांना सक्षम करणारे एक मजबूत व्यासपीठ असल्याचे त्यांनी सांगितले. टीमवर्क, प्रेरणादायी सत्रे आणि सर्व सदस्यांसाठी एक सहायक, सर्वसमावेशक वातावरण निर्माण करून शिक्षण, नेटवर्किंगला प्रोत्साहन देण्याचे ध्येय असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. मावळत्या अध्यक्षा रश्मी कुलकर्णी यांनी अध्यक्षपदाचा वर्षभराचा प्रवास कथन केला. व्हीआयएचे माजी अध्यक्ष आणि व्हीआयए एलईडब्ल्यूचे समन्वयक सुरेश अग्रवाल यांनी नवीन संघाची नावे घोषित केली. ही शाखा स्थापनेपासून उत्तम काम करत असून, त्यांच्या उद्योगात प्रचंड प्रगती झाल्याचे त्यांनी सांगितले.व्हीआयएचे सचिव कौशल मोहोटा मंचावर विशेषत्वाने उपस्थित होते. भारती, कीर्ती देशमुख, श्रीगौरी घाटे, दिशा डुमरे आणि मीनल खेडकर यांनी आपल्या प्रेरणादायी यशोगाथा आणि उद्योजकीय प्रवासाचे कथन केले. कार्यक्रमाचे संचालन कार्यकारिणी सदस्य आर्किटेक्ट तेजल रक्षमवार यांनी केले.

## टिळक, आझाद यांना विनम्र अभिवादन

**नागपूर, दि. २३ :** भारतीय स्वातंत्र्यलढ्याचे थोर स्वातंत्र्यसेनानी लोकमान्य बाळ गंगाधर टिळक आणि भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील थोर क्रांतिकारक चंद्रशेखर आझाद यांच्या जयंतीनिमित्त नागपूर महानगरपालिकेच्या वतीने विनम्र अभिवादन करण्यात आले.सेंट्रल एव्हेन्यू रोडस्थित थोर क्रांतीकारक चंद्रशेखर आझाद यांच्या पुतळ्याला आमदार प्रवीण दटके, माजी महापौर दयाशंकर तिवारी यांनी माल्यार्पण आणि विनम्र अभिवादन केले. मनपा मुख्यालयात आयोजित कार्यक्रमात अतिरिक्त आयुक्त अजय चारठाणकर यांनी प्रतिमेस पुष्पहार अर्पण केले. उपायुक्त विजया बनकर, सहायक आयुक्त श्याम कापसे, अतिरिक्त वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. नरेंद्र बहिरवार, जनसंपर्क अधिकारी मनिष सोनी, कार्यकारी अभियंता राजीव गौतम उपस्थित होते.

## रोजगारासाठी प्रामाणिक प्रयत्नांसह मेहनतीची गरज

### अतिरिक्त आयुक्त वैष्णवी बी. यांचे प्रतिपादन

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**नागपूर, दि. २३ :** नागपूर महानगरपालिकातर्फे महिलांना विविध संस्थेच्या माध्यमातून प्रशिक्षण आणि रोजगाराची संधी उपलब्ध करून दिली जात आहे. महिलांनी यात सातत्य आणि शिस्त ठेवण्याची गरज असून, रोजगारासाठी प्रामाणिक प्रयत्न आणि मेहनतीची गरज आहे, असे मत अतिरिक्त आयुक्त वैष्णवी बी. यांनी केले.



आयुक्त डॉ. अभिजीत चौधरी यांच्या निर्देशनानुसार वैष्णवी बी.यांच्या अध्यक्षतेत बुधवारी दीनदयाल अंत्योदय योजना- राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान अंतर्गत स्थापित बचत गटातील महिला व त्यांच्या कुटुंबातील मुली यांना कौशल्य प्रशिक्षण उपलब्ध व्हावे, या हेतूने कौशल्य प्रशिक्षक संस्था व बचत गटातील महिलांची कार्यशाळा पार पडली. यावेळी त्या बोलत होत्या. कार्यशाळेत ५२ महिला उपस्थित होत्या. कार्यशाळेत महिलांना बेड साईड असिस्टंट आणि ड्रोन हाताळण्याबाबत प्रशिक्षणाची माहिती कौशल्य प्रशिक्षण संस्थामार्फत माहिती देण्यात आली. कार्यशाळेत समाज विकास विभागाच्या उपायुक्त डॉ. रंजना लाडे, समाज विकास विभागाचे अधीक्षक राजेश मेश्राम, मिटकॉनच्या संचालक सोनाली मिश्रा, वेदिक इंजिनियरिंगच्या संचालक भावना देशपांडे, समाज विकास विभागाचे विनय त्रिकोलवार,नूतन मोरे, श्री. बांते यांच्यासह इतर कर्मचारी उपस्थित होते.

## सफाई कर्मचारी महोत्सवास उत्स्फूर्त प्रतिसाद

### पाल्यांना महानगरपालिकेत नियुक्तीपत्र, विविध महामंडळांच्यावतीने स्टॉल

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**नागपूर, दि. २३ : वंचित घटकांतील लोकांना सामाजिक न्याय विभागांतर्गत असलेल्या विविध योजनांचा लाभ देण्यासाठी सामाजिक न्याय विभाग प्रयत्नरत आहे. शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेऊन सफाई कामगारांच्या मुलांनी आपले शिक्षण गुणवत्तेने पूर्ण केले पाहिजे.**



सोबतच स्वयंरोजगाराच्या दृष्टीने कौशल्य आत्मसात करून विविध उद्योगधंद्याकडे वळावे, असे आवाहन राज्य सफाई कर्मचारी आयोगाचे अध्यक्ष शेरसिंग डागोर यांनी केले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त मंगळवारी सामाजिक न्याय विभाग, महानगरपालिका व राज्य सफाई कर्मचारी आयोगाच्या संयुक्त विद्यमाने इमामवाडा येथे स्वच्छतादूत कल्याणकारी दिवसाचे आयोजन करण्यात आले होते. विधानपरिषद सदस्य संदीप जोशी, आमदार मोहन मते, महापालिका आयुक्त डॉ. अभिजीत चौधरी, अतिरिक्त आयुक्त वसुमना पंत, अजय चारठाणकर, समाजकल्याण विभागाचे प्रादेशिक उपायुक्त प्रसाद कुलकर्णी, सहाय्यक आयुक्त सुकेशिनी तेलगोटे, राजेश भगत, विनोद जाधव उपस्थित होते. सफाई कर्मचा०यांची प्रगती व विकास होण्यासाठी नागपूरच्या धर्तीवर राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात विशेष शिबीर घेण्याचा मानस अध्यक्ष शेरसिंग डागोर यांनी व्यक्त केला. मुख्यमंत्री फडणवीस यांना स्वच्छतादूतांबद्दल आपुलकी असून, त्यांनी अनेक समस्या सोडविल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमात मुख्यमंत्र्यांच्या प्रयत्नांमुळे प्रलंबित असलेल्या लाड-पागे समितीअंतर्गत सफाई कर्मचा०यांच्या पाल्यांना महानगरपालिकेत नियुक्तीपत्र देण्यात आले. आरोग्य सेवा, घरकुल नोंदणी, रमाई घरकुल वाटप, स्वाधार योजना, अॅट्रासिटी अंतर्गत बळी पडलेल्या कुटुंबाच्या वारसांना पेन्शन, जात वैधता प्रमाणपत्र, शिलाई मशिन आदी योजनांचा लाभ पात्र लाभार्थ्यांना देण्यात आला. मनपा आयुक्त डॉ.अभिजीत चौधरी यांनी सांगितले, की हा एक अभिनव उपक्रम असून, या माध्यमातून सफाई कामगारांना विविध योजनांचा लाभ घेता आला आहे. समाज कल्याण विभागाचे प्रादेशिक उपायुक्त प्रसाद कुलकर्णी यांनी उपस्थितांचे आभार मानले. या महाशिबिरात विविध विभाग व महामंडळांच्या वतीने स्टॉल लावण्यात आले.

## कृषी उत्पन्न बाजार समितीच्या विशेष पथकाची समिती गठीत

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**नागपूर, दि. २३ :** कृषी उत्पन्न बाजार समितीच्या संचालक मंडळाने केलेल्या गैरव्यवहार / भ्रष्टाचाराबाबत जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर यांच्या अध्यक्षतेखाली विशेष तपासणी पथकाची स्थापना करण्यात आली आहे. या पथकाचे सदस्य सचिव तथा विभागीय सहनिबंधक शरद जरे, सहकारी संस्था छत्रपती संभाजी नगर यांनी या संदर्भात माहिती दिली.

उपरोक्त प्रकरणाबाबत गैरव्यवहार / तपासणी करण्याकरिता व कार्यवाहीबाबत शिफारशी करण्याबाबत महाराष्ट्र शासन, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग शासन निर्णय क. कृवास २०२५/प्र. क्र.२३३/११-स. दि. १८ जुलै २०२५ या शासन निर्णयानुसार जिल्हाधिकारी, नागपूर यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापनेचा निर्णय घोषित करण्यात आला आहे. सदर शासन निर्णयानुसार विशेष तपासणी पथकामार्फत चौकशी प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. कृषी उत्पन्न बाजार समिती, नागपूर येथील संचालक मंडळाने केलेल्या गैरव्यवहार/ भ्रष्टाचाराच्या चौकशीच्या अनुषंगाने बाजार घटकांना अथवा बाजार समितीशी संबंधित व्यक्तींना विशेष तपासणी पथकास समितीला माहिती सादर करता येईल. संबंधितांनी आपले म्हणणे जिल्हाधिकारी नागपूर, जिल्हा पोलिस अधिक्षक नागपूर यांच्या कार्यालयात सादर करावे अथवा संपर्क साधावा. तसेच, विशेष तपासणी पथक यांचे कार्यालय पत्ता भूविकास बँक कॉम्प्लेक्स, दुसरा माळा, गणेशपेठ पोलिस ठाण्यासमोर नागपूर-१२ या पत्यावर माहिती पाठवावी, असे आवाहन विभागीय सहनिबंधक शरद जरे यांनी केले आहे.

अजिंक्य भारत
# आपलं अकोला
अकोला, गुरुवार, दि. २४ जुलै २०२५

## थोडक्यात

### अल्पवयीन मुलीचा विनयभंग

**अकोला :** राऊतवाडी येथील दत्त मंदिराजवळील पार्कमध्ये १५ वर्षीय अल्पवयीन मुलीचा विनयभंग झाल्याची गंभीर घटना घडली आहे. याप्रकरणी सिव्हिल लाइन पोलीस ठाण्यात आरोपीविरुद्ध पोक्सो कायद्यासह भारतीय न्याय संहिता अंतर्गत विविध गंभीर कलमांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शहरातील रहिवासी १५ वर्षीय अल्पवयीन मुलगी ही २२ जुलै २०२५ रोजी दुपारी २.३० वाजता राऊतवाडी येथील दत्त मंदिरात दर्शनासाठी गेली होती. दर्शनानंतर ती मंदिराशेजारील पार्कमध्ये काही वेळ बसली असता, राज ऊर्फ स्वराज वाहूरवाघ (१८) रा. सांगळूद, जि. अकोला हा तिच्या समोर येऊन ''तू इथे काय करत आहेस, माझ्यासोबत फिरायला चल'' असा आग्रह करू लागला. फिर्यादीने विरोध करीत त्याला त्रास देऊ नकोस, नाहीतर वडिलांना सांगेल, असे स्पष्टपणे सांगितले; मात्र आरोपीने तिचा हात पकडून तिला जबरदस्तीने थांबवले व गालावर थापड मारत धमकी दिली. घाबरलेल्या पीडितेने घरी जाऊन घडलेली संपूर्ण माहिती आई-वडील व नातेवाइकांना सांगितली. त्यानंतर ती सिव्हिल लाइन पोलीस ठाण्यात तक्रार देण्यासाठी पोहोचली. पोलिसांनी या संदर्भात संबंधित विभागाविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे.

### बालविवाह प्रतिबंधासाठी स्वातंत्र्यदिनी ग्रामसभेत ठराव घ्यावा : जिल्हाधिकारी

**अकोला :** जिल्हा बालविवाहमुक्त करण्यासाठी सर्व विभागांनी प्रयत्न करणे आवश्यक असून, गावोगाव जागृती झाली पाहिजे. येत्या स्वातंत्र्यदिनी १५ ऑगस्ट रोजी होणाऱ्या ग्रामसभेमध्ये गावात बालविवाह होणार नाही, असा ठराव घेण्याचे आदेश जिल्हाधिकारी अजित कुंभार यांनी येथे दिले. बालविवाह निर्मूलन जिल्हा कृती दलाची बैठक मंगळवारी झाली, त्यावेळी ते बोलत होते. मुख्य कार्यकारी अधिकारी अनिता मेश्राम, समितीच्या सदस्य सचिव तथा जिल्हा कार्यक्रम अधिकारी राजश्री कोलखेडे व इतर अधिकारी उपस्थित होते. जिल्हा बालविवाहमुक्त करण्याकरिता कृती आराखडा तयार करण्याची सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी यावेळी केली. शिक्षणाधिकारी (प्राथमिक) रतनसिंग पवार, बाल कल्याण समितीच्या सदस्य प्रांजली जयस्वाल, राजेश देशमुख, मिलिंद करंदीकर, दर्शन जनईकर ॲड.मनिषा भोरे, जिल्हा बाल संरक्षण अधिकारी राजेंद्र लाडुलकर, दीपक मसने, रमेश जोशी, बाल न्याय मंडळाच्या सदस्य ॲड. सारिका घिरणीकर, तसेच पोलीस प्रतिनिधी, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, सर्व बालगृहांचे अधीक्षक, बालकांच्या क्षेत्रात काम करणाऱ्या स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

### अन्यायकारक बदलीप्रकरणी विद्युत भवनसमोर उपोषण

**अकोला :** अऊंदा संवसू विभागातील तंत्रज्ञ-२ सुधाकर हिरामण चव्हाण यांची झालेली अन्यायकारक प्रशासकीय बदली तत्काळ रद्द करण्याच्या मागणीसाठी वि.से.लां.का. युनियनने विद्युत भवनसमोर आमरण उपोषण सुरू केले आहे. ७ ऑगस्ट रोजी चव्हाण यांची बदली करण्यात आली होती; मात्र त्यांनी कार्यरत असलेल्या ठिकाणाहून कोणतीही तक्रार नसताना ही बदली का झाली, याचा ठोस खुलासा प्रशासनाकडून करण्यात आलेला नाही. यासंदर्भात युनियन पदाधिकाऱ्यांनी ११ व १४ जुलै रोजी कार्यालयीन चर्चेस विरोध दर्शविला होता. युनियनचा आरोप आहे की, ही बदली कार्यकारी अभियंत्यांनी हेतुपुरस्सर सुचवली असून, मानसिक छळाच्या प्रकारात मोडणारी आहे.

# भांडवली मूल्याधारित करवाढीचा बसणार फटका

## जुन्या व नव्या मालमत्तांचे मूल्यांकन सुरू

। रवी देशमुख ।

**अकोला, दि. २३ : अकोला महापालिका क्षेत्रात वार्षिक भाडे कराराच्या आधारे मालमत्तांचे मूल्यांकन करून मालमत्ता कराची आकारणी करण्यात आली, ज्याचा मुद्दा सर्वोच्च न्यायालयापर्यंत गाजला. आता पुन्हा मालमत्ता कराच्या आकारणीसाठी प्रक्रिया सुरू झाली आहे. शहरात मालमत्तांचे मूल्यांकन सुरू झाले आहे. पुढील पाच वर्षांसाठी भांडवली मूल्याच्या आधारे मालमत्ता कर आकारण्यात येणार आहे.**




यापूर्वी करदात्यांना २०१६ मध्ये केलेल्या मूल्यांकनाच्या आधारे कर आकारणी करण्यात आली होती. वार्षिक भाडे कराराच्या आधारे आकारण्यात आलेल्या करामुळे करात दुप्पट वाढ झाली. तत्कालीन सत्ताधारी भाजपच्या या निर्णयाला विरोधकांनी कडाडून विरोध केला होता. दरम्यान, करवाढीचे प्रकरण न्यायालयात पोहोचले. करवाढीच्या महापालिकेच्या निर्णयाला उच्च न्यायालयाने स्थगिती दिली; मात्र सुप्रीम कोर्टाने ही स्थगिती उठविली असून, अद्यापही प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

दरम्यान, तत्कालीन आयुक्त नीमा अरोरा यांनी ३१ ऑगस्ट २०२१ च्या सर्वसाधारण सभेत शासनाच्या आदेशानुसार भांडवली मूल्याच्या आधारे मालमत्तेचे मूल्यमापन करण्याचा प्रस्ताव ठेवला होता; परंतु सत्ताधारी पक्षाने निवडणुका लक्षात घेऊन हा विषय बाजूला सारला. मार्च २०२२ मध्ये, प्रशासकीय कालावधीत भांडवली मूल्याच्या आधारे मूल्यांकन करण्याचे नियोजन होते; परंतु प्रक्रिया सुरू होऊ शकली नाही; मात्र आता प्रशासनाने शहरातील मालमत्तांचे मूल्यांकन सुरू केले आहे. या मूल्यांकनाच्या आधारे पुढील पाच वर्षांसाठी मालमत्ता कर निश्चित केला जाणार आहे. नव्या मूल्यांकनानंतर अनेक मालमत्ताधारकांना करवाढीचा फटका बसण्याची शक्यता आहे.

### रेडिरेकनर दरांवर होणार मूल्यांकन

दर पाच वर्षांनी नव्याने कर रचना करणे आवश्यक आहे. यापूर्वी महापालिकेकडून सन २०१६ मध्ये कर आकारणी करण्यात आली होती. २०१७-१८ ते २०२१-२२ पर्यंत कर वाढविण्यात आला. वार्षिक भाडे कराराच्या आधारे हे मूल्यांकन करण्यात आले. आता प्रशासनाने मूल्यांकन सुरू केले असून, पुढील पाच वर्षांसाठी नव्याने कर आकारणी करण्यात येणार आहे. सरकारने रेडिरेकनर दर निश्चित केले असून, या दरानुसार भूखंड आणि त्यावर बांधण्यात आलेल्या इमारतीचे मूल्यमापन केले जाणार आहे. मालमत्तेच्या किमतीनुसार सुमारे दीड टक्क्यांपर्यंत मालमत्ता कर आकारला जाऊ शकतो. मालमत्तेच्या भांडवली मूल्यावर किती टक्के कर लावायचा हे महापालिकेने ठरवायचे आहे.

### कुठे धक्का तर काहींना मिळणार दिलासा

महापालिकेने सन २०१६ मध्ये केलेल्या मालमत्ता करात वाढ केल्यानंतरही रस्त्याच्या कडेला असलेल्या मिळकती आणि खालच्या जागेतील मिळकतींना आकारण्यात येणाऱ्या करात फारसा फरक पडला नव्हता; मात्र आता असे होणार नाही. मूल्यमापन भांडवली मूल्यानुसार केले जाईल. परिणामी, प्रमुख चौक, रस्त्यांच्या बाजूला असलेल्या मालमत्तांच्या करात मोठी वाढ होऊ शकते, कारण त्यांचे बाजार मूल्यही अधिक आहे. झोपडपट्टी, जुनी आणि अंतर्गत घरे यांच्यावर लागू केलेल्या मालमत्ता करात पुनर्मूल्यांकन करूनही विशेष परिणाम होणार नाही असे जाणकारांचे मत आहे. यामुळे काही मिळकतधारकांना मालमत्ता करवाढीचा झटका बसू शकतो, तर काही मालमत्ताधारकांना दिलासा. भांडवली मूल्याच्या आधारे मूल्यांकन केल्यानंतरच संपूर्ण चित्र स्पष्ट होईल.

# एकही पात्र नागरिक मदतीपासून वंचित राहू नये!

## पालकमंत्री ॲड. आकाश फुंडकर: पंचनाम्याची प्रक्रिया तत्काळ पूर्ण करा

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. २३ :** जिल्ह्यातील अतिवृष्टीग्रस्त भागात पंचनाम्याची प्रक्रिया गतीने पूर्ण करून नुकसानग्रस्त शेतकरी बांधवांना व नागरिकांना आवश्यक मदत मिळवून द्यावी. एकही पात्र नागरिक मदतीपासून वंचित राहता कामा नये, याची काटेकोर खबरदारी घ्यावी, असे निर्देश राज्याचे कामगार मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ॲड. आकाश फुंडकर यांनी आज येथे केले.



जिल्ह्यातील पाऊस परिस्थिती, बाळापूर तालुक्यातील अतिवृष्टी, मदत आदी विविध बाबींचा आढावा घेण्यासाठी पालकमंत्री ॲड. फुंडकर यांच्या अध्यक्षतेत बैठक जिल्हाधिकारी कार्यालयात झाली, त्यावेळी ते बोलत होते. आमदार रणधीर सावरकर, जिल्हाधिकारी अजित कुंभार, सर्व उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, मुख्याधिकारी आदी यावेळी उपस्थित होते. बाळापूर तालुक्यात अतिवृष्टीमुळे १५० घरांचे नुकसान झाले. त्याचप्रमाणे १८ गावांमध्ये तूर, सोयाबीन, कपाशी आदी पिकांचे नुकसान झाले आहे. या सर्व नुकसानाचे सविस्तर व तपशीलवार पंचनामे करावेत. एकही पात्र व्यक्ती मदतीपासून वंचित राहता कामा नये. नुकसानग्रस्तांना आवश्यक मदत मिळवून देण्यासाठी शासनाकडे पाठपुरावा करण्यात येईल. शासन आपदग्रस्तांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे, अशी ग्वाही पालकमंत्र्यांनी दिली.

नदीकाठांवरील गावे, वस्त्या, वाड्या आदी ठिकाणी पावसाळा लक्षात घेऊन सतर्कता बाळगावी व आवश्यक उपाय अमलात आणावेत, असेही निर्देश त्यांनी दिले. आपत्तीबाबतचे यापूर्वीचे पंचनामे, मदतीचे प्रस्ताव, प्राप्त निधी व मदत वितरण आदी विविध बाबींचा आढावा पालकमंत्र्यांनी घेतला. जिल्हाधिकारी कुंभार यांनी सादरीकरण केले.

# आयोग येता दारी, झाली स्वच्छता भारी!

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**अकोला, दि. २३ :** राज्य लोकसेवा हक्क आयोगाचे अमरावती विभागाचे आयुक्त मा. डॉ. एन. रामबाबू नरकुल्ला यांनी आज अकोला महानगरपालिकेच्या कार्याचा आढावा घेतला. मनपा आयुक्त डॉ. सुनील लहाने यांच्या दालनात झालेल्या या बैठकीत विविध विभाग प्रमुख व अधिकारी उपस्थित होते. या भेटीमुळे एकूणच महापालिकेचा परिसर चकाचक झाला होता आणि स्वच्छतेचे झपाट्याने चित्र दिसून आले.

महापालिकेच्या कारभाराचा आढावा घेताना आयोगाने नागरिकांना देण्यात येणाऱ्या अधिसूचित व गैर-अधिसूचित सेवांचा तपशील, त्यातील ऑनलाइन-ऑफलाइन सेवा पुरवठा, फीडबॅक प्रणाली, कर्मचारी शिस्त व प्रशस्तीपत्रे या गोष्टींचा विशेष उल्लेख केला. विशेष म्हणजे कामचुकार कर्मचाऱ्यांवर कारवाईपूर्वी सुधारण्याची संधी देण्याच्या सूचना आयोगाने केल्या. डॉ. रामबाबू यांनी मनपा प्रशासनाच्या प्रयत्नांवर समाधान व्यक्त करीत आयुक्त व उपायुक्त यांचा पुष्पगुच्छ देऊन सन्मान केला. उपस्थित विभाग प्रमुखांमध्ये चारही झोनचे सहा.आयुक्त, कार्यकारी अभियंते, कर अधीक्षक, वैद्यकीय आरोग्य अधिकारी, शिक्षणाधिकारी, स्वच्छता प्रमुख, प्रकल्प अधिकारी व अग्निशमन अधिकारी यांचा समावेश होता; मात्र हाच उत्साह व शिस्त जर रोजच्या कामात दिसली असती, तर अकोला शहराचे चित्र वेगळे दिसले असते, असा सवाल सामान्य नागरिकांतून उपस्थित होतो. आयोगाच्या भेटीमुळेच जर स्वच्छता आणि वाहनशिस्तीचे दर्शन घडत असेल, तर मग शहराच्या दैनंदिन प्रशासनावर प्रश्नचिन्ह उभे राहत आहे, अशी चर्चा महापालिका वर्तुळात होती.

# तलाठी आणि खासगी ऑपरेटर एसीबीच्या जाळ्यात

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. २३ :** तालुक्यातील हिवरखेड येथे एका शेतकऱ्याच्या प्लॉटची ऑनलाइन नोंद करण्याच्या बदल्यात १५ हजार रुपयांची लाच मागणाऱ्या तलाठीसह त्याच्या खासगी ऑपरेटरला ॲन्टी करप्शन ब्युरो अकोला यांनी रंगेहाथ पकडले. २३ जुलै २०२५ रोजी ही कारवाई करण्यात आली असून, यामध्ये १० हजार रुपये लाच रक्कम स्वीकारताना दोघेही आरोपी सापळ्यात अडकले.

तक्रारदाराने ३ जुलै २०२५ रोजी ॲन्टी करप्शन ब्युरो कार्यालय, अकोला येथे लेखी तक्रार दाखल केली होती. त्यात नमूद केले होते की, मौजा हिवरखेड येथील त्याच्या नावावर असलेल्या प्लॉटची ऑनलाइन नोंद करण्यासाठी तलाठी विनोद बापुराव आढे ग्राम महसूल अधिकारी, तलाठी कार्यालय, हिवरखेड, ता. तेल्हारा, जि. अकोला

प्रमोद गुलाबराव इंगळे खासगी ऑपरेटर, तलाठी कार्यालय, हिवरखेड यांनी १५ हजार रुपयांची लाच मागितली आहे.

त्यानुसार एसीबी अकोला यांनी ४ जुलै रोजी लाच मागणी पडताळणी केली असता, तलाठी विनोद आढे यांनी तडजोड करून १० हजार रुपये लाच रक्कम मागितली असल्याचे समोर आले. यावेळी प्रमोद इंगळेनेदेखील लाच स्वीकारण्यासाठी दबाव टाकल्याचे निष्पन्न झाले.

एसीबीने २३ जुलै रोजी पंचासमक्ष सापळा रचला. त्यामध्ये तलाठी विनोद आढे यांनी त्यांचा खासगी सहकारी प्रमोद इंगळे याच्या मार्फत तक्रारदाराकडून १० हजार रुपये लाच रक्कम स्वीकारली. त्यामुळे दोन्ही आरोपींना तत्काळ अटक करण्यात आली. सदर कारवाई तलाठी मंडळ कार्यालय, कृषी उत्पन्न बाजार समिती, हिवरखेड येथे पार पडली.

या प्रकरणात भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ अंतर्गत विविध कलमांनुसार हिवरखेड पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

## उघड्यावरचा संसार..



**शहरात टॉवर चौकातील उड्डाण पुलाखाली काही दिवसांपासून बेघर असणाऱ्या शेकडो नागरिकांनी आपले ठाण मांडले असून, हे बेघर नागरिक दिवसभर मोलमजुरी करून आपला उदरनिर्वाह चालवितात. या शेकडो बेघर नागरिकांचा वाली कोण, असा प्रश्न उपस्थित होत आहे.** **(छाया. संजय ताथुरकर)**

# जि.प.च्या कृषी विभागाच्या योजनांच्या लाभार्थ्यांची लॉटरी पद्धतीने निवड

## शेतकऱ्यांना कृषी विभागातील लाभार्थी निवडण्याचा प्रथमच सन्मान

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. २३ : जिल्हा परिषदेच्या सेस फंडातून जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी कृषी विभागाकडून राबविण्यात येणाऱ्या योजनांच्या लाभार्थी निवडीला बुधवार (ता.२३) लॉटरी पद्धतीने सोडत काढण्यात आली. विशेष म्हणजे यावर्षी प्रथमच जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी विनय ठमके यांच्या मार्गदर्शनात कृषी विभागाने शेतकऱ्यांना कृषी विभागातील लाभार्थी निवडण्याचा सन्मान देत ही निवड प्रक्रिया राबविली.**



गेल्या दोन-तीन वर्षांपासून निसर्गाच्या अवकृपेमुळे जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. शेतकऱ्यांना जिल्हा परिषदेच्या माध्यमातुान मदतीचा हात देणे आवश्यक असुन त्याादृष्टीनेच योजनांची यशस्वी अंमलबजावणी करण्याचे नियोजन जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी अनिता मेश्राम आणि अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी विनय ठमके यांच्या मार्गदर्शनात जिल्हा परिषदेचे कृषी विकास अधिकारी डॉ. तुाषार जाधव यांनी केले आहे.सेस फंडातील या योजनांसाठी एक कोटी आठ लाखाचा निधी मंजुर आहे. या योजनांसाठी प्राप्त अर्जांची छाननी करण्यात आली. बुधवारी जिल्हा परिषदेच्या संविधान सभागृहात अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी विनय ठमके यांच्या अध्यक्षतेखाली निवड समितीने सन २०२५-२६ या वर्षाकरिता एकूण ८२० लाभार्थी निवडी करिता पंचायत समिती निहाय योजना निहाय सोडत प्रक्रिया लॉटरी पद्धतीने राबविण्यात आली. यावेळी कृषी विकास अधिकारी डॉ. तुषार जाधव, मुख्यलेखा व वित्त अधिकारी योगेश धोंडगे, सहाय्यक गटविकास अधिकारी हरिनारायणसिंग परिहार, जिल्हा कृषी अधिकारी सुनंदा दळवी, मोहिम अधिकारी महेंद्र सालके, जिल्हा कृषी अधिकारी मिलिंद जंजाळ आदी अधिकारी उपस्थित होते.

### जिल्ह्यातील ८२० शेतकऱ्यांना लाभ

या योजनेत ९० टक्के अनुदानावर सर्वसाधारण शेतकऱ्यांना एचडीपीई पाईप पुरविणे ६५ लाभार्थी, सर्वसाधारण शेतकऱ्यांना ९० टक्के अनुदानावर पीव्हीसी पाईप पुरविणे ५८ लाभार्थी, मनुष्य चलीत पेरणी यंत्र पुरविणे ७१ लाभार्थी, ९० टक्के अनुदानावर शेतकऱ्यांना इलेक्ट्रीक पंप पुरविणे ओपन वेल सबमर्सीबल पंप ५ एचपी १३३ लाभार्थी, मनुष्य चली बीज प्रक्रिया यंत्र पुरविणे ७७ लाभार्थी, सोलर, विद्युत चार्जींग झटका मशिन शेतीच्या तार कंपाऊंड करिता ३०० लाभार्थी, ब्रश कटर यंत्र पुरविणे ६७ लाभार्थी असे एकूण ८२० लाभार्थ्यांची निवड करण्यात आली.

# रेल्वे कोचमध्ये विक्रेत्यावर हल्ला; चार जणांविरुद्ध गुन्हा दाखल

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. २३ :** दि. २१ जुलै २०२५ रोजी अकोला रेल्वे स्थानकावर भरदिवसा फलाट क्रमांक ३ वर एक धक्कादायक प्रकार घडला. रेल्वे कोचमध्ये खाद्यपदार्थांची विक्री करणाऱ्या विक्रेत्यावर चार जणांच्या टोळक्याने मारहाण केल्याची घटना घडली असून, या प्रकरणी अकोला रेल्वे पोलिसांनी चार आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

ही घटना दुपारी सुमारे १.१५ वाजता घडली. फिर्यादी शेख शारीक शेख खालीक (३३) राहणार कुरैशी कॉलनी, नांदुरा तालुका, बुलढाणा हे आपल्या भावासोबत कचोरी विक्रीसाठी रेल्वेगाडीत प्रवास करत होते. ते सध्या ट्रेन क्रमांक १७६०५ साथिगृहाभगत की कोठी एक्सप्रेस गाडीत व्यवसाय करत होते.

फिर्यादीच्या माहितीनुसार, निझामाबाद रेल्वे स्थानकानंतर शेख निसार शेख सादिक या व्यक्तीने फिर्यादीला विक्रीस मनाई केली व धमकी दिली. नंतर अकोला स्थानकावर ट्रेन पोहोचताच शेख हफिज शेख रशिद, शेख शाहिद वाहिद, शेख निसार सादिक आणि शेख साहिल कासम या चौघांनी फिर्यादीच्या कोचमध्ये येत शिवीगाळ करत लाथाबुक्यांनी मारहाण केली. लोकांनी हस्तक्षेप करून प्रकरण मिटवण्याचा प्रयत्न केला असता आरोपी मागच्या डब्यात जाऊन लपले.याप्रकरणी गुन्हा नोंदवण्यात आला असून, आरोपींविरुद्ध भारतीय न्यायसंहिता कलम ११५(१), ११८(१), ३२४, ३५२, ३५१ (२)(३)(५) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# थोडक्यात

## शेतात रमी खेळण्याची परवानगी द्या –सावजी यांचे जि.पो.अ. यांना पत्र

**मेहकर :** अतिवृष्टीने झालेल्या नुकसानीचे सर्वेक्षणावर कोणताही ठोस निर्णय झाला नाही मात्र निर्णयाच्या प्रक्रियेत असणारेच रमी खेळण्यात गुंग झाल्याचा आरोप करीत ओस पडलेल्या जमिनीमध्ये यावी अशा मागणीचे पत्र जिल्हा उपाध्यक्ष भारतीय राष्ट्रीय काँग्रेस शैलेश सुबोध सावजी यांनी दि. २१ जुलै रोजी बुलडाणा जिल्हा पोलिस अधिक्षकांना पाठविले आहे.या पत्रात शैलेश सावजी यांनी नमूद केले आहे की, कास्तकारांना रमी खेळण्याची परवानगी देण्यात बुलडाणा जिल्ह्यातील तमाम कास्तकारांच्या वतीने आपणाकडे परवानगी मागतो की, झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांना कृषी मंत्रालयामार्फत मोठ्या मदतीची अपेक्षा आहे. सरकारद्वारे आमची माय भूमिशेतीची मंत्र्यांच्या भाषेत काळ्या ढेकळांचा सर्वेक्षणाचा देखावा झाला, परंतू कुठलाही ठोस निर्णय न होता निर्णय घेण्याच्या प्रक्रियेत असणारे रमी खेळण्यात गुंग झाले, करीता ओस पडलेल्या जमिनीत आता आपण रमी खेळण्याची परवानगी द्यावी.

## व्हॉईस ऑफ मिडीयाच्या वतीने पत्रकारांच्या गुणवंत पाल्यांचा सत्कार

**बुलडाणा :** व्हाईस ऑफ मिडीयाच्या वतीने खामगाव शहर व तालुक्यातील पत्रकार बांधवांच्या दहावी, बारावीतील गुणवंत पाल्यांचा सत्कार सोहळा शनिवार दि. २६ जुलै २५ रोजी सकाळी ११ वाजता पत्रकार भवन येथे आयोजीत करण्यात आला आहे. पत्राकार बांधवांनी आपल्या पाल्यांची गुणपत्रिका, आधार कार्ड व छायाचित्र २५ जुलै २५ रोजी दुपारी ३ वाजेपर्यंत पुढील व्हॉट्सअॅप क्रमांकावर पाठवावे. शहरातील पत्राकार बांधवांनी सुमित पवार मो. ९६६५८१३८३९, पंकज गमे मो. ८२०८७४०६९१, सिध्दांत उंबरकार मो. ९८६०८८२३४० व तालुक्यातील पत्राकार बांधवांनी मंगेश तोमर मो. ९८२२९६९६४६, नाना हिवराळे मो. ९४२०७९५६९४, शांताराम तायडे मो. ९९७०९२९८५५ या व्हॉट्सअॅप क्रमांकावर पाठवावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## शेतातील मोटार व केबल लंपास

**नांदुरा :** तालुक्यातील रसूलपूर प्र. राजा शिवार येथील गट क्रमांक ३४ मधील शेतातून अज्ञात चोरट्याने पाण्याची मोटार व इतर साहित्या चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी नांदुरा पोलिस ठाण्यांत अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे अक्षय जगन्नाथ डांगे (२९), रा. आनंद चौक, नांदुरा यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, दि. ६ ते २१ जुलै या कालावधीत त्याांच्या ताब्यातील शेतात बोअरिंगवर बसवलेली मोटार, ३७० फूट केबल आणि स्टार्टर असा एकूण २० हजार रुपयांचा मुद्देमाल अज्ञात चोरट्याने चोरून नेला. फिर्यादीने आजूबाजूच्या परिसरात शोध घेतला, मात्र मुद्देमाल सापडला नाही. त्याामुळे पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवली, पोहेका, सोळके (ब. नं. १११४) यांनी भारतीय न्याय संहिता कलम ३०३ (२) अंतर्गत गुन्हा नोंदविला. पुढील तपास पोलीस करीत आहेत.

## वंदे मातरम् मंडळाची गणेशोत्सव कार्यकारिणी जाहीर

**खामगाव :** येथील गांधी चौक भागातील वंदे मातरम् नवयुवक मंडळाची यावर्षीची गणेशोत्सव कार्यकारणी गठित करण्यासाठी नुकतीच एक बैठक घेण्यात आली. यावेळी मंडळाचे ज्येष्ठ संजय (मुना) पुरवार व सतिषअप्पा दूहे यांच्या मार्गदर्शनात मंडळाची या वर्षीची कार्यकारणी गठित करण्यात आली. यामध्ये अध्यक्षपदी प्रणव अजय जोशी, उपाध्यक्ष कमलेश वर्मा, गणेश शर्मा (पंडा), सचिव संजय गुमा, सहसचिव गौरव टीबडेबाल, कोषाध्यक्ष संदीप गोड, सहकोषाध्यक्ष जीत गुप्ता, संघटक संदीप शाह, आखाड़ा प्रमुख संदीप गुमा, सल्लागार प्रमुख ॲड. रमेश (बाबू) भट्टड़, दिनेश शर्मा, दिलीप गुमा, अतुल खंडेलवाल तर सदस्य म्हणून अनिकेत धारव, अनुरोध खेतान, अमित गायकवाड, नितेश गावंडे यांची निवड करण्यात आली आहे.

## श्रीमद् भगवतगीता वाचन कार्यक्रमास प्रारंभ

**खामगाव :** श्री मदन मोहन प्रभु विजयते श्री बल्लभ यांच्या असीम कृपेने स्थानिक श्री यमुना सत्संग मंडळ यांच्या वतीने माहेश्वरी भवन येथे २२ ते २६ जुलै २५ पर्यंत दुपारी ३.३० ते सायंकाळी ६ या वेळेत श्रीमद भगवतगीता वाचन कार्यक्रमास प्रारंभ झाला आहे. प.पु.गो १०८ श्री विशाल बावाश्री यांच्या मधुर बाणीतुन गीता बाचन होत आहे. या कार्यक्रमाचा भाविकांनी लाभघ्यावा, तसेच अधिक माहितीसाठी ९४२२८८०००७५ या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# शेगाव-पंढरपूर पालखी मार्गाची दयनीय अवस्था!

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**लोणार दि. २३ :** शेगाव ते पंढरपूर पालखी मार्गावर लोणार व मेहकर तालुक्यातील रस्त्याांची अवस्था अक्षरशः धोकादायक झाली आहे. ठिकठिकाणी खोल खड्डे, रस्त्याला पडलेल्या मोठमोठ्या भेगा आणि तडे यामुळे प्रवासी, विशेषतः वारकऱ्यांचे जीव धोक्यात आले आहेत. शासनाने लाखो वारकऱ्यांच्या सोयीसाठी कोट्यवधी रुपयांचा खर्च करून हा पालखी मार्ग उभारला, पण आज तो मार्गच जीवघेणा ठरत आहे!

सुलतानपूर, लोणार, मेहकर या मार्गावरील अनेक ठिकाणी रस्त्याचा मध्यभाग थोडक्यात फुटला असून, दुचाकीस्वार किंवा अन्य वाहनचालक जर सावध नसेल, तर मोठा अपघात अटळ आहे. विशेषतः सुलतानपूर येथील सीता न्हाणी नदीच्या पुलावर असलेले खड्डे हे गंभीर चिंतेचा विषय बनले आहेत.

मागील वर्षी श्री संत गजानन महाराजांच्या पालखीच्या आगमनाआधी याच खड्ड्यांबाबत वृत्तपत्रांनी आवाज उठवला होता. त्या वेळी खड्डे बुजवले गेले होते, मात्र हे काम पूर्णतः थातूरमातूर झाले असल्याचे स्पष्टपणे समोर येत आहे. कारण यंदा पुन्हा हेच खड्डे उघडे पडले असून, त्यांची अवस्था आणखीनच बिकट झाली आहे.

या मार्गाची देखभाल व डागडुजी करण्याची जबाबदारी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाची असताना देखील त्यांची कारभाराकडे बेपर्वा भूमिका असल्याचे चित्र आहे. ज्या कंत्राटदारांकडून हे काम केले जात आहे, त्यांच्याकडून केवळ कागदोपत्री काम उरकले जात असून प्रत्यक्षात रस्त्याची अवस्था अधिकच वाईट होते आहे.

**शेतकऱ्यांचे नुकसानही गंभीर मुद्दा!**

या निकृष्ट रस्त्यांमुळे रस्त्यालगतच्या अनेक शेतकऱ्यांच्या शेतीत पाणी थेट घुसते. त्यामुळे दरवर्षी होणारे पीक नुकसान हे देखील दुर्लक्षित केले जात आहे. शेतकऱ्यांची आणि भक्तांची दोघांचीही उपेक्षा होत आहे. कोट्यवधी रुपये खर्चूनही काम निकृष्ट; वारकऱ्यांच्या जीवाशी खेळ करणाऱ्या प्रशासनाच्या ढिसाळ कारभाराला जबाबदार धरून त्वरित दुरुस्तीची मागणी जोर धरत आहे. अन्यथा संतांच्या भक्तांचा रोष अनावर होऊ शकतो!

**पालखी आगमन तोंडावर वेळेवर दुरुस्ती नाही तर संताप अनावर!**

२५ जुलै, शुक्रवार रोजी श्री संत गजानन महाराजांची पालखी लोणार येथे येणार असून, त्यानंतर ती २६ जुलै, शनिवार रोजी सुलतानपूर मार्गे मेहकरकडे मार्गस्थ होईल. इतक्या मोठ्या प्रमाणावर भक्तगण या मार्गावरून प्रवास करणार असताना देखील प्रशासनाचे अजूनही डोळे झाकलेले आहेत.

## युग धर्म पब्लिक स्कूलमध्ये विविध कार्यक्रम संपन्न

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**खामगाव दि.२३ :** दि.२२ जुलै २०२५ रोजी युगधर्म पब्लिक स्कूल मध्ये स्काऊट गाईड तसेच कब बुलबुल कार्यक्रम व दीक्षाविधी देण्यात आली संस्थाध्यक्ष गोपाल अग्रवाल सर शाळेचे प्राचार्य अनिरुद्ध ,कार्यक्रमाची प्रमुख उपस्थिती व मार्गदर्शक सौ. डॉक्टर निर्मला गजानन जाधव, तसेच सौ मंदा तिडके प. स मांडका अद्यापिका तथा गाईड कॅप्टन मांडका यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

सर्व मान्यवरांचे शाळेच्या शिक्षिका संगीता देशमुख मॅडम आणि पायल घडीकर मॅडम यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. दि.२२ जुलै २०२५ रोजी शाळेला स्काऊट गाईड दीक्षाविधी समारंभ निमित्ताने भेट दिली असता शाळेचे मुख्याध्यापक अनिरुद्ध अवचार सर उप प्राचार्य अंकिता राठी मॅडम तसेच शिक्षक व सर्व कर्मचारी वृंद व स्काऊट प्रमुख निखिल सावंग सर तसेच गाईड प्रमुख शिक्षिका प्रमुख कु कांचन लोखंडे मॅडम तसेच सौ पायल घडीनकर मॅडम हे उपस्थित होत्या. शाळेमध्ये १०४ युनिट ची नोंदणी आहे. कृतीयुक्त पद्धतीने मराठी तसेच इंग्रजी भाषेतून गीत गायले व विद्यार्थ्यांना त्यांच्या भाषणातून प्रेरणा दिल्या त्यानंतर सर्व विद्यार्थ्यांचा दीक्षाविधी कार्यक्रम घेण्यात आला. व सर्व विद्यार्थी प्रमुख पाहुणे शिक्षिका यांच्या शुभहस्ते वृक्षारोपण करण्यात आले. यामध्ये शाळेत सर्व विद्यार्थ्यांचें व शिक्षकांची उत्स्फूर्तपणे सहकार्य मिळाले.

## 'एक पेड माँ के नाम' या उपक्रमांतर्गत वृक्षारोपणाचा संकल्प

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**मलकापूर दि.२३ :** देशाचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या आव्हानावरून ''एक पेड माँ के नाम'' या उपक्रमांतर्गत येथील गोविंद विष्णू महाजन ज्युनिअर कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी महाविद्यालय परिसरात वृक्षारोपण करत आपल्या आईच्या नावे वृक्षारोपण करण्याचा संकल्प केला.

पृथ्वीचे वाढते तापमान, पर्यावरणाचा ढासळता समतोल आणि निसर्गाची होणारी हानी यावर उपाय योजना करण्याच्या निमित्ताने देशाचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून वृक्षारोपणाची मोहीम सध्या देशभर सुरू आहे. या अंतर्गत एक पेड माँ के नाम हा उपक्रम राबवत पर्यावरण विषयाला एक भावनिक आकार देण्याचा प्रयत्न शासनाने केलेला आहे. त्या अंतर्गत गोविंद विष्णू महाजन विद्यालय आज दि. २३ जुलै रोजी विद्यार्थ्यांच्या माध्यमातून वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी प्रा. डॉ.नितीन भुजबळ यांनी विद्यार्थ्यांना वृक्षारोपणाचे महत्व आणि या उपक्रमाचे गांभीर्य समजावून सांगत वृक्षारोपण करण्याचे आवाहन केले.

या उपक्रमात आपल्या घराच्या परिसरात आपल्या आईच्या नावाने एक वृक्ष लावून त्याचे योग्य संगोपन व संवर्धन करण्याचा संकल्प विद्यार्थ्यांनी व्यक्त केला. उपक्रमासाठी रमेश इंगळे विद्यार्थी योगदान दिले.

## युवक कॉँग्रेसच्या अध्यक्षपदी अचलेश्वर दिपके



अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**खामगाव दि.२३ :** खामगाव विधानसभा युवक काँग्रेसच्या अध्यक्षपदी अचलेश्वर सुभाषराव दिपके यांची निवड करण्यात आली आहे.

महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, युवक काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष कुणाल राऊत, बुलडाणा जिल्हा काँग्रेस अध्यक्ष राहुल बोंद्रे यांचे मान्यतेने युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष अनिकेत मापारी यांनी ही नियुक्ती केली असून अचलेश्वर दिपके यांच्यावर युवक काँग्रेसच्या खामगाव विधानसभा अध्यक्ष पदाची महत्वपूर्ण जबाबदारी सोपविली आहे. अचलेश्वर दिपके हे काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते तथा कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी संचालक स्व. सुभाषराव दिपके यांचे चिरंजीव असुन त्यांच्या वहिनी ह्या गारडगांव ग्रामपंचायतच्या सरपंच आहेत. त्यांना बुलडाणा येथे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, जिल्हा अध्यक्ष राहुल बोंद्रे यांच्या उपस्थितीत नियुक्ती पत्र देण्यात आले.

खामगाव तालुका काँग्रेस कमिटी अध्यक्ष तेजेंद्रसिंह चौहान, ओबीसी विभागाचे सचिव अजय तायडे, खामगाव शहर अध्यक्ष स्वप्निल ठाकरे पाटील, शेगाव तालुका काँग्रेस कमिटी अध्यक्ष ज्ञानेश्वर शेजोळे, शहर कार्याध्यक्ष किशोरआप्पा भोसले, विजय इंगळे, अक्षय शंकरवार यांचेसह काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## रस्त्यालगत टाकलेल्या केबलमुळे खड्डे पडून ट्रक उलटला

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**डोणगाव दि.२३ :** डोणगाव व राज्य महामार्गालगत कंपनीने केबल टाकण्यासाठी नाली खोदून त्यात केबल टाकून सदर नाल्या थातुर मातुर बुजविल्याने दि. २१जूलै ला पाऊस झाला त्यामुळे सदर महामार्गोवरून ट्रक जात असताना गावाजवळ रोड खाली चाक जाऊन सदर नाली मुळे ट्रक पलटी झाल्याची घटना घडली आहे.

राज्य महामार्गोच्या बाजूने कोणतेही केबल टाकायचे असेल तर मध्यापासून ९मीटर अंतरावर टाकणे अपेक्षित असताना सदर केबल डांबरीरस्त्यापासून दोन फूट अंतरावर खोदून संबधित कंपनीने केबल टाकून तीच माती परत त्या नालीवर टाकली त्यावर साधे रोलर ही फिरविण्याची तसदी न घेतल्याने ट्रक त्यामध्ये फसून पलटी झाला यावर ज्याप्रमाणे नुकताच नागापूर येथे अपघात झाल्यानंतर पोलीस यांनी स्वत फिर्यादी होऊन तक्रार केली होती. त्याच प्रमाणे संबधित कंपनी विरुद्ध पोलीस फिर्यादी होऊन



केबल टाकणाऱ्या कंपनीवर गुन्हा दाखल करावा अशी काँग्रेस चे जिल्हा उपाध्यक्ष शैलेश सावजी यांनी बोलताना दिली.

## संत सावता माळी पुण्यतिथी साजरी

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**दे.माळी दि २३ :** प्रति पंढरपूर म्हणून समजले जाणाऱ्या देऊळगाव माळी तालुका मेहकर येथे श्री संत सावता माळी यांची पुण्यतिथी निमित्य अभिवादन कार्यक्रम संपन्न झाला.

या कार्यक्रमासाठी गावातील समस्त भाविक भक्त, भजनी मंडळी, महिला भजनी मंडळ यांची उपस्थिती लाभली. सर्वप्रथम सकाळी सात वाजता विठ्ठल मंदिरापासून श्री संत सावता माळी यांची पालखी गावातील व परिसरातील भजनी मंडळ यांच्या उपस्थितीत नगर प्रदक्षिणा पार पडली. यावेळी श्री संत सावता माळी चौक येथे सावता माळी यांच्या भव्यप्रतिमेचे सावता माळी मित्र मंडळ व गावकरी मंडळीच्या वतीने अभिवादन करण्यात आले. तसेच श्री संत सावता माळी मंदिराचे भव्य बांधकाम सुद्धा देऊळगाव माळी येथे मोठ्या थाटामाटा अगदी पूर्णत्वास गेले आहे. या नियोजित मंदिरात सुद्धा



समस्त गावकरी मंडळी, भजनी मंडळी यांनी महाआरती घेतली. त्यानंतर पालखी मंदिरात विरामस्थ झाल्यानंतर महाआरती होऊन श्री पांडुरंग संस्थान च्या वतीने सर्व वारकऱ्यांना महाप्रसादाची व्यवस्था करण्यात आली होती. कार्यक्रम संपन्नतेसाठी गावातील समस्त माता भगिनी, भजनी मंडळ, यांनी सहकार्य केले.

# श्रींच्या पालखीचे विदर्भाच्या हद्दीवर उत्साहात स्वागत

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**किनगाव राजा दि.२३ :** विठू नामाच्या गजरात श्री संत गजानन महाराज पालखीचे मराठवाडा विदर्भाच्या हद्दीवर हजारो भक्तांच्या उपस्थितीमध्ये जंगी स्वागत करण्यात आले. विदर्भाच्या हद्दीमध्ये पालखीचे आगमन होताच फटाक्याचे आतषबाजी, रांगोळी,पुष्पदृष्टी करत श्री च्या पालखीचे व सोबत असणाऱ्या वारकऱ्यांचे जंगी स्वागत करण्यात आले. गण गण गणात बोते विठ्ठल नामाचा जयघोष करत वारकरी व हजारो भक्त दंग होऊन गेल्याचे पाहायला मिळाले.

विदर्भाची पंढरी म्हणून ओळख असणाऱ्या श्री क्षेत्र शेगांव येथील श्री संत गजानन महाराज यांची पालखी सध्या परतीच्या मार्गावर असून पालखीचे जिल्ह्याच्या हद्दीमध्ये दुपारी २ वाजेच्या दरम्यान आगमन झाले.

यावेळी आमदार मनोज कायंदे, राष्ट्रवादी काँग्रेस जिल्हाध्यक्ष ॲड नाझेर काजी, माजी नगराध्यक्ष देविदास ठाकरे, विष्णु मेहेत्रे,अतिश तायडे, सतीश तायडे, माजी जिल्हा परिषद अध्यक्षा नंदाताई कायंदे, वर्षा कायंदे,शेख यासीन, सिद्धार्थ जाधव, वैभव मिनासे,सिताराम चौधरी,सतिश काळे, जगन सहाने,उमेश खरात, सागर मेहेत्रे, शाम मेहेत्रे, राजेंद्र अंभोरे, सदाशिव मुंढे, उपविभागीय पोलिस अधिकारी मनिषा कदम, पोलिस निरीक्षक आशिष इंगळे, नायब तहसीलदार प्रांजल पवार,पोलीस उपनिरीक्षक बालाजी सानप, श्रावण डोंगरे, महसूलचे कर्मचाऱ्यांसह हजारो भाविकांची उपस्थिती होती. स्थानिक नगर परिषदेच्या वतीने जल शुद्धीकरण केंद्राजवळ दिंडी सोहळ्याचे उत्साहात स्वागत करण्यात आले. याच ठिकाणी सामाजिक कार्यकर्ते विजय तायडे यांनी दिंडीतील वारकऱ्यांना फराळाचे वाटप केले. ता. २४ जुलै रोजी सकाळी श्री ची पालखी किनगांव राजासाठी प्रस्थान करणार आहे.

**श्रींच्या पालखीसोबत पोलिसांचा तगडा बंदोबस्त**

सिंदखेड राजा ते शेगांव पर्यंत श्रींच्या पालखीसोबत पोलिसांचा तगडा बंदोबस्त आहे. जिल्हा पोलीस अधीक्षक निलेश तांबे, अपर पोलीस अधीक्षक अमोल गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली २ पोलीस निरीक्षक, ६ सहाय्यक पोलीस निरीक्षक पोलीस उपनिरीक्षक,३० पुरुष अंमलदार,१० महिला अंमलदार,१० वाहतूक अंमलदार, ५ स्थानिक गुन्हे शाखेचे साधा वेशातील कर्मचारी, २ वाहने शेगावपर्यंत सोबत राहणार आहेत. उपविभागीय पोलीस अधिकारी मनीषा कदम व मेहकर उपविभागीय पोलीस अधिकारी प्रदीप पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली प्रत्योक पोलीस स्टेशनच्या हद्दीमध्ये पालखी दाखल झाल्यानंतर पोलीसांचा तगडा बंदोबस्त सोबत असणार आहे.

## बुलडाणा आगाराचा असाही भोंगळ कारभार

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

### फास्टटॅग बंद असल्याने प्रवासी त्रस्त

**बुलडाणा दि.२३ :** बुलढाण्याहून अमरावतीकडे निघालेली एस.टी. बस फास्टट्रॅक बंद असल्यामुळे टोल नाक्यावर एक ते दीड तास अडकून पडली.यामुळे प्रवाशांना नाहकचा त्रास सहन करावा लागत आहे. गेल्या काही दिवसांपासून टोल नाक्यावर थांबण्याचे चित्र दिसून येत असले तरी विभाग मात्र कुंभकर्णी झोपेत आहे.

बुलढाणा आगाराची एस.टी.बस दुपारी १२ वाजता अमरावतीकडे निघाली होती. या बसमध्ये ४० ते ५० प्रवासी होते.

दरम्यान बाळापुरच्या जवळ एका टोलनाक्यावर बस थांबली. टोलनाक्याचे कर्मचायांनी बसच्या ड्रायव्हरला सांगितले की, तुमची बसचे फास्टट्रॅक बंद आहे.या गाडीमध्ये पत्रकार रहेमत अली हे प्रवास करीत होते. त्यांनाही या फास्टट्रॅकचा त्रास सहन करावा लागला. दरम्यान त्यांना या विषयी माहिती मिळताच त्याांनी एस.टी.बसचे ड्रायव्हर व वाहक यांना विचारपूस केली. मात्र वाहक व चालक यांना देखील याची कल्पना नव्हती.टोल नाक्यावर येऊन



एस.टी.बसच्या ड्रॉयव्हर व वाहकाला ही माहिती मिळाली. दरम्यान अनेक प्रवासी खाली उतरले. बस ड्रायव्हरनीं वरिष्ठ अधिकायांना माहिती दिली तरी वरिष्ठानी टाळा-टाळ केली. पत्रकार रहेमत अली यांनी बुलढाणा आगारातील शुभांगी शिरसाट विभाग नियंत्रण अधिकारी यांच्याशी दूरध्वनीने संपर्क केला असता त्यांनी माहिती दिली की, पंढरपूर यात्रा सुरु असताना सर्व बसचे फास्टट्रॅक बंद करण्यात आले आहे. यात्रा संपली मात्र यामुळे प्रवाशांना उगाच तास दोन तास टोल नाक्यावर अडकून पडावे लागत आहे. एसटी विभागाच्या भोंगळ कारभार बद्दल

अजिंक्य भारत

आपलं वाशिम

गुरूवार, दि. २४ जुलै २०२५



## थोडक्यात

### विद्याभारती शाळेत लोकमान्य टिळक यांची जयंती साजरी



**वाशिम :** येथील विद्याभारती शाळेत लोकमान्य टिळक यांची १६९ वी जयंती अतिशय उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक नितेश मिटकरी तर प्रमुख पाहुणे संचालक सुमित सुरेशराव मिटकरी, पर्यवेक्षक विजय गोटे यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे अध्यक्ष तथा मुख्याध्यापक नितेश मिटकरी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन पवन निमके यांनी केले.

### ५ ऑगस्टपासून अकोला व वाशिम जिल्ह्यातील टपाल कार्यालये नव्या युगात

**वाशिम :** भारतीय टपाल विभागाने आपल्या सेवा अधिक गतिमान, अचूक आणि जनहिताभिमुख करण्यासाठी आय.टी. २.० या महत्वाकांक्षी उपक्रमांतर्गत ए.पी.टी. प्रणाली लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. या नव्या प्रणालीमुळे टपाल व्यवहार अधिक सुलभ व कार्यक्षम होणार आहेत. अकोला टपाल विभागाअंतर्गत येणाऱ्या अकोला व वाशीम जिल्ह्यातील सर्व शाखा व उपशाखा टपाल कार्यालयांमध्ये ही नवी प्रणाली ५ ऑगस्ट २०२५ पासून कार्यान्वित होणार आहे. ही नवी प्रणाली कार्यान्वित झाल्यानंतर सेवा अधिक सुसूत्र, जलद आणि तंत्रज्ञानाधिष्ठित होणार असून, सर्वसामान्य नागरिकांच्या सोयीसाठी उचललेले हे एक सकारात्मक पाऊल असल्याचे विभागाने स्पष्ट केले आहे.

### मुख्यमंत्री फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबिराला प्रतिसाद



**वाशिम** : भारतीय जनता पार्टी वाशिम ग्रामीण मंडळाच्या वतीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त सोमवार, २२ जुलै सोनखास येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराला रक्तदात्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. शिबिराच्या समारोपप्रसंगी भाजपा जिल्हाध्यक्ष पुरुषोत्तम चितलांगे, वाशिम-मंगरूळपीर मतदारसंघाचे आमदार श्याम खोडे, वाशिम नगर परिषदेचे माजी नगराध्यक्ष अशोक हेडा, ज्येष्ठ नेते बाबुराव काळबांडे आदी उपस्थित होते आणि त्यांनी मार्गदर्शन केले. या शिबिरात डॉ. प्रवीण शेळके व त्यांच्या वैद्यकीय टीमने महत्त्वपूर्ण योगदान देत शिबिर यशस्वी केले.

### सय्यद अकील यांची शिवसेना उपजिल्हा संघटक पदी नियुक्ती



**रिसोड :** तालुक्यातील राजकीय क्षेत्रातील सर्वपरिचित माजी पंचायत समिती उपसभापती सय्यद अकील यांची वाशीम जिल्ह्याच्या उपजिल्हा संघटक पदी नियुक्ती करण्यात आली. माजी खासदार तथा शिवसेना नेत्या भावना गवळी यांनी सय्यद अकील यांचा राजकीय अनुभव व जिल्ह्यातील गावागावात त्यांनी उभे केलेले संघटन पाहता त्यांची उपजिल्हा संघटक पदी नियुक्ती केली. अकील यांच्या निवडीचा सर्वत्र आनंद व्यक्त केल्या जात आहे.

# वेगवेगळ्या घटनेत ३ ठार २० जखमी

## पेडगाव येथे लक्झरी बस व ट्रकची धडक; पिपरी सरहदजवळ ट्रक पुलावरून नदीत कोसळला

**दै. अजिंक्य भारत** । प्रतिनिधी

**वाशिम, दि. २३ :** वाशिम जिल्ह्यात मंगळवारी पहाटे ( २३ जुलै) दोन गंभीर अपघात घडले असून, एकूण तीन जणांचा मृत्यू झाला आहे तर २० जण जखमी झाले आहेत. छत्रपती संभाजीनगर-नागपूर राष्ट्रीय महामार्गावरील पेडगाव गावाजवळ ट्रॅव्हल्स आणि ट्रकच्या अपघातात दोन जण ठार झाले. दुसरी घटना शिरपूर पोलिस ठाण्याच्या हद्दीत, पिपरी सरहद गावाजवळ घडली. गॅस सिलिंडर भरलेला ट्रक ( पहाटे पाच वाजता काच नदीवरील पुलावरून वाहून गेला. ज्यामध्ये चालकाचा मृत्यू झाला.



सविस्तर असे की, संभाजीनगर-नागपूर राष्ट्रीय महामार्गावरील पेडगाव गावाजवळ सिंध ट्रॅव्हल्सची ( ३७ ७७७२) लक्झरी बस पुण्याहून कारंजा येथे जात असताना, नागपूरहून संभाजीनगरकडे जाणाऱ्या ट्रक ( ०४ ०३९१) ला पेडगावजवळ समोरासमोर जोरदार धडक दिली. धडक एवढी तीव्र होती की दोन्ही वाहनांचे पुढील भाग अक्षरशः चक्काचूर झाले. या अपघातात बसचे वाहक मुकेश विठ्ठल नाटे (वय ३६, रा. बर्डे प्लॉट, अकोट) हे जागीच ठार झाले. तर बसचालक अशोक वानखडे (वय ५५, रा. अकोट) यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. ट्रकचालकासह इतर प्रवासी गंभीर जखमी झाले आहेत. अपघाताची माहिती मिळताच ठाणेदार किशोर शेळके, स.पो.नि. गणेश काळे, व पोलीस कर्मचारी तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. १०८ रुग्णवाहिका तसेच स्थानिक ग्रामस्थांच्या मदतीने सर्व जखमींना तत्काळ बाहेर काढून जवळच्या रुग्णालयात हलवण्यात आले. घटनास्थळी काही काळ मोठा गोंधळ निर्माण झाला होता. महामार्गावरील वाहतूक काही वेळ ठप्प झाली होती. अपघातानंतर बचावकार्य पार पडल्यानंतर पोलिसांनी वाहतूक सुरळीत केली. अपघाताचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून, पोलीस याप्रकरणाचा अधिक तपास करत आहेत.

### पुलावरून ट्रक नदीत कोसळला; चालकाचा मृत्यू



**शिरपूर :** शिरपूर पोलीस ठाणे हद्दीतील पिपरी सरहद गावाजवळील पुलावरून ट्रक कोसळून ट्रकचालकाचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना मंगळवारी (२३ जुलै) पहाटे ५ वाजताच्या सुमारास घडली. अपघातग्रस्त ट्रकमध्ये अडकलेल्या चालकाचा मृतदेह पाण्यातून सापडला असून, त्याचे नाव शेख हुसेन शेख गुलाब (वय अंदाजे ३९, रा. हीना नगर, चिखलठाणा, संभाजीनगर) असे आहे. मिळालेल्या माहितीनुसार, एचपी कंपनीचे गॅस सिलेंडर भरलेला ट्रक (क्र. -२०--५५९१) मेहकरहून मालेगावकडे जात असताना, पिपरी सरहद गावाजवळील पुलावरून वाहणाऱ्या पुराच्या पाण्यात कोसळला. उतावळी आणि काच या दोन्ही नद्यांना आलेल्या जोरदार पुरामुळे पुलावर मोठ्या प्रमाणावर पाणी साचले होते. गावकऱ्यांनी ट्रकचालकाला पुढे न जाण्याचा इशारा दिला होता. मात्र चालकाने विनंतीकडे दुर्लक्ष करत धोकादायक निर्णय घेत पुढे जाण्याचा प्रयत्न केला आणि ट्रक क्षणातच नदीच्या तुफान प्रवाहात वाहून गेला. पाऊस थांबल्यानंतर गावकऱ्यांनी अपघातग्रस्त ट्रकजवळ जाऊन पाहणी केली असता ट्रकच्या केबिनमध्ये चालक मृतावस्थेत आढळून आला. ओळख पटवण्यासाठी आधारकार्डाचा आधार घेण्यात आला. घटनेची माहिती मिळताच शिरपूर पोलीस स्टेशनचे सपोनि करुणाशील तायडे, एएसआय रुखसाणा शेख, पोहेका गुरुदेव वानखेडे, पोका अमोल घायाळ, प्रवीण शेंद्रे यांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला.

### मंगरूळपीर शहरातील दुमजली इमारत कोसळली

**मंगरूळपीर :** शहरातील दर्गा चौक परिसरात सोमवार (२२ जुलै) रोजी सायंकाळी साडेपाच वाजण्याच्या सुमारास एक जुनी दुमजली इमारत पावसामुळे कोसळल्याची घटना घडली. या दुर्घटनेत सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही, मात्र मोठ्या प्रमाणात वित्तहानी झाली आहे.

सदरील इमारत जुनी व जीर्ण अवस्थेत होती. सलग सुरू असलेल्या पावसामुळे तिची भिंत व छत अचानक कोसळून ती पूर्णतः जमिनीवर आली. इमारतीजवळ उभा असलेला एक ऑटोरिक्षा ढिगाऱ्याखाली दबला असून त्याचे मोठे नुकसान झाले आहे. विशेष बाब म्हणजे, या इमारतीजवळील परिसरात एक शाळा असून, अनेक विद्यार्थी दररोज या मार्गाने ये-जा करतात. सुदैवाने शाळा सुटण्याच्या वेळेआधी ही घटना घडल्याने संभाव्य मोठी दुर्घटना टळली. घटनेनंतर स्थानिक नागरिकांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेत मदतकार्य सुरू केले. प्रशासनानेही पाहणी करत संबंधित इमारतींचा आढावा घेण्याचे निर्देश दिले आहेत. दरम्यान, अशा जीर्ण इमारतींबाबत तातडीने कारवाई करण्याची मागणी स्थानिक नागरिकांनी प्रशासनाकडे केली आहे, जेणेकरून भविष्यातील दुर्घटना टाळता येतील.



### पूरग्रस्त भागाची जिल्हाधिकारी आणि तहसीलदारांनी केली पाहणी

**वाशिम :** रिसोड तालुक्यातील वाकद व मोप मंडळातील विविध गावांमध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे शेती पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून रस्ते व पूलही बाधित झाले आहेत. या पार्श्वभूमीवर तहसीलदार प्रतीक्षा तेजनकर यांनी सकाळी ७ ते १० या वेळेत प्रारंभिक पाहणी केली. त्यानंतर जिल्हाधिकारी बुवनेश्वरी एस. यांच्यासह दुपारी १२ ते ३ या कालावधीत या संपूर्ण भागाची सखोल पाहणी करण्यात आली.

वाकद, गोहगाव हाडे, बाळखेड, पिंपरखेड, शेलूखडसे या गावांना भेट देऊन झालेल्या नुकसानीचा आढावा घेण्यात आला. प्राथमिक अहवालानुसार या गावांमध्ये अतिवृष्टीमुळे पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. गोहगाव गावात जाण्यासाठी सहा किलोमीटरचा खडतर रस्ता असून, त्या मार्गावर लेंडी नाला, खराटी नाला व विद्रुपा नदी हे तीन प्रमुख प्रवाह पार करावे लागतात. पावसाळ्यात या नाल्यांमुळे गावाचा संपर्क तुटतो. विद्यार्थ्यांसह सर्वसामान्य ग्रामस्थांना याचा मोठा त्रास होतो. या पार्श्वभूमीवर संबंधित पूल व रस्त्यांची पाहणी करून जिल्हाधिकारी यांनी तातडीने पूल व रस्त्यांच्या कामांसाठी हालचाली सुरू करण्याचे निर्देश दिले. यावेळी जिल्हाधिकारी बुवनेश्वरी एस व तहसीलदार प्रतीक्षा तेजनकर यांनी ग्रामस्थांशी संवाद साधून त्यांना पूरस्थितीत आवश्यक खबरदारीबाबत मार्गदर्शन केले.

बाळखेड येथील नदीवरील पूल परिसरात पाण्याचा प्रवाह मोकळा करण्यासाठी संबंधित यंत्रणांशी तातडीने संपर्क साधून कारवाई सुरू करण्यात आली. तसेच शेती नुकसानीचा आढावा घेऊन योग्य ती सर्वेक्षण कार्यवाही करण्याचे आदेशही यावेळी देण्यात आले. या दौऱ्यात निवासी नायब तहसीलदार एस. बी. जाधव, वाकद मंडळाचे मंडळ अधिकारी ए. व्ही. लहाने, ताकदचे तलाठी जी. जी. गरकळ, अक्षय जाधव, बाळखेडचे तलाठी के. एस. धांडे, वाडी वाकदच्या काष्टे मॅडम, शेलूखडसेचे तलाठी के. पी. डुकरे, तसेच पोलीस पाटील मिलिंद हाडे, सरपंच विकास हाडे, ग्रामपंचायतीचे कर्मचारी आणि गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## शिक्षण क्षेत्रातील प्रलंबित प्रश्न तातडीने निकाली काढा

### म. रा. शिक्षण परिषदेची शिक्षण संचालकाकडे मागणी

**दै. अजिंक्य भारत** । प्रतिनिधी

**वाशिम, दि. २३ :** महाराष्ट्र राज्य शिक्षण परिषदेची सहविचार सभा शिक्षण संचालक डॉ. महेश पालकर यांच्या सोबत नुकतीच पार पडली. यामध्ये शाळा तेथे मुख्याध्यापक व कायम मान्यता दिली जावी, खाजगी मान्यताप्राप्त शाळा मुख्याध्यापक अर्जित रजेचे रोखीकरण व प्रसुती रजेवर गेलेल्या महिला शिक्षिकेच्या जागेवर बदली या व इतर शिक्षण क्षेत्रातील प्रलंबित प्रश्नाबाबत सविस्तर चर्चा झाली.

यावेळी शालार्थ आयडी, अतिरिक्त शिक्षक समायोजन, थकीत वेतन, अनुकंपा व शिक्षकेतर भरती, राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी करण्यासाठी येणाऱ्या अडचणी, रात्रशाळा शिक्षक व शाळांचा अडचणी, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक नुकसान पटसंख्या अट शिथिल करण्याबाबत, १०० पेक्षा पटसंख्या कमी झाल्यामुळे मुख्याध्यापक पद अधिक्रमित करणे त्यामुळे शालेय व्यवस्थापनात येणाऱ्या अडचणी त्यामुळे शाळा तेथे मुख्याध्यापक व कायम मान्यता दिली जावी, खाजगी मान्यताप्राप्त शाळा मुख्याध्यापक अर्जित रजेचे रोखीकरण व प्रसुती रजेवर गेलेल्या महिला शिक्षिकेच्या जागेवर बदली या व इतर शिक्षण क्षेत्रातील प्रलंबित प्रश्नाबाबत सविस्तर चर्चा झाली.

यावेळी प्रातांध्यक्ष वेणुनाथ कडू, सरकार्यवाह राजकुमार बोनकीले, महिला आघाडी प्रमुख पुजा चौधरी, माजी आमदार नागो गाणार, माजी आमदार भगवान साळुंखे सर्व राज्य पदाधिकारी, विभाग अध्यक्ष, कार्यवाह, राज्य पदाधिकारी व शिक्षण संचालक, प्राथमिक माध्यमिक सहसंचालक सभेसाठी उपस्थित होते.

## शेतरस्त्यांचे वादाचा निकाल जलदगतीन; शेतकरी समाधानी

**दै. अजिंक्य भारत** । प्रतिनिधी

**वाशिम, दि. २३ :** जिल्ह्यातील शेतकऱ्यांना त्यांच्या शेतीसंबंधी अडचणींवर त्वरित तोडगा मिळावा यासाठी जिल्हाधिकारी कार्यालय आणि पोलीस अधीक्षक कार्यालय यांच्या संयुक्त पुढाकाराने तक्रार निवारण दिन हा अभिनव उपक्रम सुरू करण्यात आला आहे. दर सोमवारी दुपारी १२ ते १ या वेळेत तहसील कार्यालयात होणाऱ्या संयुक्त बैठकीत शेतरस्त्यांचे व शेतीशी संबंधित वाद जलदगतीने निकाली काढले जात असून, या उपक्रमामुळे शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

सध्या जिल्ह्यात खरीप हंगामासाठी मशागत व पेरणीची कामे वेगात सुरू असून, या काळात शेतकरी पारंपरिक शेतरस्त्यांचा वापर करतात. मात्र अनेक ठिकाणी हे रस्ते अडवल्यामुळे वाहतुकीची मोठी समस्या निर्माण होत होती. महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ चे कलम १४३ व मामलेदार कोर्ट ॲक्ट, १९०६ चे कलम ५ नुसार आदेश होऊनही काही प्रकरणे प्रलंबित होती. त्यामुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्नही निर्माण होत होता. ही स्थिती लक्षात घेता जिल्हाधिकारी आणि पोलीस अधीक्षक यांच्या सूचनेनुसार, प्रत्येक तहसील कार्यालयात उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, भूमी अभिलेख अधिकारी व पोलीस निरीक्षक यांच्या संयुक्त उपस्थितीत बैठका घेण्याचा निर्णय झाला. या बैठकीत प्रतिनिधी पाठवण्यास मज्जाव असून संबंधित अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष हजर राहणे अनिवार्य करण्यात आले आहे.

या बैठकीत शेतकऱ्यांकडून लेखी स्वरूपात तक्रारी स्वीकारून त्यांची तात्काळ नोंद घेतली जाते आणि संबंधित अधिकाऱ्यांच्या समन्वयातून त्यांचे निराकरण केले जाते. त्यामुळे संभाव्य वाद टाळून शेतकऱ्यांना पारंपरिक रस्त्यांनी शेतीकामे व मालाची वाहतूक करण्यास सुलभता मिळत आहे.

आजवर एकूण सहा अशा बैठका पार पडल्या असून, प्रत्येक तहसीलसाठी एक ठराविक दिवस निश्चित करण्यात आला आहे. वाशिम तहसीलमध्ये दर सोमवारी तक्रार निवारण दिन साजरा केला जातो. प्रत्येक सभेसाठी स्वतंत्र नोंदवही ठेवली जाते, ज्यावर अधिकारी व तक्रारदार यांच्या स्वाक्षऱ्या घेतल्या जातात. प्राप्त व निकाली निघालेल्या तक्रारींचा अहवाल प्रत्येक सोमवारी सायंकाळी ५ वाजेपर्यंत जिल्हाधिकारी व पोलीस अधीक्षक कार्यालयात सादर केला जातो.

जिल्हाधिकारी आणि पोलीस अधीक्षक हे स्वतः या उपक्रमाचा दर पंधरवड्याला आढावा घेत असून, तहसीलदार व ठाणेदार यांना जनजागृती करून जास्तीत जास्त प्रकरणे या बैठकीत निकाली काढावीत अशा सूचना देण्यात आल्या आहेत. यासाठी तक्रारींचा डेटा संकलन व सादरीकरणासाठी नमुना देखील प्रदान करण्यात आला आहे. शेतकऱ्यांच्या हितासाठी जिल्हा प्रशासन सजग या उपक्रमामुळे जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था राखण्यास मदत झाली असून, शेतकऱ्यांमध्ये विश्वास निर्माण झाला आहे.

## नदीच्या पुरात शेकडो हेक्टर शेतीचं नुकसान





**दै. अजिंक्य भारत** । प्रतिनिधी

**रिसोड, दि. २३ :** तालुक्यातील पिंप्री सरहद परिसरात काल रात्री अति मुसळधार पाऊस पडल्यानं उतावळी आणि कांच नद्यांना प्रचंड मोठा पूर येऊन नदी काठची शेकडो हेक्टर शेती पीकांसह खरडून गेली आहे.

त्या मुळं शेतकऱ्यांचं अतोनात नुकसान झालं आहे. या परिसरात शेतक-यांनी दुबार पेरणी केली होती ती ही या पुराच्या पाण्यात सोयाबीन,हळद,अंबा सह पिकं खरडून गेलं आणी मोठ मोठे खड्डे पडले केवल फक्त दगड उरली आहे कारण या शेतामधील सुपीक माती वाहुन गेल्या मुळे या शेतक-यांना कशी शेती करावी आसा प्रश्न शेतकऱ्यासमोर पडला आहे

रिसोड तालुक्यात मागील एका महिन्यात दोनवेळा पडलेल्या अति मुसळधार पावसामुळे पैन गंगा व कांच नदीला दुसऱ्यांदा मोठा पूर आला तसेच यासह अनेक नदी नाले ही दुथडी भरून वाहत असल्याने पूरपरिस्थिती निर्माण झाली या पुरामुळे अनेक गावांमधील सोयाबीन,कपाशी,तूर तसेच हळद या पिकांचे अतोनात नुकसान झाले आहे. शेतकऱ्यांनी आधीच बियाणे, खते, मशागत यावर मोठा खर्च केला होता तो खर्च ही आता वाया गेल्याने शेतकऱ्यांमध्ये निराशा पसरली आहे. प्रशासनाने याकडे लक्ष देऊन शेती नुकसानीचे पंचनामे करुन अर्थिक मदत करावी. अशी मागणी शेतक-यामधुन होत आहे.

### राजस्थानी महिला मंडळाकडून मध्यमेश्वर मंदिरात रुद्र उत्सव!



**दै. अजिंक्य भारत** । प्रतिनिधी

**वाशिम, दि. २३ :** येथील अखिल भारतीय राजस्थानी महिला मंडळ, वाशिम शाखेच्यावतीने मध्यमेश्वर संस्थान येथे दोन दिवसीय भव्य रुद्र उत्सवाचे यशस्वी आयोजन करण्यात आले. मंडळाच्या विविध सेवाभावी उपक्रमांची ही एक उल्लेखनीय साखळी असून, सामाजिक, धार्मिक व आरोग्यविषयक उपक्रमांमध्ये मंडळाची सक्रियता सर्वदूर प्रसिद्ध आहे.

दिनांक २१ आणि २२ जुलै रोजी पार पडलेल्या या रुद्र उत्सवात पहिल्या दिवशी भगवान मध्यमेश्वर महादेवांच्या पिंडीवर १,११,१११ बेलपत्रांची विशेष अर्पण सेवा करण्यात आली. ही सेवा महिला मंडळाच्या सदस्यांसह अनेक भाविकांच्या सहभागातून अत्यंत श्रद्धा आणि भक्तिभावाने पार पडली. दुसऱ्या दिवशी रुद्राभिषेक विधींचे आयोजन करण्यात आले आणि त्यानंतर भाविकांसाठी महाप्रसाद कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमामुळे परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. या आधी देखील मंडळाने ध्यान शिबिर, आरोग्य शिबिर, शॉपिंग मेळावा, स्त्री आरोग्यविषयक जनजागृती इत्यादी उपक्रम आयोजित करून समाजात स्तुत्य कार्य केले आहे. वाशिम शाखेचा हा सेवाभावी आणि सांस्कृतिक योगदान सतत प्रेरणादायी ठरत आहे.

## थोडक्यात

### शिक्षिका कल्पना दखने यांना निरोप



**अडगाव बु. :** जिल्हा परिषद विद्यालय तथा कनिष्ठ महाविद्यालय येथे कार्यरत असलेल्या शिक्षिका कल्पना दखने यांची अडगाव बु. येथून बाळापूर तालुक्यातील जिल्हा परिषद विद्यालय येथे बदली झाल्यामुळे त्याना अडगाव येथे त्यांचा सत्कार करून निरोप देण्यात आला. त्यांनी त्यांच्या शिक्षकीय योगदानात कोणत्याही प्रकारची कुचराई न करता विद्यार्थांना शिकवित असताना स्वतः ला झोकून दिले. त्यांच्या कार्याची दखल घेऊन त्यांचा सत्कार सोहळा २३ जुलै २५ रोजी जिल्हा परिषदेच्या महत्मा फुले हॉल येथे आयोजित करून त्यांना निरोप देण्यात आला. या कार्यक्रमाचे आयोजन विद्यालयाच्या शिक्षिका निकीता निखाडे, दीक्षा अवचार, आरती लबडे, प्रणाली निमकर्डे, तसेच विद्यालयाचे प्राचार्य चाऊदत्त मेहरे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आला. या कार्यक्रमाला विद्यालयातील संपूर्ण शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमात सत्कारमूर्ती यांनी शिक्षण क्षेत्रातील त्यांचा अनुभव आणि भावना व्यक्त केल्या. अडगाव बु. च्या सर्व शिक्षक आणि शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष विलास वानखडे त्याच बरोबर संपूर्ण शाळा व्यवस्थापन समितीने दिलेल्या योगदानाचे आभार व्यक्त केले. या सन्मानामुळे सत्कारमूर्ती यांनी कृतज्ञता व्यक्त केली. या सत्कार कार्यक्रमाचे अध्यक्ष विद्यालयाचे प्राचार्य मेहरे तर प्रमुख शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष विलास वानखडे होते. तसेच कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार निकिता दखने यांनी मानले.

### जिल्ह्यात पावसाची शक्यता: हवामान केंद्राचा अंदाज



**अकोला :** नागपूर येथील प्रादेशिक हवामान विभागाने अकोला जिल्ह्यात आजपासून २५ जुलैपर्यंत पाऊस पडण्याची शक्यता वर्तवली आहे. वीज व पावसापासून बचावाकरिता सुरक्षित ठिकाणी आश्रय घेण्यात यावा, अशा स्थितीत झाडाखाली आश्रय घेऊ नये. या कालावधीत रस्त्याचे अंडरपास, नाल्या, खड्डे, सखल भाग किंवा पाणी साठते, अशा जागेवर जाणे टाळावे. पूर आलेल्या पुलावरून जाऊ नये. जनावरांना झाडांना किंवा विजेच्या तारेखाली बांधू नये. वीज चमकताना मोबाइल व वीज उपकरणे बंद ठेवावी. वाहन विजेच्या खांबापासून दूर ठेवावे. पूर आलेल्या रस्त्यावरून वाहन चालवू नये, आदी सूचना देण्यात आल्या आहेत.

### जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेची मंगळवारी बैठक

**अकोला :** जिल्हा पुरवठा विभागांतर्गत जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेची बैठक मंगळवार, २९ जुलै रोजी सकाळी ११ वा. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नूतन इमारतीत तिसऱ्या मजल्यावरील सभागृहात होईल. ग्राहक संरक्षण परिषदेकडे दाद मागण्याच्या अनुषंगाने तक्रारी पुराव्यासह दोन प्रतीत लेखी स्वरूपात सादर कराव्यात, असे आवाहन करण्यात आले आहे.

### दर्शन पळसकर हत्येप्रकरणी आरोपींना फाशीची शिक्षा द्यावी

**अकोट :** अकोट शहरातील केवळ ९ वर्षांचा निष्पाप मुलगा दर्शन वैभव पळसकर याची सावत्र वडील व त्याच्या मित्राने निर्घृण हत्या केल्याच्या धक्कादायक घटनेनंतर संपूर्ण अकोट शहरात हळहळ व्यक्त केली जात आहे. ३ जुलै २०२५ रोजी ही अमानुष घटना घडली असून, मृतदेह पोत्यामध्ये आढळल्यावर तो पाहून उपस्थित पोलीस व नागरिकांच्या डोळ्यात अश्रू उभे राहिले. याप्रकरणी आरोपींवर फास्टट्रॅक कोर्टात खटला चालवून फाशीची शिक्षा देण्यात यावी, अशी मागणी करीत २२ जुलै २०२५ रोजी महाराष्ट्र राज्याचे गृहराज्यमंत्री योगेश कदम यांना निवेदन देण्यात आले. हे निवेदन सामाजिक कार्यकर्ते अनिकेत उन्नतकर (दर्यापूर)आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी दिले. यावेळी दर्शन पळसकर याचे मृतावस्थेतील फोटो देखील मंत्री महोदयांना दाखविण्यात आले आणि या भीषण घटनेची गांभीर्याने दखल घेऊन आरोपींवर कठोर कारवाईचे आदेश देण्याची विनंती करण्यात आली.

## निधन वार्ता

### सदाशिव वानखडे



**पिंपळखुटा :** पातूर तालुक्यातील पिंपळखुटा येथील प्रतिष्ठित नागरिक सदाशिव नामदेव वानखडे निवृत्त मंडळ अधिकारी महसूल विभाग अकोला यांचे २२ रोजी अल्पशा आजाराने वयाच्या ७८ व्या वर्षी दुःखद निधन झाले. त्यांच्या मागे पत्नी, दोन मुले, सुना, एक मुलगी, नातवंड असा बराच आप्त परिवार आहे.

# सातपुडा परिसरात जोरदार पाऊस

## बोर्डीतील घोगा नाल्याला पूर, पुराने अर्धवट बांधलेले सार्वजनिक शौचालय ढासळले

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**



**अकोट, दि. २३ :** अकोट तालुक्यातील सातपुडा पर्वत रांगेत मुसळधार पाऊस झाल्याने बोर्डी येथील घोगा नाल्याला मोठा पूर आला. या पावसाळ्यातील हा सर्वात पहिला आणि मोठा पूर आल्याने नागरिकांनी पाहण्यासाठी खूप गर्दी केली होती. या पुरात पक्के बांधकाम असलेले अर्धवट सार्वजनिक शौचालय पुराच्या पाण्याने बुडातून पलटी होऊन खाली जमिनीवर पडले व त्यावरील पाण्याची टाकी ही पुराच्या पाण्यात वाहून गेली.

नदी किनारी संरक्षक भिंतीचा अभाव असल्याने गावात पाणी शिरण्याची शक्यता वर्तविली जात आहे. घोगा नाल्यावरील संरक्षण भिंतीचे काम काही दिवस आधी ठेकेदार यांच्या मार्फत सुरू करण्यात आले होते. या कामासाठी चुरी, गिट्टी, सिमेंट, मटेरियल आणण्यात आले होते व जेसीबीद्वारे नाली खोदकाम करण्यात आले होते.

मात्र घोगा नाल्याच्या बाजूला असलेले शेतकरी यांनी अकोट न्यायालयात प्रकरण दाखल करून आक्षेप नोंदविल्याने सदर काम बंद पडले आहे. सध्य स्थितीत घोगा नाल्यावरील संरक्षण भिंतीचे काम हे प्रकरण वादग्रस्त असल्याची माहिती मिळाली. तरी प्रकरणात अकोट न्यायालयाचा अंतिम आदेश येईपर्यंत पुढील काम बंद राहणार आहे. काल आलेल्या घोगा नाल्याच्या पुरामुळे सरकारी शौचालय जमिनीवर खाली पडल्याने व त्यावरील पाण्याची टाकी वाहून गेल्याने नुकसानाची ताबडतोब दखल घेऊन अकोटचे नायब तहसीलदार मनोज मानकर, मंडळ अधिकारी पी. ए. होपळ, तलाठी राजाभाऊ खामकर यांनी बोर्डी येथे येऊन तत्काळ पाहणी केली व ठेकेदार भुईभार यांना सदर कामाबद्दल योग्य त्या सूचना दिल्याची माहिती मिळाली व गावात दवंडी देऊन घोगा नाल्याच्या काठावर असलेल्या नागरिकांना सतर्क राहण्याच्या सूचना दिल्या.

> काल बोर्डीतील घोगा नाल्यांला आलेल्या पुरामुळे घोगा नाल्यावरील सरकारी शौचालय पाण्याने कोरून बुडातून खाली जमिनीवर पडल्याची माहिती मिळाल्याने येऊन पाहणी केली व गावात दवंडी देऊन नागरिकांना सतर्क राहण्याबद्दल कळविले.
> - **राजाभाऊ खामकर,** तलाठी शिवपूर.

> बोर्डी येथील घोगा नाल्याला आलेल्या पुरामुळे सरकारी शौचालय जमिनीवर खाली पडल्याने व त्यावरील पाण्याची टाकी पुरात वाहून गेल्याची माहिती मिळाल्याने बोर्डी येथे येऊन नुकसानाची पाहणी केली व कामासंदर्भात ठेकेदार भूईभार यांना सूचना दिल्या.
> - **मनोज मानकर**
> नायब तहसीलदार, अकोट.

**घोगा नाल्यावरील संरक्षण भिंतीचे काम सुरू असलेल्या मृद व जलसंधारण विभागाच्या अधिकाऱ्यांशी आमचे प्रतिनिधी यांनी संपर्क साधला असता त्यांनी कुठलाही प्रतिसाद दिला नाही.**

## मूर्तिजापूर तालुक्यातील चार संस्था अवसायनात

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**अकोला, दि. २३ :** सहकारी संस्था सहायक निबंधकांकडून मूर्तिजापूर तालुक्यातील चार सहकारी संस्था अंतरिम अवसायनात ठरविण्यात आल्या असून, तशी नोटीस जारी करण्यात आली आहे.

त्याकरिता अवसायकांची सभा १९ ऑगस्ट रोजी दु. १ वा. मूर्तिजापूर येथील कृषी उत्पन्न बाजार समिती परिसरातील सहायक निबंध सहकारी संस्था येथे ठेवण्यात आली आहे. मूर्तिजापूर तालुक्यातील मानाता येथील जिनिंग-प्रेसिंग सहकारी संस्था, हिरपूर येथील महाराणा प्रताप गृह तारण सहकारी संस्था व शासकीय गृहनिर्माण सहकारी संस्था मर्या. तसेच श्री साईनाथ गृह तारण सहकारी संस्था मर्या. या चार संस्था अवसायनात घेण्यात आल्या आहेत. त्यामुळे अंतिम सभेस संस्थेच्या संचालक मंडळांनी संपूर्ण रेकॉर्डसह वेळेत उपस्थित रहावे. आपण सभेत हजर न राहिल्यास आपले काही म्हणणे नाही, असे गृहीत धरून संस्थेची नोंदणी रद्द करण्याबाबतचा आदेश निर्गमित करण्यात येईल, कृपया याची नोंद घ्यावी, असा इशारा सहायक निबंधक अनिल एस. शास्त्री यांनी दिला आहे.

## 'रिमझिम के गीत सावन गाये' कार्यक्रमात रसिक मंत्रमुग्ध

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**



**अकोट, दि. २३ :** अकोट शहरातील अकोट म्युझिकल कराओके ग्रुपच्या वतीने श्रावण महिन्याचे स्वागत व जुन्या आठवणींना उजाळा मिळावा, या हेतूने जुन्या फिल्मी गीतांचा 'रिमझिम के गीत सावन गाये' कार्यक्रम श्री संत नरसिंग महाराज सभागृहात आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाची सुरुवात विधिवत पूजन व हारार्पण करून करण्यात आली. त्यानंतर ग्रुपच्या सर्व गायक मंडळी यांनी एकाहून एक सुरेल गीत गायन करून श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. कार्यक्रमाची सुरुवात आपल्या संस्कृतीनुसार प्रथम पूजक श्री गणेशाची वंदना, आराधनापर गायिका प्रज्ञा धांडे व शिवानी अंभोरे यांच्या भक्तिगीताने झाली. कार्यक्रमाला माजी नगराध्यक्ष रामचंद्र बरेठीया, पुरुषोत्तम चौखंडे, मनिषा मते, उद्योजक नरेश भुतडा, दिलीप बोचे, मंगेश चिखले, वैष्णव महाराज बोरोडे, उद्योजक नंदकिशोर शेगोकार, जितेन बरेठीया, डॉ. विशाल इंगोले, डॉ. शिकवाल, भिकमचंद पालेकर, संस्कार भारतीच्या ज्योती राऊत, डॉ.राऊत, छाया कात्रे प्रामुख्याने उपस्थित होते. यावेळी अकोट म्युझिकल कराओके ग्रुपचे गणेश पाचपोर, प्रकाश गायकी ,अवि पालेकर ,राजेंद्र तेलगोटे,गायक विजय निखाडे, इंजि अविनाश चोपडे, गणेश बंकुवाले, हेमंत लहाने, सतिष तेलगोटे, बाळासाहेब नाठे,मनीष निखाडे, डॉ.संतोष गायकवाड, ईश्वर भाटी, सुरेश नागरे, रमेश बंकुवाले,रमेश भोजने,मिलिंद पत्की, रवींद्र धात्रक या सर्व गायकांनी एकाहून एक सुरेल गीत गायन करून श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. या कार्यक्रमाचे बहारदार संचलन प्रकाश गायकी यांनी तर आभार अविनाश पालेकर यांनी मानले. कार्यक्रमाला बहुसंख्य नागरिकांची व महिलांची उपस्थिती होती.

अकोटचे माजी नगराध्यक्ष रामचंद्रजी बरेठीया मित्र परिवाराच्या वतीने सर्व गायक मंडळींचा पुष्पगुच्छ, सन्मानचिन्ह देवून सत्कार करण्यात आला तर शहरातील सेवाभावी व्यक्तिमत्त्व सुदामजी राजदे यांच्या वतीने विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींचा पुष्पगुच्छ व सन्मानचिन्हे देऊन सत्कार करण्यात आला.

## कावड यात्रेकरिता जल आणण्यासाठी जाणाऱ्या वाहनाची तोडफोड

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**पातूर, दि. २३ :** कावड यात्रेकरिता पातूरवरून काशी येथे जल आणण्यासाठी जाणाऱ्या वाहनाची तोडफोड करून वाहनचालकास मारहाण करण्याची घटना घडली आहे.

पातूर येथील श्री. तपे हनुमान व्यायाम शाळेची दरवर्षी भव्य कावड यात्रा असते, त्या अनुषंगाने यावर्षीसुद्धा २२ जुलै रोजी दुपारी दोन वाजताच्या सुमारास व्यायाम शाळेचे वाहन क्रमांक एम.एच. ३० डीडी ४२७६ जल आणण्यासाठी काशी येथे निघाले असता शहरातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक, मिलिंद नगर येथे काही समाजकंटक युवकांनी कट मारल्याचे कारण दखवत सदर वाहन अडवून चालक यश गाडगे (वय २१) रा.नानासाहेब नगर,पातूर याच्याशी वादविवाद करत अश्लील शिवीगाळ करून त्यास चापट-बुक्यांनी मारहाण केली व त्याच्या खिशातून बळजबरीने १००० रुपये हिसकावून घेतले व गाडीच्या काचा फोडून नुकसान केले. सदर घटनेची माहिती शहरात पसरताच घटनास्थळी नागरिकांनी जमाव करण्यास सुरुवात केली होती.

पातूर शहरात कावड यात्रेदरम्यान सन २०१३ ला जातीय दंगल घडली होती व शहरात कर्फ्यु लागला होता, सदर घटनेचे पडसाद उमटून मागील दंगलीची पुनरावृत्ती होऊ नये, यासाठी श्री. तपे हनुमान व्यायाम शाळेचे संस्थापक अध्यक्ष अनंत ऊर्फ बालु बगाडे यांनी कार्यकर्त्यांची समजूत काढून कुठल्याही प्रकारचा अनुचित प्रकार घडला नाही पाहिजे, असे बजावल्याने एक मोठी घटना टळली. यावेळी पातूर पोलिसांनी घटनास्थळी दाखल होऊन जमाव पांगवून शहरात शांतता प्रस्थापित करून कायदा व सुव्यवस्था अबाधित राहील याची दक्षता घेतली. सदर प्रकरणी दिलेल्या फिर्यादीवरून पातूर पोलिसांनी आरोपी समीर बेग, आरिफ खान अमानुल्ला खान, शेख अजीज शेख कालू तिघेही रा.पातूर यांच्याविरोधात भारतीय न्याय संहिता २०२३ अंतर्गत कलम ११८(१), ११५, ३५२, ३२४, ४१३, ३१५(३) अन्वये गुन्हा नोंदविला असून, ठाणेदार हनुमंत डोपेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास पातूर पोलीस करीत आहेत.

> मागील काळातील दंगलीच्या घटना पाहता पातूर शहराला अतिसंवेदनशील असल्याचा शिक्का लागला आहे. आपल्याला शहराची प्रतिमा बदलायची असून, सर्व धार्मिक सण-उत्सवात सामाजिक सलोखा ठेवून कायदा व सुव्यवस्था अबाधित राखून एकजुटीचे उदाहरण बनावे. येणारा कावड उत्सवदेखील शांततेत पार पाडण्यासाठी सहकार्य करावे व कुठल्याही अफवांवर विश्वास ठेवू नये.
> - **अनंत बगाडे** संस्थापक अध्यक्ष,
> श्री.तपे हनुमान व्यायाम शाळा,पातूर.

## अकोट शहरात सलग दुसऱ्या दिवशी अतिक्रमण हटाव मोहीम



**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**अकोट, दि. २३ :** नगर परिषदेद्वारा अकोट शहरातील अतिक्रमिकांनी आपले अतिक्रमण हटविण्याबाबत गत काही दिवसांपासून ध्वनिक्षेपकाद्वारे सूचना देण्यात आली होती. त्यानुसार शहरातील बसस्थानक मार्ग, जवाहर रोड, नरसिंग रोड परिसरातील अनेक अतिक्रमिकांनी स्वयंस्फूर्तीने अतिक्रमण पहिल्या दिवशी काढण्यात आले. तर २२ रोजी सोनू चौक येथे नगरपालिकेचे सीईओ डॉ. नरेंद्र बेंबरे यांच्या उपस्थितीत आणि पोलीस बंदोबस्तात नगर परिषद अतिक्रमण हटाव पथकाद्वारे जेसीबीसह उर्वरित अतिक्रमण हटविण्याची मोहीम आजही सुरू होती. अकोट शहरातील बस स्थानक मार्ग, जवाहर रोड, नरसिंग रोड, पुरीसाथ, अकोला रोड, दर्यापूर रोड, आदी मार्गांवर मोठ्या प्रमाणात अतिक्रमण वाढीस लागले आहे. यामध्ये अनेक गोरगरिबांनी लघु व्यवसाय करून उदरनिर्वाह चालवित होते; परंतु रहदारीस अडथळा निर्माण होऊन रस्ते अरुंद झाले आहेत. परिणामी, नगर परिषद प्रशासनाने अतिक्रमण काढण्याबाबत संबंधितांना सूचना देऊन स्वत:हून अतिक्रमण काढण्याबाबत आवाहन केले होते. त्यानुसार अनेक अतिक्रमिकांनी आपले अतिक्रमण स्वयंस्फूर्तीने काढून घेतले; परंतु अनेक जणांनी आपले अतिक्रमण 'जैसे थे' ठेवल्याने सोमवारी दुपारच्या सुमारास नगर परिषदेच्या अधिकाऱ्यांसह अतिक्रमण हटाव पथकाने जेसीबीद्वारे बसस्थानक मार्गापासून मोहिमेस सुरुवात केली. त्यामुळे अनेक अतिक्रमिकांची वेळेवर धावपळ झाल्याचे दिसले. मुख्य मार्गांवरील अतिक्रमण हटविल्या जात असल्याने शहरातील अरुंद रस्त्यांनी मोकळा श्वास घेतला.

> अनेकदा पावसाळ्यात अतिक्रमण हटाव मोहीम राबविल्या जाते. त्यामध्ये आर्थिक झळ लघु व्यवसाय करणाऱ्यांना बसते. शहरातील अतिक्रमण हटविताना नगर परिषद प्रशासनाने कोणताही भेदभाव न करता सरसकट कच्चे-पक्के अतिक्रमण काढावे, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे, तसेच मोहिमेनंतर पुन्हा त्याच ठिकाणी अतिक्रमण होऊ नये, याकरिता प्रशासनाने अतिक्रमण निर्मूलन फिरते पथक ठेवून दक्षता घ्यावी.
> -लघु व्यावसायिक

## आधुनिक तंत्रज्ञानाचा बी.बी.एफ.वापर करून उत्पादन वाढ होणार

### वणी रंभापूर अंतर्गत अकराशे तेरा हेक्टरवर पीक बहरले

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**



**बोरगाव मंजू, दि. २३ :** शेती कसताना नैसर्गिक आपत्ती व्यवस्थापन, अवेळी पाऊस या गत काही वर्षांत पीक उत्पादनात कमालीची घट होत असताना आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब बी. बी.एफ.वापर करून डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ परिक्षेत्र वणी रंभापूर अंतर्गत अकराशे तेरा हेक्टर क्षेत्रावर खरिपातील सोयाबीन पेरणी आटोपून आज पिके बहरली असून, अधिक उत्पादन वाढ होईल व सोयाबीन, तूर, मूग, उडीद पीक फुलणार आहे.

डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ परिक्षेत्र वणी रंभापूर अंतर्गत येणाऱ्या अकराशे तेरा हेक्टर क्षेत्रावर खरिपातील कुलगुरू डॉ. शरद गडाख यांच्या योग्य नियोजन व मार्गदर्शनाखाली डॉ. शिवाजी नागपुरे मुख्य बीज उत्पादन अधिकारी तसेच उप-बीज उत्पादन अधिकारी राजेश झंजाळ यांनी गत काही वर्षांपासून अल्प उत्पन्न व अधिक खर्च यावर पायबंद घालण्यासाठी अधिक उत्पादन वाढ होईल, असे खरिपाच्या हंगामाच्या सुरुवातीला योग्य नियोजन करून पंचसूत्रीचा वापर जांभूळ वाई, बीज प्रक्रिया, पेरणीपूर्व तणनाशके, योग्य बियाणे, पेरणीसोबतच खते नंतर पेरणी लागताच पासवाई असे आधुनिक व शेतीची मशागतीचे योग्य नियोजन करून घेतले. शेती पेरणीयोग्य झाली. दरम्यान, मृग नक्षत्राच्या शेवटच्या आठवड्यात पावसाने हजेरी लावली. दरम्यान, पेरणीलायक पाऊस झाल्याने नवीन तंत्रज्ञानाचा अवलंब करून अकराशे तेरा हेक्टर क्षेत्रावर एक हजार हेक्टरवर सोयाबीन, शंभर हेक्टरवर तूर, उडीद, मूग आदी पिकांची पेरणी अल्पावधीतच आटोपून योग्य देखभालसह पिकांची निगा राखली जात आहे. दरम्यान, विद्यापीठाचे संसोधन संचालक डॉ. माने, तत्कालीन संशोधन संचालक डॉ. विलास खर्चे, उप-संशोधन संचालक बियाणे डॉ. आम्रपाली आखरे, विद्यापीठ नियंत्रण, कटारे व तत्कालीन नियंत्रण अधिकारी पाटील यांचे वेळोवेळी मार्गदर्शन आणि पीक संरक्षण, देखरेखीखाली विविध सेवाभावी संस्था अंतर्गत योग्य पिकांचे रक्षण करणे व इतर शेती कामे सेवाभावी संस्थांना शेती मशागतसह पेरणी नियोजन योग्य होत असल्याने पीक अधिक उत्पादन वाढ होईल, यात शंकाच नाही.

**१८ जुलै रोजी डॉ. पंजाबराव देशमुख विद्यापीठातील कुलगुरू डॉ.शरद गडाख, संसोधन संचालक डॉ. माने यांचा वणी रंभापूर येथील अचानक दौरा झाल्याने त्या दरम्यान विविध पिकांची पाहणी केली असता, पीक पाहून समाधान व्यक्त केले.**

## थोडक्यात

### लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांना अभिवादन

**खामगाव** - लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची जयंती जिल्हाधिकारी कार्यालयात साजरी करण्यात आले. जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांच्या हस्ते लोकमान्य टिळक यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी अपर जिल्हाधिकारी सदाशिव शेलार, निवासी उपजिल्हाधिकारी सुहासिनी गोणेवार यांच्यासह जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनीही लोकमान्य टिळक यांच्या प्रतिमेला पुष्प अर्पण करून अभिवादन केले.

### केंद्रीय राज्यमंत्री जाधव यांनी पंचनामे करण्याचे दिले निर्देश

**लोणार** : खामगाव शिवाजीनगर पोस्टे हद्दीत एका अल्पवयीन मुलीवर शारिरीक अत्याचार झाल्याची घटना काल २२ जुलै २५ रोजी दुपारी १ वाजताच्या सुमारास घडली. या प्रकरणी पोस्टेला झालेल्या तक्रारीवरून अभय प्रभाकर महाले (रा. घाटपुरी) याचे विरूध्द कलम ६४(१), ६५ (१) भान्यासं, सहकलम ३, ४ (१) (२) पोस्को नुसार गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सचिन सरकटे करीत आहे.

### पुलावर साचत असलेल्या पाण्याचा त्रास

**मेहकर** : चिखली मेहकर महामार्गावर लव्हाळा येथील उड्डाणपुलावर ठीक ठिकाणी पाणी साचत असल्या मुळे रस्त्यावरून जाणाऱ्या प्रवाशांना याचा त्रास सहन करावा लागत आहे. तसेच पुलाखाली साचलेल्या पाण्याचा तेथील नागरिकांना खूप मोठा त्रास सहन करावा लागत आहे. याकडे संबंधित विभागाने लवकरात लवकर लक्ष द्यावे अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

### अल्पवयीन मुलीवर शारीरिक अत्याचार

**शेगाव** : तालुक्यातील सांगवा फाटा येथे काल १७ जुलै २५ रोजी दुपारी १ वाजताच्या सुमारास नितेश महादेव सोनोने हा दुचाकी क्र. एमएच २८-बीएक्स ९४२२ ने देशीदारूचे खोके विनापरवाना घेवून जाताना पोलिसांना मिळून आला. त्याच्या जवळून देशीदारूच्या ९० मिलीच्या २०० नग शिश्यांचे दोन खोके (किं. १० हजार) व दुचाकी (किं. ७० हजार) असा एकूण ८० हजाराचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी पीएसआय गजानन शिंदे यांनी शेगाव ग्रामीण पोस्टेला फिर्याद दिली फिर्यादीवरून पोस्टेमध्ये उपरोक्त आरोपीविरुध्द गुन्हा दाखल केला आहे.

### कृषी उत्पन्न बाजार समिती, खामगाव बाजार भाव

| वान | भाव |
|---|---|
| ज्वारी | १६०० - २३२५ |
| गहू | २४५० - २५०० |
| तुर | ३००० - ६६२५ |
| हरभरा | ४४०० - ६०९० |
| सोयाबीन | ३६५० - ४४०० |
| भुईमुग | ५१०० - ५४०० |
| उडीद | ५४०० - ५४०० |
| मूंग | ५३०० - ५३०० |
| तीळ | ७४०० - ७४०० |
| धने | ५६०० - ५६०० |

## हमीभाव खरेदी केंद्रावरील ज्वारीचे बिल काढण्यासाठी शेतकऱ्याकडे मागितली लाच...

# जिल्हा पुरवठा अधिकारी टेकाळे एसीबी कडून चतुर्भुज!

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**बुलडाणा दि.२३** : हमीभाव खरेदी केंद्रावरिल ज्वारी चे बिल काढण्यासाठी व पुढे खरेदी करण्यास कोणतीही अडचण येऊ नये यासाठी शेतकऱ्याकडे ७० हजाराची लाच मागणारा जिल्हा पुरवठा अधिकारी गजानन टेकाळे यास लाच लुचपत प्रतिबंधक विभागाने आज दुपारी सापळा रचून सीताफिने अटक केली. शहर पोलीस स्टेशनमध्ये आरोपी टेकाळे व त्याच्या सहकार्य विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या कारवाईने एकच खळबळ उडाली आहे. जिल्हाधिकारी कार्यालयातील जिल्हा पुरवठा विभाग महत्वाचा विभाग मानला जातो.याच विभागातून स्वस्त धान्य दुकानात धान्याचा पुरवठा देखील केला जातो.येथील जिल्हा पुरवठा अधिकारी गजानन टेकाळे हे एका शेतकऱ्याकडे ज्वारी चे बिल काढण्यासाठी व पुढील सहकार्यासाठी ७० हजाराची लाच मागत होते. तक्रारदार शेतकरी यांनी या बाबत लाच लुचपत विभागाला कळविले.त्यांनी शासनाच्या हमी भाव केंद्रावर ज्वारी विक्री केली आहे. विक्री केलेल्या ज्वारीचे बिल निघण्यास कोणतीही अडचण न येवू देण्यासाठी व त्यांना भविष्यात ज्वारी विक्रीची प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी लोकसेवक हे लाचेची मागणी करीत होते. त्यानुसार एसीबीने आज पडताळणी कार्यवाही आयोजीत केली. त्यावेळी गजानन टेकाळे, व खाजगी ईसम देवानंद खंडाळे यांनी शेतकऱ्याकडे ७०,०००/- रुपये लाचेची मागणी करुन तडजोडअंती ५०,०००/- रूपये स्विकारण्याचे मान्य केले. त्यापैकी पहीला हप्ता २५,०००/- रुपये स्विकारण्यास संमती दर्शविली व उर्वरीत २५,०००/- रुपये ज्वारीचे बिल निघाल्यानंतर स्विकारण्याचे मान्य केले. त्याावरून दि.२३ जुलाई रोजी आयोजीत सापळा कार्यवाही दरम्यान लोकसेवक गजानन टेकाळे यांच्या वतीने खाजगी इसम देवानंद खंडाळे, सेवानिवृत जिल्हा लेखा पर्यवेक्षक यांनी पंचासमक्ष लाचेचा पहीला हप्ता स्विकारतांना त्यास रंगेहात पकडण्यात आले. लोकसेवक व आरोपी खाजगी ईसम यांना ताब्यात घेवुन त्यांचेविरुद्ध लाच मागणी व स्विकारल्याबाबत पोलीस स्टेशन बुलढाणा शहर येथे भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर कार्यवाही भागोजी चोरमले, पोलीस उपअधिक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, बुलढाणा, सापळा पथक पोलीस निरीक्षक रमेश पवार, पोलीस निरीक्षक विलास गुंसीगे, सफौ. शाम भांगे, पोहेकॉ. प्रविण बैरागी, राजेद्र क्षीरसागर, पोना / जगदीश पवार, पोकॉ. रंजित व्यवहारे, शैलेश सोनवणे, गजानन गाल्डे मपोकॉ स्वाती वाणी चानापोकों/ नितीन शेटे ॲन्टी करप्शन ब्युरो, बुलढाणा यांनी पार पाडली. शासकीय लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत ॲन्टी करप्शन ब्युरो बुलढाणा, कार्यालय दुरध्वनी क्रमांक ०७२६२-२४२५४८ व ९५५२५२०१८८ तसेच टोल फि कमांक १०६४ यावर संपर्क साधण्याचे आवाहन पोलीस उपअधिक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, बुलढाणा यांनी केले आहे.

## ढगफुटीसदृश्य पाऊस: नुकसानीची तात्काळ पंचनामे करण्याचे केंद्रीय मंत्री जाधव यांनी दिले निर्देश

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**बुलडाणा दि.२३** : २१ जुलै रोजी बुलढाणा जिल्हयातील ८ मंडळ क्षेत्रामध्ये ढगफुटीसदृश्य पाऊस झाल्यामुळे या मंडळ क्षेत्रामध्ये घरांचे आणि शेतजमिनीचे मोठया प्रमाणात नुकसान झालेले आहे. झालेल्या नुकसानीची तात्काळ पंचनामे करण्याचे निर्देश केंद्रिय मंत्री प्रतापराव जाधव यांनी जिल्हा प्रशासनाला दिले आहे. बुलढाणा जिल्हयातील लोणार तालुक्यातील २१ जुलै ला ढगफुटीसदृश्य पाऊस झाला. या पावसामुळे नदि नाले तुडूंब भरुन वाहु लागले. पावसाचे पाणी घरात शिरल्यामुळे अनेक कुटूंबांच्या घरांचे व घरातील सामानांचे नुकसान झाले आहे. तर शेतजमिनही खरडुन गेले आहे. २१ जुलै ला लोणार येथे १७१.८ मि.मि., टिटवी येथे १५४.५ मि.मि., हिरडव येथे १८४.५ मि.मि., शेगांव तालुक्यातील जवळा १७७.३ मि.मि., खामगांव तालुक्यातील पळशी येथे १५१ मि.मि. पावसाची नोंद २१ जुलै च्या मध्यरात्री झाली आहे. त्यामुळे या मंडळ क्षेत्रामध्ये शेतजमिनीचे आणि घरांचे मोठया प्रमाणात नुकसान झाले आहे. या शेतजमिनीचे कृषी विभाग, महसुल विभाग आणि पिक विमा कंपनीच्या प्रतिनिधी समवेत तात्काळ पंचनामे करण्यासंदर्भात आपल्या स्तरावरुन संबधित विभागांना निर्देशित कराव्यात अशा सुचना जिल्हाधिकारी बुलढाणा यांना देण्यात आल्या आहे.

## मल्हार सेनेच्या जिल्हाप्रमुखपदी सुनिल मतकर तर महासंघाच्या जिल्हाध्यक्षपदी कडूबा गवारे

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**दे.राजा दि.२३** : धनगर समाजाच्या विविध प्रश्नासाठी गेल्या २० वर्षापासून शासकीय दरबारी लढा देत रस्त्यावर उतरून त्यांना न्याय देणारी अशी ओळख असणाऱ्या धनगर समाज महासंघाच्या मल्हार सेनेच्या घाटावरील जिल्हाप्रमुखपदी सुनिल मतकर तर महासंघाच्या जिल्हाध्यक्षपदी कडूबा गवारे यांची निवड करण्यात आली आहे.

चिखली येथे झालेल्या जिल्हा बैठकीत धनगर समाज महासंघाचे माजी प्रदेशाध्यक्ष श्रीराम पुंडे महिला संघाच्या प्रदेशाध्यक्ष डॉ.अलका गोडे माजी आमदार नानाभाऊ कोकरे यांच्या उपस्थिती मध्ये घाटावरील मल्हार सेनेचे जिल्हाप्रमुख पदी सुनिल मतकर तर महासंघाच्या जिल्हाध्यक्षपदी कडुबा गवारे यांची निवड करण्याचा निर्णय घेण्यात आला.या प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रदेशाध्यक्ष श्रीराम पुंडे तर प्रमुख उपस्थिती माजी आ. नानाभाऊ कोकरे विदर्भ अध्यक्ष शरद वसतकार अशोक देवकाते, महिला प्रदेशाध्यक्ष डॉ.सौ.अलकाताई गोडे,मनोहर पाचपोर,मुरलीधर लांभाडे दिलीप गवारे शिवलाल बोंद्रे प्रविण सरदड, रमेश देढे यांची प्रमुख उपस्थिती होती.

## ढगफुटीसारखा पाऊस; आ.खरात यांनी पाहणी केली

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**मेहकर दि.२२** : मुसळधार पावसाने बाधित झालेल्या गावाच्या भेटीदरम्यान, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) आमदार सिद्धार्थ खरात यांनी मंगळवारी मुसळधार पावसाने बाधित झालेल्या गावांना भेट दिली आणि पाहणी दौरा केला आणि प्रशासनाला तात्काळ सर्वेक्षण करण्याचे निर्देश दिले.

२१ जुलैच्या रात्री लोणार तालुक्यात मुसळधार पाऊस पडला, ज्यामुळे बागुलखेड, धाड, दाभा, गुंज, हिरडव, आरडव, गुंधा, टिटवी, धाड इत्यादी गावांना फटका बसला. पिके आणि फळबागांनाही फटका बसला. काही ठिकाणी जमिनीची धूपही झाली. शिवसेना आमदार सिद्धार्थ खरात यांनी २२ जुलै रोजी या सर्व गावांना तातडीने भेट देऊन नुकसानग्रस्त भागांची पाहणी केली आणि प्रशासनाला तातडीने सर्वेक्षण करण्याचे निर्देश दिले.

देऊळगाव कुंडपाल येथील धरण फुटल्याची माहिती ग्रामस्थांनी आमदार सिद्धार्थ खरात यांना दिली. त्यांनी तात्काळ पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांना भेगा दुरुस्त करण्याचे निर्देश दिले.

यावेळी उपविभागीय महसूल अधिकारी, तहसीलदार लोणार, नायब तहसीलदार, मंडळ अधिकारी, तलाठी, सहाय्यक कृषी अधिकारी, ग्रामसेवक, तसेच शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे लोणार तालुकाध्यक्ष राजूभाऊ बुधवत, सदानंद तेजनकर, कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी संचालक विजयराव पवार, कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी संचालक डॉ. स्वप्नील हाडे, गोपाळ खोतकर, युवासेना तालुका प्रमुख जीवन घायाळ, पंढरी सुलताने, बंडू सुलताने, यांच्यासह गजानन सुलताने, रवी हाडे, दत्ता हाडे, श्रीकांत हाडे आदी उपस्थित होते.

## लोकमान्य टिळक जयंतीनिमित्त देशभक्तीचा संदेश देणारा कार्यक्रम

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**शेगाव दि.२३** :स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळवणारच'' या प्रखर देशभक्तीचा संदेश देणाऱ्या महान क्रांतिकारक आणि लोकशिक्षक लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या जयंतीनिमित्त आज शेगाव येथे अखिल भारतीय ब्राह्मण महासंघाच्या वतीने एक भव्य अभिवादन कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

हा कार्यक्रम बुधवार २३ जुलै रोजी सकाळी १० वाजता शेगाव येथील मेन रोडवरील लोकमान्य टिळक टी पॉइंट चौक - हिंदुस्तान सोडा फॅक्टरी समोर पार पडला. कार्यक्रमस्थळी लोकमान्य टिळक यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.या अभिमानास्पद कार्यक्रमाला शेगाव नगरपालिकेचे माजी नगराध्यक्ष शरदसेठ अग्रवाल, भा ज पा शेगाव शहर अध्यक्ष ज्ञानेश्वर साखरे, माजी नगरसेवक प्रदीप सांगळे, माजी पाणीपुरवठा सभापती व नगरसेवक पवन महाराज शर्मा, काँग्रेस शहराध्यक्ष कैलास देशमुख, ज्येष्ठ पत्रकार अनिलभाऊ उंबरकार (डिजिटल मीडिया परिषद महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष), शेगाव तालुका पत्रकार संघ अध्यक्ष नंदुभाऊ कुळकर्णी, भाजयुमो शहराध्यक्ष व मराठा महासंघ युवक आघाडी जिल्हाध्यक्ष सचिन ढमाळ, पत्रकार संघ कार्याध्यक्ष राजकुमार व्यास, उपाध्यक्ष संजय त्रिवेदी, भाजप शहर सरचिटणीस दीपक शर्मा, अ. भा. ब्राह्मण महासंघ शहराध्यक्ष विजय जगधन, महिला आघाडी शहराध्यक्ष सौ. अंजलीताई जोशी यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

तसेच राजुभिसे, राजेश शितुत, पंकज देशपांडे, कृष्णाली देशपांडे, रुद्र देशपांडे, रवी थोडगे, दत्ता भोंडेकर, गोपाल शर्मा यांसह ब्राह्मण समाजातील तसेच शहरातील इतर समाजातील विविध क्षेत्रातील मान्यवर, राजकीय पदाधिकारी, सामाजिक कार्यकर्ते आणि युवक मोठ्या संख्येने सहभागी झाले.

कार्यक्रमाचे आयोजन अखिल भारतीय ब्राह्मण महासंघ शेगाव शहर शाखेच्या वतीने करण्यात आले. या कार्यक्रमामुळे नव्या पिढीला लोकमान्य टिळकांच्या विचारांचे स्मरण होऊन, यांच्याप्रती आदरभाव व्यक्त झाला.

## अतिवृष्टीने झालेल्या नुकसानीची संजय रायमुलकर यांनी केली पाहणी

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**लोणार दि.२३** : दि.२२ जुलै रोजी लोणार तालुक्यात झालेल्या ढगफुटी सदृश अतिवृष्टीमुळे खूप मोठ्या प्रमाणावर पिकांची व जमिनीची हानी झालेली आहे. माजी आमदार संजय रायमुलकर यांनी आज तालुक्यातील वडगावतेजन ,शारा, देऊळगाव कुंडपाळ, धाड यासह बारा गावांच्या नुकसानग्रस्त भागांची पाहणी केली. बाधित शेतकऱ्यांसोबत चर्चा करून त्यांना दिलासा दिला व शासनाकडून निश्चितपणे मदत मिळवून दिली जाईल, असे त्यांनी सांगितले.

काल झालेल्या अतिवृष्टीमुळे लोणार तालुक्यातील अनेक गावातील नदी नाल्यांकाठची जमीन पुरामुळे खरडून गेले अनेक शेतांमध्ये तलावा सारखे पाणी साचून राहिले आहे यामुळे उगवून आलेल्या पिकांचे नुकसान झाले आहे. बऱ्याच ठिकाणी घर पडली आहेत. तालुक्यातील सर्व परिमंडळांमध्ये अतिवृष्टी झालेली आहे. वडगावतेजन, शारा ,देऊळगाव कुंडपाळ येथे अति पावसामुळे झालेल्या नुकसानीची संजय रायमुलकर यांनी पाहणी केली. देऊळगाव कुंडपाळ येथे सिंचन प्रकल्पाच्या मुख्य भिंतीला भगदाड पडल्यामुळे शेतीचे जास्त नुकसान झाले. कालच याबाबत माहिती मिळताच गावाला धोका आहे. म्हणून सिंचन विभागाच्या उपविभागीय अभियंता यांना घटनास्थळी जाऊन मदत कार्य आणि भिंतीची व सांडव्याची दुरुस्ती करण्याबाबत संजय रायमुलकर यांनी सांगितले होते. त्याप्रमाणे यंत्रसामुग्रीसह अभियंते त्वरित कामाला लागले. गावकऱ्यांना इतरत्र सुरक्षित स्थळी हलवण्यासाठी एस टी बस गाड्या बोलविण्यात आल्या होत्या.

तहसीलदार भूषण पाटील, गटविकास अधिकारी उमेश देशमुख, कृषी विभागाचे अधिकारी कावरखे यांच्याशी भ्रमणध्वनीवरून चर्चा करून सर्वेक्षणाच्या कामाला गती देण्याबाबत रायमुलकर यांनी सांगितले. हुमणी अळीचा प्रादुर्भाव अनेक ठिकाणी झाल्यामुळे शेतकरी त्रस्त आहेत. त्याचीही पाहणी करण्यात आली. कृषी विभागाने याबाबत तातडीने सर्वेक्षण करून नुकसानीची पाहणी करावी, अशी सूचनाही संजय रायमुलकर यांनी केली.

शिवसेनेचे जिल्हाप्रमुख बळीराम मापारी, शहर प्रमुख पांडुरंग सरकटे, शिव पाटील तेजनकर, सानप, राजूभाऊ काटे, राजीव तांबिले, गजानन मापारी , गणेश डव्हळे, शैलेश सरकटे, भागवत डव्हळे, शिवाजी सांगळे, विष्णू ढाकणे, प्रदीप जुमडे, बबन जुमडे ,जीवन सांगळे, नागेश सांगळे, श्रीराम दराडे आदींसह इतर पदाधिकारी यावेळी उपस्थित होते.

## खामगाव पंचायत समिती टॉवरवरिल घड्याळाचे ठोके झाले सुरू!

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी




**खामगाव दि.२३** : खामगाव शहरातील ऐतिहासिक आणि ओळख निर्माण करणाऱ्या पंचायत समिती टॉवरवरील घड्याळाचे ठोके अखेर पुन्हा सुरू करण्यात आले आहेत. गेल्या काही वर्षांपासून बंद पडलेल्या या घड्याळामुळे शहराच्या सौंदर्यात आणि ओळखीत घट झाली होती. मात्र स्थानिक प्रशासनाच्या प्रयतांमुळे आणि नागरिकांच्या मागणीनंतर हे घड्याळ पुन्हा कार्यरत झाले असून, त्याचे ठोके आता वेळेची अचूकता सांगत आहेत.

पंचायत समिती कार्यालयाच्या इमारतीवर उभारलेला हा घड्याळ टॉवर अनेक दशकांपासून शहराच्या इतिहासाचा भाग राहिला आहे. या ठिकाणी बसवलेले यांत्रिक घड्याळ पूर्वी दर तासाला ठोके मारत होते, जे शहरवासीयांना वेळेची जाणीव करून देत होते. मात्र देखभाल अभावी काही वर्षांपूर्वी हे घड्याळ बंद पडले होते. परिणामी अनेकांनी याची दुरुस्ती करण्याची मागणी वेळोवेळी केली होती.

अखेर पंचायत समिती प्रशासनाने याकडे लक्ष देत तांत्रिक तज्ञांच्या साहाय्याने घड्याळाचे पुन्हा जतन व दुरुस्तीचे काम हाती घेतले. काही दिवसांच्या कामानंतर हे घड्याळ पुन्हा पूर्ववत सुरू करण्यात आले. यावेळी टॉवरच्या रंगरंगोटीचे कामही करण्यात आले असून, संपूर्ण इमारत आकर्षक दिसत आहे. या घड्याळाच्या ठोक्यांमुळे अनेक ज्येष्ठ नागरिकांनी जुन्या आठवणींना उजाळा दिला.

काहींनी सांगितले की, ''पूर्वी हे घड्याळ आमच्या दिनचर्येचा भाग होतं. त्याच्या ठोक्यांवर आम्ही वेळ ठरवत असू. आता पुन्हा ते सुरू झाल्याने मन आनंदित झालं आहे.'' या कार्याबद्दल स्थानिक नागरिकांनी पंचायत समितीचे आभार मानले असून, शहराच्या सांस्कृतिक आणि ऐतिहासिक वारशाचे संवर्धन झाल्याचा आनंद व्यक्त केला आहे.

अजिंक्य भारत
# आपलं अमरावती
गुरूवार, दि. २४ जुलै २०२५

डॉ. पांडेस् मेड. रेमेडीज (OPC) प्रा.ली.
डॉ. रविराज पांडे (एम.डी.)
वात, दमा, अस्थमा, वजन वाढविणे, कमी करणे, त्वचा रोग, वंधत्व, लैंगिक समस्या, स्त्री रोग, सर्व प्रकारच्या व इतर रोगांवर उपचार व मार्गदर्शन केल्या जाईल.
व्यंकटेश कॉलनी, शंकरनगर जवळ, अमरावती. ( दर सोमवारी )
C/o राईकवार हॉस्पिटल जयस्तंभ चौक परतवाहा ( दर महिन्याचा 3 रा. शनिवार )
C/o महाराष्ट्र मेडिकल बनोसा रोड, दर्यापूर ( दर महिन्याचा 2 रा. गुरुवार )
वेळ : दुपारी 2 ते सायंकाळी 7 वाजेपर्यंत
मो. 9890043911, 9372151186

## थोडक्यात

### श्रेयस इंगळेंची अमरावती विधानसभा अध्यक्षपदी निवड

**अमरावती :** शिवसेना युवासेनेत अमरावती विधानसभा क्षेत्रासाठी श्रेयस इंगळे यांची विधानसभा अध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. जिल्हाध्यक्ष प्रमुख राम पाटील यांच्या स्वाक्षरीने जारी करण्यात आलेल्या पत्राद्वारे ही नियुक्ती जाहीर करण्यात आली.



श्रेयस इंगळे यांची विधानसभा अध्यक्षपदी नियुक्ती झाल्यानंतर कार्यकर्त्यांकडून त्यांचे स्वागत करण्यात येत असून, युवासेनेचे संघटन अधिक मजबूत करण्यासाठी ते प्रयत्नशील राहतील, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.

### लग्नाचे आमिष देत युवतीचे लैंगिक शोषण

**परतवाडा :** ओळखीचे रुपांतर प्रेमात झालेल्या युवकाने लग्नाचे आमिष देत युवतीचे मागील सहा महिन्यांपासून लैंगिक शोषण केले. दरम्यान त्याने तुझ्याकडून जे होते ते करून घे, अशी धमकी युवतीला दिली. तिने परतवाडा पोलिसात तक्रार दिली.

### लोखंडी रॉडने एकाला मारहाण

**वरुड :** दुचाकीने शेतात जात असताना पेट्रोल संपल्याने संतापाच्या भरात बडबड करणाऱ्याला दुसऱ्याने शिवीगाळ करीत लोखंडी रॉडने मारहाण केली. शेतात भेट तुला जीवे मारतो असी धमकीही दिली. याबाबत नेरंद्र कृष्णराव घाटोळे (४८) यांनी दिलेल्या तक्रारीवरून वरुड पोलिसांनी राजु रामचंद्र तिवसकी याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला.

### हिस्याच्या वादातून दाम्पत्यावर सत्तुरने हल्ला

**वरुड :** शेताच्या हिस्से वाटणीचया वादातून एकाने दाम्पत्यावर सत्तुरने हल्ला चढवत जखमी केल्याची घटना जरुड येथे घडली. याबाबत जखमी कृष्णा उर्फ किसना नामदेवराव वसुले (५४) यांनी दिलेल्या तक्रारीवरून गुन्हा नोंदवला.

### सावत्र आईला जीवे मारण्याची धमकी

**चांदूर बाजार :** सावत्र आई व मुलांमध्ये घराची वाटणी झाली झाली. दरम्यान दोघांच्या मध्ये टिन टाकण्यावरून झालेल्या वादात दोन मुलांनी सावत्र आईला जीवे मारण्याची धमकी देत लोखंडी पाईपने मारहाण करीत जखमी केले.

# दर्यापूर संत गाडगेबाबा सूतगिरणीचा मार्ग मोकळा!

## मंत्रीस्तरीय बैठकीत आ. रवी राणा यांचा आक्रमक पवित्रा; बँकेचे व्याज शून्य करण्याची मागणी

अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**अमरावती, दि. २३ :** दर्यापूर येथील संत गाडगेबाबा सहकारी सूतगिरणीच्या पुनरुज्जीवनासाठी बुधवारी दि. 23 जुलै मंत्रालय, मुंबई येथे मंत्रीस्तरीय बैठक संपन्न झाली. वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीत आमदार रवी राणा, राज्यसभा खासदार डॉ. अनिल बोंडे आणि आमदार प्रकाश पाटील भारसाकळे यांनी सूतगिरणी सुरू करण्यासाठी जोरदार पाठपुरावा केला.





बैठकीत आ. रवी राणा यांनी बँकेने आकारलेले व्याजदर चुकीचे असल्याचे ठणकावून सांगत, सूतगिरणीची मालमत्ता शासनाची आहे. त्यामुळे बँकेने व्याजदर शून्य करावा. शासनाने पूर्वीच बँकेला रक्कम अदा केली आहे, केवळ व्याज आकारणी ही बेकायदेशीर आहे, अशी ठाम भूमिका मांडली. आमदार प्रकाश भारसाकळे यांनीही आक्रमक पवित्रा घेत आपली मते मांडली.

बैठकीत वस्त्रोद्योग, सहकार आणि पणन विभागाचे प्रधान सचिव अंशू सिन्हा, उपसचिव पवार, राज्य को-ऑप. बँक नागपूरचे मुख्य व्यवस्थापक आणि अन्य वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. मंत्री सावकारे यांनी, बँकेचे प्रमुख अधिकारी यांना बोलावून थकबाकीबाबत विषयवार निर्णय घेण्यात येईल आणि सूतगिरणी पुन्हा सुरू करण्यासाठी ठोस पावले उचलली जातील, असे आश्वासन दिले.विधान परिषद सदस्य आ. संजय खोडके, आमदार लवटे यांनीही या बैठकीत आपले मुद्दे मांडले. बैठकीतून सूतगिरणी लवकर सुरू होण्याची आशा निर्माण झाली असून कामगार आणि नागरिकांमध्ये उत्सुकता आहे. दर्यापूर तालुक्यातील नागरिकांनी या प्रयत्नांसाठी आमदार आणि खासदारांचे आभार मानले आहेत.

### शेकडो कामगार बेरोजगार

दर्यापूर तालुक्यातील ही सूतगिरणी अनेक वर्षांपासून बंद अवस्थेत आहे. त्यामुळे शेकडो कामगार बेरोजगार झाले असून स्थानिक अर्थव्यवस्थेला मोठा फटका बसला आहे. शेतकरी वर्गालाही याचा मोठा परिणाम सहन करावा लागला आहे.

# जल जीवन मिशनमधून लाखो कुटुंबांची तृप्ती

## १५८२ गावांत नळजोडणी

अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**अमरावती, दि. २३ :** जिल्ह्यातील प्रत्येक कुटुंबास जल जीवन मिशनअंतर्गत प्रतिदिन प्रतिव्यक्ती ५५ लिटरप्रमाणे पाणीपुरवठा केला जाणार आहे. वाड्या, वस्त्यांवर थेट नळाद्वारे पाणीपुरवठा केला जाणार आहे. यामध्ये जिल्हाभरातील चार लाख ४५ हजार ३६ कुटुंबांची तृप्ती होणार आहे. आतापर्यंत तीन लाख ५० हजार सात एवढ्या कुटुंबांना नळजोडणी दिली आहे.ग्रामीण भागात पाणीपुरवठ्यासाठी जिल्ह्यातील ६६१ गावांमध्ये योजना राबविण्यात येत आहे. आतापर्यंत २४ गावांमध्ये योजना पूर्ण झाली आहे. याशिवाय



जिल्ह्यातील चार लाख ४५ हजार ११० कुटुंबातील व्यक्तींची या उपक्रमामुळे तहान भागली जाणार आहे. जिल्ह्यातील ६६१ गावांत यासाठी ६६१ ठिकाणच्या कामांसाठी २५८ कोटी ४२ लाख रुपयांचे अंदाजपत्रक करण्यात आले. आहे पैकी ६९१ कामांना प्रशासकीय मान्यता देऊन टेंडर काढण्यात आले आहे. या कामांपैकी ६५८ कामांच्या वर्कऑर्डर देण्यात आली आहे. २४ योजनेचे काम पूर्ण झाले आहे. योजना पूर्ण झालेल्या गावात प्रतिव्यक्ती प्रतिदिनी ५५ लिटरप्रमाणे थेट नळाद्वारे पाणीपुरवठा सुरू आहे. ह्यजल जीवनह्लमधून सुरू असणारी कामे वेळेत पूर्ण होण्यासाठी नियोजन केले आहे तसेच सर्व कामे गुणवत्तेची आणि दजेर्दार होण्यासाठी विविध उपाययोजना केल्या आहेत. कामाची तपासणी करून देयके दिली जात आहे. कामाचा दर्जा ढासळल्याचे निदर्शनास आल्यास संबंधितांवर कारवाई केली जाणार आहे.

### नळजोडणीची कामे ८७ टक्के

२०२५ पर्यंत सर्व घरांना नळाने पाणी देण्याचे शासनाने उद्दिष्ट आहे. त्यानुसार ह्यहर घर नल, हर घर जलह्ल उपक्रम सुरू करण्यात आला आहे. या योजनेंतर्गत या भागातील ह्यजल जीवन मिशनअंतर्गतह्ल या नळाद्वारे पिण्याचे पाणी मिळावे, यासाठी जिल्ह्यात जलजीवन मिशन कार्यक्रम सुरू आहे. या उपक्रमांतर्गत आतापर्यंत चार लाख ४५ हजार ११० कुटुंबापैकी तीन लाख ५० हजार सात कुटुंबांना नळजोडणी दिलेली आहे तर ९५ हजार १०३ कुटुंबांना नळजोडणी देण्याचे काम सुरू आहे.

### तालुकानिहाय नळजोडणीची संख्या

अचलपूर ४३,९१४, अमरावती ३६,८८७, अंजनगाव सुर्जी २६,४७८ भातकुली २४,८५०, चांदूर बाजार ३९,९४५, चांदूर रेल्वे १८,८८२, चिखलदरा ३१,२८७, दर्यापूर ३९०६७, धामणगाव रेल्वे २८,२२०, धारणी ३२,०२९, मोर्शी ३५,०४४, नांदगाव खंडेश्वर २६६७४, तिवसा २३,३२१, वरूड ३८,७३८

# पोलिस वाहनाच्या अपघातात कर्मचारी ठार, तीन जखमी

अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**अमरावती, दि. २३ :** चोरीच्या गुन्ह्याच्या तपासात असणाऱ्या ग्रामीण सायबर सेलच्या वाहनाला अपघात झाला. बासलापूर ते चिरोडी मार्गावर घडलेल्या या अपघातात मोहन सयाम या जवानाचा मृत्यू झाला असून तीन जवान गंभीर जखमी झाले आहेत.

चांदूररेल्वे पोलीस ठाण्याच्या हद्दीत एका चोरीच्या घटनेच्या तपासासाठी एमएच २७/एए ०६३८ क्रमांकाच्या शासकीय वाहनातून ग्रामीण तपास पूर्ण करून अमरावतीकडे परतत असताना, बासलापूर व चिरोडीच्या दरम्यान वाहनाने नियंत्रण गमावले आणि अपघात घडला. सायबर सेलचे पथक घटनास्थळी गेले होते.

वासालापूर- चिरोडी मार्गावरील अपघाताची माहिती मिळताच चांदूर रेल्वे पोलीस स्टेशनचे पथक तातडीने घटनास्थळी पोहोचले. त्यांनी सर्व जखमी जवानांना उपचारासाठी खळबळ जखमींची प्रकृती गंभीर असल्याने रुग्णालयात दाखल केले. त्यांना पुढील उपचारासाठी खासगी रुग्णालयात हलवण्यात आले. मात्र उपचारादरम्यान मोहन सयाम याचा मृत्यू झाला. दरम्यान, अपघातग्रस्त वाहन चांदूर रेल्वे पोलिस ठाण्यात आणण्यात आले आहे. अपघात नेमका कसा घडला, याची माहिती अद्याप स्पष्ट झालेली नाही. अपघाताची माहिती मिळताच अमरावतीहून काही पोलीस अधिकारी व कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले होते. या घटनेमुळे ग्रामीण पोलीस दलात हळहळ आणि खळबळ उडाली आहे.

# वेलकम प्वॉईंट चौकात एमडी ड्रग्ज जप्त

अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**अमरावती, दि. २३ :** शहरात गेल्या काही दिवसांपासून एमडी ड्रग्जची मोठ्या प्रमाणात तस्कारी केल्या जात आहे. या आधी सुद्धा गुन्हे शाखेच्या पोलिसांनी कारवाई केली. बुधवारी वेलकम प्वॉईंट चौकात एमडी ड्रग्ज घेवून येत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यावरून आरोपीला ताब्यात घेतले व त्याच्या कडून ११० ग्राम एमडी ड्रग्ज जब्त केले आहे.



आरोपी सैयद जमीर उर्फ मंजू सैयद नूद (२२,रा. तालाबपूरा) हा गेल्या काही दिवसापासून एमडी ड्रग्जची विक्री करीत होता. याबाबत गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक संदीप चव्हाण यांना माहिती मिळाली होती.

गुन्हे शाखेच्या पथकाने वेलकम प्वॉईंट चौकात सापडा रचून आरोपी अतिक बेग अनीज बेग रा. तालाबपूरा व मोहम्मद रिजवान अब्दुल गनी रा. अकबरनगर यांना ताब्यात घेतले. आरोपी यांच्या कडून ११० ग्राम एमडी ड्रग्ज जब्त केले आहे. आरोपींनी सैयद जमीर उर्फ सैयद नूर याच्याकडून हे ड्रग्ज खरीदी केल्याची आरोपींनी पोलिसांना सांगितले. या प्रकरणी पोलिस आरोपीची कसून चौकशी करीत आहे. हे एमडी ड्रग्ज कुठून आणले जातात याची पण चौकशी करीत आहे.

# दर्यापूर तहसील कार्यालय नवीन इमारतीत स्थलांतरीत

## शिवसेना युवासेनेच्या मागणीला यश

अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**दर्यापूर, दि. २३ :** तालुक्यातील दर्यापूर येथील प्रशासकीय सुसज्य अशी इमारत वास्तू बांधून बरेच दिवासापासून तयार होती. सदर नवीन इमारतमध्ये लोकसभा विधानसभा निवडणुकीचे सर्व कार्यक्रम या तहसील कार्यालयातून इमारत मधून पार पाडण्यात आले. तहसील कार्यालय नवीन इमारत मध्ये स्थलांतरीत करण्यात यावे कारण तालुक्यातील शेतकरी, विध्यार्थाना कामगार विविध योजना धारक लोकांना उपविभागीय अधिकारी कार्यालय ते जुनी तहसील कार्यालात सारख्या चकरा माराव्या लागत होत्या. वृत्त पत्रात प्रसारित झालेल्या बातम्या तसेच शिवसेना, युवासेनेच्या वतीने निवेदनाद्वारे मागणी करीत तहसील कार्यालय नवीन इमारतमध्ये स्थलांतरीत करण्यात यावे याबाबत उपविभागीय अधिकारी राजेश्वर हांडे, तहसीलदार रविंद्रकुमार कानडजे, कार्यकारी अभियंता देवेंद्र अडचुले यांच्या सोबत शिवसेना, युवासेनाच्या वतीने जिल्हा समन्वयक प्रदीप वडतकर आणि युवासेना जिल्हाप्रमुख अंकुश पाटील



कावडकर यांनी नवीन इमारतमध्ये स्थलांतरीत करण्याबाबत विविध समस्याबाबत सारासार चर्चा केली. चर्चे दरम्यान तालुक्यातील सर्व सामान्य जनतेला होणाऱ्या त्रासापासून मुक्त करण्यात यावे हा प्रश्न सोडविण्याबाबत आग्रही भूमिका शिवसेना, युवासेनाच्या वतीने घेतल्याने तहसील कार्यालय नवीन इमारतमध्ये स्थलांतरीत करण्यात आहे. शिवसेना जिल्हा समन्वयक प्रदीप वडतकर , युवासेना जिल्हाप्रमुख अंकुश पाटील कावडकर यांनी प्रसार माध्यमांशी बोलतांना माहिती दिली.

# पिंपरी-थुंगाव परिसरात जंगली प्राण्यांचा हैदोस

## शेतकरी हवालदिल, जंगली प्राण्यांच्या उपद्रवामुळे आत्महत्येची भीती, शासन जागे होईल का ?

अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**चांदूरबाजार, दि. २३ :** चांदूरबाजार तालुक्यातील पिंपरी आणि थुंगाव या गावांच्या शिवारात जंगली प्राण्यांनी अक्षरशः धुमाकूळ घातला आहे. रानडुक्कर, हरिण, रोही आणि इतर वन्य प्राण्यांच्या कळपांमुळे मोठ्या प्रमाणावर पिकांचे नुकसान झाले असून शेतकरी प्रचंड आर्थिक संकटात सापडले आहेत.

गेल्या काही दिवसांपासून रात्रीच्या वेळी हे प्राणी शेतात घुसून पिकांची नासधूस करत आहेत. संत्री, सोयाबीन, ज्वारी,



तुर, कापूस आणि भाजीपाला यांसारख्या पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. काही शेतकऱ्यांची शेतात तर एकही पीक शिल्लक राहिलेले नाही, अशी परिस्थिती आहे.

### रात्रंदिवस राखण, पण फायदा शून्य

शेतकऱ्यांनी विविध उपाययोजना करून पाहिल्या, रात्री जागून पिकांना राखण करण्याचाही प्रयत्न केला, मात्र जंगली प्राण्यांचा उपद्रव कमी झालेला नाही. दिवसाही हे प्राणी शेतात बिनधास्तपणे फिरताना दिसत असल्याने शेतकरी मेटाकुटीला आले आहेत.

### लाखो रुपयांचे नुकसान, आत्महत्येची भीती

या उपद्रवामुळे शेतकऱ्यांचे लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे. यामुळे बळीराजावर मोठे आर्थिक संकट कोसळले असून, शासनाने तातडीने जंगली प्राण्यांचा बंदोबस्त करावा आणि नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना योग्य नुकसानभरपाई द्यावी, अन्यथा आत्महत्येशिवाय पर्याय राहणार नाही, अशी भीती अनेक शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे.



# अजिंक्य भारत

# आपलं अमरावती

२

गुरूवार, दि. २४ जुलै २०२५


## थोडक्यात

### अपघातात विद्यार्थिनीसह दोघे जखमी

**अमरावती:** शहरात गेल्या दोन दिवसात झालेल्या दोन वेगवेगळ्या अपघातात एका विद्यार्थीनीसह एक नोकदार जखमी झाला. या घटना नांदगाव पेठ व गाडगे नगर पोलीस ठाण्यांतर्गत घडल्या. विशेष म्हणजे अपघातास कारणीभूत वाहन चालक घटना घडताच घटनास्थळावरून पळून गेले. नांदगाव पेठ पोलीस ठाण्यांतर्गत घडलेल्या घटनेत फिर्यादी राजु वासुदेव आठवले (५३, रा. योगीराज नगर, तपोवन) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, या अपघातात जखमी झालेले स्वप्निल चंद्रकांत पाटील (३७, रा. नवी वस्ती, बडनेरा) हे मागील दहा वर्षांपासून एमआयडीसीमध्ये कर्मचारी ने-आण करण्याचे काम करतात. घटनेच्या वेळी ते पोदार स्कूलसमोरून त्यांच्या वाहनाने (एमएच २७-बीएक्स ०९९९) यू टर्न घेत होते. त्याच वेळी मागून आलेल्या भरधाव पिकअप वाहनाने (एमएच २७-डीटी ०७४७) त्यांच्या वाहनाला धडक दिली. त्यात त्यांच्या हाताला दुखापत झाली. अपघातानंतर वाहन चालकाने घटनास्थळावरून पळ काढला. नांदगाव पेठ पोलिसांनी बोलेरो पिक अप वाहन चालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला.

### पत्नीचा छळ करणाऱ्या पतीविरुद्ध गुन्हा दाखल

**अमरावती :** सतत दारू पिवून काहीही कारण नसताना पत्नीला अश्लिल भाषेत शिवीगाळ करून बेदम मारहाण करणाऱ्या तसेच तिचा शारीरिक व मानसिक छळ करणाऱ्या पतीविरुद्ध पत्नीच्या तक्रारीवरून फ्रेजरपुरा पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला. निखिल मदन थुलकर (३३, रा. शताब्दी नगर, नागपूर) असे गुन्हा दाखल झालेल्या पतीचे नाव आहे.

### पैशाची मागणी करून युवकाला मारहाण

**अमरावती :** गेल्या वर्षी तू पोलिसात रिपोर्ट का दिला, असे म्हणत दोघांनी युवकाला मारहाण करीत जखमी केले. सोबतच २ हजार रुपयांची मागणी केली. त्याने पैसे देण्यास नकार देतात. त्याला चाकू दाखवत पैसे न दिल्यास जीवे मारण्याची धमकी दिली. ही घटना साईनगर परिसरात घडली. याबाबत जखमीचे वडील सतीश मारोतराव नाईक (५२, रा. साने गुरूजी नगर) यांनी दिलेल्या तक्रारीवरून बडनेरा पोलिसांनी प्रणव प्रकाश कुमावत (२०) व ओम पानंगे (२०) या दोघांविरुद्ध गुन्हा नोंदवला

### देशी दारू विक्रेत्यावर कारवाई

**अमरावती :** नांदगाव पेठ व गाडगे नगर पोलिसांनी केलेल्या दोन वेगवेगळ्या कारवायांमध्ये एकूण १ हजार ७६० रुपये किंमतीच्या ४५ देशी दारूच्या पावट्या जप्त करण्यात आल्या. या प्रकरणी नांदगाव पेठ पोलिसांनी कुलदीप विजय राऊत (३६) याच्यावर कठोरा गावाजवळ कारवाई करीत एकूण ९६० रुपयांची, तर गाडगे नगर पोलिसांनी शेगाव मनपा शाळेजवळ सुरेंद्र उर्फ जनार्दन बापुराव जांभुळकर (५२) याच्यावर कारवाई करीत त्याच्या ताब्यातून ८०० रुपयांची देशी दारू जप्त केली.

# रस्ते विकास योजनेला केवळ १३६.८५ कोटी

## खा. वानखडे यांच्या अतारांकीत प्रश्नावर ग्रामीण राज्यमंत्री पासवान यांची माहिती

अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**अमरावती दि.२२ :** देशाच्या विकास प्रक्रीयेमध्ये ग्रामीण विकास महत्वपुर्ण असतो. देशाच्या विकासाला गती देण्याकरीता केंद्र शासनाच्या ग्रामीण विकास मंत्रालयाद्वारे विकास निधीची पूर्तता प्रत्येक राज्याला होत असते. महाराष्ट्रासाठी सदर निधीची पूर्तता करण्यात आली आहे. मागील तीन वर्षांमध्ये राज्य शासनाने प्रत्येक जिल्ह्याला प्रधानमंत्री ग्रामीण सडक योजनेअंतर्गत निधी वाटप केले आहे. याबाबत खा. बळवंत वानखडे यांनी लोकसभेत अतारांकीत प्रश्नाद्वारे जिल्ह्यातील ग्रामीण रस्ते विकासाबाबत व निधीची माहिती घेतली.

खा. बळवंत वानखडे यांनी २२ जुलै रोजी लोकसभेत एक अतारांकीत प्रश्न उपस्थित केला, ग्रामीण विकास राज्यमंत्री कमलेश पासवान यांना प्रधानमंत्री ग्रामीण सडक योजनेअंतर्गत महाराष्ट्र राज्यातील जिल्हा निहाय निधी वाटप बाबत माहितीपर प्रश्न विचारला. ज्यामध्ये गेल्या तीन वर्षात आणि चालू वर्षात प्रधानमंत्री ग्राम सडक योजना अंतर्गत रस्ते बांधकामासाठी वाटप केलेल्या आणि वापरलेल्या रकमेचा जिल्हावार तपशील, पी. एम. जी. एस. वाय. अंतर्गत रस्त्यांचे बांधकाम पूर्ण करण्यासाठी काही वेळ मर्यादा आणि गेल्या तीन वर्षात आणि चालू वर्षात, विशेषत: महाराष्ट्रात, पी. एम. जी. एस.वाय.



अंतर्गत बांधलेल्या रस्त्यांच्या लांबी (किमी मध्ये) तपशील याबाबत माहिती मागीतली. यावर राज्यमंत्री कमलेश पासवान यांनी सांगीतले की, प्रधानमंत्री ग्रामीण सडक योजने अंतर्गत राज्य सरकार जिल्हा आणि उपजिल्हा पातळीवर हे निधी वाटप करते. पीएमजीएसवाय अंतर्गत, राज्यांना त्यांच्या मंजूर कामांच्या आधारावर तसेच मागील वर्षाच्या निधीतून त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या अप्रयुक्त शिल्लक आणि कार्यक्रम मार्गदर्शक तत्त्वांचे पालन या आधारावर निधी वाटप केला जात आहे.

### अपुरा निधी : खा. वानखडे



पंतप्रधान ग्रामीण सडक योजने अंतर्गत केंद्र शासनाने ४ हजार ४४५.६४ कोटी रूपयाचा निधी वाटप केला आहे. ज्यामध्ये अमरावती जिल्ह्याला केवळ १३६.८५ कोटी रू. चा निधी मिळाला आहे. अमरावती जिल्ह्याचा विचार करता हा निधी अपुरा आहे. सध्या राज्य महामार्ग व जिल्ह्यातील प्रमुख शहारांना जोडणाऱ्या मुख्य रस्त्यांचे सिमेंटीकरण करण्याचा प्रस्ताव आहे. शहर ते तालुका व तालुका ते ग्रामीण असे रस्ते विकास पाहता १३६ कोटी रूपयाचा निधी अपुरा ठरणारा आहे. याबाबत आपण राज्य व केंद्र शासनाला अमरावती जिल्ह्यातील रस्ते विकासाची माहीती देत अतिरिक्त निधी प्राप्त करण्यावर भर देणार असल्याचे मत खा. बळवंत वानखडे यांनी व्यक्त केले.

# काँग्रेसची महानगरपालिका निवडणुकी संदर्भात आढावा बैठक

अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**अमरावती,दि. २३ :** येत्या अमरावती महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शहरातील काँग्रेस पक्षाची रणनीती निश्चित करण्यासाठी आणि पक्ष संघटन बळकट करण्याच्या उद्देशाने अमरावती शहर (जिल्हा) काँग्रेस कमिटीच्या वतीने एक अतिशय महत्त्वाची आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती.या बैठकीत शहरातील प्रत्येक प्रभाग व वार्डामध्ये पक्षाची बांधणी मजबूत करण्याबाबत सविस्तर चर्चा होणार असून,निवडणुकीच्या दृष्टीने रणनीती ठरविण्यात आली आहे.शहर काँग्रेसचे सर्व



पदाधिकारी,कार्यकर्ते यांचे सह प्रमुख नेते म्हणून डॉ.सुनील देशमुख, बबलु शेखावत, विलास इंगोले, माजी महापौर मिलिंद चिमोटे, भैय्या पवार, आसिफ तवक्कल, जयश्री वानखडे, नीलेश गुहे, वैभव देशमुख, अब्दुल रफीक पत्रकार, नसीम खान पप्पू, फिरोज शाह प्रामुख्याने मंचावर या बैठकीस उपस्थित होते. सदर बैठकी दरम्यान अमरावती शहर काँग्रेस कमिटीचे महासचिव संजय बोबडे यांची नियुक्ती उपस्थित नेत्यांच्या हस्ते अमरावती शहर काँग्रेस कमिटीच्या ब्लॉक क्रमांक 5 च्या अध्यक्ष पदी करण्यात आली.तसेच मोहम्मद शरीफ शेख हबीब यांची नियुक्ती अमरावती शहर काँग्रेसच्या संघटन सचिव यापदी करण्यात आली.सदर बैठकीचे सूत्र संचालन व आभार प्रदर्शन विनोद मोदी आणि सलीम मिरावाले यांनी केले.याप्रसंगी प्रामुख्याने संजय वाघ,राजीव भेले, अभिनंदन पेंढारी, दीपक हुंडीकर, सलीम बेग,धीरज हिवसे, गजानन जाधव,शोभा शिंदे, सुनीता भेले, देवयानी कुर्वे, मैथिली पाटील,वंदना थोरात, अनीला काझी,आसमा परवीन, अपर्णा मकेश्वर,कल्पना शेवतकर, शिल्पा राऊत अंजली उघडे ,लक्ष्मी अहिरे, पूजा वानखडे,अर्चना बोबडे, राजश्री कुत्तरमारे, भारती पाटील, उषा पाटील, विनिता कांबळे,रवींद्र इंगोले, अब्दुल रऊफ, अफजल चौधरी आदि उपस्थित होते.



# वृक्षारोपणातून पर्यावरण संवर्धनाचा संदेश

अजिंक्य भारत |प्रतिनिधी

**धामणगाव रेल्वे, दि.२३ :** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर गौरव अभियानाच्या अंतर्गत आज अंजनसिंघी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेमध्ये वृक्षारोपणाचा कार्यक्रम उत्साहात पार पडला.

या कार्यक्रमाला तहसीलदार अभय घोरपडे, वन परिक्षेत्र अधिकारी विनोद कोहळे, गट शिक्षणाधिकारी भोगावकर यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी शाळेतील विद्यार्थ्यांनी आणि शिक्षकांनी मिळून लिंब, अशोक, पिंपळ आदी रोपांची लागवड केली. कार्यक्रमाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांच्या सहभागातून वृक्षदिंडीही काढण्यात आली, ज्यामध्ये पर्यावरण जागृतीचे संदेश देण्यात आले. या उपक्रमाचा उद्देश स्थानिक नागरिकांमध्ये पर्यावरण रक्षणाची जाणीव निर्माण करणे हा आहे. धामणगाव तालुक्यामध्ये जिल्हाधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर गौरव अभियान राबवले जात असून, यामध्ये महिला सक्षमीकरण, गतिमान आणि उत्तरदायी प्रशासन, तसेच पर्यावरण रक्षण यावर विशेष भर दिला जात आहे. तालुक्यात १० हजार वृक्ष लागवडीचे महत्त्वाकांक्षी लक्ष्य ठेवण्यात आले असून, जिल्हा परिषद शाळा तसेच सामाजिक संस्थांच्या माध्यमातून हा उपक्रम व्यापक स्वरूपात राबवला जाणार आहे. या उपक्रमात तालुक्यातील सर्व सामाजिक संस्थांनी सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन तहसीलदार अभय घोरपडे यांनी यावेळी केले.

# राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेसाठी जिल्ह्यातील दोन खेळाडूंची निवड

**कबड्डी असो. विदर्भ संघ करणार विदर्भाचे नेतृत्व | अमरावतीच्या शिरपेचात मानाचा तुरा**

अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**अमरावती, दि. २३ :** चंदीगड येथे २५ ते २८ जुलै दरम्यान आयोजित ७२ व्या वरिष्ठ गट पुरुष व महिला राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेसाठी अमरावती जिल्ह्यातील दोन खेळाडूंची विदर्भ संघात निवड झाली आहे. ही निवड अमरावती जिल्ह्याच्या कबड्डी क्षेत्रासाठी अत्यंत अभिमानाची बाब आहे.अम्यूचर कबड्डी फेडरेशन ऑफ इंडियाच्या संलग्नित असलेल्या कबड्डी असोसिएशन विदर्भ संघ नागपूर यांच्या वतीने या स्पर्धेसाठी अनमोल गजभिये व संजना गायगवई यांच्या नावाची निवड करण्यात आली आहे.हे दोघेही सप्तरंग क्रीडा मंडळ नांदगाव पेठ येथील खेळाडू असून यांच्या निवडीमुळे अमरावती जिल्ह्याच्या शिरपेचात आणखी मानाचा तुरा खोवला गेलेला आहे.



महानगर कबड्डी असोसिएशन अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने ४ ते ६ जुलै दरम्यान विभागीय क्रीडा संकुल अमरावती येथे पार पडलेल्या राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेमध्ये दर्जेदार सामने खेळणाऱ्या खेळाडूंची कबड्डी असोसिएशन विदर्भ संघ यांनी राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेसाठी निवड केली असून यामध्ये सावर्डी येथील अनमोल गजभिये आणि नांदगाव पेठ येथील संजना गायगवई या दोन्ही खेळाडूंचा समावेश आहे. सप्तरंग क्रीडा मंडळाच्या माध्यमातून हे दोन्ही खेळाडू विविध राज्यस्तरीय सामन्यात खेळलेले असून राष्ट्रीय स्तरावर खेळण्याची ही महत्वपूर्ण संधी त्यांना मिळालेली आहे.

अनमोल गजभिये,संजना गायगवई यांच्या निवडीमुळे कबड्डी तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांनी त्यांचे कौतुक केले असून चंदिगड येथे होणाऱ्या राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेसाठी त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या. कबड्डी असोसिएशन विदर्भ संघ नागपूर ची टीम मंगळवारी चंदीगड साठी रवाना झाली असून त्यांना अमरावती महानगर कबड्डी संघ असोसिएशनचे अध्यक्ष विवेक गुल्हाने,कार्याध्यक्ष संदीप इंगोले व उपाध्यक्ष अतुल इंगोले, योगेश भोसले, कोषाध्यक्ष मिलिंद पाटील सचिव नितीन सराफ तसेच गणेश वरुडकर राजेश गाडे,अजय पुसतकर धनराज यादव,सप्तरंग क्रीडा मंडळाचे अध्यक्ष राजेंद्र तुळे निलेश सराफ, संतोष चिखलकर आदींनी विजयाच्या शुभेच्छा दिल्या आहेत.

# स्व. दिगंबरराव पेटकर स्मृतिदिन साजरा

अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**अंजनगाव सुर्जी, दि. २३ :** लोककल्याणासाठी स्वत:च्या शरीराचा क्षण न् क्षण आणि वेळेचा कण न् कण खर्ची घालणारे, समर्पित व्यक्तिमत्व स्व. दिगंबरराव पेटकर यांचा स्मृतिदिन आज अंजनगाव सुर्जी येथील पेटकर आश्रम शाळेत मोठ्या आदराने साजरा करण्यात आला. दर्यापूर मतदार संघाचे आमदार गजानन लवटे यांनी यावेळी स्व. दिगंबरराव पेटकर यांच्या लोकसेवा वृत्तीची प्रशंसा करत त्यांना श्रद्धांजली वाहिली.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे सचिव तथा अचलपूर पंचायत समितीचे माजी सभापती देवेंद्र पेटकर होते. प्रमुख अतिथी म्हणून आमदार गजानन लवटे यांच्यासह शिवसेना उप जिल्हाप्रमुख महेंद्र दिपटे, प्रविण पेटकर अध्यक्ष स. ब. संस्था शिंदी बु संस्थेचे उपाध्यक्ष प्रदीप हाडोळे, सदस्य




कैलास दमाहे, स.ब. संस्था शिंदी विठ्ठलराव नागतोडे, ज्येष्ठ मार्गदर्शक माळी महासंघ अमोल गुरनुले, विदर्भ प्रदेश प्रवक्ते माळी महासंघ प्रदीप देशमुख, सौ. प्रियांका दाळू, श्रीकांत पोटदुख, सौ. जयश्रीताई पोटदुखे सरपंच ग्रा. पं .विहीगाव ललित ढेपे, चंद्रशेखर देशमुख, सुरज पवार, सुरेशराव तायडे, अश्विनीताई पेटकर मुख्याध्यापिका ख दि पे विद्यालय शिंदी सविताई पेटकर, आणि नयनाताई हाडोळे मुख्याध्यापिका स्व दि पे आश्रम शाळा, मनोज मेळे आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. वर्षा गहुकर यांनी केले, तर आभार प्रदर्शन अमोल हाडोळे अधिक्षक यांनी केले. आमदार गजानन लवटे यांनी आपल्या भाषणात स्व. दिगंबरराव पेटकर यांच्या समाजसेवेतील योगदानाला उजाळा दिला. पेटकर आश्रम शाळेच्या विद्यार्थ्यांनी आणि शिक्षकांनी यावेळी स्व. दिगंबरराव पेटकर यांच्या जीवनावर आधारित विविध कार्यक्रम सादर केले. त्यांच्या प्रेरणादायी कार्यामुळे अनेक गरजूंना मदत मिळाली असून शिक्षण आणि समाजसेवेत त्यांनी दिलेल्या योगदानाचे स्मरण याप्रसंगी करण्यात आले.

# तीन किलो गांजा पोलिसांनी केला जप्त

**अमरावती :** नागपुरी गेट पोलिसांच्या पथकाने पेट्रोलिंग दरम्यान संशयाच्या आधारे एका युवकाला पकडले. त्याच्या जवळील बॅगची तपासी केली असता, त्यात २.०७० किलो गांजा सापडला. दरम्यान पोलीस बॅगची तपासणी आती असताना युवकाने तेथून पळ काढला. जप्त केलेल्या गांजाची अंदाजे किंमत ५० हजार रुपये आहे. याबाबत पोलिसांनी मो. शारिक मो. शाकीर (२४, रा. परतवाडा) याच्याविरुद्ध एनडीपीएस अंतर्गत गुन्हा दाखल केला असून पुढील तपास नागपुरी गेट पोलीस करीत आहे. पोलिस दिसतास आरोपी हा गांजाची बॅग टाकून पडून गेला. मात्र पोलिसांनी गांजाची बॅग ताब्यात घेतली असून पोलिस त्या आरोपीचा शोध घेत आहे.

# पाच ठाणेदारांना पोलिस आयुक्तांची शोकॉज नोटिस

## गुन्हेशाखा कारवाईचा परिणाम

## पोलिस आयुक्त ॲक्शन मोडवर

अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**अमरावती, दि. २३ :** शहरातील वाढते गुन्हे, अवैध धंद्यांची वाढती प्रकरणं आणि गुन्हे शाखेच्या सातत्याने होणाऱ्या धडाकेबाज कारवाया... आणि या सगळ्याच्या पार्श्वभूमीवर ठाणेदार मात्र कोमात! अशा निष्क्रिय पोलिस ठाण्यांवर आता पोलिस आयुक्त अरविंद चावरिया यांनी थेट कारवाईचा बडगा उगारला आहे. गुन्हे शाखेला दिसणारे गुन्हे तुम्हाला का दिसत नाहीत? या सडेतोड प्रश्नात त्यांनी पाच पोलिस ठाण्यांच्या प्रमुखांना फटकारत थेट 'शो कॉज नोटीस' बजावण्याचा आदेश दिला आहे. गुन्हे शाखेने अवैध धंद्यावर धाड सत्र शुरू केले होते. या कारवाई मुळे पोलिस आयुक्तालयातील पाच ठाणेदारांना चांगलेच खडसावले आहे. त्यामुळे अनेक अधिकाऱ्यांचे धाबे दनानले आहे.

गुन्हे शाखेच्या युनिट्सनी गेल्या काही दिवसांत राजापेठ, गाडगेनगर, कोतवाली, नागपुरी गेट आणि नांदगाव पेठ हद्दीत मोठ्या प्रमाणावर कारवाई केली. स्पाच्या आड चालणारी देहविक्री, बनावट दारू विक्री, एमडीसारख्या अंमली पदार्थांची तस्करी, ऑनलाइन - जुगार रॅकेट या सगळ्यावर 'क्राइम ब्रँच' ने धडक दिली. पण स्थानिक ठाण्यांना काहीच माहिती नव्हती ह्व किंवा मुद्दाम दुर्लक्ष?



राजापेठमधील एका नामांकित स्पावर

२० जुलै रोजी छापा टाकण्यात आला. देहविक्रीचा पर्दाफाश झाला. अल्पवयीन मुलींना मद्यपुरवठा, हे ठिकाण राजापेठ ठाण्याच्या हद्दीत, पण पोलिस अनभिज्ञ ही धक्कादायक बाब सीपी चावरिया यांच्या लक्षात आल्यानंतर, त्यांनी राजापेठ डीबी स्कॉडवर संशय व्यक्त केला. ही

> “आयुक्तांचा इशारा झोपेचे सोंग नको! गुन्हे शाखेने जी ठोस कारवाई केली, ती स्थानिक ठाण्यांनी का केली नाही? आता केवळ विचारणा नाही, थेट उत्तरं लागतील. आयुक्तालयातील पाच ठाणेदारांना या कारवाईबाबत जाब विचारले जाणार आहे
>
> **अरविंद चावरिया, पोलिस आयुक्त**

केवळ दुर्लक्ष नव्हे, तर मुद्दाम डोळेझाक असा ठपकाच जवळपास ठेवण्यात आला असून, डीबी स्कॉडवर 'विड्रॉल'ची कारवाई होण्याची शक्यता आहे. आयुक्तांनी स्पष्ट शब्दांत ठाणेदारांच्या निष्क्रियतेवर नाराजी व्यक्त केली आहे. पहिल्या टप्प्यात पाच ठाणेदारांना कारणे दाखवा नोटीस पाठवण्यात येणार असून, यानंतर इतर ठाण्यांवरही कारवाई होण्याची शक्यता आहे.

## थोडक्यात



### पिशवी कापून पळविलेली रक्कम महिलेला सुपूर्द

**घाटंजी :** शहरातील बँक परिसरातून महिलेची पिशवी कापून भरदिवसा चोरलेली एक लाख रुपयांची रक्कम अवघ्या २४ तासांत हस्तगत करण्यात घाटंजी पोलिसांना यश आले आहे. सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे तपास करत पोलिसांनी चार संशयितांना अटक केली असून, अप्पर पोलिस अधीक्षक अशोक थोरात यांच्या उपस्थितीत पीडित महिलेला रक्कम परत करण्यात आली. शहरातील पांढुर्णा येथील रहिवासी असलेल्या साधना किशोर ठावरी यांनी ४ जुलै रोजी स्टेट बँकेतून रक्कम काढली होती. त्या ग्राहक सेवा केंद्रावर गेल्या असता, अज्ञात चोरट्यांनी त्यांच्या पिशवीचा तळ कापून एक लाख रुपये लंपास केले. याप्रकरणी गुन्हा दाखल होताच पोलिस निरीक्षक केशव ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक विनाश जाधव, सहाय्यक फौजदार रत्नाकर सलामे, दिनेश जाधव, निलेश घोसे आणि अरविंद चेमटे यांच्या पथकाने तपासचक्रे गतिमान केली. सीसीटीव्ही व गुप्त माहितीच्या आधारे पथकाने पांढरकवडा येथील टिपाई लॉजवर छापा टाकून चार संशयितांना ताब्यात घेतले. त्यांनी गुन्ह्याची कबुली दिल्यानंतर चोरलेली रक्कम जप्त करण्यात आली. १८ जुलै रोजी अप्पर पोलिस अधीक्षक अशोक थोरात यांच्याहस्ते ठावरी यांना ही रक्कम सुपूर्द करण्यात आली.



### शैक्षणिक साहित्याचे केले वाटप

**घाटंजी :** तालुक्यातील एकल महिलांच्या मुला-मुलींच्या शिक्षणाला बळ देण्यासाठी आधार बहुउद्देशीय संस्थेने पुढाकार घेतला आहे. संस्थेच्या वतीने आयोजित एका कार्यक्रमात या विद्यार्थ्यांना दप्तर, वह्या, पुस्तके अशा शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. एकल महिलांच्या पाल्यांना शिक्षणाच्या प्रवाहात टिकवून ठेवणे हा यामागील उद्देश आहे. येथील भुरगाटे ले-आऊटमध्ये झालेल्या या कार्यक्रमाचे आयोजन 'साऊ एक महिला संघटना'चे राज्य संघटक हेरंब कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. यावेळी प्रहार शिक्षक संघटनेचे राज्य प्रवक्ते कुलदीप डंभारे, सामाजिक कार्यकर्ते अरुण कांबळे आणि आधार संस्थेचे अध्यक्ष नंदकिशोर डंभारे यांची प्रमुख उपस्थिती होती. वक्त्यांनी आपल्या मनोगतात एकल महिलांच्या सक्षमीकरणाचे आणि त्यांच्या मुलांच्या उज्ज्वल भविष्यासाठी समाजाने एकत्र येण्याचे आवाहन केले. राज्यस्तरावर एकल महिलांसाठी रोजगार निर्मितीचे मोठे नेटवर्क उभारण्यात येत असल्याचेही सांगण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन राजश्री राऊत यांनी केले. या कार्यक्रमाला अनेक एकल महिला आणि त्यांची मुले उपस्थित होती.

### कर्करोगग्रस्त रुग्ण महिलेला खासदार देशमुखांचा मदतीचा हात

**पुसद :** अंडाशयाच्या कर्करोगाने ग्रस्त असलेल्या येथील



अस्मिता अमित डुबेवार यांना खासदार संजय देशमुख यांच्या समयोचित प्रयत्नांमुळे पंतप्रधान राष्ट्रीय सहायता निधीतून तीन लाख रुपयांची तातडीची आर्थिक मदत मंजूर झाली आहे. यामुळे आर्थिक विवंचनेत सापडलेल्या डुबेवार कुटुंबीयांना मोठा दिलासा मिळाला असून, त्यांच्या उपचारातील मोठा अडथळा दूर झाला आहे. अस्मिता डुबेवार यांच्यावर नागपूर येथील ओकार्ड रुग्णालयात उपचार सुरू आहेत. डॉक्टरांनी त्यांना 'हायपरथर्मिक इंट्रापेरिटोनियल केमोथेरपी' या अत्याधुनिक उपचाराची गरज असल्याचे सांगितले होते. त्यासाठी सुमारे आठ लाख रुपयांचा खर्च अपेक्षित होता. मात्र, डुबेवार कुटुंबाची आर्थिक परिस्थिती अत्यंत बेताची असल्याने एवढी मोठी रक्कम उभी करणे त्यांच्यासाठी अशक्य होते. या कठीण परिस्थितीत त्यांनी मदतीसाठी खासदार संजय देशमुख यांच्याकडे धाव घेतली. खासदार देशमुख यांनी या प्रकरणाचे गांभीर्य ओळखून तातडीने सूत्रे हलवली. त्यांनी आपले स्वीय सहायक गजानन कदम यांना या प्रकरणी त्वरित कार्यवाही करण्याचे निर्देश दिले. गजानन कदम यांनी देखील क्षणाचाही विलंब न लावता सर्व आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करत पंतप्रधान राष्ट्रीय सहायता निधीकडे मदतीचा प्रस्ताव सादर केला. केवळ प्रस्ताव सादर करून न थांबता, त्यांनी ही मदत लवकरात लवकर मंजूर व्हावी, यासाठी सातत्याने पाठपुरावा केला. अखेर खासदार देशमुख आणि कदम यांच्या एकत्रित प्रयत्नांना यश आले आणि डुबेवार यांच्या उपचारासाठी तीन लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला. या मदतीमुळे एका रुग्णाला जीवनदान मिळाले असून, एका लोकप्रतिनिधीने दाखवलेल्या सामाजिक जाणिवेचे आणि तत्परतेचे हे उदाहरण ठरले आहे. डुबेवार कुटुंबीयांनी खासदार देशमुख आणि कदम यांचे मनःपूर्वक आभार मानले आहेत.

# रेमंड कामगारांचा संप कायमच

## व्यवस्थापन-कामगार भूमिकेवर ठाम, 'आधी करार, मगच काम'; वेतनवाढीच्या मागणीसाठी कामगार आक्रमक

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**



**यवतमाळ, दि. २३ :** यवतमाळ येथील रेमंड कंपनीतील कामगार आणि व्यवस्थापन यांच्यातील वेतनवाढ कराराचा तिढा तिसऱ्या दिवशीही सुटलेला नाही. मार्च २०२४ मध्ये करार संपूनही नवीन करार न झाल्याने कामगारांनी संप पुकारला आहे. 'आधी करार, मगच काम' या भूमिकेवर कामगार ठाम असल्याने कंपनी परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे.

येथील रेमंड कंपनीमध्ये प्रत्येक चार वर्षांनी कामगारांच्या आर्थिक वेतनवाढीसह इतर सवलतींसाठी व्यवस्थापन आणि कामगार संघटना यांच्यात चर्चा होऊन एक नवीन करार केला जातो. याच प्रथेनुसार, मागील चार वर्षांचा करार मार्च २०२४ मध्ये संपुष्टात आला. त्यानंतर नवीन करारासाठी व्यवस्थापनाने चालढकल केल्याचा आरोप कामगारांनी केला आहे. अनेक महिने उलटूनही नवीन वेतनवाढीवर शिक्कामोर्तब न झाल्याने अखेर कामगारांनी आंदोलनाचे शस्त्र उपसले. सोमवार, (दि. २१) रोजी दुपारी ३ वाजल्यापासून सर्व कामगारांनी एकमताने काम बंद आंदोलन सुरू केले. तेव्हापासून कंपनीच्या आवारातच कामगारांचे ठिय्या आंदोलन सुरू आहे. हा संप मिटवण्यासाठी व्यवस्थापनाने सोमवारी बैठका घेतल्या, मात्र त्या निष्फळ ठरल्या. मंगळवारी, (दि. २२) रोजी रेमंड कामगार संघटनेच्या वतीने शासकीय बैठक बोलावून तोडगा काढण्याचा प्रयत्न करण्यात आला, परंतु त्यातही यश आले नाही. दोन्ही बाजू आपापल्या भूमिकेवर ठाम असल्याने हा तिढा अधिकच गुंतागुंतीचा बनला आहे. या संपामुळे कंपनीचे उत्पादन पूर्णपणे थांबले असून, मोठे आर्थिक नुकसान होत आहे. जोपर्यंत व्यवस्थापन लेखी कराराला तयार होत नाही, तोपर्यंत संप मागे घेणार नाही, असा निर्धार कामगारांनी व्यक्त केला आहे.

### गाडे अडले कुठे?

कंपनीच्या धोरणानुसार, कामगारांनी आधी कामावर रुजू व्हावे आणि त्यानंतरच नवीन करारावर चर्चा करून तो अंतिम केला जाईल, असा प्रस्ताव व्यवस्थापनाने ठेवला आहे. मात्र, कामगार संघटनेने हा प्रस्ताव एकमताने फेटाळून लावला आहे. मागण्या मान्य होऊन करारावर शिक्कामोर्तब झाल्याशिवाय कंपनीत पाऊल ठेवणार नाही, अशी ठाम भूमिका कामगारांनी घेतली आहे. यामुळेच चर्चेच्या फेऱ्या निष्फळ ठरत असून, संभ्रम कायम आहे.

### मध्यस्थी निष्फळ

हा संप मिटवण्यासाठी प्रशासकीय पातळीवरही मोठे प्रयत्न झाले. जिल्हा पोलीस अधीक्षक कुमार चिंता आणि कामगार आयुक्त यांनी स्वतः कामगारांशी चर्चा करून त्यांना कामावर परतण्याचे आवाहन केले. मात्र, प्रशासनाच्या आवाहनाला प्रतिसाद न देता कामगारांनी आपला संप सुरूच ठेवला आहे. सोमवारी कंपनीने, तर मंगळवारी कामगार संघटनेने घेतलेल्या बैठकाही निष्फळ ठरल्याने हा तिढा अधिकच वाढत चालला आहे.

# गुटखा तस्करांवर थातुरमातूर कारवाई

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**यवतमाळ, दि.२३:** शहरात खुलेआम गुटख्याची विक्री होत आहे. अनेक ठिकाणी गुटख्याचे गोडाऊन आहेत. मात्र, याकडे पोलिस व अन्न व औषधे प्रशासन सोईस्करपणे दुर्लक्ष करीत आहेत.

कारवाईच्या नावासाठी केवळ एखाद्या गुटखा वितरण करणाऱ्याला ताब्यात घेऊन कारवाई केल्याचा आव आणला जात आहे. काल, बुधवारी रात्री नागपूर बायपासवर एका शोरूमच्या बाजूला असलेल्या ताडीयानगरातील रहिवासी रोहित हेमनानी (वय ३५ वर्षे)हा राज्य शासनाने प्रतिबंधित केलेला सुगंधित तंबाखू आपल्याजवळ बाळगून विक्री करीत असल्याची माहिती पोलिसांना मिळताच पोलिसांनी या ठिकाणी धाड टाकून दोन लाख ४० हजार ३७० रुपयांचा गुटखा जप्त केला आहे. या संदर्भात शहर पोलिसांनी सांगितले की, रोहित हेमनानी यांनी शासनाने प्रतिबंधित केलेला सुगंधी तंबाखूजन्य पदार्थ स्वतःजवळ ठेवून त्याची विक्री होता, याबाबतची माहिती पोलिसांच्या डीबी पथकाला मिळताच त्यांनी त्या ठिकाणी जाऊन धाड टाकली व सुगंधित तंबाखू ताब्यात घेतला. ही कारवाई रात्री नऊ वाजतादरम्यान करण्यात आली. याबाबतचा गुन्हा रात्री बारा वाजता दाखल करण्यात आला आहे.

# नेहरू महाविद्यालयात 'नशा मुक्त भारत' अभियान

## विद्यार्थ्यांनी घेतली व्यसनमुक्तीची शपथ, वाढत्या व्यसनाधिनतेला रोखण्याचा संकल्प

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**



**नेर. दि. २३ :** वाढती व्यसनाधीनता समाजासाठी धोक्याची घंटा असून, विद्यार्थ्यांनी शारीरिक व मानसिक संपन्नतेसाठी कोणत्याही व्यसनाच्या आहारी जाऊ नये, असे आवाहन नेर येथील नेहरू महाविद्यालयात आयोजित 'नशा मुक्त भारत' अभियानांतर्गत करण्यात आले. राष्ट्रीय सेवा योजना पथकाच्या वतीने आयोजित या विशेष कार्यक्रमात महाविद्यालयातील प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांनी अमली पदार्थांपासून दूर राहण्याची शपथ घेतली.

प्राचार्य डॉ. ए. एन. भोरजार यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. शांतरक्षित गावंडे यांनी प्रास्ताविक करून केली. त्यांनी कार्यक्रमाचा उद्देश स्पष्ट केला. आजचा तरुण व्यसनांपासून दूर राहावा आणि त्याने कोणत्याही अमली पदार्थाचे सेवन करू नये, हा यामागील मुख्य हेतू असल्याचे त्यांनी सांगितले. उपप्राचार्य डॉ. एस. व्ही. अरसोड यांनी विद्यार्थ्यांना चांगल्या सवयी आणि व्यासंग जोपासण्याचा संदेश दिला. तर, इतिहास विभागप्रमुख डॉ. एम. पी. गोमासे यांनी चांगल्या सवयीच व्यक्तीला ध्येयपूर्तीच्या दिशेने घेऊन जातात, असे मत मांडले. महिला कार्यक्रम अधिकारी डॉ. शीतल जाधव यांनी 'अभ्यासाचे व्यसन करा' असा मोलाचा सल्ला देत, रासेयोच्या विविध उपक्रमांची माहिती दिली. डॉ. एम. डी. वडते यांनी तरुणांच्या बदलत्या जीवनशैलीवर प्रकाश टाकला. या अभियानांतर्गत महाविद्यालयात वर्षभर विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार असल्याचेही यावेळी जाहीर करण्यात आले. कार्यक्रमाला डॉ. व्ही. डी. बोके, क्रीडा विभागप्रमुख डॉ. व्ही. ए. खोडस्कर, अर्थशास्त्र विभागप्रमुख डॉ. व्ही. पी. कुटे, प्रा. एफ. पी. सहाळा, प्रा. अहमर अब्बास खान, ग्रंथपाल प्रा. एस. के. इंगळे, प्रा. कोमल भाकरे यांच्यासह बहुसंख्य विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते.

# लोकमान्य टिळक जयंतीनिमित्त वणीत अभाविपतर्फे स्मारक स्वच्छता



**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**वणी, दि. २३ :** लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या जयंतीनिमित्त आज, बुधवारी (दि. २३) वणी येथे अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या वतीने टिळक स्मारकाची स्वच्छता करून त्यांना अभिवादन करण्यात आले. या उपक्रमातून स्वच्छतेचा संदेश देत राष्ट्रपुरुषांप्रती आदर व्यक्त करण्यात आला. यात अभाविपच्या पदाधिकाऱ्यांसह अनेक कार्यकर्त्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

अखिल भारतीय विद्यार्थी परिषद, वणी शाखेच्या कार्यकर्त्यांनी आज सकाळी एकत्र येऊन टिळक स्मारकाचा संपूर्ण परिसर स्वच्छ केला. त्यानंतर लोकमान्य टिळकांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. या उपक्रमात अभाविपच्या नगरमंत्री आयुषी फुलेवार, नगर उपाध्यक्ष चैतन्य तुरविले, जिल्हा संयोजक चेतन राऊत, जिल्हा संघटनमंत्री वैभव वाघमारे यांनी नेतृत्व केले. त्यांच्यासोबतच समय थोरात, शुभम दहिवलकर, वेदांत भोयर, मोनिका डुकरे, श्रेया वाडेकर, सुहानी जुमनाके आणि मानसी सहारे या कार्यकर्त्यांनी सक्रिय सहभाग घेतला. महापुरुषांच्या विचारांचा वारसा केवळ भाषणांपुरता मर्यादित न ठेवता, तो कृतीतून जपला पाहिजे, हा संदेश या माध्यमातून देण्यात आला. या उपक्रमाचे नागरिकांमधून कौतुक होत आहे.

# स्मॉल वंडर शाळेत 'एक पेड माँ के नाम'

## विद्यार्थी, पालकांचा वृक्षारोपणात उत्स्फूर्त सहभाग



**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**राळेगाव, दि. २३ :** तालुक्यातील वडकी येथील स्मॉल वंडर शाळेत 'एक पेड माँ के नाम' या अभियानांतर्गत विद्यार्थी, पालक आणि शिक्षकांच्या सहभागातून नुकतेच वृक्षारोपण करण्यात आले. शाळेच्या परिसरात शंभरहून अधिक झाडे लावून विद्यार्थ्यांनी पर्यावरण संरक्षणाची शपथ घेतली. वृक्ष दत्तक योजनेद्वारे लावलेल्या झाडांचे संवर्धन करण्याचे वचन यावेळी चिमुकल्यांनी दिले.

सोमवारी (दि. २१) पार पडलेल्या या उपक्रमात आंबा, कडुनिंब, चिकू, पिंपळ, सीताफळ, लिंबू, करंज, चाफा, मोगरा, गुलाब, चमेली, गुलमोहर आदी झाडांची लागवड करण्यात आली. पर्यावरण संतुलनासाठी वृक्षारोपणाशिवाय पर्याय नाही, असे मत प्राचार्य डॉ. मंजुषा सागर यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मयूर ताठे, जितेश गवळी, मानव राऊत, उदय लालसरे, शशांक येलके, अनुज कांबळे, आयुष मानकर यांनी महत्त्वपूर्ण कामगिरी बजावली. त्यांना अहमद शेख, शंकर मालखेडे, विजय फुलकर, नीता फुटाणे, अक्षय वानखेडे, दाते, वैभव कर्डे, रुबिना शेख या शिक्षकांनी मार्गदर्शन केले. यावेळी वृक्ष दिंडीचेही आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमात निवडक पालकही सहभागी झाले होते.

# भ्रष्टाचाराचा कळस; वर्षभरातच नवनिर्मित नाल्या आडव्या

## विकास निधी जातो कुठे, ग्रामस्थांचा संतप्त सवाल, ग्रामपंचायतीच्या कारभारावर प्रश्नचिन्ह

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**







**दिग्रस, दि. २३ :** तालुक्यातील सर्वात मोठ्या कलगाव ग्रामपंचायतीच्या कारभारात भ्रष्टाचाराने कळस गाठल्याचा गंभीर आरोप ग्रामस्थांनी केला आहे. गावात वर्षभरातच कोट्यवधी रुपये खर्चून बांधलेल्या नाल्या आडव्या पडल्या असून, इतर विकासकामेही निकृष्ट दर्जाची झाल्याने नागरिक त्रस्त झाले आहेत. या संपूर्ण प्रकरणाची वरिष्ठ अधिकाऱ्यांमार्फत चौकशी करण्याची मागणी आता जोर धरू लागली आहे.

'दिव्याखाली अंधार' या म्हणीप्रमाणे, तालुक्यातील सर्वात मोठी ग्रामपंचायत असूनही कलगाव विकासापासून वंचित राहिले आहे. गावातील वॉर्ड क्रमांक एक आणि दोनमधील श्रमिक वस्तीत आजही सिमेंट रस्ते नाहीत. येथील नागरिकांना पावसाळ्यात चिखल तुडवतच ये-जा करावी लागते. ग्रामपंचायतीने या भागात शंभर ब्रास मुरुम टाकण्याचे काम हाती घेतले, पण प्रत्यक्षात केवळ ६६ ट्रिप गाळमिश्रित वाळू टाकून नागरिकांच्या तोंडाला पाने पुसल्याचा आरोप होत आहे. ही केवळ एक घटना नसून, अनेक कामांमध्ये असाच 'धर-सोड' प्रकार सुरूआहे. नाली उपसा करण्यासाठी दिग्रस येथील कामगारांना ठेका देण्यात आला, मात्र त्यांनीही काम अर्धवट सोडून दिले आहे. त्यामुळे सांडपाण्याची समस्या गंभीर बनली आहे. सर्वात धक्कादायक बाब म्हणजे, याच वर्षी बांधण्यात आलेल्या नवीन नाल्यांची अवस्था अत्यंत दयनीय झाली आहे. या कामांमधील गैरप्रकार उघडकीस येऊनही प्रशासन डोळेझाक करत आहे. त्यामुळे, गटविकास अधिकारी आणि जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी या भ्रष्टाचाराची दखल घेऊन चौकशी करणार का, की हा गैरप्रकार असाच सुरूराहणार, असा संतप्त सवाल ग्रामस्थ विचारत आहेत. या संपूर्ण प्रकारामुळे गावातील नागरिकांमध्ये तीव्र असंतोष पसरला असून, प्रशासनाच्या भूमिकेकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### 'कागदोपत्री विकास'

शासनाकडून दरवर्षी लाखो रुपयांचा विकास निधी मिळूनही गावाचा विकास का होत नाही, असा प्रश्न ग्रामस्थ विचारत आहेत. रस्ते, नाल्या, कचरा व्यवस्थापन यांसारख्या मूलभूत सुविधांची दुरवस्था झाली आहे. निधीचा योग्य वापर होत नसल्यानेच गाव विकासापासून वंचित राहत आहे. याला जबाबदार असणाऱ्यांवर कठोर कारवाई झालीच पाहिजे, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. 'कागदोपत्री विकास' दाखवून मोठ्या प्रमाणात निधी हडप केला जात असल्याचा गंभीर आरोपही आता होऊ लागला आहे.

# वणी येथे तहसीलसमोर काँग्रेसचे धरणे आंदोलन

## संजय खाडे यांचे नेतृत्व, वणी विधानसभा क्षेत्रातील विविध समस्यांकडे वेधले लक्ष, नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग



दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**वणी, दि.२३: वणी विधानसभा क्षेत्रातील विविध समस्या, शेतकऱ्यांचे प्रश्न, शहरातील समस्या इत्यादींवर वणीत बुधवारी, दि. २३ जुलै रोजी तहसील कार्यालयासमोर काँग्रेसचे एकदिवसीय धरणे आंदोलन झाले. काँग्रेसचे जिल्हा सरचिटणीस संजय खाडे यांच्या नेतृत्वात हे आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात शेकडो कार्यकर्ते, समर्थक उपस्थित होते. यावेळी आंदोलकांनी जोरदार घोषणाबाजी करीत सरकार व प्रशासनाचा निषेध करण्यात आला.**

बुधवारी, दुपारी १२ वाजता तहसील कार्यालयासमोर धरणे आंदोलनाला सुरुवात झाली. आंदोलन मंडपी काँग्रेसच्या विविध स्थानिक नेत्यांनी भेट देत आपले मनोगत व्यक्त केले. त्यानंतर शेकडो आंदोलकांनी संजय खाडे यांच्या नेतृत्वात तहसील कार्यालयावर धडक दिली. आंदोलकांच्या प्रतिनिधींनी उपविभागीय अधिकारी यांना विविध मागण्यांचे निवेदन देत चर्चा केली. त्यानंतर कार्यालयासमोर आंदोलकांनी जोरदार घोषणाबाजी केली. वणी विधानसभा क्षेत्रात संततधार पावसामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. शासनाने तत्काळ सर्वे करून शेतकऱ्यांना एकरी एक लाख रुपये आर्थिक मदत द्यावी, रांगणा-भुरकी पाणीपुरवठा योजना कुचकामी ठरल्याने विहिरीचे बांधकाम करून या योजनेला एक्स्प्रेस विद्युत फीडर जोडण्यात यावे. प्रत्येक वॉर्डला दररोज स्वच्छ पाणीपुरवठा करावा. शहर व ग्रामीण भागात खंडित होणारा वीजपुरवठा सुरळीत करावा, कृषिपंपांना दिवसा १२ तास वीज द्यावी, पीकविम्याची रक्कम त्वरित जमा करावी, खते, बी-बियाण्यांचे दर कमी करावे, घरकुलासाठी रेती उपलब्ध करून द्यावी, यासह इतर मागण्या निवेदनातून मांडण्यात आल्या आहेत. आंदोलनात नरेंद्र ठाकरे, देविदास काळे, प्रशांत गोहकार, जयसिंग गोहोकर, राजाभाऊ पाथ्रडकर, विवेक मांडवकर, ओम ठाकूर, प्रमोद वासेकर, सुनील वरारकर, शंकर वऱ्हाटे, पुरुषोत्तम आवारी, उत्तमराव गेडाम, सुरेश रायपुरे, तेजराज बोढे, संगीता खाडे, नीलिमा काळे, वंदना आवारी, सविता रासेकर, साधना गोहकार, शारदा ठाकरे, अनंत डंबारे, अशोक चिकटे, रवी कोटावर, अनंत चौधरी, जगदीश चौधरी, राजू अंकितवार, डेव्हिड परकावार, अंकुश मापूर, प्रवीण बद्दमवार, आकाश बदकी, यादवराव काळे, विनोद गोडे, बापूराव चिनावार, संतोष आत्राम, लक्ष्मण खडसे, राजू पाटणकर, प्रेमनाथ मंगाम, प्रमोद लोणारे, सुरेश बनसोड, प्रफुल्ल उपरे, हाफिस शेख, रवी धानोरकर, हरिभाऊ काकडे, प्रवीण वैद्य, सोमनाथ मंगाम, राकेश खुराना, गौरीशंकर खुराना, धनराज सातपुते, मुरलीधर ठाकरे, भीमराव चिडे, प्रफुल्ल विखनकर, वसंता आसुटकर, नंदू आसुटकर, रवी धानोरकर यांच्यासह वणी, मारेगाव, झरी तालुक्यातील काँग्रेसचे पदाधिकारी कार्यकर्ते व शेकडो काँग्रेस समर्थक उपस्थित होते. या आंदोलनामुळे काँग्रेस कार्यकर्त्यांना नवचेतना मिळाली आहे.

### नागरिकांच्या समस्येसाठी अखेरपर्यंत लढू

**पावसाच्या अनियमिततेमुळे शेतकरी हवालदिल झाले आहेत. कुठे अपुऱ्या पावसामुळे तर कुठे पूर व अतीवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. वणीकरांना भर पावसाळ्यात पाणी समस्येला सामोरे जावे लागत आहे. नळाला येणारे पाणीही स्वच्छ नसल्याने नागरिक त्रस्त आहेत. शेतकरी, कष्टकरी व वणीकरांच्या हक्कांसाठी आम्ही शेवटपर्यंत लढत राहू. जर या समस्या सुटल्या नाहीत तर काँग्रेसतर्फे यापेक्षा मोठे आंदोलन केले जाईल.**

**-संजय खाडे,**
**जिल्हा सरचिटणीस काँग्रेस.**

## थोडक्यात

### चाकूचा धाक दाखवून लूटमार

**यवतमाळ:** बाभूळगाव येथील पेट्रोल पंपावर चाकूचा धाक दाखवून पेट्रोल भरून पैसे न देता पळून गेल्याची धक्कादायक घटना २० जुलै रोजी घडली. याप्रकरणी अभिजित लक्ष्मण मुरझडे यांनी पोलिसांत तक्रार दाखल केली आहे. तक्रारीनुसार, वैभव उर्फ जहरीला अंबादास जांभुळकर आणि कुणाल बापुराव चवरे यांनी फिर्यादीच्या गळ्याला चाकू लावला. त्यानंतर जबरदस्तीने पेट्रोल भरून घेतले आणि पैसे न देताच तेथून पळ काढला. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण पसरले असून, पोलिसांनी दोन्ही आरोपींविरुद्ध गुन्हा नोंद करून तपास सुरू केला आहे.

### 'अंडाराईस' दिला नाही म्हणून मारहाण

**यवतमाळ:** उधारीवर अंडाराईस देण्यास नकार दिल्याच्या क्षुल्लक कारणावरून एका युवकाला मारहाण करून जखमी केल्याची घटना मंगळवारी (दि. २२) येथे घडली. विशाल मुकिंदा मेश्राम यांच्या तक्रारीवरून शहर पोलिसांनी अक्षय पिल्लारे आणि पंकज पिल्लारे या दोघांविरुद्ध गुन्हा नोंदविला आहे. फिर्यादी आपल्या दुकानावर असताना आरोपींनी 'आम्हाला अंडाराईस उधार का देत नाही' असे म्हणत वाद घातला. त्यानंतर शिवीगाळ करत मारहाण केली. या घटनेनंतर परिसरात खळबळ उडाली असून, पोलीस पुढील तपास करत आहेत. शहरात गत काही दिवसांपासून क्षुल्लक कारणांवरून शरीर दुखापतींच्या घटनांमध्ये कमालीची वाढ झाली आहे.

# ययाती नाईक यांचा भाजपमध्ये प्रवेश

## पुसदच्या नाईक घराण्याला धक्का; समीकरणे बदलणार

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी



**यवतमाळ, दि.२३:** महाराष्ट्रातील पुसदच्या प्रतिष्ठित नाईक राजकीय घराण्याचे वंशज आणि राज्याचे माजी कॅबिनेट मंत्री मनोहरराव नाईक यांचे पुत्र ययाती नाईक यांनी मंगळवारी (दि. २२) दिल्लीत छोटेखानी कार्यक्रमात भारतीय जनता पक्षात प्रवेश केला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वावर विश्वास व्यक्त करत त्यांनी नवी दिल्ली येथील भाजपच्या राष्ट्रीय कार्यालयात हा पक्षप्रवेश केला. या घटनेमुळे राज्याच्या राजकारणात, विशेषतः यवतमाळ जिल्ह्यात मोठी खळबळ उडाली आहे.

ययाती नाईक हे राज्याचे माजी मुख्यमंत्री दिवंगत वसंतराव नाईक यांचे नातू, माजी मुख्यमंत्री दिवंगत सुधाकरराव नाईक यांचे पुतणे आणि विद्यमान राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांचे ज्येष्ठ बंधू आहेत. नाईक घराण्यासारख्या काँग्रेस विचारसरणीच्या कुटुंबातील सदस्याने भाजपमध्ये प्रवेश केल्याने राजकीय वर्तुळात अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत. भाजपचे राष्ट्रीय सरचिटणीस अरुण सिंग यांच्या हस्ते ययाती नाईक यांनी पक्षप्रवेश केला. यावेळी भाजपचे राष्ट्रीय सचिव डॉ. अरविंद मेनन, राज्यसभा सदस्य सुधांशू त्रिवेदी आणि राष्ट्रीय कार्यालय अधीक्षक सर्वेंद्र सिंह ठाकूर यांची प्रमुख उपस्थिती होती. या पक्षप्रवेशावेळी उपस्थित नेत्यांनी ययाती नाईक यांचे पक्षात स्वागत करून अभिनंदन केले. ययाती नाईक यांच्यासारखा मोठा राजकीय वारसा असलेला तरुण नेता भाजपमध्ये आल्याने महाराष्ट्रात पक्ष संघटना अधिक मजबूत होईल, असा विश्वास भाजप नेत्यांनी व्यक्त केला आहे. ययाती नाईक यांच्या प्रवेशामुळे आगामी काळात राज्यातील राजकीय समीकरणे बदलण्याची शक्यता वर्तवली जात आहे. त्यांच्या या निर्णयामुळेनाईक कुटुंबात राजकीय फूट पडल्याचे स्पष्ट झाले असून, याचे दूरगामी परिणाम राज्याच्या राजकारणावर होण्याची चिन्हे आहेत. महाराष्ट्रात लवकरच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होणार असून त्यापूर्वीच ययाती नाईक यांनी भाजपात प्रवेश केल्याने किमान पुसद परिसरातील राजकीय समिकरणे बदल्याची शक्यता वर्तविली जात आहे. या प्रवेशामुळे भाजपला पुसद विभागात निवडणूक लढणे सोपे होईल, असे मत राजकीय जाणकार व्यक्त करीत आहेत.

# आर्णीत आज प्रहारचे आंदोलन

**आर्णी, दि. २३ :** शेतकरी कर्जमाफीसह इतर प्रलंबित मागण्यांसाठी प्रहार जनशक्ती पक्षाने आज गुरुवारी (दि. २४) राज्यव्यापी चक्काजाम आंदोलनाची घोषणा केली आहे. पक्षाचे संस्थापक अध्यक्ष बच्चू कडू यांच्या नेतृत्वात हे आंदोलन होणार आहे. शासनाने कर्जमाफीचे लेखी आश्वासन देऊनही त्याचे पालन न झाल्याने प्रहारने हे आक्रमक पाऊल उचलले आहे. यापूर्वी कडू यांनी मोझरी येथे अन्नत्याग उपोषण आणि पाफळ ते चिलगव्हाण अशी १३८ किलोमीटरची पदयात्रा केली होती. याच आंदोलनाचा भाग म्हणून आर्णी तालुक्यात दाभडी रोडवरील पाण्याच्या टाकीजवळ सकाळी दहा वाजता रास्ता रोको केला जाईल. यात शेतकरी, दिव्यांग, कामगार, मच्छीमार व शेतमजुरांनी सहभागी व्हावे, असे आवाहन तालुका प्रमुख रवी जाधव यांनी केले आहे.

# यवतमाळात आज शेतकरी कर्जमाफीसाठी आंदोलन

## बिपिन चौधरी यांचा आंदोलनाचा इशारा

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि.२३:** शेतकरी कर्जमाफीच्या प्रमुख मागणीसाठी यवतमाळ शहरात गुरुवारी (दि. २४) 'चक्काजाम' आंदोलनाची घोषणा करण्यात आली आहे. प्रहारचे बिपिन चौधरी यांनी हे आंदोलन पुकारले असून, सकाळी ११ वाजता बसस्थानकाजवळील संविधान चौकात रास्ता रोको केला जाणार आहे.

पक्ष, जात, पात विसरून सर्वांनी शेतकऱ्यांसाठी एकत्र येण्याचे आवाहन त्यांनी केले आहे. शेतकऱ्यांच्या कर्जमाफीचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला असून, या मागणीसाठी यवतमाळात गुरुवारी, दि. २४ जुलै रोजी सकाळी ११ वाजता संविधान चौकात चक्काजाम आंदोलन आयोजित करण्यात आले आहे. प्रहारचे बिपिन चौधरी यांनी 'ना पक्षासाठी, ना जातीसाठी, एक व्हा मातीसाठी'अशी साद घालत या आंदोलनाची घोषणा केली. आपल्या शेतकरी बांधवांसाठी आता एकत्र येणे अत्यंत गरजेचे आहे, असे त्यांनी म्हटले. या आंदोलनात सर्व सामाजिक कार्यकर्ते, विविध संघटनांचे पदाधिकारी आणि राजकीय नेत्यांनी पक्षभेद विसरून मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे कळकळीचे आवाहन चौधरी यांनी केले आहे. या आंदोलनाच्या माध्यमातून शासनाचे लक्ष वेधून कर्जमाफीचा निर्णय घेण्यास भाग पाडण्याचा निर्धार शेतकऱ्यांनी व्यक्त केला आहे. या घोषणेमुळे प्रशासकीय यंत्रणा सतर्क झाली आहे.

## निधन

### जगन्नाथ नागभिडकर



**यवतमाळ:** वणी येथील निवासी असलेले आणि यवतमाळ येथील जगन्नाथ शिवराम नागभिडकर (वय ८५) यांचे बुधवारी, (दि. २३) दुपारी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर आज गुरुवारी (दि. २४) रोजी येथील पांढरकवडा मार्गावरील मोक्षधामात अंत्यसंस्कार करण्यात येणार आहे. जगन्नाथ नागभिडकर हे डॉ. प्रिया नागभीडकर (येडशीकर) यांचे वडील आहे. त्यांच्या पश्चात चार मुली, एक मुलगा असा आप्त परिवार आहे.

# गँगरेप प्रकरणाचा तपास; नागपूर पोलिस यवतमाळात!

## यवतमाळातील आणखी तीन आरोपी पोलिसांच्या रडारवर

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि.२३:** एका महाविद्यालयीन विद्यार्थिनीवर सहा आरोपींनी सामूहिक बलात्कार केल्याची धक्कादायक घटना दोन दिवसांपूर्वी उघडकीस आली होती. या प्रकरणात आत्तापर्यंत पोलिसांनी सहा आरोपींना अटक केली आहे. मात्र, अजूनही आरोपींची संख्या वाढण्याची शक्यता असल्याचे पोलिसांचे म्हणणे आहे.

नागपूर हुडकेश्वर पोलिस स्टेशन ठाणेदार ज्ञानेश्वर भेदोडकर तसेच पथक यवतमाळात दाखल झाले होते. त्यांनी स्थानिक गुन्हे शाखेच्या मदतीने आणखी तीन आरोपींचा शोध घेतला. तसेच आरोपींना सोबत घेऊन बाभूळगाव तालुक्यातील एका शेतात असलेल्या गोठ्यात ज्या ठिकाणी पीडितेवर अत्याचार केला, त्या गोठ्यात काम करणाऱ्या आरोपीला अटक करून पंचनामा करण्यात आला. सोशल मीडियावरून ओळख झालेल्या मुख्य आरोपीच्या घरी जाऊन पीडितीला मारहाण करणाऱ्या दोघांचा शोध घेण्यात आला. पीडितेवर सलग दोन दिवस सहा आरोपींनी अत्याचार केल्यानंतर तिला शेतातून बाहेर काढून रस्त्यावर सोडून देण्यात आले होते. दरम्यान, नागपूर पोलिस तिच्या मागावर असताना रस्त्याच्या कडेला ती पडून असल्याचे दिसून आले. दि. १६ जुलै रोजी ती पुन्हा बेपत्ता झाली होती. कुटुंबीयांनी शोधा-शोध केली असता ती सापडली नाही. अखेर कुटुंबीयांनी हुडकेश्वर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. या तक्रारीवरून गुन्ह्यात वाढ करण्यात आली आहे. पुन्हा गुन्ह्यात तांत्रिक बाबीवरून गुन्ह्यात वाढ होण्याची शक्यता आहे. 'हुडकेश्वर पोलिस ठाण्यात दाखल असलेल्या गँगरेप प्रकरणात गुन्ह्याची तीव्रता भयानक आहे. विशेष म्हणजे, या गुन्ह्यात आरोपींना २४ तारखेपर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे. या गुन्ह्यात आणखी आरोपी वाढण्याची शक्यता आहे, अशी माहिती ठाणेदार ज्ञानेश्वर भेदोडकर यांनी दिली.

# लेखी आश्वासनावर संघटना ठाम; रुग्णसेवेचे तीनतेरा

## आरोग्यमंत्र्यांसोबत चर्चा निष्फळ; नर्सिंग कर्मचाऱ्यांचा संप आठव्या दिवशीही कायम

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी



**यवतमाळ, दि.२३:** मागण्या मान्य केल्याचे लेखी आश्वासन मिळत नाही, तोपर्यंत संप मागे घेणार नाही, या भूमिकेवर महाराष्ट्र राज्य परिचारिका संघटना ठाम राहिली आहे. त्यामुळे शासकीय रुग्णालये आणि वैद्यकीय महाविद्यालयातील नर्सिंग कर्मचाऱ्यांनी पुकारलेला बेमुदत संप आठव्या दिवशीही सुरूच आहे. यामुळेयवतमाळ जिल्ह्यातील आरोग्य व्यवस्था पूर्णपणे कोलमडली असून रुग्णांचे प्रचंड हाल होत आहेत.

विविध प्रलंबित मागण्यांसाठी संघटनेने गेल्या आठ दिवसांपासून हे आंदोलन सुरू केले आहे. या संपाच्या सातव्या दिवशी आरोग्यमंत्री हसन मुश्रीफ यांनी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांसोबत चर्चा केली. यावेळी त्यांनी काही मागण्या मान्य केल्याचे सांगितले, मात्र त्याबाबत लेखी पत्र देण्यास नकार दिला. आर्थिक बाबींशी संबंधित मागण्यांवर अर्थमंत्र्यांशी चर्चा करूनच निर्णय घेतला जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले. यावर, जोपर्यंत सर्व मागण्यांविषयी सरकार लेखी स्वरूपात देत नाही, तोपर्यंत संप मागे घेणार नाही, अशी ठाम भूमिका संघटनेने घेतली आहे.

चर्चा निष्फळ ठरल्याने नर्सिंग कर्मचाऱ्यांनी संप सुरूच ठेवला आहे. या संपामुळे शासकीय आरोग्य यंत्रणेवर भीषण परिणाम झाला आहे. एक्स-रे, सोनोग्राफी आणि इतर महत्त्वाच्या तपासण्यांसाठी रुग्णांना पुढील तारखा दिल्या जात आहेत, तर अत्यवस्थ रुग्णांना उपचारासाठी थेट खासगी रुग्णालयांमध्ये पाठविण्याची वेळ प्रशासनावर आली आहे. जोपर्यंत शासनाकडून लेखी आश्वासन मिळत नाही, तोपर्यंत परिस्थिती अशीच गंभीर राहील, असा इशारा संघटनेचे यवतमाळ जिल्हाध्यक्ष सुरेश मदनकर यांनी दिला आहे. या संपामुळे सामान्य आणि गरीब रुग्णांची मोठी गैरसोय होत असून, त्यांच्या जीविताचा प्रश्न निर्माण झाला आहे. प्रशासनाने यावर तातडीने तोडगा काढावा, अशी मागणी जोर धरत आहे.

# उमेदवारांनी रोजगार, स्वयंरोजगाराच्या संधीचा लाभ घ्यावा!

## मंत्री प्रा. डॉ. अशोक उईके; जाजू महाविद्यालयात रोजगार मेळाव्यास उत्स्फूर्त प्रतिसाद, ११९ उमेदवारांची अंतिम निवड

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी




**यवतमाळ, दि.२३ :** युवकांच्या हाताला काम देणे शासनाचे प्राधान्याचे धोरण आहे. त्यामुळेच रोजगार मेळाव्याच्या माध्यमातून जास्तीत जास्त युवकांना रोजगार उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला जात आहे. जिल्ह्यातील जास्तीत जास्त युवकांनी रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन राज्याचे आदिवासी विकास मंत्री प्रा.डॉ. अशोक उईके यांनी केले.

जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र व जाजू कॉलेज ऑफ मॅनेजमेंट अँड कॉम्प्युटर सायन्सच्या संयुक्त विद्यमाने पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळाव्याचे आयोजन जाजू महाविद्यालयात करण्यात आले होते. त्यावेळी ते बोलत होते. मेळाव्याच्या उद्घाटन कार्यक्रमास अप्पर जिल्हाधिकारी अनिल खंडागळे, आमदार बाळासाहेब मांगुळकर, सहाय्यक आयुक्त प. भ. जाधव, जाजू कॉलेजचे अध्यक्ष प्रकाश जाजू, प्राचार्य रितेश चांडक, सचिव आशीष जाजू, कोषाध्यक्ष शिल्पा जाजू, प्रफुल्ल चौहान उपस्थित होते. पालकमंत्री संजय राठोड यांनी चित्रफितीद्वारे मेळाव्याला शुभेच्छा दिल्या. आमदार बाळासाहेब मांगुळकर यांनी सुद्धा उमेदवारांना पुढील भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. अप्पर जिल्हाधिकारी अनिल खंडागळे यांनी कोणतेही काम छोटे नसते. स्वतःमध्ये कौशल्य विकसित करा. छोट्या कामापासून सुरुवात केली तर मोठी संधी नक्कीच मिळते, असे सांगताना नोकरीच्या भरवशावर न राहता स्वतःमध्ये उत्तम कौशल्य विकसित करा व चांगले जीवनमान जगा असे सांगितले. मेळाव्यामध्ये १५ नामांकित कंपन्यामार्फत एकूण ४७० रिक्तपदाकरिता नोकरी इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती घेण्यात आल्या. मेळाव्यास ७०७ उमेदवारांनी उपस्थिती दर्शवून लाभ घेतला. त्यातील १९६ उमेदवारांची प्राथमिक तर ११९ उमेदवारांची अंतिम निवड करण्यात आली. त्यापैकी ४८ उमेदवारांना प्रत्यक्ष मुलाखतीच्या ठिकाणी नियुक्तीपत्र वितरित करण्यात आले आहे. मेळाव्याचे विशेष वैशिष्ट्य म्हणजे कौशल्य रोजगार उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगल प्रभात लोढा यांच्या निर्देशान्वये संपूर्ण राज्यात एकाचवेळी घेण्यात आला. मेळाव्यास राज्यमंत्री इंद्रनील नाईक, खासदार संजय देशमुख, जिल्हाधिकारी विकास मीना, मुख्य कार्यकारी अधिकारी मंदार पत्की, पोलिस अधीक्षक कुमार चिंता यांनी शुभेच्छा दिल्या. यावेळी अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ, प्रथम एज्युकेशन फाउंडेशन, इतर मागासवर्गीय वित्त विकास महामंडळ, खादीग्राम उद्योग महामंडळ, महात्मा फुले आर्थिक मागास विकास महामंडळ, वसंतराव नाईक वित्त विकास महामंडळाने आपल्या स्टॉलद्वारे विविध योजनांची माहिती उमेदवारांना दिली. मेळाव्यास आयटीआय प्रशिक्षणार्थी, विविध कौशल्य विकास प्रशिक्षण संस्थांमधील आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्रामधील प्रशिक्षणार्थी उपस्थित होते. सहायक आयुक्त प.भ.जाधव यांनी प्रास्ताविक केले. कार्यक्रमास जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन कार्यालयाचे सुचिता घाडगे, राहुल गुल्हाणे, नितीन खडसे, संदीप यादव, सुचित वाटगुरे, नीलेश भगत तसेच जाजू कॉलेजचे सर्व प्राध्यापक उपस्थित होते.

# आर्णीत रोजगार मेळाव्याला तरुणाईचा उत्स्फूर्त प्रतिसाद

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी



**आर्णी, दि.२३:** आर्णी येथे विविध शासकीय आणि सामाजिक संस्थांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या रोजगार आणि करिअर मार्गदर्शन मेळाव्यास तरुण-तरुणींचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या मेळाव्यात युवकांना रोजगाराच्या विविध संधींची माहिती देतानाच, मान्यवरांनी त्यांना यशस्वी आणि निरोगी आयुष्यासाठी मोलाचे मार्गदर्शन केले. आयुष्याचा शेवट सुंदर असला पाहिजे, असा संदेश यावेळी देण्यात आला.

शासनाच्या जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, मॉडेल करिअर सेंटर, स्व. राजकमलजी भारती महाविद्यालय आणि प्रेरणा बहुद्देशीय संस्थेच्या वतीने येथील भारती महाविद्यालयात हा उपक्रम राबविण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. वानखेडे होते. मार्गदर्शक म्हणून विष्णू उकंडे, डॉ. गणेश सव्वालाखे यांनी रोजगाराच्या संधी व निरोगी आयुष्याबाबत मार्गदर्शन केले, तर प्राचार्य डॉ. वानखेडे यांनी युवकांना संधीचे सोने करण्याचे आवाहन केले. दिनेश चव्हाण यांनी प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन पांडे यांनी केले. या मेळाव्याला मोठ्या संख्येने युवक-युवती उपस्थित होते.